# व्यक्तिमत्व विकास

## दिवाळी अंक 2022

शुभ दीपावली

अंतरीचा ज्ञानदिवा मालवू नको रे !



- संपादक -

श्री. मंगेश विठ्ठल कोळी.

# वर्ष : ७

स्वागत मूल्य : 300/-

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**साप्ताहिक**
व्यक्तिमत्व विकास

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**संपादक -**
श्री. मंगेश विठ्ठल कोळी.

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**कार्यकारी संपादक -**
डॉ. सुनिल दादा पाटील.

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**अतिथी संपादक -**
सौ. गायत्री लाड.

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**अक्षर जुळणी -**
कवितासागर फीचर्स, जयसिंगपूर

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**विशेष सहाय्य -**
श्री. गजेंद्र चित्रुक.
श्री. अमोल कोळी.
श्री. राज धुदाट.

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

या अंकात छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

## ...विशेष आभार...



**- मार्गदर्शक -**

**श्री. विठ्ठल आप्पा कोळी.**

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-



**- मुखपृष्ठ -**

**कु. प्रतिक्षा प्रकाश गुरव**

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

# ...अंतरंग...


- “शाळा भरली पाटी फुटली”../ सौ. गायत्री लाड....07
- ज्याचे त्याला कळे मन../ सौ. मंगला मधुकर रोकडे....14
- जीवनशैली बदला../ सुरेंद्र हरिचंद्रचंद्र नेमळेकर....15
- संगीत सृष्टीत../ तुकाराम पुंडलिक खिल्लारे....19
- पोपटपंची../ सचिन बेंडभर....20
- श्रावणमास../ विनोद जाधव....27
- समाधान हेच सर्वोत्तम ध्येय../ प्रा. रमेश कट्टीमणी....28
- संकटांचा ससेमिरा../ डॉ. शिवाजी नारायणराव शिंदे....30
- स्वत्व../ सुषमा जयसिंगराव माने-गावडे....31
- स्वच्छ नाही मन तर../ कल्पना मापुसकर....37
- एक अनुभव असाही../ सौ. मनीषा पिंटू वराळे....38
- सहल../ मुरहारी कराड....41
- उगंच्या उगचं../ वीरभद्र मिरेवाड....42
- दु:खाचा तुडवून उरं../ सुनील श्रीराम पवार....45
- शोध आणि बोध../ डॉ.भाऊसाहेब मिस्तरी....46
- अपंगत्व../ हेमंत मुसरीफ....47
- जगण्यासाठी आवश्यक जीवनमंत्र../ महेश भालचंद्रराव रायखेलकर....48
- शिक्षक म्हणजे../ प्राची परचुरे वैद्य....50
- नियती../ सौ स्नेहा साळुंके....51
- मी कोरडी../ उमा पाटील....52
- धुऱ्याचा धाक../ माधव जाधव....53
- अरे माणसा../ नरेंद्र अ. वाकोडे....61
- बापाचा रेडू../ अशोक कौतिक कोळी....62
- कृतज्ञता../ रविंद्र व्ही. चालीकवार....71
- खरा हिरा../ नंदकुमार पंडित वडेर....72
- सेल्फी../ उमेश प्रकाश साळुंके....75
- मैत्री, गुलामी की जहागिरी?../ भाग्यश्री रुले हिरे....76
- लळा जिव्हाळा../ मीता अशोक नानवटकर....78
- तार !../ प्रमोद वामन वर्तक....79
- बाबा../ डॉ. राजश्री राजगोंडा पाटील....82
- आत्मविश्वास../ सौ. श्रावणी पवार....83
- आई../ डॉ. मंदा भगवान पडवेकर....85

# - दिवाळी अंक २०२२ -


➲ माणूसकी एक चिंतन !../ सुमन जाधव........................................86
➲ मात../ मोहन सोनवणे........................................................88
➲ रक्षाबंधन../ सचिन कोरोचीकर................................................89
➲ चेहरा तुझा../ जयराम सिताराम मोरे.........................................93
➲ आयुष्य सुंदर आहे../ समीक्षा चव्हाण......................................94
➲ दिवाळी करावी साजरी../ राजेश लक्ष्मण वऱ्हाडे.............................95
➲ यशाबद्दल../ प्रा. व्यंकटेश सोळंके..........................................96
➲ वाळवी../ प्रा. शिवाजी जोगदंड.............................................100
➲ गुरूकुल शिक्षा पद्धति../ कुन्दन पाटिल..................................101
➲ मुल आपलंच../ किशोर कासारे................................................104
➲ निसर्गाची जोपासना व्हावी../ रमेश कृष्णराव लांजेवार.........................105
➲ घरोघरी तिरंगा../ उषा जोईल................................................109
➲ कबीरायन../ सौ. रश्मी कवीश्वर पिंप्रीकर......................................110
➲ मैत्री../ मिलिंद देविदास हिवराळे............................................113
➲ माझा आकाश कंदील../ प्रथमेश.भि. कुंभार...................................114
➲ शेतकरी../ मिना देवाजी सैंदाणे..............................................117
➲ बिघडत चाललेली पिढी../ रणजित शहाजी खिलारे................................118
➲ गझल../ प्रकाश रामचंद्र क्षीरसागर............................................120
➲ माईलस्टोन../ डॉ. संजय शेषराव कुलकर्णी.....................................121
➲ ज्ञानाचा दीवा../ श्री. हरिबा महादेव कोळी.....................................127
➲ पणती../ सौ. रुचिरा बेटकर..................................................128
➲ साथ../ गो. शि. म्हसकर.....................................................134
➲ शहाण्या माणसांचा क्लास../ डॉ. राजेश गायकवाड...............................135
➲ बीज बोऊ नव चैतन्याचे../ प्रा. मनीषा नाडगौडा................................139
➲ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण../ श्रीमती माणिक कल्लाप्पा नागावे.........................140
➲ हिरक रण../ डी.एन.मोरे......................................................143
➲ चारीमेरा../ डॉ. श्रीकांत श्री. पाटील..........................................144
➲ शब्दांच्या पलीकडे../ देवयानी शशिकांत म्हंकाळे.................................150
➲ वेध मनाचे../ प्रिती उदगावे...................................................151
➲ नव्या युगाचे भारतीय../ अमोलजी पाटील.......................................153
➲ ऊसकोंडी../ मनोहर भोसले....................................................154
➲ माझं कोकण../ शुभम मंगेश येरुणकर.........................................156
➲ जीवनातील छंदाचे महत्त्व../ श्रीम. अवसरमल वेरोनिका श्रीनिवास...................157
➲ पुन्हा वाट पाहत बसतो../ गोपाल ऋषीदास इंगळे.................................161
➲ गंप्या पोस्टमन../ संजय धनगव्हाळ............................................162

# - दिवाळी अंक २०२२ -


➲ संसार../ सौ. अमिता अरविंद घाटोळ..........167
➲ प्रलय../ डॉ. शीतल शिवराज मालूसरे..........168
➲ आम्ही फक्त ऐकणारे../ गणेश भाकरे..........174
➲ ओझं अपेक्षांचे../ शरणप्पा नागठाणे..........175
➲ फास../ दत्ता वालेकर..........180
➲ आजचा दिवस तिचा../ होरापंडित मयुरेश देशपांडे..........181
➲ पणती../ डॉ. शैलजा करोडे ..........184
➲ आपले व्यक्तिमत्व../ अरुण वि.देशपांडे..........185
➲ आली दिवाळी../ प्रा.भावना गांधिले..........187
➲ मला अभिमान, मी ललना../ सौ मनीषा चिंतामणी आवेकर..........188
➲ विटाळ../ संदीप पाटोळे..........191
➲ त्या वळणावर../ डॉ. अनिल कुलकर्णी..........192
➲ नव्या सूर्योदयाची आस../ श्यामसुंदर मिरजकर..........195
➲ जगूया सुंदर जीवन../ सौ. भारती दिलीप सावंत..........196
➲ विकृती../ प्रा. वर्षा विलास कावरे..........198
➲ एक दुर्लक्षित राजहंस../ राहुल बोर्डे ..........199
➲ स्त्री भ्रूणहत्या../ श्रुती शिवाजी चौधरी..........201
➲ श्रद्धा और सबुरी../ सुनिता तांबे..........202
➲ तिची उत्तुंग भरारी../ एकनाथ गायकवाड..........208
➲ मराठी माणसाची भाषिक जबाबदारी../ भूषण सहदेव तांबे..........209
➲ हट्ट../ बाबू फिलीप डिसोजा..........213
➲ सुखी जीवनासाठी कानमंत्र../ उद्धव भयवाळ..........214
➲ शिक्षा../ डॉ. बाळू ना. दुगडूमवार..........216
➲ पत्त्यांची शाळा संस्कारांचा मळा../ वंदना धर्माधिकारी..........217
➲ तू जगून बघ../ रमेश नागेश सावंत..........223
➲ ती काळरात्र आणि नवी पहाट../ प्रणाली पाटील..........224
➲ मी होतो पाऊस जेव्हा../ बाळासाहेब तोरस्कर..........227
➲ आपण सविस्तर बोलू या !../ संदीप काजळे..........228
➲ धाव, राजा धाव../ आनंद कदम..........234
➲ महत्त्व संस्काराचे../ डॉ. प्रवीणकुमार वैद्य..........234
➲ स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव../ अंजली पाटील..........240
➲ हे असं आहे../ काशिनाथ भारंबे..........241
➲ लोकसंख्या../ मोहन वैद्य..........242
➲ खंत../ विजय जोशी..........243
➲ प्रयत्न../ प्रा. संपतराव माणिकराव गर्जे..........244

# व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंकास
# उत्कृष्ट दिवाळी अंक पुरस्कार प्रदान

- कोल्हापूर

दिवाळी अंक स्पर्धा २०२० चा निकाल जाहीर 'आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक संघटना' आणि 'आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक संग्रहालय' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या दिवाळी अंक स्पर्धा २०२० चा निकाल प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर नुकताच जाहीर करण्यात आला आहे.




राज धुदाट यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. प्रत्येक वर्षी साजरा होणारा पुरस्कार वितरण सोहळा आणि दिवाळी अंकांच्या संपादकांचे एक दिवशीय विशेष अधिवेशन यावर्षी आयोजित केले जाणार नाही.

यास्तव दिवाळी अंक पुरस्काराचे प्रमाणपत्र भारतीय टपालाच्या द्वारे पुरस्कार प्राप्त दिवाळी अंकांना पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला; तसेच यावर्षी झालेल्या प्रदीर्घ जागतिक लॉकडाऊन आणि सामाजिकदृष्ट्या निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे दिवाळी अंक २०२० च्या निकालास विलंब लागला. मात्र सालाबादाप्रमाणे या वर्षीसुद्धा दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

११२ वर्षांची दिवाळी अंक परंपरा ही खास मराठी अभिरुचीचे प्रतीक आहे. दिवाळी अंकाची ही परंपरा वेगळ्या धाटणीत सुरु ठेवण्याचं काम आम्ही आनंदाने करत आहोत. ही परंपरा पुढेही अशीच सुरु राहील. अशी माहिती आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक संघटनेचे कार्यकारी संचालक डॉ. सुनील दादा पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

# “शाळा भरली पाटी फुटली”



## - अथिती संपादक

“शाळा सुटली पाटी फुटली आई मला भूक लागली...”

परंपरागत चालत आलेल्या या वाक्याचा अर्थ काळानुसार बदलत चाललाय असे मला वाटते. गेल्या २ वर्षातील शैक्षणिक क्षेत्रात झालेला बदल याची देही याची डोळा अनुभवत आहे. शिक्षक सोबत असूनही पुस्तक डिजिटल झाले आहे.

मागील दोन वर्षात शाळेला मोठी सुट्टी मिळाली. सुरवातीला या सुट्टीचे आफ्रुप वाटले. भीती असूनही आनंदाने सुट्टी घेता आली कारण एकंदरीच त्या वेळी परीक्षा काळ सुरु होणार होता आणि मुलांना सुट्टीचे वेध लागलेले होते. थोडी सुट्टी वाढली आणि मनाची चलबिचलता वाढली.

सगळ्या शाळांनी आपापल्यापरीने ऑफलाईन, ऑनलाईन पद्धतीचा वापर करून आपल्या मुलांना शिकत ठेवण्याचे प्रामाणिक प्रयत्न केले. सर्वसामान्य मुलांना हे सगळ सोयीचे गेले असेल पण विशेष गरज असणाऱ्या मुलांचे काय झाले असेल? असा प्रश्न मनात येऊन गेला. पण काही चांगली उदाहरण, मुलांची जिद्द आणि शिक्षकांची मेहनत यांचा चांगला परिणाम दिसत होता.

या सगळ्यात मुलांचा स्क्रीनचा वेळ वाढतो आहे, खेळायला मैदानात मुलं जात नाहीत, मुल एकटे पडते आहे, व्हर्चुअल जगात मुल रमत तर नाही ना? अशा शंका, काळजी वाटत असताना आत्ता कोणताही उपाय नाही, तर काय करणार असे म्हणून समाधान मानणारे पालक दिसत होते. मोबाईल, टीव्ही जास्त पाहू नको असे म्हणणारे वडीलधारी मंडळी आत्ता हा घे मोबाईल आणि बस अभ्यासाला. बऱ्याचदा तर मोठ्यांना काम करताना सवलत मिळावी म्हणून मोबाईलमध्ये मुलाला गुंतवून ठेवणे सोयीचे वाटत होते, अगदी लहान मुलं



ज्यांना खाऊ घालावे लागते त्यांना तर या स्क्रीनसमोर बसवून खाऊ घालणे सोयीचे वाटल्याने मोठ्यांकडून सुरवातीला हे कौतुक आणि नंतर सवयीचे झाले.

दुसऱ्याला दोष देणे खूप सोयीचे असल्याने जे घडत आहे त्यात दुसरे कसे चुकतात हे सांगण्यात सगळ्यांनी सहभाग घ्यायला सुरवात केली. आजकालची मुलं खूप हुशार आहेत आपण अभ्यासाला मोबाईल देतो आणि हे गेम खेळत बसतात. खेळायला जाता येत नाही म्हणून स्क्रीनचा वेळ वाढला आहे. या पद्धतीने स्वतःला समजावत वेळ काढण्याचा प्रयत्न सगळेच करत होते. असे अनेक करणे शोधत प्रतीक्षा संपली आणि दोन वर्षांनी शाळा सुरु झाल्या...

शाळा ह्या नेहमीप्रमाणे पण नवीन नियमांनी सुरु झाल्या. आनंद आणि भीती अशा संभ्रमात सगळेच होते. शिक्षकांना भीती होती मुलं शाळेत येतील का? पालकांना भीती होती मुलांना शाळेत पाठवले तर काही होणार तर नाही ना? मुलांना शाळेत जायचं होत पण आपले वर्गमित्र भेटतील का? या न अनेक शंकांनी मन भरले असताना शाळा हा जिव्हाळा वाटणारा आणि महत्वाचा टप्पा असल्यामुळे सुरवात करुया अशा मानसिकतेत सगळे होते.

शाळा सुरु झाल्या त्या वेगळ्याच नियमात त्यामुळे एक वेगळीच पद्धत पण गंमत होती त्यात. ज्या मुलांनी प्रत्यक्ष शाळा कधी पहिलीच नव्हती (वय ३ ते ६ वर्षे) यांचे रडण्याचे पारायण सुरूच होते. कोणी झाडाला घट्ट पकडल, तर कोणी शाळेच्या गेटला आपली ढाल बनवलेली. मला शाळेत नाही यायचे मला बाबा सोबत घरी जायचं आहे, खेळायचं आहे असे काही सुरु होते. शिक्षकांच्या सृजनशीलतेचा कस लावून मुलं वर्गात यायला लागली. तिथे वेगळे प्रश्न सुरु झाले हे प्रश्न तर अगदी १० वर्षांच्या मुलांपर्यंत एकसारखेच होते. मोबाईलमध्ये जे शिक्षक शिकवतात ते खूप छान आहेत.वर्गातील शिक्षक आम्हाला खूप लिहायला लावतात. एका जागेवर बसायला लावतात. शी, सु ला मुलांना सोडल तर ते पुन्हा आपल्याच वर्गात येतात की नाही? या काळजीत शिक्षकांना वाट पाहणे आणि इतर मुलांना वर्गात शांत बसवणे यातच तास संपत होता.

मुलं शाळेत येणे, आल्यावर वर्गात बसणे, शिक्षक ज्या सूचना देत आहेत त्याकडे लक्ष देण, सूचना समजून काम करणे, एका जागेवर बसणे हे तर खूप अवघड काम होते. लॉकडाऊनमुळे मुलांचे वजन आणि उंचीत फार फरक पडले होते.त्यामुळे पहिलीच्या वर्गात शिकणाऱ्या मुलांना सोयीचा वाटणारा बेंच सुद्धा त्यांना गैरसोईचा होताना दिसत होता. सगळ्या गमती जमती करत मुलं आणि शिक्षक एकमेकांना समजून घेण्याचा प्रयत्न करत होते. जसे मुलांना वर्गात येऊन शिकायला त्रास होत होता तसाच शिक्षकांना शिकवताना त्रास होत होता. ऑनलाईन मोडवर शिकवताना पूर्ण लक्ष विषय शिकवण्याकडे असायचा. त्यामुळे वर्ग व्यवस्थापन, मुलांना शांत बसवण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या सूचना नव्हत्या. एका जागेवर बसून शांततेत विषय

शिकवण्याची सोय आणि सवय झाली होती. प्रत्यक्ष वर्गात मात्र याच्या उलट चित्र दिसत होत. विषय शिकवणे या पेक्षा मुलानो शांत बसा, माझ्याकडे लक्ष द्या यातच वेळ जात होता. हळू हळू सगळं रुळायला सुरवात झाली...

हा हा म्हणता शाळा सुरु झाल्या. मुलं आणि शिक्षक आनंदाने शाळेत यायला लागली. आणि ज्याची भीती सगळ्यांना असते ती पहिली परीक्षा पण आली. परीक्षा सगळ्यांचीच होती शिक्षक, पालक आणि मुलं कोणाला किती येत? येत नाही? अभ्यास कसा करायचा? कसा घ्यायचा? या सगळ्यांवर प्रश्नचिन्ह यायला लागली.

मागील दोन वर्षात मुलं शिकलीच नाही हे गृहीत घरुन (back to basic) ब्रिज कोर्स सुरु झाले. खरी परीक्षा तर इथेच होती. लिखाण, वाचन आणि गणित यातील किमान संकल्पना मुलांना माहिती आहेत का? आणि त्या नसतील तर काय करता येईल? असे सगळे आराखडे मांडण्यात आले. त्यावर कसून काम करता आले. अजूनही काम सुरु आहे आणि कदाचित पुढची काही वर्षे असेच काम सुरु ठेवण्याची गरज सातत्याने जाणवत राहील यात शंका नाही. यात मोठी अडचण अशी आहे की शिक्षकानं समोर ऑनलाईन मोडमध्ये मुलं जेव्हा शिकत होती तेव्हा त्यांच्या जवळ पालक बसलेले असायचे किंवा काय समजल नाही ते समजून सांगायचे.

काही ठिकाणी तर मुलं शिक्षकांच्या संपर्कात कोणत्याही स्वरुपाने नव्हते. फी भरली नसेल तर पालक सुद्धा शिक्षकांच्या संपर्कात यायला टाळत होते. असे असताना मुलांची प्रगती प्रत्यक्ष मापन करता येणे शिक्षकांना कठीण जात होते. असे असताना जेव्हा मुल वर्गात आली आहेत ती ज्या इयत्तेत शिकत आहेत त्याचा अभ्यासक्रम शिकवणे आणि सोबत मुलं जिथे संकल्पनेत मागे आहेत तेही घेणे ही तारेवरची कसरत शिक्षकांची होत आहे.

मुलांनाही विषय समजून घेताना अडचणी येत आहेत. संकल्पना समजून घेणे मातृभाषेत न शिकता शैक्षणिक भाषेत शिकणे आणि त्याच्या नुसार विचार करणे हे मुलांना अवघड जात आहे. शिक्षकांचे बोलणेच समजत नसल्याने संकल्पना समजून घेणे हा तर खूप दूरचा विषय झाला. असे असतानाही लिखाण, वाचन करताना येणाऱ्या अडचणी हा तर खूप कळीचा मुद्दा बनलेला. लिखाण, वाचनात मागे असणारी मुलं हे शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या असण्याचे हे एक लक्षण आहे. नेमक्या मुलांना काय अडचणी आहेत हे समजायला सध्या मार्गच नाही. खूप हळू लिहितो, चुकीचं लिहितो, अक्षर उलट-सुलट लिहितो, अपूर्ण लिहितो, लिहिताना हात दुखतो अशा प्रकारच्या अडचणी लिखाणात येतात. वाचतांना अक्षर ओळख नसणे, फोनिक्स सारखा वापर करुन चुका होत आहेत. जे वाचलं आहे ते न समजणे आणि समजत नाही म्हणून विषयाला कनेक्ट न होता येणे अशा पद्धतीचा अडचणी ह्या वाचनात येताना दिसतात. वाचता येत नाही म्हणून लिहिता येत नाही हे तितकेच खरे अशावेळी मुलांना लिखाण आणि वाचनाचा सराव कसा द्यावा आणि तो कसा करावा यासंदर्भात अनेक प्रयोग

शाळेत सुरू असलेले आपण पाहत आहोत.

काही मुलं लर्निंग डिसेबल आहेत. अशा पद्धतीनेच त्यांना लेबल करणे हे सुद्धा काही कमी नाही याचेही प्रमाण खूप वाढलेले दिसते शिक्षक आणि पालक मुलांच्या अडचणी समजून न घेता यांना शैक्षणिक अडचण आहे, शैक्षणिक मागासलेपण आहे, असे वारंवार बोलताना दिसतात.

कालच एका पहिलीच्या मुलासोबत बोलताना त्याला वाचन असं जेव्हा सांगितलं तेव्हा वाचण्याची सुरुवात करण्याआधीच मला वाचता येत नाही असं खुशाल सांगून मोकळा झालेला दिसला. मनात असे वाटले की नकार देणे हे किती सोपं वाटायला लागलं. प्रयत्नांच्या आधीच नकार यायला लागलेले आहेत. मला जमत नाही, एवढ्याशा चिमुकल्याला हे समजण म्हणजेच मोठ्यांनी त्याला किती वेळेस हे सांगितलं असेल की तुला जमत नाही याचा विचार करूनच मन उदास होते. शिक्षकांमध्ये आणि पालकांमध्ये शैक्षणिक मागासलेपण असण्यामागचे कारण आणि उपाय याबद्दलचा जागृती करण्याची गरज ही खूप जास्त आहे. मुलांना लिखाण आणि वाचनाचा सराव मागील दोन वर्षात नक्कीच कमी झालेला आहे आणि सरावच मेंदूमध्ये टिप्पणी तयार करत असतो. सराव नसल्यामुळे मुलांना येत नाही हे समजून घेणे गरजेचे आहे.

प्रत्यक्षात मुलांना शैक्षणिक मागासलेपण आहे हे समजून घेणे गरजेचे आहे. या दोघांमध्ये फरक आहे आणि हा फरक जास्तीत जास्त समजून घ्यायला हवा. शाळा सुरु झाल्या तसेच ट्युशनही सुरु झाले. पण मुलांचा अभ्यास सुरु झालाय का? याकडे कोणाचे लक्ष नाही. आम्ही मुलांना शाळेत पाठवतो म्हणजे आमची जबाबदारी संपली असे सांगणारे पालक आजही शिक्षकांशी भांडताना दिसतात. खरं तर शिक्षक आणि पालक ही दोन वेगळी टोक नसून मुलांचा एक हात शिक्षकांच्या हातात तर एक हात पालकांच्या हातात आहे. त्यामुळे मिळून काम करणे याला पर्याय नाही.




मुलांना काय समजायला हवं, काय समजलेला आहे याची वैज्ञानिक दृष्टिकोनातून तपासणी व्हायला हवी. मानसशास्त्रीय चाचण्यांचा आणि निरीक्षणांचा इथे नक्कीच उपयोग होऊ शकतो. आलेल्या निष्कर्षावर गरजेनुसार आराखडा करणे शिक्षकांना सोयीचे होऊ शकतो. शिक्षकांनी सांगितलेल्या मार्गदर्शक तत्वांना

पालकांनीही मदत करणे हे तर “सोने पे सुहागा” असंच होणार आहे. मुलं हुशार आहेत ती शिकत राहिली पाहिजेत यासाठी प्रयत्न करण्याची जबाबदारी तुमच्या आमच्यासारख्या मोठ्यावरच आहे.

विषय शिकवण आणि शिकणं यासाठी शाळा नाही तर मुलांचे मन, मनगट आणि मेंदू यावर संस्कार करणारे वातावरण निर्मितीसाठी शाळेचे शिक्षक महत्त्वाचं घटक म्हणून काम करतात. मुलांना माहिती शिकवण्याची गरज नाही तर मुलांना माहितीचा अनुभव देण्याची गरज आहे. मुलं अनुभवातून शिकत आहेत. आज जर टीव्हीवर कोणताही कार्यक्रम बघायचा असेल तर सर्च करताना टाईप करण्याची गरज पडत नाही तर व्हॉइस मोडवर काम केलं तरीही फक्त मोबाईलवर व्हिडिओ बघताना व्हॉइस मोड दाबणारे तीन चार वर्षाची मुलं सुद्धा आपल्याला दिसतात. काही टाईप करण्याची गरज पडत नाही असं जर दिसत असेल, अनुभव येत असेल तर मुलं लिखाण करू शकतात का? लिखाण करण्यासाठी लिखाण गरजेचे आहे का? हा अनुभव देण्याचे शिक्षण होणं गरजेचं आहे.

मुलांना लिहिता येत नसेल तर वाचनावर काम करावं लागतं. मुलांना वाचता येत नसेल तर मुलांच्या बोलण्यावर काम करावं लागत आणि मुलांना जर बोलता येत नसेल तर मुलांच्या ऐकण्यावर काम करावं लागतं. याच पद्धतीने आपल्याला जाण्याची गरज आहे. लिखाण जमत नाही म्हणून एक गोष्ट पाच पानं लिहिली हा यावरचा उपाय नक्कीच नाही. आणि म्हणूनच असं वाटतंय की **“शाळा भरली पाटी फुटली”** आपण आपापले प्रामाणिक प्रयत्न केले तर नक्कीच ही परिस्थिती बदलू शकते. शैक्षणिक क्षेत्रातसुद्धा अच्छे दिन येऊ शकतात. यासाठी मुलांना येणाऱ्या अडचणी समजून घ्यायला हव्यात. स्क्रीनचा वेळ वाढला आहे असे आपण जेव्हा म्हणतो त्यावेळेस तो कमी करण्यासाठी त्यापेक्षा चांगला पर्याय मुलांना देण्यासाठी आपण तयार असलो पाहिजे.

आपली सृजनशीलता यावेळी कामात येऊ शकते. “टीव्ही बंद” अभियान जसे चालायचे तसेच “स्क्रीन बंद” हा पर्याय इथे न देता स्क्रीन कमी वापरणं किंवा कशा पद्धतीने वापरता येईल हे शिकविणे हा यावरचा उपाय आहे. कोणत्या पद्धतीचे कार्यक्रम आपली मुलं बघत आहेत. आपण मुलांसोबत बघत आहोत. याचाही विचार व्हायला हवा. फक्त माझं मुलं असा विचार न करता आपलं मुलं ज्या मुलांमध्ये राहते आहे त्या मुलांचाही विचार तितकाच होणे गरजेचे आहे.

सामाजिक पालकत्व जर आपण सांभाळलं आणि ती बांधिलकी म्हणून काम केलं तर टीव्हीवरचे कार्यक्रम मुलांनी बघू नये असं वाटतंय. त्या कार्यक्रमांवर काही सामाजिक बंधन टाकता येत आहेत का? यावरही विचार व्हायला हवा. मुलांनी काय बघावं यावरही चर्चा व्हायला हवी. वेगवेगळ्या प्रकाराचे अकाउंट्स उघडतांना काय काळजी घ्यावी? काय धोके असतात याबद्दल मुलांसोबत सातत्याने चर्चा व्हायला

हवी. यात येणाऱ्या मुलांसोबत लैंगिक शिक्षणावर मोकळेपणाने चर्चा व्हायला हवी. यामुळे विकृत आसक्ती कमी होऊन चांगल्या धारणा काय असतात यावर मुलं विचार करू शकतात. मुलांना काय करू नका हे सांगण्यापेक्षा काय करा हे सांगण्याची जास्त गरज आहे आहे.

मुलांसमोर आदर्श कोण आहेत? काय आहेत? हे डोळसपणे बघण्याची गरज आहे. अपशब्द बोलणे, चिडवणे, कारण नसताना वर्गातल्या मुलांना त्रास देणे, याचं प्रमाण सध्या वाढलेले दिसत आहे. वर्तणूक समस्या जास्त वाढलेल्या दिसत आहेत. शैक्षणिक मागासलेपण असल्यावर वर्तणूक समस्या ह्या जाणवतात. परंतु वर्तणूक समस्या असल्यामुळेही शैक्षणिक मागासलेपण येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्रास देण्याकडे इतरांना काय वाटेल? याचा विचार न करता मनात येईल तसे वागणे. याचा परिणाम अभ्यासात लक्ष न लागणे, विषय समजून घेता न येणे विषयात अडचणी येत असतानाही कोणाची मदत न घेणे.

अशा पद्धतीचे वर्तन मुलांमध्ये सध्या दिसत आहेत. यासाठी कोणत्या तरी एका घटकावर काम होऊन चालणार नाही तर मुलांच्या शैक्षणिक, मानसिक, बौद्धिक आणि सगळ्यात महत्वाचे भावनिक कोशावर, क्षमतेनुसार काम होणे गरजेचे आहे. मुलांचा भावनिक कोश समृद्ध झाला तर शैक्षणिक सक्षमतेकडे मुलं नक्की जातील. चला आपण सगळेच पाटी फुटणार नाही यासाठी काळजी घेऊया आणि मुलांना समृद्धी मिळणाऱ्या मार्गावर वाटचाल करण्यासाठी क्षमतांचा पाठबळ देऊयात.

मुलांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी आणि काही अडचणी येत असतील तर त्यावर सराव करण्यासाठी या दिवाळीच्या सुट्टीचा सदुपयोग सर्वच स्तरावर होणे आवश्यक आहे असे मला प्रामाणिकपणे वाटते. आपणा सर्वांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा...

**- सौ. गायत्री लाड / पुणे**
**मो.- 9960828880**
**(- लेखिका व्यक्तिमत्व विकास व शैक्षणिक समुपदेशन कार्यातील गाढ्या अभ्यासक आहेत.)**

# दिवाळी अंकाची विषयी..

दिवाळी अंक हे मराठी वाङ्मयीन संस्कृतीचे वैशिष्ट्यपूर्ण अंग आहे. दिवाळी सणाच्या सुमारास निघणाऱ्या विशेष अथवा वार्षिक नियतकालिकांना दिवाळी अंक असे म्हणतात. मनोरंजन हा सन १९०९ साली छापला गेलेला मराठीतला प्रथम दिवाळी अंक होता. सन २००९ मध्ये दिवाळी अंकांचे शतक पूर्ण झाले आहे. काळानुरूप त्यात बदल झाला आहे. आता महाराष्ट्रात सुमारे १००० हून अधिक दिवाळी अंक प्रतिवर्षी प्रदर्शित होतात. या दिवाळी अंकामध्ये विशेष विषय घेऊन सुद्धा काही अंक प्रसिद्ध होतात. त्यापैकी “व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंक” आहे. प्रत्येक वर्षी नवनवीन विषयांची सदरे दिवाळी अंकात प्रसिद्ध केली जातात. यावर्षी सुद्धा असाच प्रयत्न आहे.

प्राचीन काळी गुरु हा सर्वेसर्वा असे आणि केंद्रस्थानी गुरुच असे गुरु सांगेल ती पूर्व दिशा असे गणित होते. पण आज ह्या आधुनिकतेच्या आणि नवीन तंत्रज्ञान यांची सांगड जर घातली तर “विद्यार्थी” हा शिक्षणाचा केंद्रबिंदु आहे, फळा आणि खडू ही संकल्पना आजच्या युगात थोडी मागे पडली ‘डिजिटल’ ह्या शब्दांन धूमाकुळच घातला.

अंशतः माध्यमिक आणि महाविद्यालयीन स्तरावर काही प्रमाणात ही ऑनलाइन शिक्षण पद्धती प्रभावी ठरु शकते. पण प्राथमिक स्तरावर समस्या उदभवु शकतात. अनेक लहान मुले, मुली या सोशल मिडीयाच्या मायाजाळात अडकून बसलेली आपणास दिसत आहे. ० ते ५ वयोगटातील बालके सर्वसाधारणपणे दिवसातील ४ ते ५ तासांचा वेळ हा सोशल मिडीयाचा वापर करताना दिसते आहे. याचा परिणाम या बालकांच्या शारीरिक, बौद्धिक, मानसिकतेवर होत आहे. अनेक विचारवंताना भविष्यातील पिढी ही सुदृढ, सक्षम, आत्मविश्वासू, मेहनती, रीतीरिवाज, परंपरा, त्याच बरोबर उत्तम समाज घडेल की नाही याची शाशंकता वाटत आहे.

यावर्षीचे दिवाळी अंकाचे मुखपृष्ठ बनविताना गेली दोन वर्ष कोणत्याही स्वरुपात दिवाळी साजरी करता आली नाही. अनेक नियम आणि भीतीदायक वातावरणामध्ये दिवाळीचा सण होऊन गेला. अंधाराच्या वादळांनी प्रकाश दाखविणारे दिवे फुंकून टाकले आहेत की काय असा यक्ष प्रश्न सर्वांच्या समोर उभा ठाकला होता. परंतु आपण सर्वांनी त्यावर मात केली. आपल्या आव्हानक्षम वृत्तीचा झरा असाच कायम वाहू दे. आपल्या जीवनातील **‘अंधार’, ‘अज्ञान’ आणि ‘आळस’** हे सुद्धा एक प्रकारचे प्रदूषणचं आहे. आपण यातून मुक्त व्हावे आणि प्रकाशाचा एक नवा मार्ग आपणाला दिसावा व यातून बाहेर कसे पडावे यासाठी यंदाच्या दिवाळी अंकात काही विशेष लेखांचा समावेश करण्यात आला आहे.

सर्व साहित्यिकांनी स्वत:चे दर्जेदार साहित्य पाठून दिवाळी अंकाची शोभा वाढविली आहे. आपल्या दर्जेदार साहित्याने **“व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंक २०२०”** सालचा **“उत्कृष्ट दिवाळी अंक”** म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. याबद्दल मी सर्व साहित्यिकांचे मनापासून आभार मानतो.

**– संपादक**

# ज्याचे त्याला कळे मन



म्हणे आभाळा एवढं
एक बहिणाचं मन
मन खाकसचा दाणा
म्हणे बहिणाई अन्॥धृ॥
मन ठाऊक मलाही
एक आनंदाचं बन
मन दु:खाचा सागर
एक म्हणे माझं मन॥१॥
नित् नवाच बहार
येतो फुलता हे बन
येता भरती सागरा
पार बुडते हे मन॥२॥
मन उडतं आभाळी
जरी पाखरु होऊन
पिंजर्यात हे देहाच्या
बंद होते परी मन॥३॥
मन जनांस कळेना
आकळेना कुणा मन
ज्याचे त्यालाच त्याचेच
येते कळून हे मन॥४॥



**- सौ. मंगला मधुकर रोकडे / जळगांव**
**मो.- 9371902303**

# जीवनशैली बदला...



काल एक नवोदित उदयाला आलेला गायक वयाच्या 53 व्या वर्षी हृदयविकाराच्या धक्क्याने गेला. दोन लहान मुले एक पत्नी सर्व झगमगीत आयुष्य त्याचे पुढील दोन वर्षाचे सर्व कार्यक्रम नियोजित बुकिंग केले होते. आणि पिक्चर साइन केले होते. अनेक स्टेज शो रिझर्व केले. होते अनेक थेटर बुकिंग केली. होती परदेशातील तिकीटे बुकिंग केली होती सर्वांना सोडून निघून गेला.

गेल्या वर्षी असाच सिद्धार्थ शुक्ला बहुतेक सप्टेंबर महिन्यामध्ये हृदयविकाराच्या धक्क्याने गेला त्याचं सुद्धा झगमगीत आयुष्य होतं. असंख्य चाहते होते, असंख्य सिनेमाच्या शुटिंग च्या तारखा बुकींग केलेल्या होत्या, परदेशातील शूटिंग तारखा बुकिंग केलेल्या होत्या सर्व टाकून हृदयाची गती थांबून त्यालाही वयाच्या चाळीसाव्या वर्षी दुर्दैवाने मृत्यूला सामोरं जावं लागलं. हे काय जाण्याचं वय असतं.?

कन्नड अभिनेता राजकुमार हा एक अभिनेता नव्हता तर कर्नाटक मध्ये देव होता एवढंच त्याचं सामाजिक कार्य मोठं होतं. जेवढी मोठ बॉलीवूड वरती अवकळा आली नाही तेवढी अवकळा संपूर्ण कर्नाटक आंध्रप्रदेश तामिळनाडू राज्या वरती राजकुमार यांच्या जाण्यामुळे झाली त्याला शेहचाळीसाव्या य वर्षी मरण पत्करावे लागले तेही हृदयविकाराच्या धक्क्याने.

आज आपल्या आजूबाजूला हृदयविकाराचे बळी ठरणारे जेवढे म्हणून परिचित आहेत त्यांना मधुमेह जास्त झाल्यामुळे सुद्धा हदय विकार होतो ब्लड प्रेशर जास्त झाल्यामुळे सुद्धा मृत्यू ओढवतो हे सर्व कशाचे परिपाक आहे आकस्मिक हृदयविकाराचे झटके येण्याचे कारण काय तर आपण आपली जीवनशैली पूर्णपणे बदललेली आहे आणि ते आपल्या मृत्यूला कारण होतं आहे.

पूर्वीच्या काळी लोक सूर्योदयापूर्वी उठत असत सूर्योदयापासून त्यांची कामाची दिनचर्या सुरु होत असे महिलावर्ग पाणी आणण्यासाठी विहिरीवर जात पाणी घेऊन येत पाणी विहिरीतून काढणे व त्या हंडाकळशी कमरेवर घेऊन घरात घेऊन येणे, पाटा-वरवंटा वरचे वाटण होते ,घरातील सर्वांचे कपडे नदीवर अथवा विहिरीवर हाताने धुतले जात होते, असा व्यायाम त्यांचा होत असे तसेच घर आणि अंगण झाडताना कमरेचा व्यायाम होत असे. जात्यावर दळण दळताना संपूर्ण हदयाची आणि लिवर फंक्शन चांगल्या पद्धतीने होत असे.

पुरुष वर्ग पहाटे उठत असे सूर्योदयाच्या वेळेस शेतामध्ये जाऊन शेतात जे काय असेल ते काम करत असे व महिला वर्ग  न्याहारी घेऊन त्याला येत असे  न्याहारी

बरोबर दुपारचे भोजन असे दुपारचे भोजन करून कधी संध्याकाळी लवकर घरी येत असे सूर्यास्तापूर्वी सर्व कामे आटपून लोक घरी येत आंघोळ करून मग पुढील कार्यक्रमाची आखणी होत असे

महिलावर्ग रात्रीचा स्वयंपाक करताना एकामेकाची गुज गोष्टी करीत. घरामध्ये एकमेकांशी सुसंवाद असे. मुलांचा अभ्यास घेणे, तसेच उद्याच्या भोजनाचा प्रबंध करणे , तर पुरुष वर्ग बाहेर ओसरीवर मग ते शेजाऱ्यांच्या का असेना किंवा आणि कोणाच्या असेना बसून पत्ते खेळणे, कॅरम खेळणे तर कधी नुसताच गप्पांचा फड रंगत असे. त्यामधून एकमेकांची सुखदुःख वाटली जात व मानसिक तणावातून मुक्त राहत असे गावात कोणी आजारी पडला तर त्याला भेटायला जाणे त्याच्या घरामध्ये संपूर्ण गाव आळीपाळीने येत असे. त्याला दिलासा देत असे व आजारपणात काय तर जास्तीत जास्त मोठा हजार पण म्हणजे एखाद्याला बैलाने शिंग मारणे किंवा शेतामध्ये नांगराचा फाळ चुकून लागला.

झाडाची फांदी तोडताना कुर्हाड किंवा फरशी लागणे अशा पद्धतीचे छोटीसे अपघात असतिल परंतु दिलासा देण्यासाठी संपूर्ण गाव आपल्या पाठीशी आहे एकाच वस्तुस्थिती मुळे तो लवकर बरा होत असे. आहारामध्ये स्वतःच्या शेतात पिकवलेले अन्नधान्य होते किंवा स्वतःच्या घरात पाळलेल्या कोंबडी बकरा यांचा मटणाचा आस्वाद घेत असे. समुद्रकिनाऱ्याजवळ राहणारे समुद्रातील ताज्या मासळीचा आस्वाद घेत असत त्यामुळे त्यांच्या शरिरा मध्ये विषमुक्त अन्न जात होते. चौरस आहार म्हणजे विटामिन च्या गोळ्या नव्हेत तसेच पेन किलर म्हणजे वेदनाशामक गोळ्यांनी वेदना क्षमते असा जर कोणाचा गैरसमज असेल तर तो पूर्णपणे चुकीचा आहे. आज आपण शहरांमध्ये राहतो



शहरांमध्ये या सर्व गोष्टी आता कालबाह्य झालेल्या असून आज आपण शहरांमध्ये राहतो शहरांमध्ये या सर्व गोष्टी कालबाह्य झाल्या आहे पूर्वी लोकांच्या मनगटावर घड्याळ होते आज लोकांच्या मानगुटीवर घड्याळ बसले आहे. त्यामुळे माणसाच्या जीवनशैलीमध्ये जमीन-अस्मानाचा

फरक पडला आहे. अरे आणि तो आपल्याला मृत्यूच्या दाराकडे ओढत नेत आहे.

पहाटे सूर्योदयापूर्वी उठणे तर सोडाच रात्री कैक लोकांना झोपण्यासाठी बारा ते एक वाजतात मग सकाळी उठण्याचा काही प्रश्न उद्भवत नाही. आणि जर उठलं तर फास्ट ट्रेन पकडणे इच्छित ट्रेन पकडण्यासाठी लोकल पकडण्यासाठी लोकांना धावपळ करायची असते दिवसभर ऑफिसमध्ये कंपनीत दमून भागून आल्यानंतर रात्री उशिरापर्यंत टीव्ही पाहणे मोबाईल खेळणे किंवा मोबाईलवर चॅटिंग करणे अशा सर्व गोष्टींमध्ये आपला वेळ जात आहे. आपण आपल्या प्रकृतीकडे कोणत्याच गांभीर्याने पाहत नाही सूर्यनमस्कार लोक विसरले आहेत कबड्डी हु तू तू आट्यापाट्या लेझीम असे खेळ लोक विसरत चालले आहेत संध्याकाळच्या टीव्हीच्या कार्यक्रमांच्या भागा मध्ये हरवून गेले आहेत श्रावण महिन्यात होणाऱ्या महिला च्या फुगड्या महिला विसरत चाललेल्या आहेत जरा आठवून बघा त्या फुगड्या मध्ये किती प्रकार होते फुघड्या मध्ये महिलांचा व्यायाम होत होता. संध्याकाळी मंदिरामध्ये पारावरती होणाऱ्या होणाऱ्या भजनाचे उत्तर अंगामध्ये वारकरी संप्रदायाचे होणारे फुगडी नाच पुरुष मंडळी गावात सुद्धा विसरून गेलेले आहेत. कोकणामध्ये जाखडी नृत्य संपूर्ण महाराष्ट्राचा खेळ असलेला लेझीम आज आम्ही विसरून गेलो आहोत.

आज शाळेमध्ये लेझीम शिकवले जात नाही गजनृत्य वारली नृत्य नृत्याचे प्रकार आपण विसरत चाललो आहोत आणि पाश्चिमात्यांचे अनुकरण करत लग्नामध्ये दारू ढोसून नाचणे या सर्व गोष्टी पाश्चिमात्य संस्कृती कडून आपण घेतलेले आहेत. कोणताही ताल लय ठेका या पाश्चिमात्य नृत्याला नसतो. केवळ अंगा विक्षेप करून आपण नाचत असतो त्याउलट फुगडी गरबा भांगडा असे भारतातील नृत्य प्रकार आपण विसरत चाललो आहोत सूर्यनमस्कार आणि बैठक सारखा व्यायामाकडे आपण कानाडोळा करीत आहोत. त्याचबरोबर सूर्यनमस्कारा इतकाच महत्त्वाचा व्यायामाचा प्रकार आमच्या मुस्लिम बांधवांच्या दिवसातून पाच वेळा नमाज अदा करण्याची पद्धत आपण विसरून चाललो आहोत. त्यामागची वैज्ञानिक कारण आमचे मुस्लिम बांधव विसरून गेले आहेत.

नमाज अदा करतांना आणि सूर्यनमस्कार घालताना जवळ-जवळ शरीराची हालचाल ही समानतेने थोडीबहुत होत असते संपूर्ण शरीराला त्यामुळे व्यायाम मिळत असतो साष्टांग नमस्कार सूर्य नमस्कार आणि नमाज हे सर्व देवासाठी नसून ते आपल्या शरीरासाठी आहेत देह देवाचे मंदिर आहे आणि आत आत्मा परमेश्वर आहे "खुद मतलब खुदा होता है यारो"

सर्व आजाराचं मूळ हे शरीराला नसणारे व्यायाम, चुकीची भोजन शैली., अवास्तव नको तो आहारात झालेला बदल, बिन तेलाची भाकरी आणि भाजी पासून सुरू झालेला आपला आहार आज पिझ्झा बर्गर फाषटफुड अशा शरीराला घातक आशा भोजन शैलीमुळे आपण आज मधुमेह रक्तदाब आणि हृदय विकार याचे बळी ठरत आहोत

अजूनही वेळ गेलेली नाही आपण सकाळी पहाटे लवकर उठून शरीराला थोडासा तरी व्यायाम अत्यावश्यक आहे तसेच रात्री उशिरापर्यंत जागरण न करता लवकर झोपणे काळाची गरज आहे.

आज तंदुरुस्त असलेल्या सेलिब्रिटी मध्ये सेलिब्रिटीजे आहेत यांची रात्री झोपण्याची वेळ दहा ते साडे दहा असून पहाटे पाच वाजता ते अंथरुणातुन उठतात शरीराला झेपेल तेवढा व्यायाम करतात व भोजनामध्ये सुद्धा वेळापत्रकानुसार जेवतात जर आपण आपली जीवनशैली त्यांच्याप्रमाणे ठेवली तर आणि तरच आपण तंदुरुस्त निरोगी जीवन जगू शकतो अन्यथा आपल्यावर ही वेळ येऊ शकते थोडक्यात सांगायचे तर अजूनही वेळ गेलेली नाही संध्याकाळी गप्पांचे फड रंगवा, भजनाचे मेळ बसवा सुखदु:खे एकमेकांना शेअर करा ,पत्ते खेळा, बुद्धीबळ खेळा, कॅरम खेळा, दोन-दोन तास टीव्ही वरती बसून किंवा मोबाईलवर खेळून आपल्या शरीराची हालचाल नीट होणार नाही जीवनशैलीमध्ये बदल घडवा अन्यथा आपल्याला मरणाला सामोरे जावे लागेल. लेख आवडला असेल तर शेअर करण्यासाठी प्रसिद्ध करण्यास वेगळ्या परवानगीची गरज नाही.

**- सुरेंद्र हरिचंद्रचंद्र नेमळेकर / वेंगुर्ला**
**मो.- 9404135619**

# संगीत सृष्टीत



संगीत सृष्टीत
शब्द कविच्या जिण्यात
तालबद्ध काळ
नाचे व्याकुळपणात

माधुर्य रसात
भुंगा पाकळीत दंग
चिरडून पंख
इंद्रधनुष्याचे रंग

डुले आसमंत
वादळाच्या गायकीत
करुणार्तपण
दाटे अवघ्या देहात

तीच तीच धून
आळविणे रातदिन
चांदण्याही गेल्या
ढगामधी काजळून

स्वर उंचावर
मूळ मातीत रुजले
फांद्या कफल्लक
गाणे पाचोळी दबले

डोंगरदऱ्यांत
वाट काढती किरण
चिवचिव पक्षी
मृदु निर्झर गायन



- तुकाराम पुंडलिक खिल्लारे / परभणी
मो.- ८८३०५९९६७५

# पोपटपंची



सकाळचे अकरा वाजले होते. पंचायत समितीच्या आवारात जीप जाताच ड्रायव्हरने दरवाजा उघडला. पिंजऱ्यातून वाघ बाहेर पडावा तशी जोंधळे साहेबाने एन्ट्री घेतली,पण केबीनमध्ये जाताच मांजरासारखे बसून राहिले. व्हील चेअरवर टाकलेल्या नॅपकीनने घाम पुशीत असताना सवईप्रमाणे जमदाडे शिपाई ग्लास घेऊन आला. साहेब विचारात हरवले होते. त्यांना भानावर येण्यासाठी जमदाडे म्हणाला,

"सर पाणी. "

"असू दे. ठेव. तू बांधकाम विभागात जावून थोरवेला इतर कुणालाही आत पाठवू नकोस. अन् मी बेल दिल्याशिवाय तू सुद्धा आत डोकावू नकोस. जा आता. "

साहेबांचा निरोप मिळताच थोरवेने पेडींग प्रकरणाची फाईल घेऊन भीत भीतच केबीनचा दरवाजा लोटून म्हटले,

"मे आय कमीन सर"

साहेबांच्या परवानगीची वाट न पाहता आत जावून नमस्कारासाठी थोडी मान झुकवली व आदेशाची वाट पाहू लागला.

प्रथम दर्शनीच त्याला साहेबांच्या चेहऱ्यावर चिंता दिसली. वरिष्ठ कार्यालयाकडून काहीतरी तातडीचा मेसेज मिळाला असावा असा त्याने तर्क केला. थोरवे काहीही न बोलता उभ्या उभ्याच चुळबुळ करीत साहेबाला निरखू लागला. परवाच्या जिल्हामिटींगमध्ये बरीच झापाझापी झाली होती. तिथला सगळा राग साहेब आपल्यावर काढणार असा अंदाज बांधून थोरवेने दीर्घ श्वास घेतला व कडवट शाब्दिक ढोस ऐकण्यासाठी मनाची तयारी केली पण बराच वेळ गेला तरी साहेबाने पवित्रा बदलला नाही,उलट अगदी खालच्या आवाजात म्हणाले,

"मी मुद्दाम बोलावून घेतलंय. थोरवे, एक प्रॉब्लेम आहे. तुम्ही माझ्या विश्वासातले म्हणून तुम्हाला. . .

साहेबाने तुम्ही माझ्या विश्वासातले म्हणताच थोरवेची छाती फुगली. थोडा धिटाईने तो आणखी साहेबांकडे सरकला. जरा खालच्या आवाजात पण काळजीने म्हणाला,

"लोकप्रतिनिधी संदर्भात की झेड् . पी . संदर्भातील प्रॉब्लेम आहे?"

"नाही रे,माझ्या घरचाच प्रॉब्लेम आहे. "

साहेबाच्या घरचा प्रॉब्लेम आपण कसा काय सोडवायचा? म्हणून थोरवे विचारात पडला. तरीही साहेबांनी आपल्यावर एवढा विश्वास दाखवलाय म्हणून तो साहेबाना म्हणाला,

"प्रॉब्लेम तर सांगा? बघू काही करता येतंय का !"

"इथे नको,आपण थोडं बाहेरचं जावू. "

साहेब केबीनबाहेर पडताच थोरवेही पित्या वासरासारखा त्यांच्यामागे तुरुतुरु चालू लागला. साहेब गाडीत बसताच थोरवेही बसला. गाडी हॉटेल कुंजवनी समोर उभी राहताच दोघेही आत गेले. वेटर येताच साहेबाने स्वत: साठी ऑर्डर दिली. पनीर मसाला व दोन रोट्या,भाजलेला पापड अन् हाप जिराराईस. आता तरी साहेब बोलेल म्हणून थोरवे वाट पाहू लागला. पण सगळं हादडल्यावर हात पुसतच साहेबाने बडीशेपचा तोबरा भरला. वेटरने बील आणताच थोरवेने त्याला अडवला व बीलाची रक्कम त्याच्याकडे सुपुर्त केली. वेटरने टेबल साफ करताच साहेब थोरवेना म्हणाले,

"जरा जवळ बसा इथं. "

मग बोलू लागले,

"थोरवे,जरा भावनिक प्रश्न निर्माण झालाय. उगीच बोभाटा नको तुम्हाला सांगतोय. तुम्हाला आमची पिलू तर माहीतच आहे. तिच्या हट्टामुळे आम्ही पोपट पाळला होता. पोपटावर पिलूचा भारी जीव. पण कालपासून पिलून काही खाल्लंच नाही बघा".

"का बरं?काय झालं पिलूला?"

"पिलूला काहीच झालं नाय हो,झालं ते पोपटाला".

"म्हणजे?"

"पिलूच्या आईने पोपटाचा पिंजरा खाली घेतला. पाण्याने धुवून स्वच्छ केला. पोपटला खायला फळं आणण्यासारठी ती घरात गेली. इकडे पिलूने पिंजऱ्याचे दार उघडले. बाहेर आलेला पोपट तिच्या अंगाखांद्यावर खेळत होता. तेवढ्यात मांजराने त्यांच्यावर झडप मारली अन् पळवला त्याला तोंडात धरून. दोघीही मांजरामागे धावल्या,पण मांजरच ते. शेवटी पोपटाचा फराळ करूनच ते आलं . . "

"अरे रे ! बिच्चारा पोपट. "

अहो तो गेला जीवानिशी पण मागे अनंत प्रश्न ठेवून गेलाय. "

"म्हणजे कोण कोणते प्रश्न ठेवून गेलाय?

"कसले प्रश्न?", साहेब काकुळतीला येवून म्हणाले.

"तसं नाही हो थोरवे,थोडं समजून घ्या म्हणजे समजेल. बरं का,काल संध्याकाळी मी आठला घरी गेलो. घरात एकदम गंभीर वातावरण. मला पाहताच पिलूच्या आईने गळा काढला. आई रडल्यावर तिला पिलूनेही साथ दिली. घडीभर काय झालं ते मलाही समजेना. पण थोड्या वेळाने पिलूनेच पोपटाची सगळी हकिगत सांगितली. मग मी पिलूला समजावलं व आपण आता दुसरा पोपट आणू.

"मग,ऐकलं का पिलूने. "

"ती काय हो,चार वर्षांची चिमुरडी पोर पण मी सांगितल्यावर लागली हसायला,खेळायला. "

"बरं झालं,मग प्रश्न काय उरलाय?"

“तेच तर सांगतोय,पिलूला समजलं हो,पण पिलूच्या आईने मात्र अंथरूनच धरलंय. म्हणते,दुसरा पोपट आणल्याशिवाय कशालाच हात लावणार नाही. रात्रीला पिलू दूध पिऊनच झोपली. पण आम्हाला उपाशीच झोपावं लागलं. ”

“मग मी काय करावं अशी अपेक्षा आहे तुमची?”

“कुठूनतरी एक पोपट आणा म्हणजे झालं. अगदी पोपटाचं पिलू असलं तरी चालेल पण लवकर आणा म्हणजे झालं. ”

थोरवेला हे उसनं संकटच वाटलं. पण तोही कमी नव्हता. शेजाऱ्याचं ओझं वाटसरूच्या माथी मारायची कला त्याला चांगलीच अवगत होती. देण्याघेण्याच्या वादात कितीतरी वेळा तोही अडकला होता. पण दुसऱ्याच्या माथी दोष मारून प्रत्येक वेळी सहीसलामत सुटला होता. तो साहेबाकडे पाहून सहजतेने म्हणाला,

“त्यातअवघड असं काहीच नाही. आपल्या शिक्षण विभागात तो नेवसे आहे ना !चुटकीसरशी पोपटाचं पिलू आणेन. नाहीतरी सदानकदा नुसत्या घिरट्याच घालीत असतो. ऑफिसचा युनियन लिडर असल्याने सारे शिक्षक,लोकप्रतिनिधी,ग्रामस्थ सगळ्यांशी जवळून संपर्क असतो त्यांचा. ”

“हरकत नाही,मग घ्या त्याला बोलावून. थोरवे यांनी साहेबासमोरच नेवसेला फोन केला. अगदी अर्जंट बोलावल्याचं सांगून त्याची खात्री पटानी म्हणून त्याने साहेबांच्या हाती फोन दिला. साहेबांचा आवाज ऐकताच नेवसे तातडीने निघालादेखील.

नेवसे गेली वीस वर्षे एकाच शाळेवर काम करीत होता. तसं तो काम काहीच करीत नव्हत. पण त्याची नेमणूक मात्र एकाच शाळेवर वीस वर्षे झाली तरी अबादीत होती. पंचायत समितीत कोणत्याही पक्षाची सत्ता आली तरी लोक प्रतिनिधीच्या तो नेहमी संपर्कात असायचा. गेली वीस वर्षे तो शिक्षकांच्या युनियनचा लिडर होता. लोकप्रतिनिधी अन् अधिकाऱ्यांशी त्याचे संबंध फारच जवळचे असायचे. आदर्श शिक्षक म्हणून त्याचा तीनदा गौरवही झाला होता. दोन वाजता तो आपल्या सॅन्ट्रोमधून हॉटेल कुंजविहारवर पोहचला. त्याला येताच साहेबांनी थोरवेची सुट्टी केली. थोरवेही जाळ्यातून सुटलेल्या पक्षाप्रमाणे आज्ञा होताच आनंदाने बाहेर पडला. आपल्यावरील संकट ढकलण्यात आजही यशस्वी झाल्यामुळे तो विशेष आनंदात होता. थोरवे गेल्यावर साहेबांने नेवसेला पुन्हा हकिगत सांगून टाकली. अन् कसंही करून नवीन पोपट अणायला गळ घातली. नेवसेने मनात विचार केला,आज पोपट आणायला सांगितला. उद्या हे एखादं कबुतर आणायला सांगतील. कुण्याही गावचं आणा,पण आणाच म्हणून लकडा लावला तर !पण आपणही यांच्याच आशीर्वादाने मोकळे फिरतोय हे ध्यानी येताच ते मनातून वरमले. थोडा विचार केल्यासारखे करून साहेबांना म्हणाले,

“पोपट मिळायचं ठिकाण मला माहिती आहे. पण ती बया माझं ऐकलंच असं नाही वाटतं. मी तिला तशी कल्पना देवून आपल्याकडे पाठविली अन् तुम्ही शब्द टाकला तर शंभरटक्के उद्याच काम होऊन जाईन. ”

"कोणती बाई म्हणालात?"

"रामआळीची शतपुत्रेबाई. "

"बघा बरं. नाहीतर तीही पळवाट शोधायची. "

"नाही शोधायची. गेली चार वर्षे बदलीसाठी तडफडतेय. बदलीसाठी तिला शब्द द्या. बघा कसं चुटकीसरशी काम होतंय ते. नेवसेच्या वक्तव्याने साहेबांची कळी खुलली. बाईचा पत्ता कळताच साहेबाला नजरेसमोर हिरवागार पोपट दिसायला लागला. नेवसेला बजावून सांगत साहेब निघून गेले. नेवसेने त्याच दिवशी बाईंना निरोप दिला.

दुसऱ्या दिवशी साहेब आपल्या केबीनमध्ये पेपरवेटशी खेळत होते. बरोबर आकरा वाजता शतपुत्रेबाई आत डोकावल्या. साहेबांनी जमदाड्याला चहासाठी पिटाळला चहापान होताना शतपुत्रेबाई साहेबांची केबीन न्याहाळीत होती. रिकामे कप नेताना साहेबांनी जमदाड्याला खडसावले,

"हे बघ कोणीही आलं तरी पाठवायचं नाही. तू सुद्धा आतमध्ये डोकवायचं नाही. काम झाल्यावर मी बोलवील तुला,तेव्हाच यायचं साहेबांच्या आदेशाचं पालन करीत जमदाड्याने दरवाजा लोटून घेतला. दरवाजा बंद होताच शतपुत्रेबाई जरा दचकल्याच. पण धीर धरून तशाच बसून राहिल्या.

मग साहेब म्हणाले,

"बदलीसाठी प्रयत्न केले होते वाटतं तुम्ही?"

"हो,पण नाही जनलं. जमेल जमेल, करून टाकू तुमचं काम. पण आमचंही काम तुम्ही करावं अशी अपेक्षा आहे.

"काय काम करावं लागेल. "

"सांगतो,जरा जवळ या. "

शतपुत्रेबाई जरा शंकीत नजरेने साहेबाकडे पाहू लागल्या. तरीही साहेबांच्या आदेशाचं पालन करीत थोडं पुढे सरकल्या. मग साहेब थोडं हळू आवाजात म्हणाले,

"माझ्या मिसेसची मानसिक स्थिती सध्या बरी नाही. आता तुम्ही मला मदत केली तर प्रश्न मिटू शकतो. पण एका अटीवर. हा मानसिक व भावनिक प्रश्न आहे. तेव्हा आपल्या दोघातला संवाद तिसऱ्याला कळू नये अशी अपेक्षा आहे. "

बाईंचा चेहरा गोरामोरा झाला. कसंबसं अवसान आणून म्हणाल्या,

"मला नाही समजलं काही. "

"नाही कसं मी नेवसेला आधीच सांगितलं होतं की बाई कबूल असतील तरच पाठव. नुसता रिकामा पिंजरा असून काय उपयोग?पोपटाशिवाय कुठं पिंजऱ्याला शोभा असते होय. आतापर्यंत दाबून धरलेलं मन विरघळलं. बाईंच्या डोळ्यातून अश्रूला पाझर असतील फुटला. त्या स्फुदून स्फुदून जशा रडाया लागल्या तसे साहेबही सैरभैर होत म्हणाले. अहो तुम्ही रडता कशासाठी. डोळे पुसा बरं. द्या नाही तर देवू नका. पण रडता कशासाठी?"

मग बाईंनी पर्समधून इवला इवला गुलाबी रंगाचा रुमाल काढून दोन तीनदा डोळे पुसले आणि साहेबांना म्हणाली,

"सॉरी,आपला काहीतरी गैरसमज झालाय. मी संसारीबाई आहे. आपण समजता तशी नाही. "

शतपुत्रेबाई तडक उठून केबीनबाहेर पडली. साहेब मात्र गोंधळलेल्या मन:स्थितीत नुसताच बघत राहिला. शरीरातलं अवसानच गळून गेलं. आता ही बाई राईचा पर्वत न करो म्हणजे झालं. त्याचा जीव प्रथमच इतका काकुळतीला आला होता. कंठ दाटून आला. डोळेही भरून आले. पण अश्रूंना त्यानी आवर घातला. तशाही अवस्थेत त्यानी आपला मोबाईल काढून नेवसेला लावला. नेवसेवर चांगलं तोंडसुख घ्यावं असं त्यांना वाटलं,पण बळेबळे मनावर संयम ठेवून त्यांनी फक्त त्याला बोलावून घेतला. बहुतेक साहेबांचं काम झालं असावं. बाईने पोपट द्यायचं कबूल केलं म्हणूनच शाबासकी देण्यासाठी फोन केला असावा असा गोड गैरसमज करून नेवसे दहावीस मिनिटातच त्यांच्यापुढे हजर झाला. साहेबाने पुन्हा केबीनचा दरवाजा लावून कुजबुज करीत सगळा वृत्तांत त्याला कथन केला.

नेवसे महाबिलंदर माणूस. त्याने पुढची सारी जबाबदारी स्वत:च्या खांद्यावर घेत शतपुत्रेबाईंचं घर गाठलं. दिवस मावळतीला गेला होता. शतपुत्रे श्री. व सौ. घरीच होत्या. त्यांचा एकुलता एक दशवर्षीय पुत्र पिंजऱ्यातील पोपटाशी बोलत होता. इतक्यात नेवसे तेथे पोहचले. नेवसेने साहेबांच्या पोपटाची सगळी हकिगत सांगताच शतपुत्रे कुटुंब पोट धरून हसू लागले. साहेबांच्या बोलण्याचा आपण विपरीत अर्थ घेतला म्हणून सौ . शतपुत्रे मनोमन शरमून गेल्या,पण श्री. शतपुत्रे मात्र आनंदी झाले. त्यांनी पक्की खात्री यावी म्हणून ते नेवसेला म्हणाले. खरंच साहेबाला पोपट हवा का?अन् समजा त्यांना हा पोपट दिला तर परत तर पाठविणार नाही ना!"

"असं कसं होईल,ते परत का पाठवतील. उलट त्यांच्या सौ. चा हट्ट पूर्ण झाल्याने त्यांना आनंद होईल. त्या पोपटाचं खरं गुपीत मात्र श्री.  शतपुत्रेनी नेवसेलाही सांगितलं नाही.

जेव्हा पोपट त्यांनी पाळला तेव्हा सारं घरदार त्याच्या सेवेला असायचं. पोपट मात्र चलाख निघाला. माणसाची भाषा त्याने लवकरच आत्मसात केली. तो बरंच काही तंतोतंत बोलू लागला. परिणाम मात्र विचित्र झाला. घरात त्याने जे पाहिलं व ऐकलं ते ते सारेच तो धडाधड बोलायचा. कोणी घरी पाव्हणा आला की तो अर्वाच्य शब्द उच्चारायचा. खाजगी जीवन जगताना श्री.  व सौ.  शतपुत्रांना या पोपटाची मोठीच अडचण वाटू लागली. मग शतपुत्रे दांपत्याने त्याला सोडून द्यायचं ठरवलं. एके दिवशी शतपुत्रेनं त्याला पिंजऱ्याबाहेर काढून टेरेसवर नेला.

"तुला मी या आकाशात विहार करायला मुक्त करतोय", असं म्हणून उडवला व शांतमनाने सुटकेचा नि:श्वास टाकीत ते घरात आले. पण . . . . .  पण या बहाद्दरानं

शतपुत्रंचा काही पिच्छा सोडला नाही. दुसऱ्या दिवशी घरात येवून तो पिंजऱ्यावर बसून राहिला. नाईलाजाने सौ. शतपुत्रे यांना पिंजऱ्याचं दार खोलावच लागलं. तेथून पुढे त्याचा चावटपणा एवढा वाढला की नाईलाजाने तो सहन करण्यापलीकडे त्यांच्या जवळ दुसरा मार्गच उरला नव्हता. श्री. शतपुत्रे यांनी मग दुसरी शक्कल लढविली. घरातला त्याचा पिंजरा उचलून वरांड्यात टांगला. सोसायटीतील तरणीताठी पोरं त्याच्याजवळ रेंगाळू लागली अन् बघता बघता अस्सल गावरान शिव्या द्यायलाही तो तरबेज झाला अशा पोपटाला स्वत : हून मागतात म्हटल्यावर शतपुत्रे दांपत्यांचा आनंद वाहू लागला म्हणून ते नेवसेंना लटकेच म्हणाले . . .

"फार गुणी पाखरू बरं हे. द्यायला मनच धजवत नाही बघा. तो गेला तर कसं सुनं सुनं वाटल आम्हाला घर. पण तुम्ही मागताय म्हणल्यावर तुम्हाला तरी कसं नाय म्हणावा शिवाय एका मोठ्या साहेबांच्या शब्दाला नकार तरी कसा काय द्यावा. "

बोलता बोलता श्री. शतपुत्रेनं त्यांच्या सौ. कडे पहात म्हटलं,माझं काय म्हणणं नाही,हिचा नकार नसला तर खुशाल घेऊन जावा.

"नेवसेसर नेवसेने खूपच आशावादी दृष्टीने सौ. शतपुत्रे यांच्याकडे पाहिलं मग सौ. शतपुत्रेची टकळी सुरू झाली. "नेवसेसर,तुमच्या शब्दाला किंमत द्यायची नाही तर आणखी कुणाला ? आमचीही एक अडचण होती. आम्ही तिघेही दिवसभर बाहेरच असतो. पोपटाला दिवसभर एकटं टाकून जायला जीवावर यायचं हो,पण विलाजच नव्हता. आता साहेबांकडे याला नेला तर त्यांच्या सौ. दिवसभर घरी असल्याने दोघांनाही करमून जाईन. खुशाल घेऊन जा. पण परत मात्र आणू नका. परत पाठविला तर त्याच्या नशिबाला पुन्हा दिवसभर एकटेपणा यायचा. "

नेवसेंना खूपच आनंद झाला. इतकं सहजासहजी काम होईल असं त्यांना अजिबात वाटलं नव्हतं. आता पोपट घेऊन गेल्यावर मात्र साहेबापुढं नेहमीच दिमाखात फिरता येईल,या कल्पनेत त्यांनी शतपुत्रे दांपत्याला धन्यवाद देऊन पोपटाचा पिंजरा उचलला.

नवीन पोपटासाठी अट्टाहास करणाऱ्या साहेबांच्या सौ. अजूनही अंथरुणावर लोळत होत्या. साहेब चिंताग्रस्त होऊन उगीचच कसल्यातरी मासिकाची पाने चाळत होते. पिलू कसलीही फिकीर न करता मजेत खेळत होती. तेवढ्यात पोपटाचा पिंजरा घेऊन नेवसेसरांनी सुहास्य मुद्रेने एन्ट्री केली. पोपटाचा पिंजरा पाहताच साहेबांच्या सौ. खडबडून उठल्या. पिलू तर आनंदाने उड्याच मारू लागली. साहेबही नेवसेसरांना पाहताच अगदी भारावून गेले. घरी एखादा सण असावा असा आनंद सोहळा त्यांच्या घरी रंगला. दोन दिवसाच्या प्रतिक्षेनंतर साहेबांच्या सौ. किचनमध्ये घुसल्या. गोडधडाचा बेत किचनमध्ये दरवळू लागला. या आनंद सोहळ्यामुळे साहेबाचं सारं घर उशिरा निद्राधीन झालं.

दुसऱ्या दिवशी साहेब सकाळी सहालाच उठले. त्यांच्या सौ . मात्र अजूनही गाढ झोपलेल्या होत्या. त्यांना वाटलं हिलाही उठवावं म्हणून ते सौ. ला हाक मारून उठवू

लागले,

" रसिका,ये रसिका ऊठ. "

' ते पाहून पिंजऱ्यातील पोपटाने त्या सुप्रभाती आपल्या नव्या मालकीनीला साद घातली.

"ये भवाने ऊठ की,ये भवाने ऊठ की. "

दोघेही आता होऊन पोपटाकडे पाहू लागले. त्यांना पहिल्याच दिवशी असा अनुभव आल्याने साहेबांच्या सौ. अंथरुणात बसूनच एकटक पिंजऱ्याकडे पहातच राहिल्या. त्या अजूनही उठेनात म्हणून की काय पोपटाने पुन्हा साद घातली,

"टवळे उठ की आता"

मॅडमला प्राणी व पक्षांची खूपच आवड होती. त्यांनी एकदा एका कुत्र्याचं पिल्लूही पाळलं होतं. संध्याकाळी त्या झोपल्यावर ते निमुट पायथ्याला बसून रहायचं. थंडीचे दिवसात ते कितीतरी वेळा अंथरुणातही घुसायचे. पण असा चावटपणा त्याने कधीच केला नव्हता. या अगोदर पोपटही पाळला होता,पण कधी ब्र शब्दसुद्धा त्याने कधी काढला नाही अन् पहिल्याच दिवशी त्याने असा तमाशा मांडलेला बघून त्या साहेबांकडे प्रश्नार्थक नजरेने व्याकूळ होऊन नुसत्याच पहात राहिल्या. साहेबांनी आजवर बरंच काही सहन केलं होतं. पण तोंड उघडायची त्यांची कधीच हिम्मत झाली नव्हती. बऱ्याच वेळा तोंडात आलेले शब्द त्यांनी निमुटपणे गिळले होते. पण नवा पोपट मात्र अगदी त्यांच्या मनातलं बोलला होता. आयुष्यात पहिल्यांदाच ते नाचत गाऊ लागले.

"हा नवीन पोपट हाय" . . . .

**- सचिन बेंडभर / पिंपळे जगताप**
**मो. - 9822999306**

# श्रावणमास



निसर्ग सुंदर वैभव
साजे श्रावणमासी
चहुकडे रम्य मनोहर
गमे श्रावणमासी।

हिरवा शालू दिगंत
नेसे श्रावणमासी
सोनेरी किरणे,सरसर
शिपके श्रावणमासी।

इंद्रधनुचे सप्तरंगी क्षितीज
उजळे श्रावणमासी
बीज अंकुरत वसुधा
हीरवळे श्रावणमासी।

सुगंध मोहक रानफुलांचा
पसरला श्रावणमासी
झाडे वेली गाती गाणी
कुहूकुहूरे श्रावणमासी।

सणासुदीचे मांगल्य लेने
हौस हौसे श्रावणमासी
रान सारं गाराचिंब
मौज मौजे श्रावणमासी।

दऱ्याखोऱ्यातुनी सरिता
प्रवाही श्रावणमासी
वदनी वदती काव्यांमृत
श्रवणेही श्रावणमासी.

मुलाफुलांची वनी रेलचेल
मधुगाणे श्रावणमासी
कृपाळू पुज्य निसर्गराजा
आदिमगाणे श्रावणमासी।

- विनोद जाधव / जामनेर
मो.- 9421522008

# समाधान हेच सर्वोत्तम ध्येय



आयुष्यात तुम्हाला काय हवे आहे? हा प्रश्न बऱ्याच जणांना विचारल्यावर आपल्याला उत्तरे मिळतात की, मला सुखी व्हायचंय, यश मिळवायचं आहे. मुलांबाबतच्या ईच्छा विचारल्या असता बहुतांशी हेच उत्तर मिळते. आयुष्यात जोपर्यंत आपल्या बाबतीत चांगले घडत असते तोपर्यंत आपल्याला ते हवे असते. परंतु दुःख देणारी परिस्थिती निर्माण झाली की मानसिक संघर्ष अनुभवावा लागतो.

पूर्ण जीवनकालामध्ये अनेक प्रसंग येतात मग ती सुखकारक असोत अथवा दुःखदायक असोत. येणाऱ्या प्रत्येक घटना, प्रसंगाकडे आपण कशा पद्धतीने पाहतो यावर तर समाधान अवलंबून असत. चांगलं जीवन जगण्यासाठी चांगले विचार, योग्य संधी निर्माण करणं, निकोप नातेसंबंध इ. बाबींची आवश्यकता असते.

'सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वताएवढे' या उक्तीप्रमाणे सुखाची मात्रा कमी मानली जाते. याचे कारण म्हणजे सुख शोधण्याऐवजी दुःखाचाच आपण जास्त बाऊ करतो. सुख हे मृगजळासारखे असते. त्याच्या पाठीमागे आपण जितके लागू तितके ते आभासी वाटते. इंद्रधनुष्याच्या एका बाजूला सुख तर दुसऱ्या बाजूला दुःख असते. एका बाजूला सुख आणि दुसऱ्या बाजूला दुःख असल्याने बऱ्याचदा टोकाची परिस्थिती निर्माण होते.

आयुष्यातील अशा अनेक घटनांचा आढावा आपल्या घटनात्मक स्मृतीच्या आधारे घेतल्यास या घटनांना दुःखाचीही झालर असल्याची जाणीव आपणास होईल. उदा. मुलाचा जन्म ही घटना विचारात घेतल्यास एकीकडे नवीन सदस्य घरी येणार याचा आनंद तर दुसरीकडे कसलाही धोका न निर्माण होता जन्म होईल का, याची काळजी. सहलीला गेल्यावर लोकांना वाटते की आपण आनंदी होऊ. या विचाराने ते सहलीला जातात, मौजमजा करतात, आनंदित होतात, काळजी दूर ठेवतात आणि सुख अनुभवतात.

हल्लीच्या धकाधकीच्या जीवनात माणूस चिडखोर व संवेदनशून्य बनत चालल्याचे आपणास पाहायला मिळते. हव्या त्या गोष्टी लगेच आणि मुबलक प्रमाणात मिळाल्या नाहीत तर व्यक्ती स्वभान हरवून बसते. एखादी गोष्ट स्वीकारून खरं तर पर्यायी योग्य मार्गाने समाधान



मिळवता येते परंतु तशी कृती मात्र घडताना दिसत नाही. आज जागतिक आकडेवारी पाहिली तर लहानसहान अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत म्हणून आत्महत्या करणाऱ्या तरुणाईचे प्रमाण वाढताना दिसून येते.

अशा घटना पाहिल्या की, सुख म्हणजे काय याची नेमकी व्याख्या करणं थोडं अवघडच होत. एखादा गरीब स्वतःच्या गरजा भागवण्याइतपत पैसे नाहीत म्हणून दुःखी असतो तर एखादा श्रीमंत पैसे, प्रसिद्धी असूनही मानसिक समाधान नाही म्हणून दुःखी असतो. त्यामुळे पैसा हे सुखप्राप्तीचे कारण ठरत नाही. आज गरीबापासून श्रीमंतापर्यंत प्रत्येकाला कोणत्या ना कोणत्या प्रकारची काळजी, चिंता सतावतच असते. त्यामुळे प्रत्येकाला दुःख आहे. या दुःखावर मात करण्यासाठी प्रत्येकजण सुखाच्या शोधात आहे. वाढते नागरीकरण, बेरोजगारी, शिक्षणाचे बदलते स्वरुप, कुटुंबाचे बदलते स्वरूप, विकृत लैंगिकता, विसंवाद अश्या अनेक कारणांमुळे माणसांच्या गर्दीत माणूस दिवसेंदिवस हरवत चालला आहे.

खरंतर सुख अनुभवण्यासाठी सुखाचे ध्येय ठेवावं लागतं. सुखाचे ध्येय ठेवणे म्हणजे 'उच्चतम उत्तम विचार' करणे होय. सुख कोठेही शोधून सापडत नाही कारण ते तर आपल्याच अंतरंगात दडलेले असते. स्वतःचा योग्य व्यक्तिमत्व विकास साधण्यासाठी प्रत्येकाला गरज असते ती स्वतःच्या अंतरंगात डोकावून पाहण्याची, आत्मविश्लेषण करण्याची. सुखाला सीमा नाही त्यामुळे सुखाचे ध्येय गाठण्यासाठी समाधानाचे ध्येय ठेवावे लागेल. कारण सुख मिळविण्यापेक्षा समाधान मिळविणे हीच आरोग्यासाठी संजीवनी आहे.

आयुष्य म्हटलं की थोडं डाव उजव होणारच, मानसिक द्वंद्व निर्माण होणारच. कधी कधी आपणास भरभरून मिळेल, कधी थोडस तर कधी काहीच आपल्या पदरी पडणार नाही. मग जे मिळालंय त्यावर रडत बसायचं की त्यात समाधान शोधण्याचा प्रयत्न करायचा हे फक्त आपल्याच हाती आहे.

शेवटी काय तर, आपल्याला निर्माण झालेल्या परिस्थितीचा सामना व स्वीकार करावाच लागेल. आयुष्य पुढे चालू ठेवावेच लागेल. नेहमी त्या तीव्र दुःखाच्या भावना घेऊन उदासपणे कोणीच जगू शकत नाही. आनंद विरून गेला की समाधानाचीच आशा आपण करू शकतो आणि सुखी होऊ शकतो. त्यामुळे समाधान हेच सर्वोत्तम ध्येय आहे.

**- प्रा. रमेश कट्टीमणी / मिरज**
**मो.- 9766801005**
(कन्या महाविद्यालय, मिरज)

# संकटांचा ससेमिरा



भासवली मुद्दामहून खताची कृत्रिम तूट !
शेतकऱ्यांची मग केली पाहिजे तशी लूट !!

खत खरेदीला बाजारात,शेतकऱ्यांची पडते उडी !
चढ्यादराने खत विक्री,मिळते तुटपुंजी सबसिडी !!

एरवी खाद्यतेलाचे भाव,गगनाला भिडतात !
बाजारात आणताच सोयाबीनचे भाव पडतात !!

संपत नाही शेतकऱ्यांच्या संकटाचा ससेमिरा !
पावसाअभावी जातो हातातून खरीप सारा !!

मुगतोडणीलाच अवेळी,बरसतो धो-धो पाऊस !
काढणीला आलेल्या पिकांची करतो नासधूस !!

बळीराजाच्या डोळ्यात मात्र,दाटून येतात आसवं !
निसर्गालाही बळीराजाचं दुःख,दिसत का नसावं !!

फेडावं कसं कर्ज,याचा विचार करून झुरतात !
संकटसमयी जवळचे नातेवाईक साथ सोडतात !!

वैतागून एक दिवस,ते जीवनालाच कंटाळतात !
स्वतःच्याच शेतात शेतकरी फास घेऊन मरतात !!

राज्यकर्त्यांनाही पाहिजे असते टीकेसाठी कारण !
पोशिंद्याच्या आत्महत्येचं होतं घाणेरडं राजकारण !!

मागणं पोशिंद्याचं भगवंताला आता एकच घडावं !
उभ्या पिकांचं दान शेतकऱ्यांच्या पदरात पडावं !!

**डॉ. शिवाजी नारायणराव शिंदे / सोलापूर**
**मो. - ९३७०६२१४७८**
(सहायक कुलसचिव(वर्ग १ अधिकारी) तथा मराठी भाषा दक्षता अधिकारी
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर)

# स्वत्व..



चार पाच दिवसांपासून नेहाची खूपच धावपळ सुरु होती. ऑफिसमधून येता येता बरंचसं सामान तिनं मॉलमधून घरी आणलेलं. दुपारी तर कुरियरवालाही कसलासा बॉक्स देऊन गेला. तिच्या या वागण्यावरुन काहीतरी खासा बेत होणार आहे याचा अंदाज आलेला. पण नेमकं काय हे उमगलं नव्हतं. तिची ती धावाधाव सुमतीबाई म्हणजे नेहाच्या सासूबाई यांच्या लक्षात आलेली. पण ‘प्रत्येकाची स्वतःची स्पेस असते आणि त्यात कोणीही ढवळाढवळ करायची नाही’ या नवविचारांची कास पकडल्यामुळं सुमतीबाई फार खोलात गेल्या नसल्या तरी त्यांचं बारीक लक्ष नाही म्हणायला होतंच.

“आई, कुरियर आलं आहे का काही?”

ऑफिस मधून आल्या आल्या नेहानं सुमतीबाईंना प्रश्न केला.

“हो. तुझ्या रुममध्ये टेबलावर ठेवलं आहे.”

भाजी निवडता निवडता सुमतीबाईंनी नेहाला उत्तर दिलं.

“काय बाई, उधळपट्टी म्हणायची की काय? हल्लीच्या या पोरांना खरेदी करायला काही कारण लागत नाही. त्या मोबाईल वरुन तर काय काय मागवत असतात. आमच्यावेळी नव्हतं बाई असं. सणावारी काहीतरी खरेदी व्हायची. तीही गाठीला गाठ मारुन ठेवलेल्या पैशांतून. उठसूट काय बाय घेणं परवडायचं नाही आम्हांला.”

जपमाळ ओढत टीव्हीवरचं कीर्तन ऐकत बसलेल्या नेहाच्या आज्जेसासूनं नेहाच्या खरेदीला नापसंती दर्शवली.

“असू द्या हो आई. जमाना बदललाय. आणि आपणही वाहत्या प्रवाहाप्रमाणं स्वतःमध्ये बदल हा केलाच पाहिजे.”

सुमतीबाईंनी आपल्या सासूला समजावण्याचा प्रयत्न केला.

“हां कर बाई तू बदल. त्या प्रवाहात मनसोक्त डुबक्या मार. मला आपलं जे वाटलं ते बोलले.”

सासूबाईंच्या या बोलण्यावर सुमतीबाईंनी फक्त हसून त्यांच्याकडं पाहिलं अन् त्या त्यांचं काम करु लागल्या. तितक्यात नेहा तिचं ते पार्सल घेऊन आली.

“आई, हा नविन स्टीमर ऑर्डर केलेला. छान आहे ना?”

जपमाळ ओढणाऱ्या आज्जेसासूनं त्या स्टीमरकडं बघितलं आणि काहीशा नाराजीनंच नजर फिरवली. सुमतीबाईंनी मात्र तो स्टीमर हातात घेत,

“हो गं छान आहे.”

असं बोलून आपली पसंती दर्शवली. कौतुकाचे दोन शब्द ऐकल्याने नेहा खुश

झाली. तो स्टीमर तिनं किचनमध्ये जागा फिक्स करत ठेवून दिला.

"आई, ड्रायफ्रूटस कुठे आहेत? जरा वरतीच काढून ठेवा. मला उद्या सकाळी लवकर लागतील. उद्या ऑफिसला उशिरा जाणार आहे." नेहाच्या या बोलण्याला सुमतीबाईंनी होकार दिला आणि निवडलेल्या भाज्या घेऊन त्या रात्रीच्या जेवणाच्या तयारीला लागल्या.

दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांना जाग आली ती किचनमधल्या खुडबुडीनं. नेहानं रात्रीच उद्याचा नाष्टा मी बनवेन असं सांगितलेलं. सोबत एक सरप्राईज डिशही. त्यामुळं उगाच आपली लुडबुड नको म्हणून उशिराच उठल्या. निवांत आवरून बाहेर जायचं हा विचार करत त्या तयार होऊ लागल्या. तोच त्यांच्या कानांवर हातातून काहीतरी भांडं निसटल्याचा आणि पाठोपाठ 'आईss' असा आवाज आला. आवाज ऐकून त्या बाहेर धावतच आल्या. नेहाचा नवरा, पेपर वाचत बसलेले सासरे, आज्जेसासूबाई सगळेच आवाज ऐकून किचनमध्ये आले. किचनमध्ये ओट्यावर बरंचसं सामान अस्ताव्यस्त पडलेलं. नेहा छानशी तयार होऊन, एप्रन वगैरे घालून ओट्याजवळ डोक्याला हात लावून उभी. समोर जे काही पडलं होतं त्याकडे ती विस्फारल्या नजरेनं पाहत होती. स्टीमर मधून काढलेला पदार्थ पाहून तिची ती अवस्था झालीय हे सुमतीबाईंच्या लक्षात आलं. नेहाजवळ जात त्यांनी,

"नेहा, तुला भाजलं तर नाही ना?"

असं विचारत त्यांनी तिचा हात हातात घेतला. तर हातात ग्लोव्हज. म्हणजे भाजण्याचा प्रश्नच नव्हता. याचा अर्थ तिला तिनं बनवलेला पदार्थ पाहून धक्का बसलेला. सुमतीबाईंनी साऱ्यांना 'काही झालं नाही. मी बघते. आवरून घ्या तुमचं.' असं सांगितलं अन् त्यांनी त्यांचा मोर्चा नेहाकडे वळवला आणि त्यांनी नेहाला विचारलं,

"काय झालं नेहा? पदार्थ बिघडला का? बिघडू दे ना. त्यात काय एवढं."

"बघा ना आई, कसं दिसतंय ते! प्रत्येक स्टेप फॉलो करत मी सगळं अगदी प्रमाणशीर केलं. पण कुठेतरी काहीतरी चुकलंच."

"काय करत होतीस तू?"

"शाही मोदक. ड्रायफ्रूटस, मावा घालून."

सुमतीबाईंनी त्यांच्याही नकळत कपाळावर हात मारून घेतला. वरणभात, चपाती, भाजी इतकंच कसंबसं करणाऱ्या आपल्या सुनेनं घाट घालावा तो ही मोदक करण्याचा! याचंच त्यांना आश्चर्य वाटत होतं. पण पटकन काहीतरी बोलून दुखावण्याचा, नाराज करण्याचा त्यांचा स्वभाव नव्हताच. काही न बोलता त्यांनी किचनचा ताबा घेतला. सगळ्यांसाठी चहा बनवला आणि त्या नेहाशी बोलू लागल्या,

"नेहा, आज मोदक करण्याचं काही विशेष कारण?"

"आई, आज ऑफिसमध्ये 'स्वाद-आस्वाद'ची टीम येणार आहे. छोटीशी स्पर्धा होणार आहे. 'आपले पारंपारिक पदार्थ पण नाविन्याचा साज घेऊन सजलेले' अशी




थीम ठेवली आहे. म्हणून मी मोदक करत होते.”

नेहाने केलेले मोदक म्हणजे चोची पसरून पडलेली छोटी पिल्लंच दिसत होती. जास्तवेळ उकडल्यानं त्या मोदकांची पारी चिवट बनलेली. काहीतरी विचित्रच दिसत होतं सारं.

“याची रेसिपी तुला कुठे मिळाली?”

सुमतीबाईंनी असं विचारताच नेहानं चटकन समोरचा टॅब घेतला अन् सुरु करुन दाखवला. त्या टॅबमधील रेसिपी समजावून सांगणारी शेफ आणि नेहा सारख्याच दिसत होत्या. अगदी त्या शेफच्या ड्रेसपासून ते स्टीमरच्या रंगापर्यंत सगळं सेम होतं. अगदी डिट्टो कॉपीच. पण पदार्थानं मात्र मान टाकलेली. जे जमायला हवं होतं नेमकं तेच जमलं नव्हतं.

सुमतीबाईंकडे आणि नेहाकडे बारीक लक्ष ठेवून असलेल्या आज्जेसासूबाईंनी आता मात्र न राहवून तोंड उघडलंच.

“सुमती, हे म्हणजे त्या गोष्टीतल्या बाईसारखं झालं म्हणायचं. जिला कणकेत पुरण की पुराणात कणिक याचा ओ की ठो माहिती नाही आणि निघालेली पुरणपोळ्या करायला.”

सुमतीबाईंनी सासूबाईंकडे बघितलं अन्,

“असू द्या हो आई. चालायचंच. बघते मी काय करायचं.”

असं बोलून त्यांनी नेहाला टॅब बंद करायला सांगितला.

"बघ हो बघ. तू आणि तुझी सून दोघी मिळून काय गोंधळ घालायचा आहे तो घाला. पण पोटातले कावळे मरण्याआधी त्यांना शांत करा म्हणजे झालं."

"आई, कसली गोष्ट? मी तर पुरणपोळी करतच नाहीये. मग आजी काय बोलत आहेत."

"काही नाही गं. त्या आपल्या अशाच बोलल्या. आपण आधी हे आवरून घेऊया का?"

"हो आवरूया. पण तुम्ही मला ती कसली गोष्ट सांगा."

नेहानं सासूची पाठच धरली.

"बरं बाई. थोडक्यात सांगते ऐक. ही गोष्ट आहे दोन शेजारणींची. आता शेजारणींमध्ये ईर्षा तर हमखास असतेच. कितीही सख्ख्या शेजारणी म्हंटल्या तरी त्यांच्यात तुम्ही म्हणता तशी Superior - Inferior ची चढाओढ, स्पर्धा असतेच. तशीच या दोघींमध्येही कोण कोणापेक्षा सरस हे दाखवण्याची स्पर्धा असतेच. त्यातील एक शेजारीण कुठून तरी पुरणपोळी करायला शिकून येते. आणि आपलं कौशल्य, आपल्या हाताची चव वगैरे दाखवण्यासाठी म्हण किंवा शेजार घरी आपल्या घरात शिजलेला पदार्थ देण्याची सवय म्हण, ती गरमागरम पुरणपोळी दुसऱ्या शेजारणीच्या घरी घेऊन येते. दुसऱ्या शेजारणीचा नवरा ती पुरणपोळी खातो आणि मनसोक्त कौतुक करतो. त्याच्या बायकोला मात्र हे आवडत नाही. तिचा मनातल्या मनात जळफळाट होऊ लागतो आणि नवरा बाहेर गेल्या गेल्या ती शेजारणीच्या नकळत, लपूनछपून ती पोळ्या कशी करते हे बघते. आणि घरी येऊन पुरणपोळ्या करण्याचा घाट घालते. कणिक, पुरण करून घेते. पण कणकेत पुरण की पुरणात कणिक घालायची हेच विसरून जाते. शेजारणीला जाऊन विचारावं तर ती भाव खाईल, आपला स्वाभिमान दुखावला जाईल असं वाटून ती जात नाही. पण ती तिचं अनुकरण करत राहते. तिनं कशी पोळी बनवली, त्यासाठी ती कशी बसली होती, कशी साडी नेसली होती वगैरे वगैरे.. पण काही केल्या तिची पोळी बनत नाही आणि तव्यापर्यंत जात नाही. शेजारीण विधवा असते म्हणून अगदी तिच्यासारखं कपाळीच कुंकू अन् हातातील बांगड्याही ती काढून ठेवते. पण तरीही ये रे माझ्या मागल्या. तेवढ्यात तिचा नवरा घरी येतो. आपल्या बायकोचा असा अवतार पाहून तो खूप चिडतो. काठी घेऊन तिला मारझोडही करतो. नसते उद्योग करायला कुणी सांगितलं म्हणत आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार असंही सुनावतो.

समजली? अशी आहे ती गोष्ट."

सुमतीबाईंनी काम आवरत आवरत आपल्या सुनेला हे सांगितलं.

"आता बघ हं नेहा, तू हा मोदकाचा घाट घातलास. नवीन काहीतरी बनवण्याचा प्रयत्न केलास ते छानच आहे. कौतुकच वाटतं त्यासाठी. पण हे करताना दुसऱ्याची कॉपी करून चालत नाही गं. त्यात आपलं असं, स्वतःचं असं काही तरी असावंच

लागतं."

सुमतीबाईंचं बोलणं ऐकून नेहाला आपलं काही तरी चुकलं हे लक्षात येऊ लागलं.

"हो आई, माझं काही तरी चुकत होतं. पण नेमकं काय हे कळेना. प्रत्येक स्टेप मी फॉलो केलेली."

"अगं, प्रत्येक स्टेप फॉलो केलीस हे मान्य. पण समोरच्या बाईनं भाजीत दोन चमचे तिखट आणि अर्धा चमचा मसाला टाका असं सांगितल्यानं आपल्या पदार्थाला चव येत नाही. पदार्थ करताना या साऱ्या मसाल्यांसोबत आपल्या हातची चवही मिसळावी लागते. सोबत आपल्या मनातील प्रेम, माया यांनी त्या पदार्थाला सजवावं लागतं. तरच तो पदार्थ चांगला बनतो. आणि या गोष्टी कोणी शिकवाव्या लागत नाहीत किंवा शिकवून येत नाहीत. मनात असेल तरच कोणतीही गोष्ट चांगली बनते ना?"

"हो आई."

"आता बघ हं, साधी बटाट्याची भाजी करायची झाली आणि आपल्या दोघींना अगदी सारखं साहित्य दिलं असलं तरी दोघींच्या भाजीच्या चवीत बदल हा वाटतोच ना?"

"हो ना आई. मला तुमच्यासारखी बटाट्याची भाजी करणं जमतच नाही."

नेहाच्या उत्तरानं सुमतीबाईंना हसू आलं.

"अगं वेडाबाई, मी फक्त उदाहरण म्हणून सांगतेय. कोणताही पदार्थ असो वा कोणतंही काम, ते करताना आपलं असं काहीतरी मिसळलं की ते नक्कीच चांगलं जमतं हे लक्षात ठेव."

बोलत बोलत सुमतीबाईंनी नेहाच्या उरलेल्या मोदकाच्या साहित्यातून छानसे मोदक करून तिच्यासमोर ठेवले. जे त्या व्हिडिओतील मोदकांहूनही सुंदर दिसत होते. मोदक बघून नेहाला राहवलं नाही. पटकन एक मोदक उचलून तिनं तो तोंडात टाकला अन् सासूला मिठी मारत,

"आई, तुम्ही खरंच सुगरण आहात."

अशी मोदकभरल्या तोंडानं स्तुतीही केली.

खरंच आहे ना, एखादा पदार्थ असो वा एखादं काम, त्यामध्ये स्वतःचं असं काहीतरी मिसळल्याशिवाय चांगलं होतच नाही. आता कोणीतरी म्हणेल, 'स्वतःचं असं काहीतरी म्हणजे नेमकं काय?' आता बघा हं, बऱ्याचवेळा एखादा पदार्थ चाखल्यानंतर आपल्याही नकळत आपण बोलून जातो की, 'या पदार्थाला तशी चव नाही.' 'लोणचं घालावं तर आजीनंच.' 'अमुक एखादी भाजी करावी तर आईनंच.' आता या अशा स्पेशल पदार्थांमध्ये आई किंवा आजीनं नेमकं काय मिसळलेलं असतं हे शोधून सापडतं का? नाही ना! ती त्यांच्या हाताची चव असते. तो पदार्थ बनवण्याची त्यांची 'खासियत' असते. जी दाखवता तर येत नाही पण तिनं स्वतःचं अस्तित्व मात्र

जपलेलं असतं.

ही खासियत फक्त पदार्थांपुरतीच मर्यादित असते असं नाही. प्रत्येक कामात, प्रत्येक गोष्टीत प्रत्येकाची स्वतःची अशी एक खासियत असतेच, वेगळेपण असतं. जे ज्याचं त्यालाच जमतं. ज्याचं अनुकरण, कॉपी केली जाऊ शकते. पण त्यातला खरेपणा, सच्चेपणा मात्र त्या कॉपी केलेल्या गोष्टीत येत नाही.

सांगायचंच झालं तर, आता आपल्या मराठीतील वर्णाक्षरं 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंतची किंवा इंग्रजीतील 'A' पासून 'Z' ,पर्यंतची या अक्षरांपासून शब्द तयार होतो. शब्दांपासून वाक्य बनते आणि वाक्यापासून परिच्छेद बनत असतो. या मराठीतील ४६/४८ किंवा इंग्रजीच्या २६ अक्षरांपासूनच सगळी निर्मिती होत असते. छोट्या मोठ्या कथा, लेखांपासून मोठमोठ्या कादंबऱ्या, पुस्तकं ही या अक्षरांपासून तयार झालेल्या शब्दांनीच निर्माण होतात. ही सगळी निर्मिती प्रक्रिया होण्यासाठी काय गरजेचं असतं? तर त्या अक्षरांना, शब्दांना भाव-भावनांचा साज चढवून सजवणं. कधी मुक्तपणे वावर करू देणं. तर कधी कोंदणात बंदिस्त करणं. प्रत्येकाला विचार स्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य आहेच. त्याप्रमाणे जो तो व्यक्त होत असतो. कोणी कसं व्यक्त व्हावं याला कसलंही बंधन नसतं. फक्त त्या व्यक्त होण्यात सच्चेपणा असणं महत्त्वाचं ठरतं. या व्यक्त होण्यातून प्रत्येकाची स्वतःची एक शैली निर्माण होऊ लागते, झालेली असते. आणि ती शैली कोणालाही सहजासहजी कॉपी करता येत नाही. थोड्याफार प्रमाणात त्या शैलीचं अनुकरण केलं गेलं तरी ते वाचकांपर्यंत योग्यरीत्या पोहोचत नाही. 'येऱ्या गबाळ्याचे ते काम नव्हे तेथे पाहिजे जातीचे' असं म्हणतात ते खरंच आहे. म्हणूनच तर कोणत्याही गोष्टीत स्वतःचं आपलं काही असेल तरच ते टिकतं आणि आपल्या विचारांना टिकवतं. नाही तर अनुकरण हे कधीही अयोग्यच!

**- सुषमा जयसिंगराव माने-गावडे / शिरोळ**
**मो.- 7020072678**

**(- लेखिका, व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंक २०२१ च्या अतिथी संपादक आहेत.)**

# स्वच्छ नाही मन तर...



गोरगरीबांच्या पॅकेजमध्ये
घालतायत दलाल घोळ.
दगडधोंड्यावर दिसतेय
दुधातुपाची ओघळ.
स्वच्छ नाहीच मन
तर काय करील साबण.....१

राऊळात देवापुढे सदा
झुकत असते ताठ मान.
स्वार्थ भरल्या पोटामध्ये
हव्यासाचं पिकतं रान.
स्वच्छ नाहीच मन
तर काय करील साबण.....२

विकृत,घृण,कोडग मन
किड्यागत लिवलीवतय
अंधश्रद्धेच्या दलदलीत
बळी,गंडा-दोऱ्यात रमतय
स्वच्छ नाहीच मन
तर काय करील साबण.....३

स्वच्छतेचा वसा,अंधश्रद्धा खालसा
भुकेल्यास अन्न,निराधाराला काठी.
बुवाबाजीच्या मठावर हाणा
जोरदार कायमची लाठी
स्वच्छ असेल मन
तर कशाला हवा साबण.....४



- कल्पना मापुसकर / मिरारोड
मो.- 9082646494

# एक अनुभव असाही...



सर्वांना दिवाळीच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा ही दिवाळी सर्वांना आरोग्य, सुखसमाधान समृध्दीची लाभावी ही सदिच्छा.

सध्याच्या धावपळीच्या जीवनात जो तो धावतोय धावतोय, अगदी रात्रीचा दिवस करून आपल्या माणसांसाठी राबत आहेत. मग तो कुणी रोजंदारीवर काम करणारा मजूर असो वा कोणी मोठा व्यवसायिक!

महागाई आणि बेकारीने त्रस्थ झालेल्या आपल्या सहकाऱ्यांना अजून एका गोष्टीचा त्रास होतोय तो म्हणजे भ्रष्टाचार! आता हा भ्रष्टाचार म्हटलं की वाटतं...लाचखोरपणा; पण नाही हा भ्रष्टाचार आहे भावनांचा होय आपुलकीने जपलेल्या माणुसकीचा.....

शेखर आणि रुपाली ही दोघं नवरा बायको आपल्या कुटूंबासाठी अहोरात्र कष्ट करीत होती.घरची थोडीफार शेती आणि म्हातारे आई वडील यांच्या सोबत शेखर आपल्या शेतात राबत होता.हसतमूख स्वभावाच्या शेखरला त्याच्याच माणसांनी लूटलं होतं.भावनेच्या भरात त्याच्या चुलत्यांनी शेखरच्या वडिलांना फसवून त्यांची शेतीवाडी स्वतः कडे घेतली होती.अडाणी बापाने कोर्या कागदावर अंगठा करून आपला हिस्सा भावाला दिला होता.

शेखरला हे सर्व समजूनही तो काहीच करु शकत नव्हता.कारण, कोर्टकचेरीच्या चक्कर मध्ये पडून नाती तोडणं शेखरला पटत नव्हतं.म्हणून तो काहीही न बोलता झालं गेलं विसरून रोजगारासाठी दुसरीकडं जाऊ लागला.सर्वांना आपलं समजणार्या शेखरला मात्र कुणी आपलं मानलं नव्हतं.कर्तबगार शेखरच्या कष्टाला पाहून त्याच्या मित्रांनी भागिदारीत व्यवसाय सुरु करण्यासाठी शेखरला तयार केले आणि चौघांनी मिळून एक व्यवसाय सुरु केला.बाकींच्यांच्या कष्टापेक्षा शेखरचं कष्ट अधिक जास्त होते.व्यवसाय कमी वेळात जास्त प्रमाणात जम बसला होता.चार पैसे जमत होते. भरभराट होत होती.शेखरसह त्याचे मित्र खूप खूप खूश होते.काम करताना उत्साह वाढत होता.एक एक काम वाढत होतं.

लोकांना त्यांचं हक्काचं घर मिळत होते.शेखरला भरभरून प्रतिसाद मिळत होता आणि हेच त्याच्या मित्रांना आवडत नव्हतं.त्यांनी शेखरचा वापर करून घ्यायला सुरुवात केली.भावनाविवश शेखरच्या हे लक्षात आलं नाही.रात्रंदिवस फक्त काम करणं एवढंच शेखर करत होता.त्यामुळे घराकडे शेखर कमी जात होता.बायकोमूलांसाठी वेळ देता येत नव्हता. आई बाबांचे आजारपण त्याची बायको रुपालीच बघायची. दिवाळीसारख्या सणाला खूप काही करायचं असं ठरवून शेखरने आपल्या मित्रांकडे

पैसे मागितले पण मित्रांनी त्याला उडवाउडवीची उत्तरे दिली व त्याच्या साधेपणाचा फायदा घेऊन त्याला व्यवसायातील भागिदारीतून बेदखल केले.

आपण पुन्हा एकदा फसलो गेलोय याचं शेखरला खूप दू:ख झाले.निराशेच्या गर्तेत सापडलेल्या शेखरला जीव नकोसा वाटू लागला.तो सतत आत्महत्येचा विचार करु लागला.तो सतत आजारी पडू लागला.नको नको ते विचार करु लागला.तेव्हा त्याची सहचारिणी रुपाली खूप धीराने वागली.त्याने त्याला समजावलं.पुन्हा नव्याने सुरुवात करायची यासाठी बचतगटाच्या माध्यमातून कर्ज काढले आणि पुन्हा नव्याने व्यवसाय सुरु केला.

माझी म्हणावी अशी हक्काची नाती त्यांनी जोडली होती.त्यामध्ये काही तिचे मानलेले पण जीवाभावाचे भाऊ होते.त्यांनी कमी वेळात खूप जास्त कष्ट घेतले व पुन्हा व्यवसायाचा जम बसवला.आज शेखर इतरांसारखाच एक कुशल व्यावसायिक आहे.पण आजही शेखरने माणुसकी सोडली नाही.आपल्या मितभाषी बोलण्याने त्याने अनेक माणसे जोडलेली आहेत.

आज शेखर एक चांगला माणूस म्हणून त्याची ख्याती वाढत आहे.आपल्या स्वभावाने शेखरने खूप माणसे मिळवलीत आणि तो स्वत: अनेक अडचणींतून गेल्याने अडल्या नडल्या प्रत्येकाच्या मदतीला धावून जातो.कुणाचं लग्न ठरवणं असो किंवा कुणाचा दवाखाना करायचा असो शेखर आपल्या परीने मदत करीत असतो.आज भले तो बंगल्यात राहत नाही गाडीतून फिरत नाही पण लोकांच्या मनात तो राजा सारखा राज्य करतो.




समोरचा आपल्याला लूटत आहे हे ओळखून सुध्दा तो भोळा शंकर बनून दुर्लक्ष करतो आणि जेव्हा एखादा गरजू भेटतो तेव्हा स्वत: चा विचार न करता मदत करीत असतो आणि सांगायला गेले तर म्हणतो,जे ज्याच्या नशिबात आहे ते त्याला मिळणारच; त्यामुळे कोणत्याही गोष्टीची खंत न करता, हळहळ न करता मदत करावी.समोरचा जाणो अथवा न जाणो पण आपण खर्या मनाने शुद्ध भावनेने मदत करावी.प्रसंगी उपाशी रहावे पण दुसर्याची भूक भागवावी.

अशा या निर्मळ मनाच्या शेखरला लुबाडणारी माणसं खूप भेटली तशीच समजून घेणारी मोजकीच भेटली.पण त्याने

कधी कुणाचं मन दुखावलं नाही.समोरचा आपल्याला फसवतोय हे लक्षात येऊनही त्याच्याकडे दुर्लक्ष करत राहीला कारण ज्याच्या त्याच्या संगे हे वाक्य तो नेहमी बोलतो. अनेक घरांत आज शेखरमुळे आनंद आहे.पण नेहमी नम्रपणे तो म्हणतो आपण फक्त निमित्त आहोत करता धरता परमेश्वर असतो.त्याच्या या स्वभावामुळेच तर त्यांच्या विरोधात जाणार्यांची संख्या सुध्दा वाढत आहे.रोज नवी कुरघोडी होत आहे.अनेक अडचणी ताणतणाव वाढत आहे.तरी हा भोळा सांब निश्चलपणे म्हणतो.....”सर्वे सुखीन भवतू”

सलाम या त्यांच्या संयमाला आणि संघर्षाला सुध्दा! देव करो त्याच्या आयुष्यातील संकटे अडचणी दूर होवोत आणि निदान आयुष्याच्या या टप्प्यावर तरी तो सुखाने रहावा कारण, समाधानी तर तो आहेच आणि सूख म्हणावं तर तेही माणण्यावर असते अन् त्याचे हितशत्रू त्याला क्षणाची उसंत घेऊ देत नाहीत.आश्चर्य या गोष्टीचे वाटते की, इतक्या कठीण काळात हा माणूस येवढा संयमी रहातो तरी कसा?

त्याच्या या संयमाला आणि कष्टाला,धीराला माझा सलाम! शेखरसारखी प्रांजळ मनाची माणसं आहेत म्हणूनच ही दुनिया टिकलीय असे वाटते.त्यामुळेशेखरच्या सहनशक्तीला माझ्या लाख लाख शुभेच्छा.त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण होवोत या सदिच्छा.

**- सौ. मनीषा पिंटू वराळे / धरणगुत्ती**
**मो.- 7057225407**
**(- लेखिका, व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंक २०१९ च्या अतिथी संपादक आहेत.)**

# सहल



सांगू का सहलीत मी पाहिले काय ?
बिळाच्या वाटेवरती उंदराचे पाय !

तबेल्यात पाहिले खूप खूप घोडे
उंच उंच झाडावर पाखरांचे वाडे
गुहेत वाघ आणि वाघोबाची माय
सांगू का सहलीत मी पाहिले काय ?

वारुळात नागोबाची वाकडी चाल
ढोलीमधे पोपटाचे ओठ लाले लाल
गोठ्यात गाय आणी दुधावर साय
सांगू का सहलीत मी पाहिले काय ?



कोळ्याने विणलेले छान छान जाळे
मधमाश्यांचे पाहिले गोड गोड पोळे
सुगरणखोपा त्याची कला हायफाय
सांगू का सहलीत मी पाहिले काय ?

माणसाचे घर  लई उंच उंच भारी
फिराया अलिशान नवी गाडी दारी
घरात ना दयामाया नाही कोठे माय
सांगू का सहलीत मी पाहिले काय ?

- मुरहारी कराड / अहमदपूर
मो.- 7391957298

# उगंच्या उगचं



कुठं देलयं माय वरस्याला..कमी आयकू येणा-या म्हतारीनं टकळी फुटल्यावानी एका मागून एक परसन इचारून गाबणंच केल..

तवा परस संबाळत..घामागडद झालेली परदकसीना वहीनी मन्ली..आवो सांगते वं मायं नकरं बुड टेकू द्या..लई रस्ता खराब झालायं आपल्या गावचा..पोरीलाच आणलावं..मारोतीच्या पाया पडाया..एकदा लगीन झालं की येणं व्हईना लेकरायला.. आयी बस की ये मायं..पाणी प्या..आगं सगुणा..आय माय आपली वरवट्याची सून आली ये माय ..लेकराला घेऊन..गाडी आणली चार चाकाची ..पाणी दे मायं.. तवा पटकूण्या कण्या भरडीत मदल्या घरात बसलेली सगुणा बाहिर आली..अन् मन्ली..वयणी कवा आल्या..पाय धुवा की ..वतलात गरम पाणी हाय..तवर च्या करतो....म्हतारीचं चालूच..माय, सांदीत गेलत्या की, व्हतं काय कोणी...बोललं की कोणी...तवर परदकसिणा मन्ली ,” नाही, गेलो...नसतीलच कोणी... येळ झालाय... आमालाबी उशिर झालाय..भेगिन आलं असलं तर राहतं व्हते..म्याबी फोन केलो नाही बाई, कामाच्या दिवसात काम आपरूक राहते..काय गोड तर काम गोड मन्लंय..”

आयी, तेयला माणसाची कदर राहीली नाही, बाई, पैस्याच्या मागं लागल्यात... थैली भरून नोटा आणलं आसलं की नाही..मंग लाळ घोटतं व्हते..मागं फुढी..करत व्हते...परदकसीना काईच बोलली नाही..तिला चांगलच माहित व्हतं..खेड्यातले सगळे एकच राहत्यात..ईकडच्या बोटावरला थुका तिकडं करत्यात ...आता मव्ह आयकित्यात अन् सांच्याला देराचे कान फुकित्यात ..आपल्याला वानतिनीचा एकच मोडका हाय ..उगं कोणाच्या नादी कश्याला लागावं...तवर वरस्याला एक कप अन् परदकसीनाला एक कप च्या सगुणानं देली..परस मदली पाण्याची बाटल काढून दोगीनं घोट घोट पाणी पिल्या ..अन् व्हटं पोळून घेतल्या..म्हतारीनं गिलासातच च्या पिली..तिचा पटा च्यालूच व्हता.. माय,मला कपबशी जमना..पलिकडल्या वरसी मला हिरामननं कासीला नेलता..तवा पसून बशी सुटली..म्हतारी एकटीच बोलतं व्हती..सगुणा फतकलं मारून आयकत व्हती..परदकसीना मान हालवित व्हती... म्हतारीचं च्यालूच व्हतं..च्या बरा झालता की माय,आयी श्यारवसतीच्या तुमा लोकाला पाकीटाचं दुद पिऊन सव हाय ..म्हशीच्या दुदाचा कसा लागला की... म्हणून ईच्यारलो मायं...मोजून खाऊन, कुतून हागणं राहते तुमा लोकायचं..

आमचं उगं येड सास्तर..म्हतारी कचून हाणित व्हती...सगुणाला काईच बोलता

येत नव्हतं..तोंड शिवल्यावानी गुणानं बसून राहिली व्हती...काई मनावं जावाव तर तिला घालून पाडून बोलली असती म्हतारी...अन् सगुणा परदेसी लेकरू व्हती..मागं पुढं कोणीच नव्हतं..तिनं जलमली की तिची मायं देवाघरी गेलती...तिनं जलमल्या बाराव्या दिसी बापाला पान लागून गेल्ता..चुलत्यानं परतपाळ करून लगन लावून देलतं..पोटपाणी पिकायचं व्हतं..आपून कश्याला बोलाव म्हणून ती मुटका व्हऊन खाली मान घालून म्हतारीच्या बोलण्याची पडत्या फळाची आज्ञा मानून समद्याला लावून घेऊन राहत व्हती..बिचारी काय बोलणार हाय...आणिक म्हतारीनं पट्टा च्यालू केला...आय ,सगुणा दाळ घाल, साज्यारोट्या कर, तांदुळ धुऊन टाक..कदी नाही ते आली ये माय ..तवा परदकसीना मन्ली, नका वो आत्या..डबा आणलाय आमी ,शेतात जाऊन ,समाधीच्या पाया पडून..डबा खाऊन जाता..

तवा म्हतारीला चेव चडला मन्ली..आये, माय ,इतं काय तुमच्यावानी डब्यातला संसार हाय काय ये,तुमी ईकत आणावं तवाच खावं..हर एक गोट तुमची डब्यातचं... इथं घरच्या साळीचे तांदुळ हायित, गव्हाचे पोते हायित, दाळीचे मडके भरून हायित, दाण्याची लादण हाय, दुदाला म्हसी हायित..तुमच्यावानी नसते ये माय..इथं..दोन माणसं सपादनात तुमच्या श्यारातल्या घरात....चार माणसं तुमच्या घरला आले तर तुमच्या कपाळावर नुसत्या आट्या, घरात भांडे वाजतात..तोंडावर बोलालावं मायं, वंगळ का म्हणनासं..परदकसीनाच्या अंगातलं अवसान गळून गेलं...मन मारून आयकत व्हती..तवा म्हतारी मन्ली, उठं, माय, सगुणा कामाला लागं, जेवून जात्यात...तवा सगुणा मन्ली..वहिनी, आता करतो वं ..जाऊन या शेताकडं..नका नका वहिनी... येड लागलं काय.. उशिर व्हते..परवा आळंक्या हायित..लेकराला पाया पडून..घेऊन जाया आलो..तुमच्या भावाला जास्त सुट्या नाहीत...तवा सगुणानं कुकाचा करंडा घेऊन..वरस्याला अन् परदकसीनाला कुकु लावली...तटकुण्या उठून दोघी जायला निघाल्या..

जेल मदून बाहीर पडल्यावानी झालं...बाहिर पडल्यावर वरस्या मन्ली..आई,काय बालंगी हाय ग मायं ये म्हतारी..आपली माय किती चांगली व्हती..तवा समजावणीच्या सुरात परदकसीना मन्ली, तसं नसते गं वरस्या..पाची बोटं सारके नसत्यातं...आपुन घंटाबर आयकुन घेतल्या..सगुणा वहिनीला जिंदगीभराची दुखरी जखम हाय की गं.. बेटा संसार करावं तर सगुणा वहिनी सारखं..आपल्या माहेराला बट्टा लागू देऊ ने... वरस्याला समजलं..आईला काय बोलायचं ते..मंग दोघी गाडीकडं निघाल्या..तवर एक गावातलं बिलिंदर माणूस भेटलचं..लई इपितरं बोलायचं..कोणालाच सोडायचं नाही..आता हे बाया..उगं उभ्या व्हत्या..डरावर गाडी परतू लालतं..एक चेडी वरी करतं पोरगं पळत आलं..डरावर कडं बगून मन्लं..ओ,मामा, आंदो आंदो..हा बस्स... थोडा सरळ करो..हां..आता ज्यांदो ज्यांदो...वरस्या, परदकसीना, डरावर हसू लाले..तवर पोरगं मन्लं..ईच्या मायला नेऊन..दात काढाय काय झालं..चांगला रोड

सांगालाव तर हसालेत..जा बोंबलत...तितक्यात आगावं बोलणारं माणूस लगे खेटलं येऊन..अन् मन्ल..आऽऽबा..कुठं निगाल्या वहिनी..ये टपरं घेऊन...वाटतं बंद पडलं म्हणताना कळलं..सोताच व्हयं की किरायानं आणल्या..उगं किरायाच्या गाडीत पुढी बसून लई लोकं शान मारालेत म्हणून ईचारलो..व्हळापसून दमान चलवा बरं गाडी.. नाहीतर उलथलं गाडी..लगनं व्हायचं लेकराचं इतचं खपाटा उठलं..डरावर, वरस्या अन् परदकसीना एकमेकाच्या तोंडाकड बगतच राहिले.

**- वीरभद्र मिरेवाड / नायगाव**
**मो.- 9158681302**



# दुःखाचा तुडवून उरं



केली आयुष्याने फरपट किती
तू थकायचं दमायचं नाय रं
अन् दुःखाचा तुडवून उरं
पुढं पाऊल टाकायचा आहे रं

विझू पाण्यानं पोटातली आग
काढू नको तू श्वासावर राग
जरी भोवताली विषारी नाग
चेव धरून आता तू जाग

धम्मचक्रवांनी फिरायचं हाय रं
दाही दिशाला चमकायचं हाय रं

माणुसकी विवस्त्र झाली
खऱ्याचा कोणी ना वाली
जिंदगी निवडुंग झाली भुक उपाशी निजूनी गेली

स्वाभिमान विकायचा नाय रं
कोणापुढं झुकायचं नाय रं

आसवांची करुनी होळी
केली साजरी जरी दिवाळी
शिरी निखारी वाहिली मोळी
तरी रिकामी राहिली झोळी

तू भरकटच जायचं नाय रं
तुला आतून पेटायचं हाय रं

**- सुनील श्रीराम पवार / मेहकर**
**मो.- 9881851413**

# शोध आणि बोध



जन्मता आपण सर्व वेगवेगळे आहोत. स्वभावाने, रंग रुपाने हे आपल्याला चांगले माहित आहे. हे माहित असून ही आपण काही वेळेस आयुष्यात नको त्या गोष्टीसाठी नको तेवढा वेळ देत असतो. अमुक-अमुक सारखं मला व्हायचे आहे. आपण स्वतः आपल्याला सांगत असतो. पण आपल्याला नेमकं काय व्हायचे आहे ? हे माहित नसते. मी शाळेत असताना जवळून पाहिलेली गोष्ट मला यानिमित्ताने आठवत आहे. माझ्या वर्गात चंद्रकला नावाची एक गोऱ्या रंगाची खूप सुंदर अशी मुलगी होती. आणि तिची मैत्रीण रेखा नावाची रंगाने खूप काळी होती. पण ती नाके डोळे खूप सुंदर होती.

गंमत अशी झाली की रेखाने स्वतःला खूप व्यवस्थित ठेवले होती. ती चंद्रकला नावाच्या मैत्रिणी पेक्षाही अधिक उजळ आणि उजवी दिसत होती. तिच्या डोळ्यात एक वेगळीच चमक होती. तिला आपल्यातले खरे सौंदर्य जणू सापडले होते की काय ? तिने कधीच प्रयत्न केला नाही की मी चंद्रकला सारखी गोरी दिसायला पाहिजे म्हणून ! तिला देवानी दिलेल्या रंग रुपावर ती स्वतः खुश होती. चंद्रकला सारखे गोरे दिसणे तिला कधीच शक्य नव्हते अर्थात आपल्यालाही कोणा सारखे दिसणे, असणे कधी शक्य नसते. कोणा सारखे आपण कदचित थोड्याफार फरकाने दिसून येऊ ही पण आपले वागणे,बोलले सर्व भिन्न असणार आहे.

आयुष्यात माणूस कोणाच्या दिसण्या बाबत असो की असण्याबाबत असो बऱ्याचदा स्वतःच्या बाबत चुकीच्या निर्णय घेऊन स्वतःचे आर्थिक, मानसिक, शारीरिक या पातळीवर नुकसान करून घेत असतो. कोणी बंगला, कार घेतली म्हणून मी तेच करायला पाहिजे असं नाही मी माझ्या पद्धतीने माझे आयुष्य साकार करायला पाहिजे आहे. आपल्या सर्वांनाच बेडकाची गोष्ट माहीत आहे. बेडकाने आपले पोट किती ही फुगवले म्हणून तो बैल होत नाही आणि बैलाने कितीही मस्ती केली म्हणून तो जंगलाचा राजा सिंह होत नाही. अगदी तसेच माणसाने आपल्या आयुष्यभर कोणासारखे होण्याचा प्रयत्न करू नये. मी स्वतःचा शोध घेईल आणि मी स्वतःला सिद्ध करेल यातच माझ्या जगण्याचं खरे सौंदर्य आहे. माझ्या जगण्यातले खरे सत्व,तत्व सर्वत्र सिद्ध करणे. आपल्या कर्तृत्वाचा झेंडा उभा करणे म्हणजे आपले खरे जगणे होय.

**- डॉ.भाऊसाहेब मिस्तरी / सांगवी बाजार**
**मो.- 9960294001**

# अपंगत्व ..



असे असावे शरीर
नाही कुणा हातात
मडक्यासम वेगळे
तन असे जगतात

मिळते कधी कुणां
व्यंगत्व जन्म जात
काही कमी जास्त
जसेअसे प्रांक्तनात

येते कधी अपंगत्व
घडता घातअपघात
भले चांगले चालले
अचानक वज्रघात

व्यंगत्व नको मनात
निदान असे हातात
माणूस आहो जाण
जागृती हो जनात

व्यंगात्मक कुणावर
टिका करु नकात
बदलू शकते वेळही
जाणीव हो लक्षात

अवयव दान करुनि
पुण्य घ्यावे पदरात
मरणोत्तर रे अमरत्व
रहायचे सुख भरात

- हेमंत मुसरीफ / पुणे
मो.- 9730306996

# जगण्यासाठी आवश्यक जीवनमंत्र



जगण्यासाठी आवश्यक जीवनमंत्र खाली दिलेले आहेत ते जर जीवनात उतरविले तर जीवनाचा, आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास झाल्या शिवाय राहणार नाही.

**१. वेगळं काही करा तरच वेगळं काही घडेल :** जीवनात वेगळं काही घडावं असे वाटत असेल तर काही वेगळं करून दाखवावे लागेल, की जे या आधी कधी केलेले नाही. तेच तेच काम त्याच त्याच पद्धतीने केल्याने काही वेगळं कसे घडणार ? तुम्हाला वेगळे निकाल पाहिजे असतील तर वेगळ्या पद्धतीने काम करावे लागेल. वेगळ्या वाटा धुंडाळाव्या लागतील. वेगळ्या क्षमता, ज्ञान, विचार विकसित आत्मसात करावे लागेल. आपल्या जीवना बद्धलची काही चुकीची गृहीतके बदलावी लागतील. जीवनाकडे वेगळ्या नजरेने पाहावे लागेल.

**२. चिंता नको काळजी घ्या :** भविष्या विषयीची, करीअर विषयीची, मुलांविषयीची, कुटूंबाविषयीची चिंता करणे सोडा. कारण चिंता हा एक नकारात्मक विचार आहे. जो तुमची क्षमता, ऊर्जा नष्ट करतो. चिंता म्हणजे चिता हे लक्षात घ्या. त्यापेक्षा स्वतःची काळजी घ्या. स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्या. मुलांच्या शिक्षणाची व त्यांच्यावर चांगल्या संस्कार करण्याची काळजी घ्या. स्वतःच्या व्यवसायाची, ग्राहकांची काळजी घ्या . कुटूंबाची काळजी घ्या त्यांना वेळ द्या. माता - पिता जर वृद्ध असतील तर त्यांच्या औषधोपचाराची काळजी घ्या. त्यांना मानसिक आधार द्या. एखादा छंद, कला जोपासा. निसर्गाचा आनंद घ्या. तेव्हा चिंता नको तर काळजी घ्या.

**३. प्रत्येकाचे स्वतःचे एक जग असते :** एखाद्या प्रसंगी किंवा गोष्टी विषयी प्रत्येकाची प्रतिक्रिया वेगवेगळी असते. कारण प्रत्येक व्यक्तीचे स्वतःचे एक जग असते व त्या जगात त्याने जीवनात घेतलेले अनुभव, त्याच्यावर झालेले चांगले किंवा वाईट संस्कार, त्याची बुद्धिमत्ता, त्याचे शिक्षण, त्याची क्षमता याचा समावेश होतो. हे आपल्याला नीटसे समजले तर आपले नातेसंबंध सुदृढ होण्यास याची मदत होईल. तसेच एखाद्या व्यक्तीचे आचरण समजणे सहज शक्य होऊ शकेल. एखादा व्यक्ती असाच का वागतो याचे गमक आपल्याला लक्षात येईल.

**४. वाईट काळापासून शिकूया :** जीवनातील वाईट काळ देखील आपणास खूप काही गोष्टी शिकवून जात असतो. वाईट काळातच कोण व्यक्ती आपल्या सोबत आहेत, कोण नाही हे समजून येते. वाईट काळातच आपल्या बुद्धिमत्तेचा, क्षमतेचा कस लागतो. वाईट काळातच मित्र, पैसा, वेळ, कुटूंब याचे महत्व कळते. वाईट

काळातच आपल्या नीतिमत्तेची, मूल्यांची कसोटी लागते. हा काळच आपल्याला जीवनाचे महत्व पटवून देतो. तेव्हा वाईट काळात निराश न होता त्याला धीराने सामोरे गेल्यास हा काळच जीवनात आपल्या शिक्षकाची भूमिका बजावू शकतो.

**५. स्वतःमधील क्षमता ऊर्जा ओळखा :** प्रत्येक व्यक्तीमध्ये प्रचंड क्षमता असते. फक्त एक तर ती त्याला माहित नसते किंवा तो ती योग्य दिशेने वापरत नाही. तो ती ऊर्जा अयोग्य कामासाठी किंवा अयोग्य ठिकाणी वापरत असतो. यामुळे त्याची अनमोल क्षमता वाया जाते. तेव्हा वेळीच जागे व्हा व स्वतःतील शारीरिक मानसिक व बौद्धिक क्षमता ओळखा. असे जर केल्यास जीवनात कोणतीही गोष्ट करणे अशक्य असणार नाही. तसेच तुम्ही हाती घेतलेले कोणतेही काम अपूर्ण राहणार नाही.

**६. लोक काय म्हणतील याचा विचार करु नका :** तुम्ही चांगले काम करत असाल तर लोक काय म्हणतील याचा काडीचाही विचार करु नका. तुम्ही चांगले किंवा वाईट काम करा लोक काही ना काही टीका करतच असतात. चांगले काम केल्यानंतर देखील लोक तुमचे कौतुकच करतील अशी अपेक्षा करु नका. स्वतःच्या समाधानासाठी काम करा. तुमचे काम दिसेल व ते आधीची त्यांनी केलेली टीका विसरुनही जातील. तेव्हा टीकेला न घाबरता पूर्णपणे आपल्या कामावर लक्ष केंद्रीत करा.

**७. स्पर्धेचा सकारात्मक विचार :** सध्याच्या जीवघेण्या स्पर्धेच्या युगात स्पर्धेचा सकारात्मक विचार करणे गरजेचे झाले आहे. तसे पाहिले तर कोणत्याही प्रकारची स्पर्धा अस्तित्वात नाही. हा एक आपण केलेला विचार आहे, जो कि आपल्या जीवनात ताण-तणाव निर्माण करत असतो. आपण नेहमी इतरांशी तुलना करत असतो. त्यांच्या पुढे जाण्याचा प्रयत्न करत असतो. पण आपण या जगात इतरांशी तुलना करण्यासाठी जन्माला आलेलो नाहीत.

जर स्पर्धा करावयाची असेल तर स्वतःशी करा. विचार करा की आधी मी काय होतो आणि आता काय आहे. नक्कीच तुम्ही काही मिळविले असेल. आधी तुम्ही नोकरी करत असाल आता तुम्ही नोकरी देणारे झाले असाल. आधी तुम्ही कोणावर अवलंबून असाल आता कोणीतरी तुमच्यावर अवलंबून असेल. आधी तुम्ही घेणारे असाल आता देणारे झाले असाल. आधीपेक्षा तुमच्या विचारांचा, बुद्धीचा, अनुभवांचा विकास झालेला असेल. तर स्पर्धा इतरांशी नको तर स्वतःशी करा.

शेवटी एकच सांगावयासे वाटते जीवन अनमोल आहे त्याचे मोल ओळखा व आनंदाने जगा. सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !

**- महेश भालचंद्रराव रायखेलकर / सोलापूर**
**मो.- ९३२६६१२४३६**

# शिक्षक म्हणजे ....



आयुष्याला कलाटणी देणारी असता
तुम्ही प्रेरणा
मनात ज्ञानरूपी ज्योत पेटवणारी
तुम्हीच असता चेतना
सखोल मूलभूत ज्ञानाचे भांडार
दूर करी जीवनातील अज्ञानरूपी
अंध:कार ।।१।।

भासतो शिक्षक मज सूर्यासारखा
स्वत:च्याच प्रकाशात इतरांचे भविष्य
उजळविणारा
देती आपल्या जीवनास अर्थ
जगण्याचे देती सामर्थ्य ।। २।।

ज्ञानाचा पावित्र्याचा
एक प्रचंड गाभारा
येई प्रत्येक व्यक्तिच्या आधारा
कल्पवृक्षासम भासे मज हा ।।३।।

शाळांना जर का शिक्षक लाभला
नसता
तर आयुष्याचे गणित - भूगोल झाले
असते
फळ्यावर खडूचा हात फिरला नसता
तर अबकड व चौदाखडीचा अर्थ कसा
कळला असता ।।४।।

क्षणात वज्राहूनही कठोर
तर क्षणात कापसाहूनही मऊ
प्रत्येक कृतीला योग्य दिशा
दाखवणारे दिशादर्शक तुम्ही
वादळात भरकटलेल्या गल्बताला
जसे दीपस्तंभ तुम्ही ।।५।।

म्हणूनच म्हटले आहे
गुरूने दिला ज्ञानरूपी वसा
आम्ही चालवू हा पुढे वारसा

- प्राची परचुरे वैद्य / पुणे
मो.- 9767613142

# नियती



आपण ठरवल्याप्रमाणे प्रत्येक गोष्टं घडतेच असं नाही. पण म्हणून निराश होऊन आत्महत्या करु नये. आपल्या प्रारब्धात लिहीलेले भोग आपल्याला भोगावेच लागतात. आनंदाच्या क्षणी आपण फक्तं सुखाच्या राशीवर लोळत असतो.सुखाच्या कणांना वेचताना आपण मीच का,मलाच का हा प्रश्नं देवाला विचारत नाही.पण दु:खाच्या क्षणी मात्र आपण मीच का,मलाच का असा विचार सतत करत राहातो आणि आलेल्या संकटावर मात करण्याऐवजी नशीबाला दोष देत राहातो.

पण नियती मात्रं हसत असते.एका मागोमाग एक संकटं आली की माणूस गांगरून जातो हे स्वाभाविक आहे. ही संकटं कधी साधी नसतात. अचानक घरावर कोसळलेले संकट घरातल्यांना जीव नकोसा करते. कधी मोठे आजारपण,कधी आपली चूक नसताना झालेले दोषारोप,पैशाचा अपव्यय,अपमान,अवहेलना, मानसिक कुचंबणा,हे सर्व सहन करावं लागतं. नि: स्वार्थीपणे केलेल्या कामात यश येत नाही. तेव्हा तर खूपच नैराश्यं येतं.कारण अशा कामात आपण पूर्णपणे स्वत: ला समर्पित केलेलं असतं.कुणाचाच आधार नसेल तर निश्चितपणे परमेश्वराचा आधार घ्यावा.

जिथे सगळे उपाय थकतात तिथे त्याची आपल्याला मदत होते. कोणत्या ना कोणत्या रुपात कुणीतरी अचानक आपल्याला मदत करतं. फक्तं आपण धीर सोडू नये. संकट कितीही मोठं असू द्या आपलं मन सक्षम असलं पाहिजे. विचारसरणी सकारात्मक असायला हवी.घाबरुन किंवा पळ काढून संकटातून सुटका होत नाही. ईश्वराचे नामस्मरण सुरु केल्यास एक एक मार्ग आपल्यासाठी आपोआप मोकळा होतो व संकटाची तीव्रता कमी होऊ लागते. आशेचा किरण दिसू लागतों. संकटं ही येणारच त्यातून तावून सुलाखून बाहेर पडावं लागतं.

कधी कधी संकटांचा अतिरेक होतो. पण प्रत्येक संकट आपल्याला एक अनुभव देतं व जीवनात सावध व सजग राहून शहाणपणाने कसं वागावं याचं प्रात्यक्षिक देते. अनेकांच्या जीवनात अशा जीवघेण्या संकटांनी आत्महत्येचे विचार आणले पण वेळीच त्यांनी स्वत: ला सांवरले व आपल्या आयुष्याची उर्वरित वाटचाल ठाम निश्चयाने व निर्भिडपणे सुखकर केली.

**- सौ. स्नेहा साळुंके / ठाणे**
**मो.- 9323654576**

# मी कोरडी...



न केलेल्या गुन्ह्यासाठी
मी फोडते खडी
मी कोरडी... मी कोरडी... ॥धृ॥

पुढे डोकावताही येत नाही
मागे वळून बघताही येत नाही
बसून राहते तासन् तास मी
घालून हाताची घडी... ॥१॥

सोडून दिले परमेश्वरावर
जेवढे होते जंगम स्थावर
चालण्याचा रस्ता सरळ आहे पण
माझ्या नशिबाची रेषाच वाकडी... ॥२॥

कधी शिकणार मी दुनियादारी
सोडून लाचारी, कधी होणार व्यवहारी
खाऊन-पिऊन कसे राहायचे सुखात
शिकवतात मला लोके मरतुकडी... ॥३॥

स्विकारावा लागला नियतीचा प्रस्ताव
विसरून गेले चांदण्यांचा गाव
रोज उसवत जाते आपोआपच
कितीदा शिवावी फाटकी गोधडी... ॥४॥

मन लागत नाही इथल्या पसाऱ्यात
जाईन म्हणते दुसऱ्या विश्वात
हे अंतरिक्षातल्या विश्वासू सरदारांनो,
पाठवाल का मला न्यायला तबकडी... ॥५॥



- उमा पाटील / धुळे
मो.- 9422750558

# धुऱ्याचा धाक



केरबातात्या लिंबाच्या झाडाखाली बसून एकटक धुर्याकडे पाहत होता. वळभर अलीकडे असणारं लिंबाचं झाडं धुर्याच्या जवळ आलं होतं. नव्हे धुराच लिंबाच्या झाडाजवळ आला होता. एकाच बाजूने सतत इजा होत असल्याने बिचारा धुरा चळचळ कापायचा अन् पुन्हा धक्का लागू नाही म्हणून थोडा सरकायचा. असे करीतकरीत तो वळभर तात्याच्या शेतात सरकला होता. तात्याची प्रेमीक नजर त्यावर पडायची अन् तात्याच्या डोळ्यांच्या कडा आपोआप पाणावायच्या. खरंच बिचार्याला वाचा असती तर तो काय बोलला असता? तात्याला विचार करताकरताच प्रश्न पडायचा. तात्याच्या नजरेने त्याला त्याला भूतकाळात नेले. तो आठवणीत गढून गेला. संबाने दोनदा आवाज दिला तरी त्याच्या आवाजाकडे तात्याचे लक्ष नव्हते न राहून संभा त्याच्याजवळ आला. धुर्याकडे एकटक पाहत बसलेल्या तात्याला म्हणाला,

'काय इचार करताय तात्या?'

तात्या एकदम दचकला. भानावर येत डोळे चोळत बोलला,

'काही नाही रे संबा. मला काही गमना झालं.'

'तात्या आलं मह्या लक्षात, दौलतरावनं धुरा फोडल्यानं तुमचं डोस्क बिघडलं खरयं नं'

'हो, गांडमनीचं लईच तरास देयालं वाँ संभा.'

'जाऊ द्या तात्या. इतका नका इचार करू. घेऊनघेऊन किती वळभर रानं घेईल याच्यापैसा काय हाय. तुम्ही टेंशन घेतल्यानं उगं काही करता काही झालं तं.'

या शेवटच्या वाक्यानं तात्याच्या छातीत धस्स झालं. गडी तसा शरीरानं हाडकुळा, पण विचारानं हिंमतबाजच. अलीकडे वाढत जाणार्या धुर्याच्या भांडणामुळे तो थोडा खंगत चालला होता.

काही म्हणं, 'दौलतीला माज चढला संभा गरीबाला एवढंय छळू नाई रे. पाच वेळा माणसं बोलवले. गोटे रवले तरी धुर्याला सारखचं खिसतो म्हणजे.'

''जाऊ द्या तात्या माणसाच्या संग काय येणार हाय. सगळं येथंच ठेऊन जायाचं हाय. काळ काय असाच थोडी राहाणार हाय. सकाळची इकडची सावलीतं सांजच्याला तिकडं जाते. काळ देईल उत्तर त्याला.' संबा तात्यासमोर खाली बसतबसत तात्याला समजावत होता. तात्याच्या शेताचा दुसर्या बाजूला शेजारीच होता तो. तात्याला त्याच्यासोबत कधीच धुर्याच्या भांडणाची वेळ आली नव्हती.

'पनीक मी काय मनतो संबा, गरीब झालो म्हणून किती सहन करायच रे या

गधडीच्याच. पिढ्यानं पिढ्या चालल्या की याच्यात आपल्या. काही तरी धडा शिकवावं लागल ब्वा. नाही तर इकून मोकळं तरी व्हवावं लागंल' बोटानं माती उकरत तात्या अस्वस्थ होऊन बोलत होता.

'खरचं हे जमंल का तुमच्याच्यानं?' संबाचा प्रश्न

'ते व्हयनं मनूनतं याचं तागडं वाढायलं न संबा.'

'मग मी आधीच काय मनलो तुम्हाला, आपल्यानं काही व्हत नाही. जाऊ द्या माणसानं खाल्यानं काही कमी पडत नाही. वरच्याची नजर आसावी फक्त. तेच दाखवते दाखला एखाद्या बार. आता हेच पाहानं, त्याचं पोरगंच किती उधळ निघालं. चार वर्सात दावील त्याला इंगा. मनतात नं आभळाकीचं धन कोणाला पचत नाही तसं हाय....' संबा अजून बरंच काही बोलणार होता. तात्या त्याला मध्येच थांबवत बोलला,

'त्याचं जाऊ दे; पण दौलतला धडा शिकवाव लागंल गड्या. पंचाचं ऐकीनं, कोणाचंच ऐकीनं म्हणजे लईच झालं.' बोलताबोलताच तात्याचा आवाज वाढत होता.

'जाऊ द्या, जाऊ द्या' म्हणत संभानं तात्याला हाताला धरून उठविलं. दोघं बोलत बोलत शेतातून घरी आले. विषय काही बदलला नव्हता अन् संपलाही नव्हता. संबा त्याच्या घरी गेला. तात्यानं घरी जाऊन हातापाय धुतले. धोतरानं तोंड पुसीत तो बैठकीत तक्तावर येऊन बसला.



नागेशनं ग्लासात पाणी आणून दिलं. त्याच्या हातातला ग्लास स्वतःच्या हातात घेत तात्या बोलला,

'आनिक फोडला ब्वा धुरा दौलत्याच्या टॅक्टरनं.'

नागूनं हातातला मोबाईल खिशात ठेवला. पँटीला हात पुसीत तो बोलला,

'कही आज आल्तं टॅक्टर?'

'हो.'

'तुमच्यादेखत आल्तं?'

'मह्यादेखत फोडल्यावर तं तेथचं हानला असता साल्याला. मी जायाच्या आधीच नांगरून झालं व्हतं मेंग्याचं' हाडकुळा असणार्या तात्याचा, आवाज कणखरच होता.

'देवावं का पोलीस ठाण्यात तक्रार' - नागेश

'त्यानं काय व्हणार हाय?'

तात्याच्या चेहर्यावरची खिन्नता पाहून नागेशही अस्वस्थ झाला होता.

पाण्याचा ग्लास तात्यानं तोंडाला लावला. पहिल्याच घोटानं त्याला ठसका लागला.

'जरा हळहळू बाबा.'

खोकलणं थांबलं तसा तात्या पुन्हा त्याच विषयावर मुलाशी बोलू लागला. अंधार वाढत चालल्यानं बाहेरच्या खांबावरचे दिवे नेमकेच लागले होते. नागूनंही लाईटचं बटन दाबलं. तो बाजूला लोखंडी खुर्चीत बसला. दोघंही काही वेळ गप्पच.

तात्या भूतकाळात गेला होता. बापदाद्यापासून दौलती आणि त्याच्या वडिलाचा धुर्याला होणारा त्रास तात्याचा मनस्ताप सारखाच वाढवीत होता. सतत सांगून समजावून, पाव्हण्यारावळ्याला मध्ये टाकूनही तो ऐकत नव्हता. पंचासमोर तो ऐकल्यासारखं करायचा. नंतर करायचं तेच करायचा. पंच तरी काय करतील. ज्याचा जोर जास्त तिकडं ते झुकायचे. तात्यालाच समजावत म्हणायचे, 'जाऊ द्या, जाऊद्या'. म्हणून अलीकडे तात्यानं पंच बोलावणं सोडूनच दिलं होतं. दौलती धुरा खिसायचा अन् तात्यावरच नको ते आरोप करायचा.

त्याची धुरा खिसण्याची पद्धती अनोखीच होती. मुसळधार पावसात सालगड्याला खोरं घेऊन शेतात पाठवायचा. धुरा खिसाय लावायचा. निघालेले गवताचे बेचाडं सरकून तात्याच्या शेताच्या बाजूला लावायचा. दोन दिवसांत बेचाडं जसेचा तसे हिरवेगार व्हायचे अन् धुरा जागा बदलायचा. हे सालोसाल चालू होते. आता मात्र तात्याने चांगलेच मनावर घेतले होते. दौलतीच्या आजच्या कृतीने तो अजून पेटून उठला होता. स्वभावाने आणि आर्थिकतेनेही गरीब असणार्या तात्याची अस्मिता जागी झाली होती. त्याचा सुपरइगो त्याला गप्प बसू देत नव्हता. रात्री जेवण करून तो कसाबसा झोपला. पण, झोप लागते कोठं बिचार्याला. या अडंगावरून त्या अडंगावर

होत त्याने रात्र काढली. दौलतीला टक्कर देण्यासाठी त्याने मनात अनेक शक्कल तयार केल्या; पण सकाळी उठला तो दौलतरावाच्या पायावर डोके ठेवण्याचा विचार करीतच. चहापाणी झाले अन् लगेच तो दौलतरावाच्या घरी गेला. दौलत तरी कोण, त्याचा चुलतभाऊच की. वयाने लहान असला तरी संपत्तीने श्रीमंत होता. गावात त्याचे बर्यापैकी वजन होते. काही लोकांशी देण्याघेण्याचे व्यवहारही होते.

दौलती बैठकीत एकटाच आहे, हे पाहून तात्या आत गेला. दौलतीचे डोळे आपोआप ताणले गेले. कपाळावर आठ्या आल्या. चेहर्यावर खोटे हसू आणित तात्याकडे पाहत तोंडातील सुपारी चघळीत खाकरत तो म्हणाला,

'येनं केरबादा.'

तात्या मुक्यानेच मान हलवत त्याच्याजवळ गेला, अन् हलक्या आवाजात बोलला,

'भाऊ, हे बस करनं आता. मी असं काय पाप केलं. काय घोडं मारलं तुव्हं म्हणून तू असा सारखा तरास देतूस.' बोलताना त्याच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या.

'काय झालं? काय झालं?' दौलतीनं विषय कळाला नसल्याचं सोंग घेत तात्याला विचारलं.

'तुला माहीत नाही व्हय!-'

'नाही-'

'आरे, त्या ट्रॅक्टरवाल्यानं व्हते नव्हते ते सगळेच बेचाडं काढले की धुर्याचे.'

'ते कहाला काढील केरबादा! एलगर्जीनं निघाले असतील एकदोन. त्याला काय मिळणार हाय तुहे बेचाडं काढून.'

'हे तुव्हं नेहमीच हाय भाऊ.' असं म्हणून तात्यानं त्याला हात जोडाय सुरुवात केली.

तात्याच्या या वाक्यानं तो भडकला. चढ्या आवाजात बोलला, 'तोंड सांभाळून बोल केरबादा. विनाकारण माझी बदनामी करू नको. रडायचं सोंग घेऊन माझ्या गळ्यात पाय टाकू नको. माझं पुढं जाणं खपनं झालं तुला. राहूनराहून माझी बदनामी करायला. फोडलातं नाही धुरा; पण आता सगळाच फोडतो. जाय तुला काय करायचं ते कर. निघ मह्या घराच्या बाहेर. पुन्हा उबंरवटा वलांडायचा नाही मह्या घराचा.'

दोघांचाही आवाज वाढल्यानं रस्त्यानं जाणारे चार जण गलबला ऐकून थांबलेले. ते मध्ये पडण्यापूर्वीच नागू तिथे आला. वडिलांचा हात धरून त्यानं तात्याला घराकडं नेलं.

'कशाला गेले बाबा दुश्मनाच्या घरी? अन्याय करणार्याला कोठं न्याय देयाचं माहीत असते. जाऊ द्या राहिलं तेवढं राहिलं.'

महिना-दोन महिने असेच गेले. तात्या शेतात गेला की, धुर्याकडं जायचा. डोळे भरून पाहायचा. धुर्याकडं पाहातच म्हणायचा, 'मी समजू शकतो तुही दशा...

गेल्या अनेक वर्सापासून तुला इजा व्हतेय.... तुझे साल्टं निघतात..... हाडं उघडे पडतात... इजा व्हवू नये म्हणून तू सारखा सरकत आहेस.....पण नक्की एक दिवस तुझा येईल.....तुला आम्ही दोघेही हात लावणार नाही.....तू आमची इज्जत आहेस.....बांध आहेस.' बोलताबोलताच तात्याला आव्हेरुनं आलं. डोळ्यांतले दोन अश्रू जमिनीवर पडले. त्या दिवसापासून दौलतरावला धडा शिकवायचा ठाम निर्णय त्यानं केला 'साप तर मेला पाहिजे, पण काठी मोडता कामा नये,' याप्रमाणे त्याने नामी युक्ती सोचली. मनाचा पक्का निर्धार केला. ही युक्ती नागेशशिवाय कोणालाच सांगायची नाही, असे ठरवून तो कामाला लागला.

तात्याने दौलतीला प्रचंड गोड बोलायला सुरुवात केली. आपल्याला त्रास झाला हे विसरल्याचे त्याने सोंग घेतले. दौलतीच्या वडिलांचे म्हणजे तात्याच्या काकांचे श्राद्ध होते. दौलतरावाने गावजेवण देण्याचा मानस केला होता. तात्याने या कार्यक्रमाच्या निमित्ताने पुढाकार घेतला. आठ दिवस तो सतत राबत होता. दौलतीने सांगितलेले कोणतेही काम तो मन लावून करायचा. तात्याची ही भूमिका दौलतीला प्रचंड भावली होती. केरबादा म्हणणारा दौलती आता तात्याला दादा, दादा म्हणाय लागला होता. मोठ्या असणार्या चुलतभावाला मान द्यायला लागला होता. लोकांना कोठे बरे दिसते. लोक म्हणायचे,

'तूही सगळी जमीन गिळायला दौलत, तरी तू त्याच्याच गोडीनं काऊन हागायला केरबादा.'

तात्या निमूटपणे ऐकून घ्यायचा अन् सहज म्हणायचा, 'शेवटी काहीही झालं त मव्हा, भाऊच व्हयनं ब्वा. खाऊनखाऊन कोण खायलं भाऊच की.'

तात्याच्या अशा बोलण्यानं जवळचे सगळे मित्र त्याचे शत्रू झाले होते. तात्याच्या मनात चाललेला कालवा त्यांना काहीच माहीत नव्हता. तात्या एवढा बदलला कसा, याचेच नवल गावातल्या प्रत्येकाला वाटत होते.

'भोळसट हाय येड्या गांडीचं, नुसतं भियालं.'

'भीत नाही तसं बेरकी हाय.'

'कहाचं बेरकी! माझ्यासारखं व्हयतं नादीच लागायचं नाही, अन् तोंडय पाह्यचं नाही अशा लुचाटाचं.'

'खूप सहन केलं त्यानं. त्याची ताकतच नाही. काय करील?'

'मंग असं करावं की-'

केरबातात्याच्या जवळचे लोक आपसात असं काही बोलत होते. त्यांच्या दृष्टीने तात्या वेडा ठरला होता. त्याची हिंमत खचली असेच त्यांना वाटत होते.

श्राद्धाचा कार्यक्रम जोरात पार पडला. सगळ्या गावाला, पाव्हण्याला दौलती-केरबाच्या साथ-संगतीचा संदेश गेला. पाव्हण्यातील एखादा म्हणायचा,

'बरं झालं बापा, दोघाचं चांगलं जमायलं. नाहीतर सारखा वाद-वाद.'

श्राद्ध होऊन आठेक दिवस झाले असतील. लगनसराईचे दिवस असल्याने दौलती आणि केरबा एकाच मोटारसायकलवर शेजारच्या गावी लग्नाला गेले होते. लग्न लावून तालुक्याला गेले अन् परत यायला अंधार पडायची वेळ झाली. तालुक्यावरून गाव तसं चारच किलोमिटर. पण, रस्ता खराब असल्याने गाडी हळू होती. अर्ध्या रस्त्यात आले असतील. अचानक गाडीसमोर दोन लुंगीधारी तरुण आले. दोघांनी दोन्हीकडून हँडल पक्के धरले. त्यांनी डोक्यासहित तोंडाला पक्की काळी पट्टी बांधली होती. त्यामुळे ओळख पटण्याचा प्रश्नच नव्हता. दौलतीने गाडीचा ब्रेक कचकून दाबला, तसा तात्या त्याच्या पाठीला टेकला. दौलतीच्या तोंडून पटकन शब्द बाहेर पडले,

'अरे बापरे! काय झालं?'- तात्यानं विचारलं

'चोयऽऽ चोयऽऽ' दौलतीची बोबडी वळली. हात-पाय थरथर कापाय लागले. गाडी स्टँडला लावेपर्यंत तात्या कसाबसा उतरला. पोरांनी अंधारात पहिल्यांदा दौलतीची ओळख पटविली. लगेच एकाने त्याची कॉलर पकडून बाजूला घेतले. तो कॉलर पक्की धरून उभा राहिला अन् दुसर्याने बदडाय सुरुवात केली. बदडणारा त्याचे पाय, पोटरी, मांडी, ढुंगन, पाठ यावर फोकाने झपके देत होता अन् कॉलर धरणारा आवाज बदलत घोगर्या आवाजात एकेका फोकासंगे म्हणायचा, 'करतू का व्याजबट्टा! लुबाडतू का गरिबाला! देतू का तरास शेजार्यापाजार्याला! सगळे धंदे बंद झाले पाहिजे. आम्ही कोणी चोर नाहीत. धडा शिकविणारे आहोत. पुन्हा आमच्या कानावर तुझ्याबद्दल तक्रार आली तर बघ उभा चिरतो.'

दौलती 'नाही भाऊ नाही भाऊ' म्हणत विव्हळत होता. माराने तो पुरता सुजला होता. सगळीकडे वळ उठले होते.

त्याला सोडून पोरांनी आपला मोर्चा तात्याकडं वळवला. तात्या अंधारात गुमान बाजूला बसला होता. एक जणाने हलक्याने त्याची कॉलर पकडली अन् दुसर्याने पहिला फोक माराय सुरुवात केली. अर्थात फोकाचा आवाज कमी बोलण्याचाच मोठा होता.

पहिल्याच फोकात तात्याने मोठमोठ्याने ओरडाय सुरुवात केली 'मायो, बापूयो मेलो रे.' अर्थात हे नियोजनबद्धच होते.

'हाडकुळ्या एका रट्टयाचा नाहीस. थापडात जायबंद करील. कहाला भेटला याला. याद राख वाचा उखळली तर? तात्याला दोन-तीन फोक मारेपर्यंत शेजारच्या शेतातले काम करणारे दोन शेतकरी आवाजाचा शोध घेत आरडत येत असल्याचे पोट्ट्यांना कळाले. पोट्टे लगेच पसार झाले.

दौलती आडवा पडला होता, तर तात्या बाजूलाच बसून मोठमोठ्यानं ओरडत होता. आलेल्या एका शेतकर्याने खिशातला मोबाईल काढला. त्याची बॅटरी लावली. उजेडात पाहतात तर दौलतराव अन् तात्या विव्हळत असल्याचे त्यांना दिसले. लगेच दौलतरावच्या घरी एकाने फोन लावला. घरच्यांच्या मनात धस्स झाले. दौलतच्या

मुलाने नागेश अन् शेजारच्या दोन माणसांना सोबत घेतले. तीन मोटारसायकलवर ते घटनास्थळी पोहोचले. दौलतीची अवस्था पाहून मुलगा भांबावून गेला. एरव्ही बापाला पैसे मागताना शिव्या देणारा तो; पण आज बापाची गत पाहून त्याचे डोळे पाणावले. 'कुठे लागले पप्पा' म्हणत त्याने दौलतीच्या हातात हात दिला. इकडे नागेश आपल्या वडिलांना बोलत होता.

दोघांनाही गाडीवर बसविले. दवाखान्यात नेले. दौलतीला चांगलाच मुका मार होता. डॉक्टर त्याला तपासत म्हणाले,

'कसे झाले हे? कुणी मारले? दंगा झाला का?'

'तसे काही नाही. गावाकडे गाडीवर येत होते. रस्त्यात अडवून मारले? - दौलतीचा मुलगा बोलला.

'गावात काही दुश्मनी आहे का?' - डॉक्टर

'नाही.'

'तुम्हाला कसे कळले?'

शेजारच्या शेतकर्‍याकडे बोट दाखवीत नागेश बोलला, 'ह्या काकांनी फोन केला दादाच्या घरी.'

'तुम्हाला कसे कळले?' शेतकर्‍याकडे पाहत डॉक्टरांचा प्रश्न.

'यांच्या मोठ्यानं होणार्‍या आरडाओरड्यानं. आम्ही अंधारात धावत गेलो, तोपर्यंत मारणारे पसार झाले.'

'पैसाआडका होता का?' दौलतीला डॉक्टरांचा प्रश्न.

'पैसे होते थोडेफार, पण त्यानी हातय लावला नाही.'

'अजबच चोर व्हते म्हणा की?'

डॉक्टर पुढे बोलणार होते; पण मध्येच एका शेतकर्‍याने त्यांना थांबवले अन् म्हणाला.

'देता का त्रास गरिबाला, लुटता का, असे वाक्य आमच्या कानावर आले.'

डॉक्टरांना जे समजायचे ते समजले. बाकी सर्व शांतच औषधी, गोळ्या देऊन डॉक्टरांनी दोघांनाही घराकडे नेण्यास सांगितले. दोघानांही घरी आणले. दौलतीचे पाय पाठ सुजले होते. त्याच्या पायांवर, पाठीवर हिरवेगार वळ दिसत होते. केरबातात्याच्या पाठीवर दोन वळ उठले होते.

दौलतीच्या पाठीवर मलम लावून त्याला गरम पाण्याने शेकत त्याचा मुलगा आणि बायको विचार करीत होते. 'कोणी आखला असेल हा कार्यक्रम, याचा छडा लावला पाहिजे.' दोघे एकमेकांना म्हणत होते. 'आपण म्हणत होतो यांना, एकदा तरी अद्दल घडल्याशिवाय तुम्ही वाटवर येणार नाहीत. अभाळकीचं धन पचत नसते. यांना भलती पैशाची हाव कहाला देणंघेणं करता. काय कमी हाय आपल्याला. जीव गेला असता तर. आता तरी सोडून द्या'

दुसर्या दिवसापासून गावात या प्रकरणाची सारखीच चर्चा सुरू झाली. दौलतीनं ज्यांना व्याजानं पैसे दिले होते ते आतून सुखावले होते अन् केरबातात्याचा डाव फत्ते झाल्याने तो तर भलताच आनंदला होता. दौलतीशी मुद्दाम दोस्ती करणार्या अन् बंधुप्रेमाचा आव आणणार्या तात्याला त्याच्यामुळे दोन चार धप्पू मुद्दाम खावे लागले होते. धप्पू कमी अन् आवाज जास्त काढणार्या हडकुळ्या तात्याचीच त्यामुळे ही युक्ती असेल असे कोण म्हणणार!

दौलती त्या दिवसापासून मनाने बराच खचला होता. लोकांना पैसे मागावे का आता, असा प्रश्न त्याच्या मनात आला की, 'पुन्हा त्रास दिल्याची बातमी कळाली की उभं चिरतो,' हे वाक्य त्याच्या कानात घुमायचे अन् तो दचकायचा. शेतात गेला तरी धुर्याकडे तो पाहायचापण नाही. धुर्याकडे पाहिलं की त्याच्या अंगावर काटे यायचे.

तात्याला या प्रकरणावर लोक बोलायचे. तो अतिशय घाबरा चेहरा करून म्हणायचा, 'वाचलो तेच खूप झाले बाबा. मरायचीच येळ व्हती त्या दिवशी. सुन्या जागी लागलं असतं त. मरायला काय लागते. वरच्याचीच नजर मनावं. जाऊ द्या नावसुद्धा काढू नका आता.' अन् आतून भलता सुखावायचा. मनाशीच म्हणायचा,

'किती सोपी हाय युक्ती. युक्ती लढवायला कोठं गरिबी-श्रीमंती लागते! ती तर डोस्क्यातून जल्मते अन् डोस्कं त ईश्वरानं सगळ्यायलाचं सारखं दिलं'.

- माधव जाधव / नांदेड
मो.- 9423439991

# अरे माणसा



माणसा तू बन प्रेम
बरस पावसाळ्या सारखा
माणसा तू बन गारवा
गार हिवाळ्या सारखा

माणसा तू बन तेजस्वी
तळप उन्हाळ्या सारखा
माणसा तू बन बोधि वृक्ष
उगव सागजळ्या सारखा

माणसा तू बन सामान्य
वाग सगळ्या सारखा
बनू नको अहंकारी
वागू नको वेगळ्या सारखा

माणसा तू बन कष्टकरी
ज्वारीच्या खळ्या सारखा
वाईट व्यसन थांबव
कर वारं खिळ्या सारखा

अन्याया विरुद्ध लढ
बन दात सुळ्या सारखा
माणसा तू बन मित्र
जणू भाऊ जुळ्या सारखा

माणसा तू बन सापेक्ष
नरम पोळ्या सारखा
शत्रू साठी बन
तोफ गोळ्या सारखा

माणसा तू बन औषध
जखमेवर बोळ्या सारखा
माणसा तू बन किमती
सोन्याच्या तोळ्या सारखा

**- नरेंद्र अ. वाकोडे / जळगाव जामोद**
**मो.- ९४२१४६५८५४**

# बापाचा रेडू



आमच्ह्या घरी एक रेडू व्हता. रेडू आसनं त्या टायमाले लय म्होटी गोष्ट व्हती. गोरगरीबाच्या घरी नव्हत्याच राहात अशानं अशा वस्तू. सायकल, रेडू ह्या त्या टायमाच्या परतिष्ठेच्या वस्तू व्हत्या. त्या गरीबा घरी सहसा राहात नव्हत्या. गावात म्होट्या मुश्किलानं चारपाच सायकली-रेडू व्हते. गावातले जे म्होटे शेतकरी व्हते त्येंच्ह्याकडी राहात ह्या वस्ता. गरीबाच्या घरी नव्हत्या राहात. आम्ही तं गरीबावून बी गरीब व्हतो. निपत्तरावून निपत्तर...

तरी मंग आम्हच्या घरी रेडू व्हता. कसा आला आशिन आम्हच्या घरी रेडू ? तशी तं आम्हच्ही रेडूस काय बकड्डी घ्याची आयपत नव्हती. एखादी कुतरं मांजरं पायू शकत नव्हतो. चांगले कापडं आंगावर राहात नव्हते. दोन टायमाचं खायाले भेटत नव्हतं. कोन्ही दारी नव्हतं उभं करत आम्हाले. निपत्तरावून निपत्तर आयुष्य जगत व्हतो. आसं सम्द आसतांना कुठून आला व्हता रेडू ?

बरं! रेडू वाजव्याले आन् रेडू आयक्याले रिकांपन कोन्हाचं व्हतं ? सम्देस तं कामाले जात व्हते. माय-बाप दोन्ही मोलमजुरी करत व्हते. मजुराच्हं कशाचं आलं रिकांपन... घरातले कामं आटपून मजुरीच्या कामावर निंघनं पडत व्हतं. घरीदारी कामाची कचकच राहात व्हती त्येंच्ह्या मांघी. रिकापंन म्हणून घडीचं राहात नव्हतं. कशानं काय रेडू आयकतीन मंग त्ये. रेडूले धरून बशासारकी परस्थिती नव्हतीस त्येंच्ही!

जे म्होटे शेतकरी राहात व्हते गावातले. ज्येंच्ह्या घरी कामाले नोकर चाकर राहात व्हते, आशा लोकांच्हा शोक व्हता रेडी वाजवनं. त्येंच्हं काय, मस्त आयकत बसत व्हते. आरामस आराम राहात व्हता त्येंल्हे. टाइमपास म्हणून रेडू आयकत व्हते. त्या टायमाले रेडूवर मस्त करमणूकीचे कार्यक्रम लागत. नाटकं, नाटकातले पदं, कीर्तन, भारूड, भजनं- टायमोटाईम कार्यक्रम लागत व्हते. हे, म्होटे लोकं मंग रेडू आयकत बसत व्हते. लयलय आनन आन् आफेक राहात व्हता त्येंल्हे रेडू आयक्याचा.

आमच्ह्या घरी मातर तशानं तसं कसलंच वातावरण नव्हतं. ना रिकांपन व्हतं मायबापाच्हं ना आफेक त्येंल्हें... कशानं काय रेडू घेतला व्हता मंग त्येंन्हं ? काय करत व्हते रेडूले ? सम्ध्यात महत्वाचं म्हन्जे एवढी मोलामहागाची वस्तू कुठून आनली व्हती त्येंन्हं ? कशानं काय आला व्हता रेडू आम्हच्या घरी? पाय फुटले व्हते त्येल्हे कां चालत आला व्हता. सम्ध्यात महत्वाचं, काम्हू आनला व्हता बापानं रेडू. काय काम व्हतं त्येल्हे रेडूचं. तो, काही म्होटा शेतकरी नव्हता. का त्येचं रेडू आयक्याले रिकांपन व्हइन... कशानं काय व्हतं मंग ?

त्या टायमाची परस्थिती आशी व्हती, की गरीबाले टायमावर खायाले भेटत नव्हतं.

तुकडा नव्हता भेटत खायाले, की कपडा नव्हता राहात आंगावर. घडीभर कोन्हाशी बोल्याचं रिकांपन राहात नव्हतं. आशा परसंगात कशाची आली करमणूक आन् कशाचं आलं काही. टीव्हीचं थोबाडं पाह्याचं काम नव्हतं,की रेडूकडे कान देवात नव्हते. टीव्ह्या तरफडेलच नव्हत्या म्हना ताव्हा. हां रेडू व्हते गावात. काही मोजक्या लोकांच्या घरी. ज्येच्या घरी रेडू व्हते त्ये लय भारी भरत व्हते. म्होटीस गोष्ट व्हती त्येंच्ह्यासाठी त्ये. आसणारचं व्हती तशानं तशी.

कशानं काय करत मंग ज्येंच्याघरी रेडू व्हते त्ये. म्होटा आवाज करून देत व्हते. सक्काय पासून रेडू लावून देत असत. ज्येच्या घरात व्हता रेडू तो तं आयकेस, पन शेजारचे पाजारचे बी आयकत.जसाकाही त्येंच्हा बी आधिकार व्हता त्या रेडूवर... भाव हिस्यासारखा, भावबंदकी सारखा... कोन्ही कोन्ही तं हाक्कानं सांगे, “रेडू लाव न् रे भो!” अशानं आसं वातावरण व्हतं ताव्हा गावात. एकमेकाले लोक समजून घेत व्हते. ऐकमेकाची मदत करत व्हते.

गावात जे म्होटे शेतकरी व्हते त्येंच्हा आधार वाटे गरीब मजुराले. भावू दादा कामात पडीन आपल्या काव्हा बी. वक्तावर धावून येतीन मदतीले, आसं वाटत व्हतं. म्होट्या लोकांच्या सहा-यानं लहान लोकं राहात व्हते. आपुलकीचा हक्क दाखवत व्हते. रेडू आयक्याचा परकार त्यातलाच व्हता. हक्क- अधिकारानं आयकत व्हते लोकं रेडू. हक्कानं सांगत व्हते. रेडूवाला बी मोठास करून ठेवत व्हता आवाज. सगळ्यांल्हे आयकू जाईन आसा.

अशानं आशी जुगाड व्हती. एका रेडूचा आवाज गल्लीभर पसरत व्हता. गल्लीतले सम्देस मंग आस्वाद घेत व्हते. मन लावून रेडू आयकत व्हते. महाग व्वस्तू गरीबाले घेता येत नव्हती, आयक्याले भेटत नव्हती. पन मंग आशानं आशी गरज पूरी हून जात व्हती त्येंची. गरीब बिचारा शेजारपारून कानावर पडणारा थोडाफार आवाज आयकून घेत व्हता. कानावर पडलाच एखादा दोन शब्द तर हवाच रहात व्हता त्याला.

रेडू आयक्याची परत्येकाची ईच्छा राहात व्हती; पण परत्येकाच्या नशिबात राहात व्हता रेडू,आसं नव्हतं. आम्हचं नशिब मात्र ह्या बाबतीत फडफडलेलं व्हतं. आमच्ह्या घरी रेडू व्हता. गरीब आसून रेडू व्हता आमच्ह्या घरी,हे- विशेष! तशी तर त्ये आभिमानाची गोष्ट व्हती. मिरवून घेण्यासारकी गोष्ट व्हती. रेडू व्हतं ताव्हाच एकमेव करमणूकीच साधन. ताव्हा ना टिव्ह्या व्हत्या ना आत्ताच्यासारके मोबाईल हातात. हातात गारामातीची खेळणी राहात व्हती. तशा अर्थानं दिवस गारामातीचे व्हते त्ये. फाटक्या - तुटक्या संसाराचे. कपडे राहात नव्हते आंगावर ना खायाप्याले धनधान्य... रंजला गांजला राहात व्हता माणूस ...गरीबाच्या घरात कशानं काही राहात नव्हतं .आशा टायमाले रेडू आसंनं ह्ये म्होटी फुशारकीची गोष्ट व्हती.

तशानं तशी मिरवून घेत व्हतो आम्ही फुशारकी! कोन्ही आभिमान व्हता वाटत आम्हाले रेडूचा. टनाटन आवाज घूमत व्हता घरभर...आख्खी गल्ली दनानून सुटत

व्हती. ह्या बाबतीत म्होट्या लोकांसारखे भारी भरत व्हतो आम्ही. शेजा-या पाजा-यांकडे सहानुभूतीनं पाहात व्हतो. आयकूद्या बिचाऱ्यांल्हे रेडू, आसं वाटत व्हतं. म्हणून्त आवाज म्होटा करत व्हतो. कोन्हालेस त्या टायमाले म्होट्या आवाजाचा तरास व्हत नव्हता. उलट आवाज जेवढा जास्त वाढवला तेवढी जास्त सहानुभूती भेटत व्हती. चांगले म्हणत व्हते शेजारपाजारी. तसा तर गल्लीचाच आभिमान व्हता आमच्हा रेडू म्हणजे... तशानं तसा परत्येकाचा आधिकार व्हता त्येच्यावर... परथाच व्हती तशानं तशी. रीतच व्हती चालत आलेली...

उलट कोन्ही नही आलं रेडू सुरू करा आसं नही सांग्याले तं आम्हाले चुकचुकल्यासारखं वाटत व्हतं. जसाकाही गल्लीतल्या सम्धायच्हा हाक्क व्हता त्येच्यावर. आन् तो हाक्क आम्हाले बी मान्य व्हता. त्याटायमाले तशानं तशे वागत व्हते लोकं. एकमेकाशी मिळून मिसळून राहात व्हते. एकमेकाले समजून घेत व्हते. एकमेकाच्या कामात पडत व्हते. एकमेकाच्या सुखदु:खात सहभागी व्हात व्हते. गरीब आसला तरी स्वाभिमानानं जगत व्हता माणूस! मतलाबासाठी लाचारी पत्करत नव्हता. लांडीलबाडी माहित नव्हती त्येल्हे. जो तो आपल्या कष्टावर भरवसा ठिवून व्हता. आपल्या नशिबावर भरवसा व्हता त्याचा. त्याबाबतीत कोन्हाले दोष देवून नव्हत्ये. तशा अर्थानं सुखी- समाधानी व्हता माणूस. सुखाच्या त्याच्या कल्पना मोजक्या व्हत्या. हापापलेपना नव्हता. दु:खाले दु:ख समजत नव्हता आन् सुखाले सुख मानत नव्हता. आन् कष्टावर सम्धायचा भरोसा व्हतं.

आपलं काम भलं आन् आपन भला,आसं परत्येकाचं वागनं व्हतं.कोन्ही कोन्हाच्या संसारात म्हणा का कुटुंबकबिल्यात नाक खुपसत नव्हता.निर्मळतेचा झरा सगळीकडे खळखळून व्हता.आकस द्वेषभावना मत्सर शोधून बी सापडत नव्हता.परत्येकाच एक विश्व व्हतं. आपापल्या विश्वात जो तो मशगुल राहात व्हता. मह्या बाप बी त्येल्हे अपवाद नव्हता. काय व्हतं बापाचं विश्व?

त्येच्या विश्वात एक रेडू व्हता! कुठुन आला व्हता हा रेडू ? तो, त्येल्हे ‘आंधन’ भेटेल व्हता. मह्या मायच्या बापाकडून. ताव्हाचे दिवस गरीबीचे व्हते. सायकल, रेडू हे गरीबासाठी म्होटे विषय व्हते. नेमक्या ह्या दोन्ही गोष्टी बापाले लग्नात आंधन म्हणून भेटेल व्हत्या. तशी तर त्याची स्वत:ची आयपत नव्हती रेडूगिडू घ्याची. रेडूस काय एखादी छत्री घ्यू शकत नव्हता तो. तशानं तशी आयपत नव्हती बापाची. पण अशानं आसं त्याचं नशीब फडफडलं व्हतं. लग्नात आंधन म्हणून बापाले रेडू भेटला व्हता. कशानं काय खुश राहणार नव्हता मंग मह्या बाप! कशानं काय भारी भरनार नव्हता मंग तो...

रेडू म्हणजे त्या टायमाचं एकमेव करमणूकीच साधन व्हतं. त्ये बी परत्येकाकडे व्हतच आसं नव्हतं. आपल्याकडे रेडू पायझेल, आसं मातर परत्येकाले वाटत व्हतं. तशानं तशी प्रतिष्ठेची गोष्ट व्हती रेडू म्हणजे. .शिवाय ज्ञान,मनोरंजनाचं एकमेव

साधन. जे आपल्या घरात पायझेल, आसं परत्येकाले व्हतं वाटत;पण भेटीनच याची खात्री नव्हती. शेवटी गरीबी आडवी येत व्हती. परस्थिती नडत व्हती.

ह्याबाबतीत बाप भाग्यवान ठरला व्हता. गरीबी आसून त्येल्हे रेडू भेटलाला व्हता. ज्येच्या घरात रेडू त्येच्या घरात कोन्ही आनन राहात व्हता. रुबाब राहात व्हता. गल्लीभर समजा त्या घराले मान. त्याच्या घरातलं वातावरण संगितमय राहात व्हतं. भक्तीमय राहात व्हतं. कारण की रेडूवर भजनं लागत, भावगीतं लागत, भक्तीगीतांच्या भक्तरसात त्ये कुटुंब बुडालेलं राहात व्हतं. भजन कीर्तनासोबत बातम्या, चालूघडामोडी, विचारधन, आरोग्यसंदेश - आशा कार्यक्रम्हांन्हं लोकशिक्षण घडत व्हतं. जगातली मायथी भेटत व्हती. चांगल्या चांगल्या गोष्टी कानावर पडत व्हत्या. म्हणजे गरीबाले कोन्ही सांगणार नि, त्येच्या कानावर पडन्हार नयथी, आशा गोष्टी रेडूमुळे समजत व्हत्या. कशानं काय आनंद आभिमान वाटन्हार नव्हता मंग रेडूबद्दल बापाले ?

अशानं आसा आनंद, आभिमान आम्हच्या घराच्या वाट्याले आलेला व्हता. त्येच्यानं मायबाप आनंदी राहात व्हते. भलतेच भारी भरुन राहात व्हते त्ये. तशानं तशी भारी भरण्यासारखीच वस्तु व्हती त्ये. स-या गल्लीत त्या घराचा मान राहात व्हता. सा-या गल्लीभर रेडूचा आवाज घूमत राहात व्हता. करमणूकीसोबतच गल्लीले टाईम बी समजत व्हता रेडूमुळे - टायमोटाईम!

आशा ह्या रेडूले बाप जिवापाड जपत व्हता. संसार त्येचा गरीबीचा व्हता. पोटाले पोटभर खायाले भेटत नव्हतं. आंगावर धड आंगभर कपडा नव्हता.पण रेडूनं संसारात रंग भरला व्हता.आपल्या घरी रेडू हाये येचा केवढा आनंद व्हता माय-बापाले. तशा कारणानं एकमेकाचा आभिमान वाटत व्हता त्येंल्हे. कोन्ही कोन्ही आनंद व्यक्त करत व्हते. एकमेकाविषयी आधार,आदर प्रकट करत व्हते. रेडूच्या आसन्यानं आशानं आशी रंगत वाढून गेल्ही व्हती मायबापाच्या संसारातली. गरीबी, दुःख काहीसं हालंकं झालं व्हतं त्यांचं. जसाकाही गरीबीचं दुःख हालकं क-यासाटीस रेडू आम्हच्ह्या घरी आलेला व्हता. मायबापाच्या संसारात रंगत भरत व्हता. कष्ट, यातना दूर झाल्यासारक्या वाटत व्हत्या. बापाले तं लयच भारी वाटत व्हतं. कित्ती बी थकवा आसला चेहऱ्यावर तरी तो ईसरुन जात व्हता. रेडू अशानं असा त्येंच्हा संगाती झालेला व्हता. सुख दुःखातला सोबती; नव्हे कुटुंबातलाच तो एक घटक बनला व्हता.

रेडू म्हणजे नुस्ती वस्तू नव्हती आम्हच्ह्या घरात. तर तो आम्हच्हा संगाती व्हता. घरातलाच एक सदस्य व्हता. मायले, बापाले आन् आम्हा भावंडांल्हे बी रेडू आपला वाटत व्हता. मायच्या तं तो माहेरचाच व्हता. माहेरची कोन्थी बी गोष्ट किती आलोखीची राहाते त्ये, माय रेडू बाबतीत जपत व्हती. रेडू बोले ताव्हा मायले वाटे, आपल्या माहेरचच कोन्ही बोलू राहालं. कशानं काय मंग तिच्या मनात रेडू विषयी आदर राहानार नव्हता. तसा बी तो, तिच्या बापानंस देल व्हता. तशा अर्थानं मायचा हक्क जास्त व्हता रेडूवर. पण माय तसं ना करे. आपला हक्क ना दाखवे. बापासाठी आलेला रेडू बापच वापरत

व्हता. म्हणजे रेडूवर पूरेपूर बापाचाच आधिकार व्हता. रेडू चालू करना आसो, बन करना आसो, कोन्थ ठेशन लाव्याचं कोन्थ नही, आवाज किती ठिव्याचा किती नही, रेडूच तोंड स्पीकर कुकडे ठिव्याचा, रेडू कुठी ठिव्याचा - ह्या सम्धा गोष्टी बाप करत व्हता. तशा आर्थानं रेडूवर पूर्ण बापाचा आधिकार व्हता. माय सहसा रेडूले हात लावत नव्हती. आम्ही तं लहानस व्हतो.

आशानं आशा बाबतीत समाधानी व्हते, मायबाप. तशा अर्थानं सुखी व्हते. एकमेकाले समजून घेत व्हते. भारी भरत व्हते माय-बाप ! बाप जास्त ...तोच रेडूची जास्त कायजी घेत व्हता. तोच रेडूले चालू - बंन करत व्हता. बटनं फिरवून स्टेशन लावनं आसो का आवाज कमी - जास्त करना आसो ,तोच करत व्हता. ह्या बाबतीत माय अडाणी व्हती. तसंही तिचं शिक्षण झालेलं नव्हतं.मायनं शाळेचं तोंड पाहालेलं नव्हतं. बाप मातर चौथी नापास व्हता. म्हणजे तो शिकेल व्हता. त्यामुळे तो सोताले शिकेल समजत व्हता.म्हणून रेडूवर त्येचा हक्क अधिकार बसलेला व्हता.

आपल्याले रेडूतलं बरंच समजतं, आशी बापाची समज व्हती. निदान तसं तरी तो दाखवत व्हता. खटाखट बटनं फिरवत व्हता. बटनं फिरवून स्टेशन लावत व्हता. आवाज कमीजास्ती करत व्हता. आवाजाची दिशा बदलवत व्हता. चांगला कार्यक्रम लागला ,की बाप चित देवून आयकत व्हता. मान डोलवत व्हता. आपल्याले लयच समजतं तिच्यातलं, आसं दाखवत व्हता. गाण्याच्या तालावर डोलनं आसो, की सुरात सूर मिसळवून बोलनं आसो- आसं तो करत व्हता.

माय आपली दूर राहात व्हती रेडूपासून ! तिल्हे ना रेडूची आवड व्हती ना चीड. आवड यासाठी नव्हती, की तिल्हे रेडूवरच्ह्या कार्यक्रमांमंधी रस नव्हता.रेडूवरच्हे गाणे म्हणा का कार्यक्रम म्हणा तिल्हे आवडत नसत.तिल्हे तिच्या सोताच्या गाण्यांची आवड व्हती. मायले आशे भरपूर गाणे येत व्हते.गाणे आन् गोष्टींच्हं कोठारच व्हतं तिच्याजोय. तिचं म्हन्न आसं व्हतं मह्याजवळ एवढा खजिना असतांना मी कशाले कोन्हाचं आयकू ?म्हणजे रेडूचं...रेडूतल्या बायांपेक्षा तं मी,चांगले गाणे म्हणते,आसं मायचं म्हन्न व्हतं. म्हणून काय त्ये रेडूचा द्वेष करत व्हती,आसं नव्हतं.एवढं आसल्यावर बी माय रेडूचा व्देष करत नव्हती.त्याचं कारण म्हणजे रेडू तिच्या बापानं दिलेला व्हता.

बाप मातर रेडूच्या लयच जवळ व्हता. त्येची पुसून पासून काळजी घेत व्हता. रेडूसाठी बापानं खास कव्हर आनेल व्हतं. कव्हरात त्या रेडू व्हता, जसाकाही धोतरात पंढरीनाथ. त्येन्हं आपल्या हातानं ठिवेल व्हता रेडूले. म्हणजे रेडू ठेवण्यासाठी सुरक्षित जागा करून ठिवलेली व्हती. रेडू ठ्याची खास जागा व्हती आम्हच्ह्या घरात. भीतीच्या गोखल्यात व्हती त्ये जागा. ताव्हा आमच्हं घर गारामातीचं व्हतं. भिती बी मातीच्या व्हत्या. त्या एका भितीले व्हता गोखला - मधून ...मस्त जागा व्हती तठी सुरक्षित,देव्हा-यासारखी. तिच्यात ठिवेल व्हता बापानं रेडू. तठी कोन्हाचा हात पूरू शकत नव्हता ना कुत्र्या- मांजराचा धाक व्हता. अशानं असा रेडू गोखल्यात बेतोबेत ठिवलेला राहात


"व्यक्तिमत्व विकास" संपादक - मंगेश विठ्ठल कोळी, मो. 9028713820

व्हता. देव्हा-यातल्या देवासारका! मखरात गुंढाळून ठिवलेला. धूळ वैगेरे बसू नही त्यावर म्हणून फडकं टाकून झाकलेला. टायमोटाईम सापसफाई व्हत व्हती त्येची.

बाप रेडूले आतोनात जीव लावत व्हता. मस्त पुसून पासून घेत व्हता. झटकून झाटकून ठेवत व्हता. कधी कधी मांडीवर घ्यून, छातीशी कवटाळून रेडू आयकत व्हता. ताव्हा माय नवलपनानं त्येच्याकडे पाहात जाये. रेडूचं बी आन् बापाचं बी कवतिक वाटे तिल्हे. आनंदआभिमान वाटे. जास्त करून रेडू गोखल्यात राहे. तठी मस्त सवारेल जागा व्हती रेडूची. आन् तठी सुरक्षित बी व्हता तो. ना पड्याचा धाक ना फुट्याचा. शिवाय तठून सम्धायले आयकू जात व्हता आवाज. चूल्ह्याजोयच्या मायले ...अंगणात बसलेल्या बापाले...आम्हाले...गल्लीतल्या सम्धायले...तशानं तशा आरथानं सम्धायचा हक्क व्हता रेडूवर...जेच्या घरी रेडू नव्हता तो शेजारपाजारचा रेडू आयकत व्हता.

शेजारपाजारच्या रेडूच्या आवाजावर त्यांचं बी वेळापत्रक चालत व्हतं. तसं तर स-या गावाचच वेळापत्रक रेडीओच्या ठोक्यावर चालत व्हतं ताव्हा. सक्काळचे नऊ चाळीसचे गाणे संपल्याबरबर बाया वावराच्या रस्त्यानं लागत व्हत्या आन् युववाणी संपता संपता गावात शिरत व्हत्या. दुफारच्या वावरातल्या न्याहा-या तीनविसच्या गाण्यांव्हर व्हत व्हत्या.वावरात शिवारात घरीदारी सद्यादूर रेडू राहात व्हता. एकचाळीसचे गाणे परशिद्ध व्हते. दीडच्या बातम्या झाल्यावर लागत एकचाळीसचे गाणे. लय भारी भारी गाणे लागत भो ताव्हा. मस्त डोले आयकणारा... जिकडे तिकडे रेडूचा बोलबाला राहात व्हता. ढोरकी,कामकरी,शेठ,सावकार सम्देस रेडूचे शोकीन व्हते.त्येच्यानं सम्धादूर रेडूच्या लहरी तरंगून व्हत्या.त्या तालावर ग्रामीण जनजीवन डोलत व्हतं.

सम्दस देत व्हता न् रेडू... सक्काळी सहालेस मंगल वाद्यानं सुरवात व्हत व्हती. त्यानंतर सहापाचच्या दिल्लीवरच्या बातम्या. कार्यक्रमाची रुपरेषा... भक्तीसंगीत... सकाळी साडेसाहाचं भक्तीसंगीत आन् संघाकायच्या साडेसहाचं लोकसंगीत... लयच आवडीचं व्हतं... लोकजागरमधून आन् कौटुंबिक नाटीकामधून लोकशिक्षणाच काम व्हत व्हतं. झुंबर नावाची विनोदी मालीका व्हती. हे, सम्दे कार्यक्रम आम्हच्याकडच्या जळगाव केंद्राचे व्हते. बातम्या देणाऱ्याचा आवाज, कार्यक्रमाची सुचना करणारांचे आवाज वयखिचे झालेले व्हते. त्ये सम्दे आपले वाटत. प्रतिमा जगताप, सतीश पप्पू, स्मिता दिक्षित आशे त्ये व्हते... लय लय गोड आवाज व्हता त्येंच्हा... सम्धायल्हे आपलंसं करून घेत... त्येच्यानं रेडू असा परका वाटतच नव्हता.

बरं भाईर कुठी सीनेमा पिक्चर पाह्याले भेटत नव्हता. तशानं तशी आयपत नव्हती कोन्हाची. त्ये सम्दी भूक रेडू भागवत व्हता. इतके भारी भारी गाणे लागत इचारु नका. लता दिदि, आशा भोसले, अनुराधा पौडवाल, किशोर कुमार, मोहमद रफी... बिनाका गितमाला, फोन इन कार्यक्रम, आपकी पसंद आशे एकापेक्षा एक भारी कार्यक्रम व्हते. अशानं असा रेडू सम्धायचा मैतर झालेला व्हता.अनेकांच्या गयातला ताईत झालेला

व्हता.पाहता पाहता गरज म्हणूनही त्याचा उपयोग वाढलेला व्हता. तशी तर रेडूले सम्धादूर मागणी व्हती.त्येच्या शब्दावर,टायमावर सम्धायचा बिनबोभाट इस्वास व्हता. नुस्त्या त्येच्या सूरावटीवरुन काळचक्र फिरत व्हतं गावगाड्याचं. कामधंद्याले निंघत व्हते गावकरी. तशा अंदाजा अंदाजानं काम करत व्हते. मोडाखे बांधत व्हते. अशानं अशा रेडूच्या तालावर सगळा गावगाडा नाचत व्हता, चालत व्हता. गावगाड्याचा सखा,गावगाड्याचा चरखा,गावगाड्याचा सूर व्हता रेडू म्हणजे !

बापाचा तर तो, आवडता व्हता. गयातला ताईत व्हता.सखा आन् मैतर व्हता. बाप रेडूवरच्हे सम्दे कार्यक्रम आवडीनं आयकत व्हता. सकाळी सहा वाजल्यापासून आमच्ह्या घरचा रेडू सूरु हून जात व्हता. वंदे मातरम्...भूपाळी आन् विचारधन बाप आवरजून आयकत व्हता. आरोग्य शिक्षण, लोकसंगीत ,लोकजागर , नाटीका - नाट्यसंगीत आयकत व्हता. हवामानाचा अंदाज ,बातम्या , अवतीभोवती हे सदरंही त्येचे आवडते व्हते.तसा तर रेडूवरच्हा शब्दन् शब्द बापाले आयकू वाटत व्हता.प्रत्येक वाक्य,कार्यक्रमाची त्येल्हे गोडी व्हती.आसा कोन्हताच कार्यक्रम नव्हता जो बापाले आवाडत नव्हता.

ह्या बाबतीत माय, बापाले नावं ठिवत व्हती.काय समजतं तुम्हाले ,आसं म्हणून हिनवत व्हती.पण बापाले कशानं काही पर्वा राहात नव्हती. त्याचं आपलं चालू राहायचं रेडू आयकनं...ऊठता बसता, घराच्या भाईर जातांना ,..कामावरून आल्यावर तर तो हमखास रेडू चालू करत व्हता. रेडूवरच्हे बोल आयकून त्येचा शीण निंघून जात व्हता. ताजातवाना हून जात व्हता बाप... संध्याकायच्या लोकसंगीताच्या तालावर बाप डुलत व्हता. बातम्या आयकून हरखून जात व्हता.

कित्ती बी तयून तापून यो ...कित्ती बी थकून भागून यो ...रेडू लावला म्हणजे बापाचा थकवा गेला म्हणून समजा. घरातलं वातावरण हलकंफुलकं हून जात व्हतं. सुरेली मैफल जुळून येत व्हती घरात. रेडूवरच्या कार्यक्रमावून म्हणा का कमीजास्त आवाजावून म्हणा ,मायबापाचं भांडन मिन्हं कधी पाहालं नव्हतं. थोडीफार मजाक सोडली तं रेडू त्येंच्हा दोन्हींच्हा आवडता व्हता. प्रेमाचा आन् ममतेचा व्हता. सुरांसोबतच तो मायेची गुंफन बी करत व्हता घरात. मानसं जोडून ठिवत व्हता. मायबापाच्या खेळकर संसाराचा तो साक्षिदार बनून गेला व्हता. कित्ती बी कष्ट,वेदना,गरीबी यो संसारात रेडूमुळे खेळकरपणा वाढून जात व्हता. अशानं असा माय-बापाचा संसार रंजक करून टाकला व्हता रेडूनं!

अशानं असा रेडू सम्धायचा आवडता व्हता. गरीबी जरूर व्हती ताव्हा,पण संसारात गोडी व्हती. हे गोडी रेडुमुळे वाढून गेलेली व्हती. काहून,की रेडू भांडनं लावत नव्हता कुटुंबात... घरात कलह निरमान करत नव्हता ...ज्ञान मनोरंजनाचा झरा खळाळता ठिवत व्हता... ज्यामुळे वातावरण ताजंतवानं, निरमळ, निरोगी- खेळकर राहात व्हतं... एकूणच समाजाच आरोग्य टिकवून ठेवण्यात रेडूचा मोठाच हातभार लागत व्हता....

आमच्ह्या बी घरात तसंच व्हतं. रेडूमुळे घरात आनंद नांदत व्हता. खळाळतं राहात व्हतं घरातलं वातावरण. दुःख,यातना,कष्टाचा भार कमी हून जात व्हता. खेळतं राहात व्हतं घरातलं वातावरण. काही टायमाले टकरावाचे परसंग येत बी व्हते. भांड्याले भांडं लागत व्हतं. पन आशा परसंगी रेडूस कामी येत व्हता. रेडूचा आवाज वाढवून देल्हा की घरातल्या भांडणाचा आवाज भाईर जात नव्हता. दुसरं म्हणजे बाय बापा मधला भांडणानंतरचा आबोला बी रेडूस दूर करत व्हता. भांडनं झाल्यावर एकदोन दिवस बाप रेडूले हात लावत नव्हता. मायाले मातर हा दूरावा सहन व्हत नसे. पुढाकार घ्यून माय रेडू चालू करे. तिच्या हातून कधी बंड बदलून जात व्हता. स्टेशन हूकून जात व्हतं. ताव्हा मंग बापाले ऊठनस पडत व्हतं. म्हणत व्हता, “ व्हय तू बाजूले... बिघडवून टाकशीन रेडूले...” अशानं असा अबोला दूर व्हत व्हता त्येंच्ह्यातला.

रेडूच्या बाबतीतल्या लयलय आठवणी व्हत्या बापाच्या. रेडूले आसा एकटा सोडतच नव्हता तो. संध्याकायी कामावून आल्यावर जोय घ्यून बसत व्हता. जेवनं करतांना रेडू मंधी ठेवत व्हते. रेडूच्या आजूबाजूनं चौफेर बसत व्हते. एखांद्या दिशी रेडू नसला तं घास घशाखाली उतरत नव्हता बापाचा. एवढंस काय माय माहेरी गेल्ह्यावर मायची आठवण म्हणून रेडूमंधी रमत व्हता, तो.अशानं असा रेडू आन् बापाचा लळा व्हता. तो, त्याचा संगाती व्हता. मायच्या जागी आयुष्यभराचा जोडीदार व्हता. माय जशा गोष्टी सांगे, रेडू बी तशाच गोष्टी सांगे. खरे पनाच्या... चांगूल पणाच्या...आपल्या हिताच्या... मायनं जसं बापाच्या आयुष्यात परिवर्तन आनलं व्हत, तसंच काम रेडूनं केल्हं व्हतं. बाप आडानी व्हता. जास्त कुठी फिरलेला नव्हता. जगाचा व्यवहार त्येल्हे मायथी नव्हता. पन हे सम्दी समज, शिकवन रेडूपासून भेटली व्हती त्येल्हे. म्हणून रेडूले इसमत नव्हता.

एवढा की माय गेल्ह्यावर बी तिची आठवण म्हणून त्येन्हं रेडू संभायून ठिवला व्हता. एक टाइम खायाले नही भेटलं तरी चालीन पण तो रेडूची टापटीप ठिवत व्हता. आवाज थोडाफार बी कमी जास्त झाल्यास सील बदलवत व्हता. थोडशी बी खरखर खुरखुर झाली सुदरवून आनत व्हता. मायची आठवण म्हणून बाप रेडूले जपत व्हता. नंतरच्या काळात टिव्ही आला घरात, तरी बाप टिव्हीसमोर बसत नव्हता. त्येल्हे आपला रेडूस आवडत व्हता. जणूकाही बाप रेडूच्या माध्यमातून मायचा आवाज आयकत व्हता. मायचा सहवास आनुभवत व्हता. मायच्या आठवणी तो अशानं आसा जपत व्हता. रेडूमंधी मायले पाहात व्हता.

घरात टिव्ही आल्यावर आम्ही रेडूले इसरलो व्हतो. आम्हाले रेडू पेक्षा टिव्हीच आकर्षण जास्त वाटत व्हतं. बापानं पन कधी टिव्हीचं थोबाडं पाहालं नव्हतं. एवढी रंगीत टिव्ही, तिच्यातले नट्ट्यापट्ट्याचे चित्र बापाले कधीच आकर्षक करू शकले नव्हते. तो,आपला रेडू धरून बसत व्हता. रेडूच्या आपल्या विश्वात खूश व्हता. रेडू म्हणचे त्याचा जीवलग सखा- सखी व्हता.

नंतर नंतर रेडू बंद पडून जात व्हता. सील गेल्ह्यावर सील टाक्याले बापाजो पयशे

राहात नव्हते. कधी कधी रेडू खोडाय हून जात व्हता. तसा तर रेडू बी म्हातारा झालेला व्हता. खिळखिळा झालेला व्हता. कधीचीच त्याची गरंटी संपलेली व्हती. एक एक पार्ट गेलेला व्हता. त्याच्यासोबतीची माय कधीचीच हे जग सोडून गेलेली व्हती.बाप बी आताशा थकला व्हता. हातपाय चालत नव्हते त्याचे बी. कानानं आयकू येत नव्हतं. तरी बी बाप रेडूले सोडत नव्हता. आम्हच्हं त्येंच्ह्याकडे लक्ष व्हतं पन बाप सीलाले पैसे मांगत नव्हता. रेडू खोडाय झाल्याचं आम्हाले सांगत नव्हता. एक मात्र व्हतं, तशाही अवस्थेत बाप रेडूले इसमत नव्हता. जवळ ठेवत व्हता. रेडूच्या नुस्त्या आसन्यानं बाप खुश राहात व्हता.

आम्ह्च्या लक्षात काही गोष्टी आलेल्या व्हत्या. जोवर रेडूचा आवाज वाजत व्हता तोवर बाप बोलता चालता राहात व्हता. खुशीत राहात व्हता. बोलनं चालनं, जेवन खावन करत व्हता. जसाकाही रेडू बंद पडला, बाप बी अबोल हून जात व्हता. शक्तीहीन हून जात व्हता. रेडू म्हणजे बापाची शक्ती व्हती. शेवटच्या दिवसात आसाच खेळ चालत व्हता. रेडू एवढा खुळखुळा झाला व्हता की तो सुदरवन्याच्या पलिकडे गेला व्हता. सुदरवनारा नाही म्हणायचा. तसाच आम्ही रेडूले बापाच्या हवाली करायचो. बाप रेडूले जवळ घ्यायचा. एकटक त्याच्याकडे बघत बसायचा. रेडू चालू हाये का बंद ह्याबाबत त्याला काही नाही कळायचं. तशानं तशा वातावरणातच बापाचे शेवटचे दिवस गेले.शेवटी एक दिवस रेडू आन् बाप दोन्ही बी अबोल झाले....

बाप गेल्यावर 'बापाचा तो रेडू' आम्हीनं भितीतल्या त्या गोखल्यात जपून ठेवला व्हता, बापाच्या फटूसह - मायची आठवण म्हणून....

**- अशोक कौतिक कोळी / जामनेर**
**मो.- ९४२१५६८४२७**

# कृतज्ञता



कृतज्ञता असावी
सर्वांच्या मनी
उपकाराची जाणीव
असावी ध्यानी

गरजवंतांना द्या
मदतीचा हात
होईल त्याची मग
संकटावर मात

एकदुसऱ्याला सदा
बोलावे सत्य
सलोखा नि प्रेम
असावे नित्य

दुसऱ्यांच्या वैभवाचा
करू नये हेवा
सदा अंगी बाळगावा
संस्काराचा ठेवा

मनातली कृतघ्नता
दूर आता सारा
मानवता धर्म पाळूनी
कृतज्ञतेला द्या थारा



- रविंद्र व्ही. चालीकवार / महागाव
मो.- 9011559106

# खरा हिरा



कंपनीच्या पोर्चमध्ये रावसाहेब गोखल्यांची गाडी येऊन थांबली...रावसाहेब त्यातनं खाली उतरून लगबगीने ऑफिसच्या कॉरिडॉरमधून आपल्या केबिनकडे निघाले...आज पहिल्यांदा त्यांना इतका उशीर झालेला होता...दुपारचे साडेबारा होऊन गेले होते...नेहमी ऑफिसच्या वेळे आधीच ते आलेले असत... सकाळी दहाच्या दरम्यान त्या कॉरिडॉरमध्ये असलेल्या स्वातंत्र्य सेनानी तात्यासाहेबांच्या तैलचित्राच्या तसबिरीला सर्व प्रथम पुष्पहार घालून वंदन करूनच नित्याच्या कामकाजाला लागत. आजही कॉरिडॉरमधे आल्यावर पुष्पहार घालण्यासाठी ते वळले आणि पाहतात तर इथे पहिल्यांदाच आज कुणीतरी तो पुष्पहार घातलेला त्यांना दिसला...जो गेल्या पंचवीस वर्षाच्या काळात रावसाहेब गोखल्यां खेरीज कुणीच घातला नव्हता...हा अधिकार त्यांच्या कंपनीत त्यांच्या एकट्याचाच होता...हा अगोचरपणा रावसाहेबांना रूचला नाही... ते क्रुद्ध झाले,संतप्त होऊन आपल्या केबिनमध्ये येउन त्यांनी त्वरित सर्व विभागिय मुख्यअधिकाऱ्यानां तात्काळ बोलवले... आणि हा अगोचरपणा कोणी केला असा जाब त्यांना विचारू लागले. हा कर्मचारी कोणत्या विभागाच्या अधिकाऱ्याच्या अखत्यारीतला आहे? त्या मुख्य अधिकाऱ्याने त्याला काहीच समजावले कसे नाही? असे विचारत होते...काही क्षण केबिन एकदम शांत झाली...जो तो दुसऱ्याकडे पाहत होता...मनातून घाबरला गेला होता...रावसाहेबांच्या रागाला कोणाला बळी जावे लागणार आहे याची प्रत्येक मनात भीती उभी राहिली...एक दोघांनी आपल्या विभागातील नाही म्हणत नकारर्थी मान हलवली...

तोच इंजिनिअरींग विभागाचे गोडबोले नि दिवाण दोघेही ऊभे राहिले, व म्हणाले,

“सर आठवड्यापूर्वी कँपस निवडतीले जी नवरत्नं ट्रेनी इंजिनिअर हजर झाले ना त्यातला प्रभंजन आपटे ह्या मेरुमणीचा हा अगोचरपणा आहे..” गोडबोले दिवाण जोडगोळीने आपल्या कुत्सित स्वभावानुसार गरळ ओकू लागले व पुढे म्हणाले,

“आम्ही त्याला अस करू नयेस म्हणून परोपरीने समजावून सांगण्याचा प्रयत्न केला... कंपनीत आजतागायत कोणत्याच कर्मचाऱ्याने रावसाहेब सरांच्या अधिकारात ढवळाढवळ केली नाही आणि आज तू ती केली आहेस...यास्तव कंपनी व्यवस्थापन तुझ्यावर शिस्तभंगाची कारवाई करून कदाचित तुला कंपनीतून सेवामुक्त करण्याचा कठोर निर्णय सुद्धा घेतील...शिवाय तुला क्षमायाचना करण्यास संधी असणार नाही...तेव्हा पुढच्या परिणामास तू तयार राहा...”

अशी आम्ही दोघांनीही त्यास कल्पना दिली आहे...जोडगोळीने आपल्या नित्याच्या

कातडीबचावाचे ओशाळ बोलणे केले...रावसाहेब ह्या जोडगोळीची किती लायकी आहे ते पुर्णपणे ओळखून होते... तेथे जमलेल्या दहाबारा अधिकारी वर्गाच्या मतानुसार निष्कर्ष काढला जात असला तरी अंतिम निर्णय हा रावसाहेबच घेत असत...या मिटिंगमध्ये प्रभंजनवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे ठरले...त्याप्रमाणे प्रभंजनला विभागातून बोलावून घेण्यात आले...

...प्रभंजन केबिनमध्ये खाली मान घालून आला...आल्या आल्या त्याने माझ्या हातून आगळीक घडली आहे आणि त्याला नियमानुसार होणारी कारवाई देखील मला मान्य आहे...पण मी येथून जाण्यापूर्वी दोनच मिनिटं मला तुमच्या समोर बोलायचं परवानगी देत असाल तर बोलतो अन्यथा आहे तसाच बाहेर पडतो...रावसाहेबांनी त्यास परवानगी दिली...आणि प्रभंजन बोलू लागला,

“सर सर्व प्रथम देशातल्या नावाजलेल्या नवरत्न कंपनी मधे मला ट्रेनी इंजिनियर म्हणून संधी दिल्याबद्दल मी आपल्या सर्वांचा आभारी आहे...मी इथे ज्या दिवशी हजर झालो तेव्हा पहिल्यादां मला कॉरिडॉरमध्ये तात्यासाहेबांची तसबीर दिसली... मी त्यांना अभिवादन करूनच रोजचं पुढे विभागात जात होतो...कारण तात्यासाहेब माझे दैवत आहेत...माझी त्यांच्यावर प्रामाणिक निष्ठा आहे...केवळ इतकेंच नाही तर त्यांचे सर्व जीवन चरित्र ,त्यांचा अलौकिक त्याग, देशाबद्दलचा स्वाभिमान नि प्रेम, त्यांची परखड शैलीतली अमोलिक अजरामर अशी निर्माण केलेली साहित्य संपदाचं मी पारायणं केली आहेत, ते देशात जिथे जिथे गेले तिथली पायधूळ मी मस्तकी लावून घेतली आहे, इंग्रजांनी केलेला अनन्वित छळ आणि  स्वातंत्र्य प्राप्तीच्या नंतर स्वकीयांकडून राजकीय स्वार्थापोटी केली गेलेली अवहेलना आणि त्याहीपेक्षा त्यांच्या बद्दलची चुकीची माहिती पुढच्या पिढीला कशी देता येईल याचा आमच्याच लोकांचा खटाटोप  इ.इ.सार काही मला ज्ञात आहे...मी मात्र माझ्या पद्धतीने त्यांच्या बद्दलची सर्व योग्य ती माहिती शाळकरी मुलांना, तरुणांना, वडीलधाऱ्यानां सांगत असतो... एक छोटासा खारीचा प्रयत्न करत असतो...आपल्या कंपनीच्या कॉरिडॉरमध्ये ती तात्यासाहेबांची तसबीर पाहून माझा ऊर भरून आला...मी नेहमीच त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घातलेलाच पाहत आलो होतो...आणि नेमके आज अकरा वाजून गेले तरीही तो पुष्पहार तसाच पडून होता...मला माझ्या दैवताची ताटकळत ठेवलेली अवस्था पाहून खेद वाटला...मी कॉरिडॉरमध्ये असलेले माझे विभागाचे अधिकारी यांना याबद्दल विचारले तर सर्वांनी तो फक्त तुमचा अधिकार आहे एव्हढेच सांगीतले...पण विचाराने कृती करण्यास कचरले जी मी कृती करताच मला भीती धाक दाखवण्यातच त्यांनी धन्यता मानली... मला दोन शब्द बोलू दिल्याबद्दल धन्यवाद...मी आपल्या निर्णयाची सुद्धा वाट न पाहता हा असाच बाहेर पडत आहे...”

...प्रभंजन निघाला...सर्व अधिकारी त्याच्या कडे आ वासून बघत होते...आजपर्यंत रावसाहेबांच्या समोर उभे राहून इतके बोलण्याच धारिष्ट्य कुणीच दाखवलं नव्हतं

आणि काल आलेल्या या उर्मटाने रावसाहेबांची काही तमा बाळगता बेताल बोलत सुटतो...आता त्याची काही खैर नाही अस तिथे बसलेल्या सगळ्या अधिकाऱ्यांना वाटून गेले...रावसाहेब काय निर्णय देतात त्याकडे त्यांचे लक्ष लागले होते. प्रभंजनचा प्रामाणिकपणा आणि तात्यासाहेबांच्याबद्दल असलेली जाज्वल्य निष्ठा पाहून रावसाहेबांचे डोळे पाणावले एक खरा हिरा त्यांना हवा होता तसा मिळाला होता..

त्यांनी पाठमोऱ्या जाणाऱ्या प्रभंजनला थांबण्यास सांगितले नी उद्या पासून तात्यासाहेबांच्या प्रतिमेला तुच पुष्पहार घालायचा आहेस...माझी सुद्धा वाट न पाहता....हा माझा अंतीम निर्णय.आहे...प्रभंजन मागे फिरला...रावसाहेब स्वतः जागेवरून उठून त्यास आलिंगन देते झाले.. मग दोघेही तात्यासाहेबांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यास आले...तात्यासाहेबांच्या चेहऱ्यावर त्यावेळी वेगळेच तेज चमकत असलेले दिसत होते...

**- नंदकुमार पंडित वडेर / सांगली**
**मो.- 9920978470**

# सेल्फी



कुठे ना कुठे जात रहातो फिरायला
मोह आवरत नाही आमच्या मनाला
मोबाईल काढून लगेच लागतो सेल्फी
काढायला.....।

रोज चालत्या गाडीवर
नदीच्या वाहत्या प्रवाहावर
निसर्गाच्यां सहवासावर
आगीच्या ज्वाळांनवर

एक दिवस असा नाही
आम्ही सोशल मिडिया पासून
राहू शकत नाही.
दिवसाची रात्र कधी होते हे
आम्हाला समजतं नाही.....।

भावाच्या वाढदिवसाला
मित्राच्या लग्नाला
दूर जायच्या प्रवासाला
भेट देत राहतो प्रत्येक ऋतूला....।

कुठे ना कुठे जातो फिरायला
सेल्फी आणतो धोक्याच्या
वळणाला जपुन रहा सेल्फीला.
मोकळा श्वास घेऊ द्या अनमोल
जीवाला.....।

- उमेश प्रकाश साळुंके / पिंपरी चिंचवड
मो.- 9657757619

# मैत्री, गुलामी की जहागिरी?



हा जिवाहून प्यारा रे तूच मला यारा
तुझ्यावरचे वार दोस्ता झेलीन मी
अरे हिम्मत कुणाची वार करण्याची
धडाकेबाज टक्कर देऊ आम्ही!!!!

तर माझ्या बालदोस्तांनो तुम्ही हे गाणं तर ऐकलं असशीलच धडाकेबाज सुप्रसिध्द चित्रपटातील हे गाणं आहे. ह्यात मैत्रिविषयी खूप सुंदर आणि मनाला भिडणारं अशी त्या गाण्याची मांडणी केलीय. सुप्रसिद्ध कवी ,लेखक माननीय प्रविण दवणे सर आणि माननीय कवी अनिल मोहिले ह्यांनी ही रचना तयार केलीय. मित्रांनो आपण आपल्या आयुष्यात नेहमीच एक खास जागा आपल्या मित्रांना देत असतो. मित्र हा आपल्या आयुष्यातील एक असा अविभाज्य भाग आहे जो असणं फार आवश्यक आहे. आवश्यक नाही असलाच पाहिजे. कारण मित्र ही गरज नाहीये तर मित्र हे एक अशी मागणी आहे की ती प्रत्येकाने केलीच पाहिजे एक हौस आहे जी प्रत्येकाने आपल्या आयुष्यात पुरवली पाहिजे. एक छंद आहे जो सगळ्यांनी जपला पाहिजे. एक मौल्यवान ऐवज एक किमती दागिना आहे जो सगळ्यांनी परिधान करून मोठ्या अभिमानाने मिरवला पाहिजे.

जसे आपल्यासाठी नातेवाईक आपले पालक आपले सगेसोयरे महत्वाचे असतात. अगदी तसेच मित्रही तितकेच महत्वाचे असतात. म्हणूनच माझ्या बालदोस्तांनो मैत्री करा आणि त्या मैत्रीचा प्रामाणिकपणे निभाव करा. मैत्री इतकी सुंदर आणि गोड भेट जगाच्या पाठीवर कुठेही जा पण सापडणार नाही. म्हणूनच आपल्याकडे जे मित्र आहेत त्यांना जपा. त्यांच्या ज्या ज्या चांगल्या सवयी तुम्हाला आवडतात त्या तुम्ही स्वतःहून अंगीकृत करा.

मैत्री इतकी सुंदर संकल्पना कोणतीच नसावी अस मला वाटतं. पण हा ह्या मैत्रीत आपण आपल्या काही बाबतीत मात्र बंदनाधिन होणं गरजेचे आहे. जस की आपला एखादा जिवलग मित्र कोणत्याही एखाद्या विशिष्ट कारणावरून जर वाईट वळणावर जात असेल तर आपलं कर्तव्य आहे की आपण त्याच्या भरकटलेल्या बुद्धीला योग्य मार्ग दाखवणे. जर तो चुकीच्या पद्धतीने वागत असेल तर त्याला समज घालून त्याला त्याच्या वागणुकीची जाणीव करून दिली पाहिजे. हे झालं तुमचं तुमच्या मैत्रीवरची “जहागिरी”!!!

समजा जर तो तुमच्या कामात अडथळा निर्माण करत असेल म्हणजे समजा तो ही योग्य मार्गाने जात नाही आणि तुम्हालाही जाऊ देत नाही तर आपण त्याच्याशी सरळ

रेषेत स्पष्टपणे आपले मत मांडले पाहिजे. म्हणजे जर तुम्हाला अभ्यास करायचा आहे आणि तो तुम्हाला म्हणतोय की आजच्या दिवस जाऊदे नाही केला अभ्यास तर कुठे काय होतं? चल आपण फिरून येऊ किंवा मोबाईल वर वेळ वाया घालवू. तर तुम्हाला तुमच मत स्पष्ट मांडता आलं पाहिजे जे योग्य आहे तेच केलं पाहिजे. मैत्रीला नेहमीच प्राधान्य दिले पाहिजे पण कधीही त्या मैत्रीच्या विलीन होता कामा नये. कारण जगात असा कुठलाच मित्र नाहीये जो आपल्या मित्राला चुकीच्या मार्गावर जाऊ देईन किंवा वाईट गोष्टींच्या सवयी लावेल. जर तुमच्या मित्रवर्गात असा कोणी आढळून आले तर तुम्ही त्यांच्याशी मैत्री ठेवा. त्यांना दुखावू नका पण जे योग्य आहे तेच करा.

संत कबीर ह्यांनी त्यांच्या दोहे मध्ये मित्राचे महत्व पटवून दिले आहे.

“दोषमुक्त हमको करे ,
देकर सच्चा ज्ञान ।
सबका जो आदर्श हो,
ऐसा मित्र महान।।

कबीर जी हे सांगतात की मित्र अशे असावे जे आपल्याला दोषमुक्त करतील म्हणजे आपल्यातील ज्या वाईट सवयी आहेत त्यांच्यापासून आपल्याला कायम दूर ठेवतील. आपल्याला योग्य ते मार्गदर्शन करतील. जे सगळ्यांचे आवडते असले पाहिजे त्यांचा सगळ्याना हेवा वाटावा सगळ्यांचे आदर्श असावे. अशे मित्र कधीही गमावू नका आणि स्वतः सुद्धा अस होण्याचा प्रयत्न करा. कारण जस आपण इतरांमध्ये चांगल्या सवयी चांगले गुण शोधत असतो . अगदी तसच इतरही आपल्याला सतत निरखून पाहत असतात. म्हणून स्वतःहा एक आदर्श निर्माण करा आणि इतर तर तुम्हाला पाहून सुजाण मित्र होतील.

“ मित्र एक दरवळणारा सुगधं जसा, जेव्हा पसरतो चैफेर
नात्यांच्या ह्या काळोख रातीत , मैत्रीचा उगवता भोर”

“जस मित्र जमले कैकदा, तश्या मैफिल आमच्या रंगल्या
बहाणा फक्त गाठभेटीचा, अवघा गुलजार तेथे अवतरला”

“ऐवज माझा मौल्यवान, जपु की करु परिधान
जेव्हा जेव्हा मित्र दिसे, मित्रात माझा लाखमोलाचा ऐवज भासे”

**- भाग्यश्री रुले हिरे / ठाणे**
**मो.- 8600156937**

# लळा जिव्हाळा



रेताळल्या बेधुंद काठाने
लावला लळा जिव्हाळा
उत्साही वातावरणी त्या
अनुभवला सुगंध निराळा

आभाळी स्पर्शतोय जणू
डोंगराचा हिरवा कळस
अथांग हा सागर किनारा
गिळतो देहातला आळस

शांत निवांत कातरसांज
अन् स्तिमित गंधित वारा
स्थिरावल्या मंद लाटांवर
छेडती विणेच्या मंद तारा

क्षितिजी मावळता रवी
पुरवी प्रसन्न संधी प्रकाश
चैतन्यानुभुती देवून हाती
दृष्टीआड जाई सावकाश

तरंगत्या लहरींनी शमते
असंख्य विचारांची वर्दळ
अलौकिक समाधानानेच
आनंदाची फुलते हिरवळ

नजरेत न मावणारे पाणी
लावीते ओढ तनामनाला
आंतरिक लयलूट हर्षाची
बनवी खास हर क्षणाला

विसावल्या सावल्यांतूनी
पाऊल हे मुळीच निघेना
कितीही पाहिला नजारा
काळजाची तृष्णा मिटेना

- मीता अशोक नानवटकर / सावनेर
मो.- 9823219083

# तार !



चाळीतल्या कॉमन गॅलरीत उभ असतांना, पोस्टमनचाच ड्रेस घालून पण सायकलवर स्वार होऊन, “तारवाला” चाळीत शिरतांना आम्हाला दिसला की, आम्ही मुलं तो कुठल्या खोलीत जातो याची लगेच फिल्डिंग लावायचो ! एवढंच करून आम्ही तेव्हाची वात्रट मुलं थांबायचो नाही, तर त्या खोलीपासून थोडं दूर उभं राहून, नंतर त्या ठराविक खोलीतून येणाऱ्या आवाजावरून, तारेतला मजकूर काय असावा याचा पण अंदाज बांधत असू !

पन्नास साठ वर्षांपूर्वी, दूर असलेल्या आपल्या लोकांची ख्याली खुशाली कळण्यासाठी, तेव्हा पोस्ट कार्डचा वापर होत असे आणि सविस्तर खुशाली किंवा दुसरं कुणी तो मजकूर वाचू नये यासाठी म्हणा, आंतरदेशीय पत्राची सुविधा होती आणि अर्जंट संदेश देण्यासाठी तार ! हा तारेचा अर्जंट संदेश साधारण दोन प्रकारात मोडणारा व त्रोटक शब्दात असायचा.

एक तर त्या तारेत कुठली तरी चांगली किंवा एखादी दुःखद घटना घडल्याची बातमी असायची ! त्यामुळे या तारवाल्याची चाळ भेट पोस्टमन सारखी रोजची नसायची. कधी सठीसामाशी हा चाळीत येणार, त्यामुळे तेव्हा त्याचे अप्रूप जास्त होते ! शिवाय हा तारवाला चाळीत कोणाच्या दारात उभा राहिला की त्या घरातल्या लोकांच्या मनातल्या तारा, आतील मजकूर समजेपर्यंत खूपच ताणलेल्या असायच्या ! कारण तार म्हटली की, ऐंशी टक्के वाईट बातमी असं जणू समीकरणच ठरून गेलं होतं ! आणि जर तार वाचून त्या घरातून रडण्याचा आवाज आला, की एखाद्या वाईट घटनेच्या बातमीच्या तारेवर शिक्कामोर्तब व्हायचं ! पण जर बातमी आनंदची असेल तर लगेचच शेजाऱ्या, पाजाऱ्यांच्या हातावर साखर ठेवून ती तारेतली गोड बातमी आनंदाने सांगितली जायची !

आपल्या रोजच्या जीवनात आपला संबंध कितीतरी दृश्य, अदृश्य तारांशी सतत येत असतो. यातील काही तारा तुटल्यावरच आपल्याला त्यांची महती कळते हा भाग निराळा ! उदाहरणंच द्यायची झाली तर, रेल्वेचा वीज प्रवाह वाहून नेणारी तार ! ती तुटली की होणारे प्रवाशांचे हाल आपण कधीतरी अनुभवले असतीलच ! मग त्या नंतर काही लोकांच्या डोक्याची तार सटकून, काही लोकांनी मनातल्या मनांत शिव्या शाप देत, तर काहीजणांनी हातात दगड घेवून, आपल्याला आलेल्या रागाची तार आणखी ताणलेली असायची. हीच गोष्ट कधी शहराला वीज पुरवठा करणाऱ्या तारेच्या बाबतीत झाली आणि घरातले दिवे विझून अंधार झाला की आपल्याला त्या तारेची महती पटते !

काही काही लोकांच्या नशिबात स्वतःचा आणि आपल्या कुटुंबाचा, तुटपुंजा का होईना पण उदरनिर्वाह करण्याच सामर्थ्य या तारेत असतं, असं मी तुम्हाला सांगितले तर, विश्वास बसेल तुमचा ? हे कितीही कटू असलं तरी सत्य आहे ! जरा रस्त्यावर आपल्या कुटुंबासह खेळ करणारा डोंबरी डोळ्यासमोर आणा, म्हणजे मी काय म्हणतोय हे तुमच्या लक्षात येईल ! दोन्ही टोकाला दोन-दोन बांबू बांधून त्यावर उंचावर ताणून बसवलेली तार, त्यावर कसरत करणारी त्याची बायको, किंवा लहान मुलगा किंवा मुलगी ! ते दृश्य पाहतांना कोणाही सहृदय माणसाच्या काळजाचा ठोका चुकल्या शिवाय रहात नाही ! त्या उंचावर ताणलेल्या तारेवर कसरत केल्याशिवाय, त्यांच्या पोटाची खळगी भरत नाही, हे ही तितकच खरं !

आपल्या भारतीय अभिजात संगीतात वेगवेगळी तंतूवाद्य वाजवणारे कितीतरी दिग्गज कलाकार होऊन गेले आणि कितीतरी तेवढ्याच ताकदीचे कलाकार अजूनही आपली या क्षेत्रातील कला सादर करून रसिकांच्या मनातील तारा छेडत असतात ! तंतू वाद्यांच्या तारा सुरात जुळवण ही अत्यंत अवघड गोष्ट ! अगदी साधासा वाटणारा गायकाच्या साथीचा तंबोरा म्हटला, तरी तो योग्य प्रकारे जुळल्याची खात्री स्वतः केल्याशिवाय, कोणताही गायक, गायिका आपल्या गायनाला सुरवात करत नाहीत, हे आपण अनुभवले असेलच. एवढंच कशाला, आपण अगदी एकतारीचा विचार केला, तरी गाणाऱ्या कलाकाराची पट्टी ओळखून त्याला साजेसा आवाज एकतारीतून येत नाही तिथवर तो वादक ती जरी एकतारी असली तरी, तिची तार कमी जास्त ताणून तिला जुळवण्याचा प्रयत्न करतो !

आता थोड्या अदृश्य तारा वाजवूया !

माझ्या मते यात, प्रथम क्रमांक (जरी स्वानुभव नसला तरी) लागतो तो दोन प्रेमी हृदयांच्या तारांचा ! याला बहुसंख्य सफल प्रेमिकांचा पाठिंबा असणार, याची मी माझ्याच मनाच्या तुणतुण्याची तार वाजवून तुम्हांला खात्री देतो ! कसं असतं ना, ती आणि तो, ज्यांनी एकमेकांना आयुष्यात पहिल्यांदाच बघितलेले असतं, असे ते दोन जीव एकमेकांसमोर येताच, त्यांच्या म्हणे हृदयाच्या तारा एकाच वेळेस छेडल्या जाऊन, त्यांना त्या क्षणापासून एकमेकांशिवाय जगणे मरणप्राय वाटायला लागते ! म्हणजे एकमेकांशी काही बोलायच्या आधीच त्यांची ही अवस्था होते ! जसं, अमूर्त प्रेम का काहीतरी असतं असं म्हणतात, तसं हे लव्ह ॲट फर्स्ट साईट असावे, असा माझा आपला एक समज आहे ! यावर ज्यांच्या हृदय तारा अशा प्रकारेच छेडल्या जाऊन, ज्याची परिणिती पुढे जाऊन (मानलं तर) विवाह नामक संसार संगीतात झाली असेल, तेच यावर जास्त प्रकाश टाकू शकतील ! उगाच या बाबतीतला मी बिनानुभवी माणूस, त्यावर माझ्या विचारांच्या नको त्या तारा कशाला छेडू ?

"अरे लक्ष कुठाय तुझं ? कुठल्या तारेत आहेस ?" असा प्रश्न विचारणाऱ्या माणसाला त्याने विचारलेल्या प्रश्नातल्या तारेचा कुठला अर्थ अभिप्रेत आहे, हे त्या


"तारेचे" जाणकार शौकीन (स्वतः त्या तारेत नसतील तर) लगेच ओळखतील, यात मला काडीमात्र शंका नाही !

कधी कधी सकाळची राहिलेली आमटी, खास करुन उन्हाळ्यात रात्रीच्या जेवणात पुन्हा आली तर, खराब होते आणि मग आपण आमटीला तार सुटल्ये असंच म्हणतो !

मंडळी, अशा अजून अनेक तारा आहेत की ज्या, मी लेख विस्तारभयास्तव वाजवू शकत नाही ! अर्थात या लेखात ज्या काही तारा वाजवायचा मी माझ्या परीने छोटासा प्रयत्न केलाय, त्यातून आपल्या ह्रदयातली एक जरी तार वाजली तरी मला या माझ्या तारा वाजवण्याचे समाधान नक्कीच मिळेल ! आता मी वर वाजवलेल्या तारा नीट वाजल्या की नाही, हे आपणच वरील लेख वाचल्यावर नक्की सांगाल, अशी मी माझ्या मनातल्या आशेची तार ताणून वाट बघतोय !

शेवटी, आपल्या ह्रदयातल्या तारा नेहमीच काही ना काही चांगल्या कारणांनी सतत झंकारत राहू देत, हीच माझी त्या दुनियेतल्या सर्वशक्तिमान संगीतकाराकडे प्रार्थना ! शुभं भवतु !

**– प्रमोद वामन वर्तक / ठाणे**
**मो.- 9892561086**



# बाबा



माजघरातल्या, गुलामीतल्या
शूद्र 'ती 'ला
जगण्याचा ,फुलण्याचा
उडण्याचा ,हक्कांचा
अधिकार तू फारच आम्हा हो बहाल
केलास...

आमच्या पहाटेचा तू
उगवता ' सूर्य ' झालास...

तुझ्या प्रयत्नांचा पळस
असा फुलला..
स्त्री सक्षमीकरणाच्या पायाने
कळस गाठला..

संविधानाच्या 'सर्वोच्चपदी'
स्त्री सन्मान बसला ...
तुझ्या 'धम्म 'पुढे .."मनुवाद" ही
लीन पावला ..
अन् स्वातंत्र्याचा मोकळा
श्वास "ती ' ला गवसला ..

अन् स्वातंत्र्याचा मोकळा
श्वास ' ती ' ला गवसला..



- डॉ. राजश्री राजगोंडा पाटील / खिद्रापूर
मो.- 8088211252
BAMS (आयुर्वेदाचार्य)

# आत्मविश्वास



स्वत:वर असणारा विश्वास म्हणजेच आत्मविश्वास होय व्यक्तीकडे आत्मविश्वास असेल तर कोणतीही गोष्ट साध्य करु शकतो प्रत्येक व्यक्तीचा आत्मविश्वास प्रत्येक परिस्थितीत बदलत असतो आत्मविश्वासामुळेच कोणत्याही आव्हानांना सामोरे जाण्यास मदत होत असते. मनात नकारात्मक विचार बाळगण्यापेक्षा हार न मानता प्रयत्न करत राहा. कठोर प्रयत्न करुन यशापर्यंत पोहोचण्याचे धैर्य आत्मविश्वासात असते. आयुष्यात आनंदी आणि यशस्वी होण्यासाठी स्वत:कडं असणारा विश्वास खूप महत्वाचा आहे. येणार्या परिस्थितीला सामोरे जात भूतकाळाचा विचार न करता वर्तमानात राहून भविष्यातील विचारांकडे लक्ष देत राहा. कारण स्वत:वर विश्वास असेल तर कोणतेही कठीण कार्य सहजपणे पार पाडून जीवन यशस्वी होते.

आत्मविश्वास ही अशी शक्ती आहे की स्वत:वर विश्वास असेल तर इच्छाशक्ती वाढून अशक्य वाटणारे कार्य साध्य करु शकतो. जसे मानवाला ऑक्सिजन आणि माशाला पाणी आवश्यक आहे. तसंच सकारात्मक विचार जोपासण्यासाठी आत्मविश्वास आवश्यक आहे. कारण शून्यातून विश्व निर्माण करताना व्यक्तीकडे असणार्या विश्वासू वृत्तीतूनच सर्व कार्ये पार पडत असतात. स्वत:वरचा विश्वास हा अमूल्य भूमिका पार पडत असतो. म्हनूनच "स्व"ची जाणीव झाली की असंभव गोष्टी संभव होतात. यशाच्या मार्गातील अडचणींचा सामना करण्याचे धैर्य हे आत्मविश्वासामुळेच येते.

रोज स्वत:शीच स्पर्धा असावी. स्वत:ची तुलना स्वत:शी करावी. आपण काल काय केलयं? आज काय करतोय? आणि उद्या काय करणार? यावरच आपलं यश-अपयश अवलंबून असणार. आलेल्या अपयशाला परिस्थिती किंवा इतरांना दोष न देता आलेल्या अपयशाचे कारण शोधण्याचा प्रयत्न करुन त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न करा. कारण एक गरीब व्यक्ती श्रीमंत बनू शकतो. नकारात्मक विचार करणार्या व्यक्ती सकारात्मक विचार बाळगत असतील तर स्वत:मधला आत्मविश्वास का वाढवू शकत नाही.

स्वत:ला स्वत:च्या नजरेत सर्वश्रेष्ठ बनवायचे असेल ते स्वत:ला समजून घेणे गरजेचे आहे. आपण काय काय करु शकतो? हे जेव्हा समजेल तेव्हा आत्मविश्वास वाढून जीवन जगणे सोपे होईल. आजचा दिवस कालच्या पेक्षा सुंदर होता. आणि उद्याचा दिवस आजच्या पेक्षा सुंदर असेल असा विचार करुन नकारात्मक विचारांना बाजूला सारुन सकारात्मक विचार जोपासा. तेव्हाच आत्मविश्वास वाढेल व तुम्ही स्वत:ला कधीच कमी समजणार नाही. आपण सर्व काही करु शकतो. मनात एखादी

गोष्ट ठरवली की ती आत्मविश्वास व करण्याची इच्छा असेल तर तुम्ही ते पूर्ण करणारचं. एवढं सामर्थ्य यामध्ये असतं. न घाबरता न थकता जिद्दीनं जिंकण्याचा प्रयत्न करा. जिंकला नाहीत तर अनुभव तरी नक्कीच मिळेल. शेवटी अनूभवातूनच माणूस शिकत असतो.

एकदा एका व्यक्तीला उद्योगात खूप मोठा तोटा होतो. श्रीमंतीवरून तो खूप गरिबी अवस्थेमध्ये येतो. धंद्यात तोटा झाल्यामुळे तो हताश झालेला असतो. पुढे काय करावे त्याला काहीच सुचत नव्हते. असचं एके दिवशी समोर त्याला एक छोटी मुलगी दोरीवर नाच करताना दिसते. ते पाहण्यासाठी रस्त्यामध्ये खूप गर्दी झाली होती. ती चिमुकली मुलगी स्वत:च व कुटूंबाचं पोट भरण्यासाठी दोरीवर नाच करतीय. खूपदा ती खाली पडत असे. पुन्हा त्या दोरीवर चढून नाचून सगळ्यांचे मनोरंजन करीत असे. जेव्हा त्या व्यक्तीने त्या मुलीचे आकलन केले असता तिच्याकडे पाहून तिच्या मनात असणारा स्वत:वरचा विश्वास जिद्द चिकाटी त्या व्यक्तीला त्याचे नुकसान काहीच वाटत नाही. जर कोणी दोन वेळच्या भाकरीसाठी एवढा संघर्ष करीत असेल तर, आपण पण सगळं संपलय म्हणण्यापेक्षा शून्यातून विश्व निर्माण करु शकतोच. असे त्याला वाटले. त्या व्यक्तीने हार न मानता पुन्हा आहे तिथून सुरूवात करण्याचे ठरवले.

स्वत:वर असणारा विश्वास, जिद्द, चिकाटी व कष्ट करण्याची हिम्मत असेल तर अशक्य वाटणार्या गोष्टी शक्य होतात.

म्हणूनच मी काही करु शकत नाही. म्हणण्यापेक्षा मी अजून काय करु शकतोय? यावर लक्ष केंद्रित करुन आत्मविश्वास वाढवा. यशस्वी जीवन जगण्यासाठी आत्मविश्वास असणे आवश्यक आहे. स्वत:च्या डोळ्यांनी पाहिलेले आणि कानांनी ऐकलेली उदाहरणे समोर ठेवून आत्मविश्वासाने प्रगती करत राहा. जे होईल त्यातून शिकण्यासारखे खूप काही असेल. आयुष्यात कोणतेही प्रसंग घडो खचून न जाता दु:खी न होता मागील घडलेल्या गोष्टींचा अतिविचार न करता आत्मविश्वासाने चेहर्यावर हास्य ठेवा.

**- सौ. श्रावणी पवार / विटा**
**मो.- 7498798831**

# आई



तीन्ही लोकाची जननी
अस्तित्व तीचे विशाल ,
सतत पेटत राहते
होऊन क्रांतीची मशाल .

आईच आद्य गुरु
कष्टते दिन-रात ,
घडविण्या लेकरास
होते दिव्याची वात .

सावली वटवृक्षाची
वात्सल्याचा झरा .
कुटूंबाचा आधारस्तंभ
गोडवा हाताचा न्यारा .

आई ढाल रक्षेची
अमृताचा प्याला ,
स्वत: वर झेलून वार
रक्षिते सर्व जगाला .

क्षितिजापार
पदर तीचा
न्याय सत्याची
मूर्ती,
जगावेगळी आईची माया
वर्णावी किती महती .

मन मंदीरातील देव
चरणात असे स्वर्ग ,
आईच दाखवते उत्तम




- डॉ. मंदा भगवान पडवेकर / चंद्रपूर
मो.- ९८३४८९५२३८

# माणूसकी एक चिंतन !



"माणूसकीच्या जलाशयात डुंबून घ्या, मनसोक्त विहार करा त्याच्यासारखा आनंद नाही". कॉलनीतल्या फलकावर लिहलेला सुविचार वाचला, दररोज फेरफटका मारताना आजचा सुविचार काय? वाचनाचे एक व्यसनच जडले होते. कॉलनीतले काही युवक दररोज एक सुविचार फलकावर लिहीत असत. शक्यतो दररोज मी हे फेरफटका मारताना सुविचार वाचत असे. सुविचाराने मन कसे उत्साही आनंदी होत असे. एकेदीवशी घरी येऊन आवराआवर चाललेली होती एवढ्यात, अकरा वाजता विद्यालयातील चिमुकल्यांची प्रार्थना माइकवर ऐकू आली- *"हीच आमची प्रार्थना अन हेच आमचे मागणे, माणसाने माणसाशी माणसासम वागणे"* किती अर्थपूर्ण अशी ही प्रार्थना निष्पाप निरागस मुले गाताना परमेश्वराला आळवत होती, कदाचित परमेश्वर त्यांचे हे मागणे अगदी मनापासून ऐकतोय व चिमुकल्यांना आश्वासन देतोय असे वाटले.

घरातली सर्व कामे आटोपल्यावर दुपारच्यावेळी थोडासा मोबाईल करमणूक म्हणून त्यातील व्हिडिओ पाहण्याचा एक छंद, असाच एक व्हिडिओ पाहण्यात आला- यामध्ये एका घरातील एक विचित्र प्रसंग ! एका महिलेचा मृतदेह सोप्या मध्ये ठेवलेला आहे व काही नातेवाईक त्या महिलेचे कोर्टस्टॅम्प पेपरवर भराभर असे डाव्या हाताचे (अंगठ्याचे) ठसे उठवून घेत आहेत, यात काही महिलाही होत्या यातील एकजण चक्क पहारा देत दरवाज्याजवळ उभा होता, नक्की काय चाललंय कळत नव्हतं, कदाचित त्या महिलेचा मृत्यू झाला असावा आणि तिच्या मालमत्तेसाठी असला उपद्व्याप सुरु असावा असे वाटले. ठसे घेणाऱ्यामध्ये जवळचे नातेवाईक होते की दूरचे, काही समजत नव्हते, दरवाज्यावर पहारा का सुरु होता पहारा देणारा माणूस कोण असावा काही समजत नव्हते.

शाळेतील मुलांची प्रार्थना आणि हा प्रसंग किती विरोधाभास विचार चक्र सुरु झाले मन बेचैन झाले, दोन्ही प्रसंगांची तुलना करता करता मन अस्वस्थ झाले हे मात्र खरे.

अजून असाच एक प्रसंग रात्रीच्या वेळी प्रवास करणारे एक जोडपे, दोन जराशी मोठी मुले, एक तान्ह बाळ, नवरा आणि धीर असे कुटुंब चारचाकी गाडीतून प्रवास करत होते. मुलांना तहान लागली म्हणून गाडी रस्त्याच्या कडेला उभी करून पाणी आणण्यासाठी दीर व नवरा दोघे गेले एवढ्यात एक वीस बावीस वर्षाचा अनोळखी युवक गाडीत चढला व गाडीचा ताबा घेऊन गाडी जोरजोराने पळवू लागला. महिला

घाबरली कोण आहेस तू ? तू काय करतोय? खाली उतर! असे म्हणत ती ओरडू लागली तरी पण तिने धाडस दाखवून आणि ती ड्रायव्हर शेजारच्या सीटवर बसलेली असल्याने तिने तान्ह्या बाळाला सावरत दुसऱ्या हाताने स्टेरिंग आवळून धरले व एक पाय ब्रेकवर दाबला. पाठीमागे बसलेली मुले घाबरली रडू लागली, ओरडू लागली असा थरारक प्रसंग पाच ते सात मिनिटे सुरू होता शेवटी त्या महिलेचा विरोध पाहून त्या युवकाने गाडीतून धूम ठोकली हा प्रसंग माणुसकीला कलंक लावणाराच म्हणावा लागेल. बहिणीच्या वयाची असणारी महिला, दोन लहान मुले सर्वांच्या असहायतेचा फायदा घेऊन त्यांना लुबाडण्याचा त्या युवकाचा प्रयत्न होता, पण त्या महिलेने दाखवलेल्या धाडसाने तो प्रसंग टळला.

दोन्हीही प्रसंग आणि मुलांची प्रार्थना खूपच विरोधाभास होता माणसातली माणुसकी हळूहळू कमी झाल्याचे जाणवत होते असे प्रसंग पाहिल्यास माणुसकीवरचा विश्वासच उडायला वेळ लागणार नाही.

माणूसकीची जपणूक करणारी अनेक उदाहरणे समाजात घडत असतात, घडतात पण असे एखादे दुसरे उदाहरण जरी घडले तरी मन बेचैन होते,विचार चक्र गतिमान होते, पण मला तर वाटते, असे एखादेजरी घडणारे उदाहरण थांबले तर किती छान निर्माण होईल आपला समाज आणि माणुसकीवरचा विश्वास तर दृढ होईलच होईल.

**- सुमन जाधव / किर्लोस्करवाडी**
**मो.- ९९७०३३३२३६**



# मात



माझीच पात होती माझीच बात होती ...
अन् घाव घालणारी माझीच जात होती!

पाठीत वार केला बेसावधास त्यांनी...
डोळ्यात जागलो ती काळीच रात होती!

काळोख सांजवाती शोधीत आयु गेले...
हाती निखारलेली फानूस वात होती!

ज्यांना दिला सहारा त्यांनीच घात केला...
अन् रक्त लागलेली माझीच कात होती!

सारे खुशीत होते मोजीत चांदतारे...
तोर्‍या मध्येच त्यांची सारी जमात होती!

केला विचार जेव्हा सारे कळून आले...
विश्वास घातक्यांची तीही वरात होती!

केला हिशेब मीही हारुन जिंकण्याचा...
माझ्या वरीच तेव्हा माझीच मात होती!

- मोहन सोनवणे / धुळे
मो.- 9423287835

# रक्षाबंधन..



बहीण ,दिदी, आक्का ,ताई अशी तिची वेगवेगळी नावे..आणी वेगवेगळी रुपे पण ....

खरं तर या जगात आईनंतर आपल्यावर सर्वात जास्त प्रेम करणारी जर कोण असेल ना तर ती म्हणजे आपली बहीण. कारण ज्या स्वर्गात आपण ९ महिने ९ दिवस राहीलेलो असतो ना!!!!

तिथे

ती पण राहीलेली असते.त्यामुळे कदाचित आतड्यापासुन चे

जे प्रेम म्हणतात,

ते मला वाटतं हेच असावं. खुप निस्वार्थी प्रेम ओ!!!

कुठल्याही अपेक्षेविना.....

लहानपणी आई मुलांना पदराखाली घेते.त्या पदराखाली आईच्या माये बरोबर बहीणीच्या प्रेमाची ऊब असतेच.

आणि खरंच आहे ,बहिणी असतातच तशा.

आपली सतत काळजी घेणारी घरात एखादी बहीण असेल,

मग ती लहान असो किंवा मोठी असो आईची सगळी जबाबदारी ती पार पाडते.

वयात येण्याअगोदर प्रौढ होते बिचारी.

मला पण एक बहीण आहे. मला शिकवण्याच्या नादात स्वतः शिकली नाही. मी जेव्हा जेव्हा माझ्या बहिणीला बघतो तिच्यात मला माझी आईचं दिसते .मी तर म्हणतो माझं पण आयुष्य माझ्या बहिणीला मिळुदे......

अशाच बहीण भावाच्या नात्याची पुढील कथा मनाला स्पर्श करते.......

चार पाच दिवसांपासून पांडबा अस्वस्थ होता.त्याचं कशातच चित्तं लागत नव्हतं. एका ठिकाणी बसला म्हणजे तास तासभर हलत नव्हता.

काय विचारल्याशिवाय बोलत नव्हता ,आणि बोलला तर फक्त व्हय आणि न्हाय .

एवढेच उत्तर द्यायचा. आपल्या नवऱ्याचं हे वागणं रखमाच्या नजरेतून सुटलं नाही .आपल्या नवऱ्याच्या डोक्यात काहीतरी चालू आहे असं तिला वाटु लागलं.

मग एक दिवस संध्याकाळी जेवताना तिनं विषय काढलाच

“काय वं ,

एक ईचारु का ?”

“हं ईचार” पांडबा वर न बघताच बोलला.

“न्हवं ,चार पाच दिसापसनं काय व्हायलंय तुम्हास्नी ? कशातच ध्यान नाही तुमचं

?"

पांडबा गप्पंच.

काय बोलायला तयारच होईना.

पण रखमा काय पाठ सोडंना .

त्याचा नाईलाज झाला.

मग त्यांनं मनातला विचार बोलून दाखवला,

" अगं, पुढच्या आठवड्यात रक्षाबंधन हाय, ताईनीला काहीतरी घ्यायला पाहिजे ???"

पांडबा असं म्हणताच रखमा

जेवायची थांबलीच....

तोंडातला घास घशाखाली उतरेनाच.

तोंडातल्या तोंडात फिरत राहीला.

कारण विषयचं तसा गंभीर होता.

ताईनी म्हणजे रखमाची नणंद .

पांडबाची एकुलती एक सख्खी बहीण.

रखमाला तिने कधी भावजय मानलंच नाही.

सख्ख्या बहिणी वाणी जीव लावला. रखमाला कधी परकं समजलंच नाही.

लय गुणाची ताईनी.

पांडबावर तर जीवन ओवाळून टाकायची.

गेल्या वर्षी तिचा नवरा वारला.

तेव्हापासून थकली बिचारी.... आर्थिक परिस्थिती पण कोलमडून गेली.

घर बांधायचं पण अर्धच राहीलं. यावर्षी रक्षाबंधन ला तिला काहीतरी भरीव मदत करावी असं पांडबानं योजलं होतं.

त्यात,

सहा महिन्यापूर्वी पांडबाची आई पण वारली होती. त्यामुळे आईविना तिचं पहीलंचं रक्षाबंधन....

या रक्षाबंधनला आपण ताईनीला काहीतरी घ्यायचं असा विचार पांडबाच्या मनात सतत येत होता.

पण पांडबाची परिस्थिती तर कुठे चांगली होती?.

वीस गुंठे जमीन .

त्यात कसाबसा त्याचा संसार चालला होता .

पोटाला दोन लेकर ,

त्यात पाऊस पाणी वेळेत नाही. सावकाराची कर्ज अगोदरच होती तीच फिटत नव्हती आणि आता तर हा रक्षाबंधनचा सण त्यामुळे पांडबा आणि रखमा दोघेही

विचारात पडले.

पण आज आई असती तर गप बसली नसती,

असा विचार पांडबाच्या मनात आला आणि तो तडक उठला आणि गावातल्या सावकाराच्या कडे गेला.

“अरे पांडबा तुझी अजून अगोदरची कर्ज फिटली नाहीत आणि आता कुठलं पैसे देऊ ?नाही बाबा ?

माझ्या कडं काही नाही”

सावकारांनं सांगुन टाकलं.

पांडबा निराश होऊन परतला.

त्या दिवशी संध्याकाळी चुल पेटलीच नाही.

कारण दोघांचही कशातच लक्ष लागेना. रात्रीच्या अंधारात तर पांडबाची गरीबी अधीकच गडद होत होती....

दुसऱ्या दिवशी पांडबा सकाळी लवकर उठला.

एक वेगळ्याच विचारानं त्याच्या हालचाली गतीमान होत होत्या.

”रखमा”

तो बायकोला म्हणाला,

“आता आपल्याला एकच मार्ग हाय”

गोठ्याकडे जात तो म्हणाला,

“बैल विकुया!!!!”

“काय???.आवं ....पण ......?

रखमाला काय बोलावं कळंना.

कारण त्यांच्याकडे पण एकच बैल होता. एका बाजूला बैल आणी दुसर्या बाजुला पांडबा असं करुन ज्यु ओढायचे .

रानातली नांगरणि , कोळपणी अशी कामं चालु असायची ,त्या एका बैलावरच.....

त्या एका बैलावरच

त्यांचं पोटपाणी चालु होतं.

आता तो बैलंच विकायचा म्हणजे

यावर्षीची रानातली काम होणार नाहीत.

रखमाला वर्षभराची उपासमार डोळ्यांसमोर दिसु लागली.

पण त्यापेक्षा मोठं होतं रक्षाबंधन.

पण त्यापेक्षा मोठं होतं ताईनीचं प्रेम.

बैल विकुन ताईनीला साडी-चोळी , मुलांना कपडे घेऊन

एक वीस-पंचवीस

हजार घर बांधण्यासाठी देता येईल. या विचाराने पांडबा सुखावला. ..

बिचारी स्वतः च्या घरात तर राहील सुखानं.......

बहीणीच्या प्रेमापुढे वर्षभराची

उपासमार फिकी पडली.

रक्षाबंधन च्या दिवशी पांडबा

खुषीत होता. ताईनी ला साडी चोळी ,मुलांना कपडे व एका कापडी पिशवीत पैसे घेऊन तो बहीणीकडे गेला.

या पैशातून बहीणीचं घर पुर्ण होणार होतं, बहीणीला हक्काच्या घरात राहायला मिळणार

त्या विचारानं तो खुपचं आनंदात होता.

ओवाळणी झाल्यावर पांडबा ओवाळणी देणार तोच ,

ताईनी म्हणाली ,

“दादा , रक्षाबंधन हा बहीण- भावाच्या नात्याचा उत्सव असतो.

प्रत्येक वेळी भावानंच बहीणीला ओवाळणी दिली पाहिजे असं काही नाही .आज मी माझ्या लाडक्या दादासाठी रक्षाबंधन-भेट आणली आहे नाही म्हणं नगुस.”

असं म्हणुन तिनं बाहेर नेलं

पांडबाला काय सुचेना.

बाहेर जाताचं तिनं त्याला हातात कासरा दिला आणि म्हणाली,

“कीती दिवस झालं ,

तु एकाच बैलांनं शेतातली कामं करतोस.मला हे बघवलं नाही बाबा .!!! भावाला बैलावानी राबायला लावुन मला या घरात सुख मिळणार नाही . म्हणून तुला न विचारताच मी हे घर विकलं आणखी तुझ्यासाठी हा दुसरा बैल आणलाय . नाही म्हणं नगंस.!!!!”

पांडबा मटकन खाली बसला आणि कापडी पिशवीकडे पाहीले. कधी नव्हे ते त्याला त्या पैशाचा तिरस्कार वाटु लागला.

**- सचिन कोरोचीकर**
**मो.- 9850335133**

# चेहरा तुझा



जातो कुठे डोळ्या समोरुन चेहरा तुझा
काळजात बागडत असतो चेहरा तुझा

टाळू नकोस मला खोटीच कारणे देऊन
आठवातही  कासावीस करतो चेहरा तुझा



तू लाख लपवून ठेव गूज तुझ्या अंतरीचे
मनकवडा आहे वाचून घेतो चेहरा तुझा

बेनाम होतो मी ही या दुनियेच्या नजरेत
ठरला जगास ओळख माझी चेहरा तुझा

काळाजात आहेस म्हणून जपतो काळजीने
या श्वासांना आधार आहे चेहरा तुझा

- जयराम सिताराम मोरे / सोनगीर
मो.- 7709565957

# आयुष्य सुंदर आहे



आजच्या घडीला आपण घडयाळाच्या काट्यावर पळतोय. जीवनाच्या शर्यतीत धावता धावता क्षण जगायचंच विसरतो आपण सगळे. लोक काय म्हणतील याचा विचार करताना आपल्याला काय हवयं हेच विसरतो आपण. भौतिक गोष्टींच्या इतके मागे लागतो आपण की दुसरीकडे पाहायला वेळ ही मिळत नाही.

आणि आयुष्याच्या शेवटी म्हणतो जगायचं राहूनच गेलं. आयुष्य म्हणजे नेमकं काय? आत्ताचा क्षण भरभरुन जगणं, हेच खर आयुष्य आणि तेच खरं जगणं.

आयुष्याकडून काहीच अपेक्षा नसावी . जे जगता येईल, तेवढं तणावमुक्त असावं. कोणताच ताण नसावा. अगदी बेफिकीर होऊन जगता यावं. प्रत्येक क्षण अगदी भरभरुन जगावा.

सकाळचा सूर्योदय,भगव्या रंगात रंगलेला सूर्यास्त, पारिजातकाचा नाजूकपणा, जास्वंदीची निजलेली कळी, फुलपाखराची मखमल, गवताच्या पात्यावरचं चमचमतं दवबिंदू, भेगाळल्या जमिनीतून उगवलेला पोपटी कोंब, आकाशातल्या निळाई सोबत नदीचं खळखळणं, लुकलुकणारा व्याधाचा तारा, चित्रविचित्र पांढरे ढग, अचानक दिसणारा तुटता तारा, कोकिळेचं कुहूकुहू आणि पावसाची पहिली सर,मोगऱ्याचा सुगंध, देवापुढचा नंदादीप, डोळे मिटून ऐकलेली समुद्राची गाज, पिवळ्या प्रकाशात सुस्त पडलेल्या रस्त्यावरुन वेगात झामझुम करत केलेला प्रवास, जेवून आईच्या पदराला पुसलेला हात, आजीने कोणाला सांगू नकोस म्हणून हातात कोंबलेले पैसे, दारात पाऊल ठेवताक्षणी आपल्या पायात येणाऱ्या कुत्र्याचे लुकलकणारे डोळे.

हेच तर ते क्षण असतात. याहून का वेगळं असत आयुष्य. याच क्षणांना घेवून तर पुढे जायच असत. या क्षणांवर फक्त आपला हक्क असतो.

**- समीक्षा मीनाक्षी विश्वास चव्हाण / जुन्नर**
**मो.- 8983309608**

# दिवाळी करावी साजरी



दिवाळी करावी साजरी
सर्वांच्या मनाचा हेत
कबाळ कष्ट मेहनत
पै पै काटकसरी जमा करत

श्रीमंत मोठ्या लोकांची
होते खरि साजरी दिवाळी नीटनेटकी का वाकडी
तिकडे देवाला अर्पण झोपडी



देवी कुठे अवतरणार
रंग रांगोळी अंगणात
मनाची सफाई सदा
ज्याची ज्याची होतं

नियमाने भक्ती अचा
पूजनात आवाहन
मिष्ठांना चे जेवण काही
ना घ्यावे सांगून

देईल ते नशीब
कर्म ते प्रारब्ध
पूजन करा मनोभावे
हात जोडूनी स्तब्ध.

- राजेश लक्ष्मण वऱ्हाडे / कसुरा
मो.- 9921125239

# यशाबद्दल...



यश म्हणजे नुसते जिंकणे नोव्हे त्या यशाचा उचित आनंद घेणे होय. यशस्वी होणे ही अनपेक्षितता किंवा निव्वळ योगायोग नव्हे, मनाची निश्चितता व त्या अनुशंगाने केलेले प्रयत्न व प्रयत्नांची पराकाष्ठा होय. निश्चित व उचित मार्गाने साध्यकृतीकडे होणारी वाटचाल म्हणजे यश. एखाद्या यशामागे अनैक प्रयत्न व त्या प्रयत्नातली अनैक अपयश असतात . लोकांना प्रकाश देण्यासाठी एडिसनने विजेच्या बल्बचा शोध लावला. त्यांना त्यात यश मिळवण्यासाठी हजारो वेळेस प्रयोग करावे लागले. अनैक अपयश त्यांना सहन करावे लागले. शेवटी प्रयत्नांचे प्रकाशमय यश त्यांना मिळाले. यश हे नक्कीच अनैक अपशातून मिळालेले फलित असते. एखादाच माणूस असा असतो की नियमित त्याच त्या चुका करत यशप्रत जावून पोहोचतो. काही लोक पहिल्याच प्रयत्नात थकून जातात. निरुत्साह होतात. मग अपयश त्यांच्या मागे मागे येत असते.

अमेरिकेचे तिसरे राष्ट्राध्यक्ष थॉमस जाफर्सन यांनी यशाबद्दल म्हणतात,

“अपयशानंतर अपयशाचा सामना करत तेवढ्याच उत्साहाने नियमित वाटचाल करत राहणं हाच यशप्राप्तीचा सरळ मार्ग असतो.

जगातील सर्वच सर्वच यशोगाथा ह्या करुण कथा व व्यथा आहेत. यशस्वी माणसं ही प्रत्येक अपयशानंतर अगीतून फिनिक्स पक्षासाठी भरारी घेतात.

वयाच्या सदुष्टाव्यावर्षी एडिसन यांचा कारखाना जळून खाक झाला. लक्षावधी रुपयांचे नुकसान झाले. त्या वेळेस एडिसन उद्गारतात , “सर्वच चुका जळून खाक होतात म्हणून विनाश ही मौल्यवान असतो.” असा विनाश घडल्यानंतर अवघ्या विस दिवसातच वृध्द एडिसनने फोनोग्राफचा शोध लावला.

स्टीव्ह जॉब्स आईवडीलांचे पैसे वाचवण्यासाठी कॉलेजमधून बाहेर पडतो. रोज कोकच्या रिकाम्या बाटल्या देऊन तो ५ सेंट्स जमा करत त्यातून जेवणाची तजवीज असतो. तो प्रत्येक रविवारी ‘हरे राम हरे कृष्ण मंदिरात सात मैल चालत जात असत. तेथे ते व्यवस्थित जेवण करत असायचे . सुरुवातीच्या जीवनात ह्या सर्व संकटाचा सामना करत स्टीव्ह जॉब्स यांनी एका गॅरेजमध्ये ॲपल कंपनीची सुरुवात केली.

प्रयत्न आणि संकटाचा सामना करत यश संपादन करत त्यांनी त्यांच्या कंपनीस यशोशिखरावर नेऊन पोहचवले.

स्टीव्ह जॉब्स एक अचाट व सामर्थ्यवान माणूस, आज जरी तो आपल्यात नसेल तरी त्यांचे यशस्वी विचार जिवंत आहेत.

# स्टीव्ह जॉब्स यांचे यशस्वी विचार :

°इतरांच्या मतांच्या आवाजामध्ये तुमचा आतला आवाज दबू देऊ नका.

°तुमच्याकडे वेळ फार कमी आहे. तो पुरेपूर सत्कारणी लावा.

°दुसऱ्याचे आयुष्य जगणे सोडा.

°आजचा दिवस माझा जीवनाचा शेवटचा दिवस असेल असं म्हणून दिवसाची सुरुवात करा.

°अतिशय उत्कंटता असणारेच  लोक जगाला बदलून आणखी चांगले बनवण्याचा प्रयत्न करतात .

°शिकण्याची भूख नियमित बाळगा. काही तरी करण्यासाठी वेडाने झपाटून जा व धडपड करा.

°कधी कधी आयुष्य तुमच्या डोक्यावर जोरदार प्रहार करेल व अपयश घेऊन येईल तरीही, स्वतः वरचा विश्वास ढळू देऊ नका.

°आपण आज काही अदभुत केलं आहे का ही जाणीवच यशस्वी होण्यासाठी रोज खूप महत्त्वाची असते .

°नवीन शोधच एक लीडर आणि एक अनुयायी या मध्ये अंतर दाखवते.

°पैसासाठी काही करु नका जे मनाला पठते ते करा .

°मनात एक एखादे ध्येय निश्चित करा व त्याविषयीची कल्पना ठरवा.  तुमचं सारं आयुष्य त्या कल्पनेच्या पूर्ततेसाठी झोकून द्या. मनात फक्त तिचाच विचार आणत राहा. स्वप्नी, ध्यानी व मनी तेच ते  दिसू द्या . तुमच्या जीवनाच्या प्रत्येक क्षणात तेच ध्येय असू द्या . साऱ्याचा विचारही सोडून द्या. यशाचा हाच खरा धोपट मार्ग आहे.



यशस्वीते विषयी कांही विचारवंतांचे विचार :-

१)दलाई लामा:

कधीच चुका न करणं म्हणजे यश नाही; तर एकच चूक दुसऱ्यांदा न करणं ही गोष्टच तुम्हाला यशप्राप्तीकडे घेऊन जात असते.

२)स्वामी विवेकानंद:

जर यशस्वी व्हायचं असेल तर तुमची यशासाठीची तळमळ अपयशाच्या भीतीपेक्षा कित्येक पटीनं जास्त हवी.

३) रॉबर्ट एफ. केनेडी:

यश संपादन करताना काय काय गोष्टी तुम्ही गमावून बसलात? कोणत्या कोणत्या गोष्टी तुम्हाला सोडून द्याव्या लागल्या. याचा विचार नेहमी करा आणि त्यावरच यशाचं मोजमाप करा.

४)बिल कॉस्बी:

ज्यांच्यात प्रचंड अपयश पचवण्याची धमक असते त्यांनाच भव्यदिव्य यश संपादन करता येते.

५) जॉर्ज बर्नार्ड शॉ:

अपयश छे! मी कधीच अपयशी ठरत नाही. माझ्या अवतीभवतीचे लोक माझ्यापेक्षा जरा जास्ती यशस्वी ठरतात, इतकंच.. !

६) कॅरोल ब्रायन:

आयुष्यात दोन गोष्टी महत्त्वाच्या! एक म्हणजे दुर्लक्ष करायला शिकणं.
दुसरी आत्मविश्वास बाळगणं.
एवढं जमलं की  यश निश्चित मागे मागे धावत येते.

७) डेव्हिड ब्रिन्कले:

यश हा एक प्रवास आहे. ते केवळ अंतिम ठिकाण किंवा साध्य नव्हे.

८) बुकर टी:

जर योग्य मानसिक दृष्टिकोन असेल तर अंतिम साध्य गाठण्यास, यशस्वी होण्यास माणसाला कोणीही अडवूच शकणार नाही.

तो यश मिळवणारच. पण मानसिक दृष्टिकोनच जर चुकीचा असेल तर त्याला कोणी यश मिळवूनही देऊ शकणार नाही हे सत्य आहे.

९) महात्मा गांधी:

अपार कष्ट आपल्या कामाप्रती अविचल निष्ठा आणि आपण जिंकू किंवा अपयशी ठरू याची तमा न बाळगता आपल्या कामात १०० टक्के झोकून देण्याचा, पूर्ण शक्ती लावून ते काम करण्याचा निश्चय या गोष्टीतूनच यश साकारत जातं.

यशस्वी व्यक्ती आणि इतरांच्यातला फरक काय? इतरांकडे क्षमता नसतात, ताकद नसते किंवा ज्ञान नसते असं नाही. पण यशस्वी व्यक्तींमध्ये जी आंतरिक तळमळ

आणि इच्छा असते. त्या पेक्षा कमी इतरांमध्ये असते.

१०) विन्सेट लोम्बार्डी:(विन्सी)

नम्रता अंगी असावी. जे काम तुमच्यावर सोपविण्यात आले , ते पार पाडण्याची मानसिक तयारी असावी. उत्साही व व्यवस्थित राहावं. कधीही कुणाबद्दल द्वेषभावना नसावी. नेहमी प्रामाणिक राहावं. तरच तुम्ही इतरांशी प्रामाणिकपणे वागू शकाल. इतरांच्या मदतीला तत्पर राहा. स्वतच्या कामात रस घ्या. कधी स्वतला इतरांच्या नजरेत दयनीय बनवू नका. इतरांची स्तुती करण्यात तत्परता दाखवा. मत्रीत निष्ठा असू द्या. पूर्वग्रह झटकून टाका, स्वतंत्र वृत्ती अंगी बाणवा..

११)बर्नार्ड बॅरूच:

समाजाला हितकारक ठरतील अशा कृती करणं आणि त्या प्रक्रियेचा आनंद घेणं म्हणजे यश.. ! यावर तुमचा विश्वास असेल, अन् ही व्याख्या तुम्ही मनापासून स्वीकारत असाल, तर 'यश' तुमचंच आहे.

१२)स्टीव्ह जॉब्स यांचे शेवटचे वाक्य :

माणसास जेव्हा वाटायला लागतं की, मी भविष्यासाठी खुप कमाई केलेली आहे.

तेव्हा तो स्वतासाठी जगायला सुरुवात केली पाहिजे.

आपले जुनी स्वप्न पूर्ण केली पाहिजेत. सुटून गेलेल्या इच्छा अकांक्षा यात रमले पाहिजे.

आठवणीच खुप श्रीमंत असतात त्या आपण सोबत घेऊन जात असतो. श्रीमंती व पैसा आपण कदापि सोबत घेऊन जाऊ शकत नाही.

यश हे इच्छा शक्तीचा खेळ आहे. भिती आणि भय यापासून दूर जाता येत असेल तर आपणास निश्चितच यशापर्यंत पोहचता येईल.

यश म्हणजे निव्वळ पैसा कमावणे नव्हे तर आपल्या इच्छांचाही आदर करणे होय.

यश हे तळमळ, जिद्द, चिकाटी व प्रयत्नांचे फलित आहेत. तेच जीवनात यशस्वी होण्यासाठीची खरी गुपितं आहेत.

**- प्रा. व्यंकटेश सोळंके / नांदेड**
**मो.- ९९२२६५४७३२**

# ॥ वाळवी ॥



जगावं की मरावं
ह्या डोंगराएव्हा प्रश्नांचा कोंडमारा
आतल्या आत किती दिवस सोसावं
घडंघडं लेकराबाळा म्होरी बोलावं की,
आपल्या पगाराची आशाळभूत
नदरनं वाट बघणाऱ्या
आधारवडा म्होरी खोलावं
मया डोळ्यांदेखत
तुयी पगार व्हावं रं
बापा म्हणतं मरणाला रातर आडवी
करणाऱ्या माया बापापुढं
काळीज खोलावं
जगण्या मरण्याच्या तराजूत
झुकतं पासांग मरणाला द्यावं
येणाऱ्या असंख्य प्रश्नाला बगल देऊन
ईक खायाला पैका नाही म्हणून
गळफास घेऊन मोकळं व्हावं
बायका पोरं
व्यवस्थेच्या नावानं खापर फोडून
सुतक पाळावं की
नियतीचा खेळ सारा म्हणून
सटवीला दोष देत जगावं की
विनाअनुदानाचं
शापित धोरण
बायका पोरांच्या माथी
कुठरोक मारावं
बापाचा जोडा पोराला येजेस्तोर नी
वेठबिगारीचं जिणं जगावं
फुले, शाहू, आंबेडकरांच्या राज्यात
ज्ञानदानाचं पवित्र काम करणाऱ्या
शिक्षकानं आत्महत्या करावं
एवढं विपरीत घडूनही
निर्डावलेली व्यवस्था कुंभकर्णा
सारखं झोपावं
लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ
मूग गिळून बसावं
एवढं दुर्दैव पुरोगामी महाराष्ट्रात
घडावं

**- प्रा. शिवाजी जोगदंड / सावरगाव कला**
**मो.- 9545661923**

# गुरूकुल शिक्षा पद्धति से ही विश्व गुरू का मान।



प्राचीन काल में शिक्षकों (गुरूजनो) को परम पूज्यनीय, परम आदरणीय जैसे अनमोल वचनो से सम्भोदन किया जाता था।समयानुसार परिवर्तन आया गया और समय के साथ साथ सम्भोदन में भी व्यापक बदलाव आते गए फिर गुरु जी आचार्य जी से सम्भोदन करना सुरु हुआ और आज के पाश्चात्य औ र भौतिकवादी संस्कृति के चलते और अंग्रेजो के द्वारा किए गए हमारी वैभवशाली गुरूकुल शिक्षा पद्धति पर किए जबरदस्त प्रहार के चलते और आधुनिकता पाश्चात्य सभ्यता के प्रचलन के चलते आज गुरूजनो को हम सर, मेडम, मेम से सम्भोदन करने लगे है। इसका मतलब यह नहीं की शिक्षकों का सम्मान नहीं रहा शिक्षकों को आज भी गुरु जी आचार्य जी का दर्जा प्राप्त है। पर यह सम्भोदन भी अब हमें कभी कभी ही हमारे लब पर आते हैं। मुगलो ने फिर अंग्रजो ने जो पड़यत्र भारतीय शिक्षा पद्धति को समाप्त करने के लिए रचा था।आज के हालातो से जान पढ़ता है कि वे बहुत हद तक सफल रहे।

रामायण ,महाभारत काल में शिक्षक ईश्वर तूल्य होते थे। मध्यकालीन काल में भी शिक्षकों को पूज्यनीय परम आदरणीय सा आदर सम्मान मिलता था जो आज सभ्यता संस्कृति परंपराओं के ह्रास होने से हमारी गौरवशाली विरासत धुमिल होती नजर आती हैं शिक्षकों का सम्मान भी अब एक शिक्षक दिवस तक सिमट कर रह गया है। आज हमारा पुरा का पुरा परिवेश अपनी सभ्यता संस्कृति परंपराओं को विलुप्त होते देख रहा है। पर अब नई सरकार नई शिक्षा नीति को अमल में लाने जा रही है कुछ उम्मीद अब पुनः जागी है कि पुनः हम हमारी वैभवशाली सभ्यता संस्कृति के साथ अपनी वैभवशाली शिक्षा पद्धति को पुनः विद्यमान करने के प्रयास से एक बार फिर से जग फिर मोर बनेंगे अब हम सब की जवाबदेही बनती है कि फिर से हम अस्तित्व में लाने के तत्पर रहे खास कर शिक्षकों पर यह जुम्मेवारीबहुत ज्यादा है।

यदि शिक्षकों को राम, लक्ष्मण, भरत, अर्जुन, भीम, कर्ण, चंद्रगुप्त मोर्य, महाराणा प्रताप, छत्रपति शिवाजी महाराज जैसे वीर साहसी कृप्रालु महान शिष्य चाहिए तो शिक्षकों को भी विश्वामित्र, द्रोणाचार्य, भगवान परशुराम आचार्य चाणक्य जैसे समान आचार विचार के साथ कठोर परिश्रम एकाग्रता के साथ भारतीय प्राचीन गुरुकुल शिक्षा पद्धति को अस्तित्व में लाने के लिए कठोर परिश्रम करना होगा तभी हमारी प्राचीन सभ्यता संस्कृति परंपराएँ हमें पुनः देखने का शौभाग्य प्राप्त हो सकेगा। और

यह सब शिक्षकों के निसवार्थ, कठोर परिश्रम, लगन और अपने अर्जित अनुभवों तथा ज्ञान भंडार को अपने शिष्यों पर खर्च करने पर हीं पुनः भारतीय सभ्यता संस्कृति की महत्ता दिखाई देती नजर आ सकतीं हैं।

पर क्या यह सब इतना सरल सहज और आसान हैं? जब की हमारी वैभवशाली सभ्यता संस्कृति गुरूकुल शिक्षा पद्धति को मिटाने के लिए पहले मुगलो ने हमारे मन्दिर और मन्दिर से संचालित गुरूकुलो को नष्ट किए मन्दिरो से आस्था पर चोट की और गुरूकुल नष्ट कर अपनी संस्कृति परंपराओं को हम पर थोपा गया। वही अंग्रजो ने बुद्धिमानी का परिचय देते हुए न केवल हमारी वैभवशाली सभ्यता संस्कृति से गुरूकुल को प्रतिबंधित किया बल्कि अपनी शिक्षा नीति को को अनिवार्य किया। और 200 वर्षों के अपने राज में अंग्रजो ने अपने उद्देश्य में सफल भी रहे थे गुलामी का यह दौर हमें अपने गौरवशाली अतीत सभ्यता संस्कृति परंपराओं से बहुत दूर ले गया। देश आजाद तो हुआ पर मानसिक गुलामी जारी रही आजादी के कुछ दशकों तक तो हम वहीं गुलामी में जीते रहे वही अंग्रजो को खुश रखने की नीति पर भारत में काम चलता रहा अंग्रजो के प्रति तभी कोई भारत वाशी में कोई घृणा बेर नफरत नहीं दिखाई पड़ती मतलब साफ था अंग्रज जाने के बाद भी अपने मानसिक गुलामी के संरक्षक को बिठा के गए थे वे अपने उद्देश्य में पुरी तरह सफल नजर आते हैं। और हम आजादी के सात दशकों के बाद भी अपनी मुल सभ्यता संस्कृति परंपराओं को पुनः स्थापित करने के लिए आज भी प्रयास रत नजर आते है। यही हमारी सबसे बड़ी असफलता है। मानसिक दिवालीयापन की निशानी है।



अब प्रश्न यह उठता है कि कैसे पुनः भारतीय सभ्यता संस्कृति को पुनर्जीवित किया जा सकता है और यह सब सम्भव भी है वही भारतीय प्राचीन गुरूकुल शिक्षा पद्धति को पुनः स्थापित करना होगा सरकार ने अपना काम कर दिया है 34 वर्षों के लम्बे सफर के इंतजार के बाद शिक्षा पद्धति में व्यापक सुधारों के द्वारा पुनः एक बार भारतीय सभ्यता संस्कृति परंपराओं से गुरूकुल शिक्षा पद्धति की और अग्रसर करने का प्रयास किया हैं। और भारतीय शिक्षा मण्डल का गठन भी हो गया है अब हमारा कर्तव्य बनता है कि हर कीमत पर अपनी गुरूकुल शिक्षा पद्धति को जमीन पर लाने का प्रयास करे इसमें शिक्षक और शिष्य की अब बहुत बड़ी जवाबदारी रहने वाली है। 800 वर्ष मुगलो के ओर 200 वर्ष अंग्रजो के गुलामी त्रासदी के मिटाना आसान नहीं है पर यदि सचमुच में भारत को पुनः विश्व गुरु बनने की और अग्रसर करना हैं तो ईमानदारी निःस्वार्थभाव सेवाभाव कठोर परिश्रम एकाग्रता से ही यह सब सम्भव हो सकता है ।

निष्कर्ष यही निकालकर आता है की जो भारत और भारतीय सभ्यता संस्कृति और गुरूकुल शिक्षा पद्धति से खोप खाते थे उन्होंने सब से पहले इन्हें नष्ट करने का काम किया मन्दिर तोड़े गुरूकुल नष्ट किए और गुरूकुल शिक्षा पद्धति को पुर्ण रूप से बन्द कर अपनी शिक्षा पद्धति हम पर थोपी गई। और आजादी के बाद भी मानसिक गुलामी जारी रही अब जा कर कुछ चेतना जगी है और संस्कृति राष्ट्रवाद अलख जगा है सरकार भी प्रयास रत्न है हमें भी त्यार रहना चाहिए और गुरूकुल शिक्षा पद्धति को आत्म सात करना चाहिए।

**- कुन्दन पाटिल / देवास मध्यप्रदेश**
**मो.- 9826668572**

# मुल आपलंच



जणू प्रतिबिंबच
माता-पित्याच
तरीही
वेगळ्या व्यक्तिमत्त्वाचं
स्वतंत्र विचाराचं
स्वतंत्र कल असलेलं
आपलं मूल
आपल्या समोर
एक कोडं असतं
समजून घेणे
अवघड असतं
आकलन होण
ज्ञात होण
आव्हान असतं
म्हणून
साधा सुसंवाद
थांबवा लादन
आणि हो
थांबवा थोपवनही

व्हा मार्गदर्शक
त्याचे समुपदेशक
एक उत्तम पालक
राहा पाठीशी
उचित निर्णयात
त्यामुळे वाढ होईल
त्याच्या आत्मविश्वासात
नसावा तेथे दुरावा
मिळो नात्याचा ओलावा
मायेचं असेल छत्र
प्रसंगी व्हा मित्र
त्याला द्या वेळ
खेळूदेत खेळ
नको कोणता सल
गुणवान व्हावं
मोठ व्हावं
आपलं मूल
माणूस म्हणून
सन्मानानं जगाव!

- किशोर कासारे / मंडणगड
मो.- 8767425180

# निसर्गाची जोपासना व्हावी



भारतात अनेक जातीपंथाचे व धर्माचे लोक रहातात. त्याचप्रमाणे त्यांचे वेगवेगळे सण व इतर उत्सव सुध्दा मोठ्या प्रमाणात आपल्याला पहायला मिळते.परंतु आज बदलत्या काळानुसार पर्यावरणाला संतुलित ठेवण्याची जबाबदारी संपूर्ण मानवजातीवर आलेली आहे.याकरीता सर्वांनीच एकत्र येऊन लढा उभारण्याची गरज आहे.आज वाढत्या प्रदूषणामुळे मानवच नाही संपूर्ण जीवसृष्टी भयभीत होऊन धोकादायक स्थितीमध्ये आलेली आहे.आज आपण पहाले की १९४८ ला छत्तीसगढ मधील कोरिया जिल्ह्यात शेवटचा चित्ता मृतावस्थेत आढळला होता.यानंतर १९५२ साली देशातुन चित्ते नामशेष झाल्याची घोषणा सरकार मार्फत करण्यात आली.नामशेष झालेले चित्यांना भारतात आणण्यासाठी अनेक वर्षांपासून प्रयत्नही सुरु होते.शेवटी नामिबियातुन ८ चित्ते भारतात आले आणि तो दिवस उजाडला.

दिनांक १७ सप्टेंबर २०२२ सुवर्ण महोत्सवी वर्षात चित्यांचे आगमन झाले व मध्यप्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यान सोडण्यात आले.हे सर्व ठीक आहे यांचे स्वागतच. परंतु वाढत्या प्रदूषणामुळे अनेक पशुपक्षी नामशेष होत आहे.त्याकडे सुध्दा सरकारने व वनखात्याने लक्ष केंद्रित करायला हवे.देशात दिवसेंदिवस सर्वच स्तरातून प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे.अत्याधुनिक साधनसामग्री, कारखाने, जंगल तोड, अणुचाचणी, दारुगोळा,वाढती युद्धजन्य परिस्थितीत व वाढते औद्योगिकीकरण यांमुळे आकाश-पाताळ-पुर्व-पश्चिम-उत्तर-दक्षिण-पृथ्वी-निसर्ग पुर्णपणे अत्यंत कठीण परिस्थितीमध्ये येवुन ठेपला आहे.त्याचप्रमाणे मानवाने मोठमोठे बरड(पहाड) भुईसपाट केले आहे.यामुळे सर्वत्र मोठ्या प्रमाणात प्रदुषण दिसून येते.याचाच परिणाम आज मानव, पशुपक्षी, जीवजंतू यांना भोगावा लागत आहे.

आज वाढत्या प्रदूषणामुळे पक्षांना आकाशात उडतांना अनेक कठीणायीचा सामना करावा लागतो.जंगलतोडीमुळे जंगलातील पशुपक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे आणि आता निसर्गाला संतुलित ठेवण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे ते निसर्ग मित्र गिधाड यांनाच आज मृत्यूशी सामना करावा लागत आहे याला अत्यंत भयावह परिस्थिती म्हणावी लागेल. मेलेल्या जनावरांचे मांस खाऊन निसर्गाचे संतुलन सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी व काम मुख्यत्वेकरुन गिधाडांचे आहे.त्यामुळे गिधाड आपली भूमिका चोखपणे बजावुन निसर्ग निरोगी ठेवुन पृथ्वीचे व मानवजातीचे रक्षण गिधाड करायचे व करीत आहे.परंतु भारतासाठी धक्कादायक बातमी म्हणजे भारतातील 90 टक्के गिधाडांची संख्या घटल्याने भारतीय निसर्गावर मोठे संकट आल्याचे दिसून येते.

यासाठी आजच्या परिस्थितीत गिधाडांना वाचवीने काळाची गरज आहे.गिधाडांना मृत्यूच्या खाईत लोटण्याचे काम मानवजातीनेच केले.

1980 च्या दशकापर्यंत देशात गिधाडांची संख्या 40 दशलक्ष पेक्षा जास्त होती. मात्र डायक्लोफेनॅक सारख्या विषारी औषधांमुळे अवघ्या 15 -20 वर्षात 90 टक्के गिधाडे संपली.काही प्रजातीतर नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.जनावरांना दिली जाणारी डायक्लोफेनॅक औषध ही गिधाडांच्या मृत्यूचे कारण ठरायला लागली. त्यामुळे सरकारने 2006 मध्ये डायक्लोफेनॅक औषधीवर बंदी घातली.तरीही या औषधीचा वापर होत असल्याने 2015 मध्ये भारत सरकारने त्यांच्या उत्पादनावर पुर्णतः बंदी घातली.डायक्लोफेनॅकवर बंदी लावली असली तरी इतर नॉन-स्टेरॉइडल ऍंटी-इंफ्लेमेटरी ड्रग्सचा वापर जनावरांवर केला जातो आणि या औषधीचाही वापर गिधाडांसाठी तेवढ्याच धोकादायक आहे.म्हणजेच आपण जनावरांना जेही काही औषधे देतो ती संपूर्ण औषधे गिधाडांच्या मृत्यूचे कारण ठरत आहे. अशीच परिस्थिती रहाली तर चित्या प्रमाणे गिधाड सुध्दा नामशेष होईल यात तिळमात्र शंका नाही. त्यामुळे मृत जनावरांचे मांस खाऊन निसर्गाचे संतुलन निरोगी ठेवणाऱ्या या निसर्ग मित्रालाच आता वाचविण्याची वेळ आली आहे.



२५-३० वर्षापुर्वी गिधाड मृत जनावरांचे जे मांस खायचे ते त्यांना पोषक व आहार युक्त होते.परंतु आधुनिक युगात गेल्या काही वर्षांपासून जनावरांना अनेक रोगांपासून वाचविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची औषधे व इंजेक्शन देऊन त्यांचे प्राण वाचवले जाते.काही जनावरांना प्रजननासाठी व दुधाची मात्रा वाढवीण्यासाठी मोठ्या प्रमाणात औषधांचा व इंजेक्शनचा वापर होतांना दिसतो व होत आहे.परंतु यांचा विपरीत परिणाम निसर्ग संरक्षक गिधाड याला भोगावा लागत आहे.कारण जी औषधे जनावरांना देण्यात येते ती औषधे जनावरे मृतपावल्यानंतर विषेली होतात.ही मृत जनावरे गिधाड खातात व त्यांना अनेक रोगांच्या यातना भोगुन मृत्यूशी झुंज द्यावी लागते.यामुळेच आज निसर्ग मित्र गिधाड यांची संख्या 90 टक्याने घटल्याचे दिसून येते.ही अत्यंत चिंतेची आणि गंभीर बाब आहे.आपण निसर्ग वाचविण्यासाठी प्रयत्न करतो तर दुसरीकडे खणन कामासाठी जंगल नामशेष होत आहे.

छत्तीसगडमध्ये ५८ हजार दशलक्ष टन कोळशाचा साठा आहे.हा साठा संपुर्ण देशात असलेल्या कोळशाच्या साठ्यापैकी हे प्रमाण २१ टक्के आहे.छत्तीगडच्या कोळशाच्या साठ्यापैकी १० टक्के साठा एकट्या हसदेव जंगलात आहे.म्हणजेच आपण आपल्या स्वार्थासाठी लाखो झाडांची खुलेआम कत्तल करीत आहोत हे कीतपत योग्य म्हणावे?ही तर छत्तीसगडच्या हसदेव अरण्याची गोष्ट झाली.अशाचप्रकारे भारतात मोठ्या प्रमाणात जंगलतोड आताही सुरूच आहे.यामुळेच जंगलातील हिंसक प्राणी गावात व शहरात प्रवेश करतांना दिसतात.यामुळे मोठ्या प्रमाणात जिवीत हानी सुध्दा होत आहे.त्यामुळे केंद्र सरकार असो वा राज्य सरकार यांनी समन्वय साधून संपूर्ण जंगल तोड ताबडतोब थांबवीली पाहिजे.यामुळे पशुपक्षी, जीवजंतू यांचे प्राण वाचतील व निसर्ग संतुलीत रहाण्यास मोठी मदत होईल.

आज हवामानातील बदलांमुळे ओझोनचे प्रमाण कमी होत आहे यामुळे धोका निर्माण झाला आहे, पृथ्वीचे वाढते खणन मृत्यूचे कारण ठरत आहे, जलप्रदूषणामुळे सर्वत्रच धोका निर्माण झाला आहे, जंगलतोडीमुळे निसर्गाच्या सान्निध्यात रहाणारे संपूर्ण पशुपक्षी धोकादायक स्थितीमध्ये आहे.असे सांगण्यात येते की वायुप्रदूषणामुळे जगातील ७९७ कोटी लोक प्रदुषित हवेच्या सानिध्यात रहातात.म्हणजेच ९९ टक्के लोक प्रदुषित जागी राहतात.धूम्रपान करणाऱ्यांना फुफ्फुसाचा कॅन्सर होण्याचा धोका असतोच.मात्र धूम्रपान न करणाऱ्यांना वातावरणातील विषारी घटकांमुळे फुफ्फुसाचा कॅन्सर होवू शकतो, असे लंडन येथील फ्रान्सिस क्रिक इन्स्टिट्यूटच्या संशोधकांच्या अभ्यासातील निष्कर्षनात सांगण्यात आले आहे.म्हणजेच मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी स्वतःचे आरोग्य धोक्यात आणलेच सोबतच संपूर्ण जीवसृष्टीला धोकादायक स्थितीमध्ये आणुन ठेवले आहे ही संपूर्ण जगासाठी मोठा गहन आणि चिंतेचा विषय आहे.

आज जंगलतोडीमुळे ऑक्सिजनचे कमी झाले, अनेक जडीबुटी युक्त वृक्ष नामशेष

होण्याच्या मार्गावर आहेत, पृथ्वीतील पाण्याची पातळी दिवसेंदिवस कमी होत आहे, अनेक क्षेत्र पाण्याच्या बाबतीत रेडझोनमध्ये आहेत व समुद्राची पातळी दिवसेंदिवस वाढत आहे ही पृथ्वीसाठी धोक्याची घंटा आहे.म्हणजेच मानवापुढे येणाऱ्या महाप्रलयाचा आलाराम झालाच आहे.याचे उदाहरण म्हणजे सुनामी,भुकंप,महाप्रलय,ग्लेशियर वितळणे, ढगफुटी, ज्वालामुखीचा उद्रेक,ग्लोबल वॉर्मिंग हे आपण उघड्यावर डोळ्यानी पहायचं आहो.नुक्ताच दिनांक १७ सप्टेंबरला तैवानला आलेला भुकंपाची तिव्रता ६.९ रिश्टर स्केल इतकी होती.यामुळे इमारती जमीनदोस्त झाल्या, रेल्वे घसरल्या, रस्त्याला तडे गेले ह्या संपूर्ण घटना मानवाच्या अतीरेकामुळे निर्माण झालेल्या आहेत. फक्त आता विनाशलीलेचा पिक्चर बाकी आहे.त्यामुळे आताही वेळ गेलेली नाही.

"देर आऐ दुरूस्त आये"मानवजातीने आतातरी स्वतःला सावरले पाहिजे, जंगल तोड थांबवीली पाहिजे, वृक्षलागवड मोठ्या प्रमाणात व्हायला हवी यामुळे निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल.पशुपक्षांना जंगलाचा आसरा मिळेल व संपूर्ण जीवसृष्टीला शुद्ध हवा आणि ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.दिवाळीच्या सणाला मोठ्या प्रमाणात फटाके फुटतील यामुळे वायुप्रदूषण सुध्दा वाढेल त्यामुळे दिवाळीत फटाके फोडताना थोडा आवर घालावा यामुळे वायुप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी मोठी मदत होईल.दिवाळीला भरपूर पक्वान्न तयार करून खावेत परंतु फटाक्यांवर आवर घालावा.

आरोग्य हिच संपत्ती या मुलमंत्राला जीवीत ठेवायचे असेल तर सर्वांच्याच आरोग्याच्या दृष्टीकोनातून बुध्दीजीवी मानवाने निसर्गाला संतुलित ठेवण्यासाठी व वाचविण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे.निसर्ग सुरक्षित तर संपूर्ण सृष्टी सुरक्षित, संपूर्ण सृष्टी सुरक्षित तर आपण सुरक्षित" हा मुलमंत्र मानवजातीने अंगीकारला पाहिजे.कारण सर्वांचे आरोग्य हे निसर्गावर अवलंबून असते.त्यामुळे पर्यावरणाला वाचविने काळाची गरज आहे.तेव्हाच आपले व जगाचे कल्याण होईल.

दिवाळीच्या निमित्ताने सर्वांनीच आपल्या परिसरात एकतरी वृक्ष लावले पाहिजे. ज्यांच्याकडे जागा नसेल त्यांनी एखाद्या कुंडीत वृक्ष लावुन दिवाळीचा सण साजरा करावा व निसर्गाचे संतुलन टिकविण्यासाठी मदत केली पाहिजे.

**- रमेश कृष्णराव लांजेवार / नागपूर**
**मो.- ९९२१६९०७७९**

# घरोघरी तिरंगा



आन बान शान तिरंगा
असे आमुचा अभिमान
फडकतो ताठ  गर्वाने
दाखवी सारा हिंदुस्थान

सर्व धर्म सुखे विसावले
होई  बंधुत्वाचे दर्शन
स्नेह शांती संदेश जगाला
नीत्य करितो गुणसंवर्धन

तीन रंगाची गोष्ट आगळी
क्रांतिवीरांच्या बलिदानाचे
त्याग आणि ससमर्पणाचे
प्रतिक ते केशरी रंगाचे

पांढरा रंग दर्शवितो
सत्य अहिंसा शांतीचे
प्रगती पथ चढलो आम्ही
स्वातंत्र्या नंतर कर्तृत्वाचै

शुभ्र  रंगावरी झळकते
निळ्या रंगातील चोवीस
अऱ्यांचे गतिमान चक्र
स्फूर्ती देई नीत्य प्रगतीस

हिरवा रंग असे
द्योतक
सुखसम्रुध्दी
विकासाचा
हरितक्रांती
भरभराटीचा
ध्यास भारतभूच्या उत्कर्षाचा

स्वातंत्र्य आम्रृतमहोत्सव दिनी
तिरंगा फडकू दे घरोघरी
जन गन मन राष्ट्रगीत गात
सारे घेऊ उंच उंच भरारी



- उषा जोईल / कोथरूड
मो.- ९७६४८८६३८४

# "कबीरायन"

**लेखिका डॉ.भारती सुदामे**



मनात असलेली एक सुप्त इच्छा कशी पूर्ण होते, ती म्हणजे मला वाढदिवसानिमित्त मिळालेलं पुस्तक "कबीरायन" लेखिका आहेत डॉ. भारती सुदामे. संत कबीरां बद्दल खूप वाचलं होतं, त्यांनी लिहिलेले "दोहे" ,तर अजरामर आहेत. काव्या ची भाषा जनसामान्यांच्या शब्दांतून आलेली आहे.

हे पुस्तक हातात घेतलं आणि अगदी भारावून गेल्या सारखे झाले. अगदी सुंदर आणि सोपी ओघवती भाषा, सोप्या भाषेत काव्या चे अर्थ. संत कबीरां च्या जन्मापासून ते मृत्यु पर्यंत चा संघर्षमय प्रवास..."कबीरायन" या कादंबरीतून डॉ. भारती ताई सुदामे यांनी लिहला आहे, खरोखरच कौतुकास्पद आहे. त्या साठी त्यांनी घेतलेली मेहनत, स्वतः काशी ला जाऊन कबीरां च्या जन्मस्थळी घेतलेली भेट, वीणकर वस्ती, कबीर चौरा आणि बी.एच. यू. (बनारस हिंदू युनिवर्सिटी) मधे जाऊन अभ्यासकांना भेटणे, सर्वांनी केलेली मोलाची मदत, या कादंबरी च्या मनोगत मधे त्यांनी तसं नमूद केलं आहे.

माझा आणि संत कबीरांचा काव्य परिचय झाला तो असा की माझं बालपण देखील उत्तर प्रदेश राज्यातील, इलाहाबाद (आता प्रयागराज) मधलं, त्यावेळेस हिंदी विषयात अशे बरेच साहित्यिक वाचण्यात आले. संत कबीर, संत रविदास, संत रहीम, संत मीराबाई या सर्वांचा साहित्यिक प्रवास आणि त्याकाळातील जीवन संघर्ष वाचण्यात आला. तसेच हिंदी साहित्यातिल ज्येष्ठ साहित्यिक मुंशी प्रेमचंद्र, महादेवी वर्मा, मैथिलीशरण गुप्त, सूर्यकांत त्रिपाठी निराला, हरिवंशराय बच्चन, सुभद्रा कुमारी चौहान...या सर्व थोर साहित्यिकांची कविता, कथा हिंदी च्या पाठ्य पुस्तक मधे अविभाज्य अंग होते, त्यामुळेच संत कबीरांन ची ओळख झाली, आपण सोप्या भाषेत काव्य म्हणतो तेच हिंदी भाषेत "दोहे" .संत कबीर दोहे म्हणून आपले विचार समाजा समोर मांडत असत. हे दोहे उत्स्फूर्त येत असत, कुठले ही विचार केव्हा वेळ लागत नसत.

समाजा ला प्रबोधन करण्या साठी परमेश्वराची एक अद्भुत काव्य रचना उत्स्फूर्त तयार होत असत.

आता थोडं "कबीरायन" बद्दल बोलू या, "अयन" म्हणजे जाणं. कबीरांच "काशी" हून "मगहर" जाणं आणि तिथेच निजधामी जाणे, हा प्रवास म्हणजे जन्मापासून ते मृत्यु पर्यंत हेच "कबीरायन" .

यात या कादंबरी चा प्रवास कसा घडला, डॉ.भारती ताई लिहतात, ही कादंबरी

लिहायची हे 1998-99 मधे ठरवलं होत पण काही न काही कारणांमुळे मागे पडलं, पण म्हणतात नं योग यावा लागतो तसेच काही तरी असेल कदाचित. अगदी कबीरांच्या भाषेत म्हणायच तर,भारती ताई लिहतात...

धीरे धीरे रे मना, धीरे सबकुछ होय!
माली सींचे सौ घड़ा, रितु आये फल जोय !!


20 जून 2016 कबीर जयंती च्या दिवशी लेखनाला सुरुवात केली, वीणकर वस्तीत जाऊन प्रत्यक्ष लेखनाला सुरवात झाली. खूप आनंददायी आणि अंतर्मुख करणारा प्रवास सुरु झाला. आणि 1 ऑक्टोबर 2016 ला शेवटचा शब्द लिहला.

डॉ.भारती ताई लिहतात, कबीरांच जीवन जसं जसं उलगडत गेलं तसं अधिक गूढ आणि रहस्यमय होत गेलं.

दुसरा भाग म्हणजे "श्रृणनिर्देश" .....

ताईंन नी त्यांना प्रत्यक्ष केव्हा अप्रत्यक्ष रूपाने ज्यांनी मदत केली, त्या सर्वांन चे आभार मानले आहेत, त्या शिवाय हे धनुष्य पेलणं शक्यच नहव्त.

तीसरा भाग म्हणजे "थोडं कबीरां विषयी" ....




संशोधकांच्या संशोधनातून प्राप्त झालेली ऐतिहासिक तथ्य म्हणून या कादंबरीत लेखनासाठी स्वीकारल्या आहेत. काही चा उल्लेख करायला आवडेल....

* जन्म काशीचा, ज्या दिवशी पालन कर्त्याला सापडले तो दिवस ज्येष्ठ पौर्णिमा इ.स.1398

* मृत्यु मगहर येथे, मार्गशीर्ष एकादशी इ.स.1518

* एकशेवीस वर्षाचं दीर्घायुष्य.

* कबीर निर्गुणी संत होते.

* कमाल नावाचा पुत्र आणि कमाली नावाची मुलगी असल्याचा उल्लेख आहे. पण ते मानसपुत्र आहेत.

* कबीरांनी जशी वेदांवर टीका केली तशी कुराणावर ही केली.

कबीरांच्या जीवनात अनेक दंतकथा प्रचलित आहेत, त्याचा पुस्तकात उल्लेख आहे. जसे...

- एकदा एक ब्राह्मण आपल्या विधवा कन्ये ला घेऊन स्वामी रामानंद यांच्या कडे आशिर्वादा साठी गेला. त्या कन्येने नमस्कार केला, स्वामींनी "पुत्रवती भव" असा आशिर्वाद ही दिला.तो खरा ठरून तिला मुलगा झाला पण लोकलाजेस्तव तिनं तो टाकून दिला, त्याच मुलाला नीरू आणि नीमा या मुस्लिम दाम्पत्याने सांभाळ केला.

- काही ही न खाता पीता कबीरांची शारीरिक वाढ होत होती, त्यामुळे माता पितांना चिंता वाटू लागली. कबीरांनी दूध पिण्याच्या इच्छे ने नुसतं बघितल तरी भांडं दुधाने भरून जात होतं.

- एका दंतकथेनुसार कबीर शुकदेवाचा अवतार समजल्या जातो.

अशे बरेच कथा आणि प्रसंग या पुस्तकात आहेत, ज्याची मजा वाचण्यात आहे, आणि आपल्याला विचार करायला भाग पाडतात. कबीर एक फकीर, अवलिया संत जो आपल्या शिष्य मंडळी सोबत गावोगावी फिरून प्रबोधन करायचा. कबीर बोलायचा लोकं ऐकत असायचे, वेळ कसा संपायचा हे कळायचं ही नाही.

कबीर सूता क्या करै, जागी जपो मुरारी ।
एक दिन हैं सोवना, लंबे पाव पसारी।।
कहाँ हंसा बिसराम किया है,कहाँ लगाये आस ।।
अब ही हंसा चेत सबेरा, चलो हमारे साथ।
संसय सोक वहाँ नही व्यापै नही कालकै त्रास।।

खरं आहे, जिथे संशय आणि शोक संपलेला आहे आणि काळाचा ही त्रास मिटलेला आहे अशा ठिकाणी कबीर पोहचतो.

असाच एक प्रसंग कामाख्या मंदिरात ला आहे ,जो वाचतांना अंगावर काटे आणतो. मंदीर परिसरात कबीर आणि पुजारी सोबत झालेला संवाद अनाकलनीय आहे. जेव्हा पुजारी विचारतोय, तुझा धर्म कोणता? तर...कबीर म्हणतो, माणुसकीचा... माणसाच्या मनात देव असतो आणि प्रत्येकाच्या मनात राम आहे, त्याची सेवा करणं हा माझा धर्म आहे.

अशे किती तरी प्रसंग या पुस्तकात आहे, अगदी सोपी आणि ओघवती भाषेत वर्णन वाचून आपण देखील भूतकाळात हरवून जातो. किती निर्भय आणि निडर संत होते कबीर. कबीरांन चा निजधामी जाण्याचा प्रसंग फारच अप्रतिम आहे. त्यांना चाहूल लागली होती की वेळ आता जवळ आली आहे त्याप्रमाणे सोय करा, तो प्रसंग डॉ. भारती ताई नी फारच उत्तम रित्या लिहला आहे की डोळे पाणवल्या शिवाय राहत नाही. प्रत्येकाने आवर्जून हे पुस्तक वाचावे असं मला वाटते आणि संग्रही ही असावे.

**- सौ. रश्मी कवीश्वर पिंप्रीकर / जामनगर (गुजरात)**
**मो.- 8128059820**

# || मैत्री ||



दोन मनांचं मीलन
जीवनाचं खरं धन;
मैत्री म्हणजे सुखांची
मनसोक्त उधळण.

मैत्रीचं रोपटं जेव्हा
मनात फुलू लागतं;
कुबेरी धनही तेव्हा
क्षुल्लक वाटू लागतं.

विश्वासाच्या पायावर
सदैव उभी असते;
कोणत्याही बंधनात
मैत्री बंदिस्त नसते.

संकटांशी लढताना
वादळ होऊन येते;
जीवनाच्या लढाईत
मैत्री तलवार होते.

सगळ्या नात्यांना आता
लागले आहे ग्रहण;
कोणीही कोणाचं नाही
जुगार झाले जीवन.

सुंदर जीवनासाठी
विश्व वाचले पाहिजे;
विश्व वाचविण्यासाठी
मैत्री केलीच पाहिजे...!

**- मिलिंद देविदास हिवराळे / बार्शिटाकळी**
**मो.- 7507094882**

# माझा आकाश कंदील



दिवाळी हा असा सण आहे,जो दिव्यांच्या संगतीने अंगण प्रकाशमयासोबत समृद्धमय करतो.दिवाळी हा असा सण आहे, जो रांगोळीच्या सुंदर सड्यातून रंगीबेरंगी रंगांचे गंध अंगणभर दळवळण्यास मदत करतो. दिवाळी हा असा सण आहे, जो इतिहासाच्या पानावरील गड-किल्ल्यांना वास्तवातील पानावर उतरवण्यासाठी बालवयाला सुट्टीचा क्षण देतो. आणि दिवाळी हा असा सण आहे, जो आकाशातील ताऱ्यांनाही लाजवेल असे आकाशकंदीलांचे तोरण घरोघरी बांधतो.अशी ही दिवाळी स्वर्गाहून सुंदर दिव्यांचा स्वर्ग दाखवते. दिवाळीच्या उत्सवातील प्रत्येक क्षण मनाच्या आणि हृदयाच्या अंगणात चैतन्याचा, उत्साहाचा,आनंदाचा दिवा लावून जातो. बालपणी शिक्षकांनी “आवडता सण “ या विषयावर निबंध जरी लिहायला सांगितलं, तरी वर्गातील चार-पाच विद्यार्थी सोडले तर संपूर्ण विद्यार्थी “आवडता सण:दिवाळी” यावरच निबंध लिहीत होते. कारण बालपणीच दिवाळीने दिव्यांच्या प्रकाशातून बाल मनाला नवा उजाळा दिला होता. आणि हिच दिवाळी म्हातारपणही तितक्यात बाल उत्साहाने साजरी केली जात असतं. दिवाळी जस जशी जवळ येऊ लागते. तस तशी कुटुंबातील प्रत्येक हात घरच्या सजावटीकडे गुंतले जातात. आजा-आजीच्या मदतीने मुलांनी केलेले रंगीबेरंगी पताके वडिलांच्या उंचीने घराच्या छतापर्यंत लावले जातात, वडिलांनी बाजारातून आणलेली भारतीय बनावटीची लाईटिंगची माळ आईच्या सल्ल्याने घराच्या चहूबाजूंनी तिचा रोशणाईचा पिंगा घातला जातो. आणि अंतिम टप्प्यात लावला जातो, “मुलांच्या कल्पकतेने साकारलेला आणि वडिलांच्या मदतीने केलेला सुंदर नाविन्यपूर्ण असा आकाश दिवा.” तोच आकाश दिवा घराच्या अंगणातील आकाशात लावताच, घराचं अंगणही दिवाळी साजरी करण्यास तयार होतं. आणि प्रत्येकजण उद्गारतो, “ आकाश कंदील शिवाय दिवाळीला शोभा नाहीच.” हो..! बरोबर आहे. “दिवाळी जर दारी आली असेल, आणि आकाश कंदील जर अंगणी नसेल.” तर दिवाळी अपूर्ण आहे. असं म्हणायला काही वावगं वाटणार नाही. कारण दिवाळी हा सणच दिव्यांच्या प्रकाशाने आणि आकाशकंदीलाच्या मंद उजेडाने उजळून जातो. पण वास्तविक आज आकाश कंदील घरामध्ये केला जात नाही, तर तो विकत आणला जातो. तसं पाहिलं तर, आपण सर्वजण दिवाळीच्या उत्सवा मधील जास्तीत जास्त वस्तू विकतच आणतो. कारण आज बाजारांमध्ये रेडीमेंटचं वारं वाहत आहे. त्यामुळे दिवाळी उत्सवात लागणारी छोट्यातील छोटी वस्तू आणि मोठ्यातील मोठी वस्तू देखील आज रेडीमेंट झाली आहे. काही वेळा म्हणण्यापेक्षा मला खूप वेळा असं म्हणावसं वाटतं की, “दिवाळी झाली

रेडीमेंट". तसाच आज आपल्या प्रत्येकाच्या अंगणातील आकाश कंदील देखील रेडिमेंट झाला आहे. त्यामुळे आज आपल्याला आकाश कंदील कसा दिसतोय हे एवढंच माहितीये, पण आकाश कंदील कसा केला जातो हे जरा सुद्धा माहिती नाही. आज आम्ही दिवाळीचा आस्वाद घेण्यासाठी बऱ्याच ठिकाणी ऐकतो की,"पूर्वीच्या कुटुंबातील व्यक्तींच्या सोबतीने आकाशकंदील साकारला जायचा." पण आज काय ? पूर्वीच्या नको त्या परंपरा आज चालत आलेल्या आहेत. मग अशा निर्मितीजन्य परंपरा का बरं धावत आल्या नाहीत ? पूर्वीचा आकाश कंदील हा पर्यावरणपूरक असायचा. निसर्गाने दिलेल्या पर्यावरण पूरक वस्तूतून पर्यावरण पूरक आकाश कंदील साकारला जायचा. त्यामध्ये प्रामुख्याने बांबूच्या काठ्या, कागदी पाने, खळ यांचा वापर केला जायचा. अशा या पर्यावरण हितकारक आकाशकंदील मुळे पर्यावरणाचा समतोल पूर्वीच्या व्यक्तींनी टिकवून ठेवला आहे. पण आजचे चित्र आणि आजचे आकाशकंदील पाहता. सर्वच रेडीमेंट झाले आहे. त्यासोबत ते पर्यावरण पूरक म्हणजेच इको-फ्रेंडली नाही आहेत. या रेडिमेंट आकाश कंदील मध्ये प्रामुख्याने प्लास्टिकचा अधिक वापर केला जातो. त्याचप्रमाणे थर्माकोल आणि रासायनिक रंग यांचा देखील वापर केला जातो.



जेणेकरुन आकाश कंदील घेणाऱ्याला तो चमत्कार वाटावा. अशा या अपर्यावरण पूरक आकाशकंदील मधून निसर्गाचा संसार कुठेतरी कोलमडत चाललेला आहे. आणि मानव त्याचा रासायनिक, प्रदूषणदायी संसार उभा करत चाललेला आहे. त्याचप्रमाणे आज माणसाला नसलेल्या वेळेमुळे ही माणूस रेडिमेंट या शब्दाकडे आणि वस्तूंकडे आकर्षित होत चाललेला आहे. अशा अनेक अपर्यावरण पूरक वस्तूतुन आपण मानव जात निसर्गाचे अस्तित्व निसर्गापासून हिरावून घेत आहोत. त्यामुळे या दिवाळी वेळी आपण प्रत्येकाने पर्यावरणपूरक,

स्वदेशी आकाश कंदीलचा अवलंब करुया. जेणेकरुन निसर्गाचे सप्तरंग निसर्गाच्या कागदावर ओजस्वी आणि तेजस्वी दिसतील. आणखी एक म्हणजे, वास्तविक कोरोना नंतरच्या काळात आपला देश आणि देशातील प्रत्येक व्यक्ती ही आत्मनिर्भर झाली आहे. आत्मनिर्भरच्या या शक्तीमंत, बुद्धीमंत, भरारीमंत पंखांनी आज आपल्या भारत देशाने जास्तीत जास्त ठिकाणी उंच भरारी घेतली आहे. त्याच प्रमाणे आपण ही दिवाळी- उत्सवात आपल्या आत्मनिर्भर मनाला आणि आत्मनिर्भर पंखांना उभारी देऊया, आणि साकारुया आत्मनिर्भर, पर्यावरणपूरक आपल्या स्वतःचा आकाश कंदील. आज आपले आजा-आजी आपल्याला सांगतात की," पूर्वी आम्ही आकाशकंदील घरामध्ये तयार करत होतो." मग असा प्रश्न पडतो की, "आम्ही आमच्या येणाऱ्या पिढीला काय सांगायचे ? " की, "आम्ही आकाश कंदील विकत आणत होतो." हे सांगताना देखील आपल्या मनाला वाईट वाटेल. आज बऱ्याच शाळांमध्ये कार्यानुभवचे शिक्षक ५ गुणांसाठी आणि तोच आकाश कंदील शाळेच्या कपाटात ठेवण्यासाठी मुलांना आकाशकंदील करायला सांगतात. " पण तसाच कागदी आकाश कंदील दिवाळी वेळी घरामध्ये तयार केलास, तर तू तुझ्या बाबांचे ५०० रुपये वाचवू शकशील." हे ते शिक्षक का ? बरं मुलांना सांगत नाहीत. मग आज मुलांनी कार्यानुभव विषय ५ गुणांसाठी आणि केलेल्या वस्तू शाळेच्या कपाटात ठेवण्यासाठी शिकायचा का ??????? त्यामुळे मी यावेळी पासून ठरवला आहे. परिवर्तनाची सुरुवात स्वतापासून करुया. आणि या दिवाळीला निसर्गाला आवडेल असा, पर्यावरणपूरक आणि मनाच्या कल्पकतेला वाव देणारा असा आत्मनिर्भर. म्हणजेच " आत्मनिर्भर, पर्यावरण पूरक माझा आकाशकंदील " मी साकारला आहे. चला.. तर मग तुम्ही ही परिवर्तनाची सुरुवात स्वतःपासून करा. आणि यावर्षी घरातील लहान मुलांच्या कल्पकतेला नवी दिशा देऊन, आजा-आजींच्या सल्ल्याने आणि आई-वडिलांच्या मदतीने सहकुटुंब आत्मनिर्भर आकाशकंदील साकारा. त्याचप्रमाणे या वर्षीचा आकाशकंदील पर्यावरणाला आवडेल असा पर्यावरण पूरक बनवा. अशाप्रकारे आत्मनिर्भर, पर्यावरणपूरक ही दोन्ही सूत्रे हाती घेऊन " आत्मनिर्भर पर्यावरणपूरक माझा आकाश कंदील " निर्माण करुया. त्याचप्रमाणे आत्मनिर्भर, पर्यावरणपूरक आकाशकंदील प्रमाणे, दिवाळी मधील अनेक वस्तू या घरामध्ये साकारुया. आणि या दिवाळीला " home made दिवाळी " म्हणूयात. आपणा सर्वांना दिवाळीच्या खूप साऱ्या शुभेच्छा.....

**- प्रथमेश भि. कुंभार / सांगली**
**मो.- 9049951569**

# शेतकरी



संपलो जरी मी आत
पुन्हा उगवणार आहे
मातीत गेले बी बियाणे
पुन्हा हिंमतीने लढणार आहे

दरवर्षीप्रमाणे मातीशी
पुत्राच नात जपणार आहे
गेल जरी पिक वाहून कुजून
पुन्हा लाखो रुपयांचा सट्टा खेळणार आहे



पिक बघुन डोळे येतात भरुन
पुन्हा जीवनाचा जुगार खेळणार आहे
दैव जरी कोपले माझे
भूमातेवर माझा विश्वास आहे

जळते काळीज निसर्गाचा प्रकोप पाहून
पुन्हा अश्रू पुसुन भूमातेच ऋण फेडणार आहे
घामात चिंब होऊन मनावर दगड ठेवून
पुन्हा हिंमतीने लाखो रुपयांचा जुगार खेळणार आहे

**- मिना देवाजी सैंदाणे / अमळनेर**
**मो.- ७३६०८१६३१२**

# बिघडत चाललेली पिढी



पार म्हटल की खेडेगाव आठवतं. संध्याकाळच्या वेळी जुनी जाणती माणसं एकत्र जमण्याचे ठिकाण.माफक गरजा आणि कायम आनंदी असणारी ही मंडळी.छोट्या छोट्या गोष्टीत आनंदी होणारी आणि तो आनंद डोळ्यांत साठवणारी.

हळूहळू काळ बदलला,भौतिक सुखासाठी माणुस आसुसला. संस्काराच विद्यापीठ असणारा,आनंदी आणि स्वच्छ वातावरण असणारा हाच ग्रामीण भाग पाश्चात्यांचे अनुकरण करु लागला. चुकीच्या गोष्टीना अनुसरु लागला.विविध चुकीच्या गोष्टी घडू लागल्या. मिसरुडही न फुटलेले 'भाई' चौकाचौकातून दिसू लागले.गुणवत्तेपेक्षा खोगिरभरतीला महत्व वाढू लागलं.जातीयतेच पीक जोम धरु लागलं.सोशल मिडीयाचा वापर चांगल्या गोष्टीपेक्षा विघातक कार्यासाठी होऊ लागला. माझाच नेता श्रेष्ठ कसा? यासाठी मिडीया वॉर घडू लागलं.सगळं काही वर्चस्वासाठी सुरु झालं.आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी रसद मिळू लागली.

मुलाच्या अपरिपक्वतेचा फायदा घेतला जाऊ लागला.एकसंघ असणारा समाज जाती-जातीत वाटला गेला.महापुरुषाच्या विचारापेक्षा तो कोणत्या जातीचा यावर जयंती/पुण्यतिथी ठरु लागल्या.संकुचित वृत्तीमुळे समाजात तेढ निर्माण झाली. तरुणाई भरकटली.ज्या वयात मुलांचे आदर्श महापुरुष बनावेत.ती जागा नेत्याने घेतली.चुकीचं मार्गदर्शन मुलांना मिळू लागलं.माणुस धर्मा-धर्मात वाटला गेला. महापुरुषाचे विचार घेतले तर ग्रेट आहेतच,पण तो वैचारिक वारसा चालवणारे सक्षम मन आज घडताना दिसत नाहीत.

शाळेत मिळणारी शिक्षा ,आणि आठवी पर्यंत पास या दोन निर्णयाने शिक्षणाचे तीन-तेरा झालेत. आणि यावर कहर म्हणावं की काय तर आता मुलांना दिला जाणारा गृहपाठही बद होणार आहे.कुणीतरी म्हटल आहे तुम्हाला एखादा देश जर कमकुवत करायचा असेल तर त्याच्या शिक्षणव्यवस्थेवर घाव घाला.आता तेच घडतयं. म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावतोय... उद्याची भावी पिढी आदर्श बनावी,यासाठी शिक्षणव्यवस्था खुप मोठी भुमिका बजावत असते.शाळेत मिळणारं बाळकडू आयुष्यभर पुरतं.तेच कमकुवत होताना दिसतंय.

आजही कुठे समाजात काही चुकीची घटना घडली तर आपण सहज बोलून जातो,की सध्याची पिढी बिघडली,पण ती का बिघडलेय याचाही विचार होणं गरजेचं आहे,प्रत्येक पालकांसाठी आपला मुलगा प्रिय आहे,मला जे मिळालं नाही ते माझ्या मुलाला मिळालं पाहीजे हा चुकीच्या विचाराने आपण आपल्या मुलांना हव्या असलेल्या गोष्टी

मिळवून देतो.आपल्या कितीही असु द्यात,पण मुलांना ते सहजासहजी उपलब्ध करून देउ नका.त्याना गोष्टीचे मुल्य कळू द्यात.( किंमत नव्हे).एखादी गोष्ट मिळवण्यासाठी कोणताही शॉर्टकट नसतो त्यासाठी कष्टच करावे लागतात.याची जाणीव त्याना होऊ द्या.मग त्या गोष्टीचे महत्त्व त्याना समजेल.

मुलांना योग्य वयात योग्य संस्कार दिले तर ती कधीच वाया जात नाहीत. जबाबदारी,योग्य कृती मुलांना त्यांच्या आयुष्यात परिपक्व बनण्यास प्रेरणा देईल. संस्काराबरोबर मुलांना आरोग्याचे महत्व सांगा. चिरकाल अस्तित्व निर्माण करायचे असेल तर प्रामाणिक प्रयत्न करावे लागतात.संयम पाळावा लागतो.अपयश पचवावं लागत.नकार सोसावा लागतो.याचाही अनुभव मुलांना द्या.मागता क्षणी मुलाचे हट्ट पुरवू नका.वाट पहायला शिकवा.त्याना सक्षम बनवा.आणि या छोट्या छोट्या गोष्टी आपण करू शकतो.ही सर्वस्वी जबाबदारी आपली आहे.मुलांना मजबूत बनवा.तर उद्याचा सक्षम भारत घडेल....

**- श्री. रणजित शहाजी खिलारे / बनाळी**
**मो.- 7758823599**



# गझल



उघड्या तुझ्या तनुला सजवू अता कशाला?
अब्रूस खोललेल्या लपवू अता कशाला

हृदयात मान नसता कोणावरी रुसावे?
खोटेच हासुनी मग भुलवू अता कशाला?

का वेल मोगरीची फुलते अशी अवेळी
भुंग्यास मोह पडता पटवू तरी कशाला?

हसतोस पाहिल्यावर वाटेत सांजवेळी
लोकांपुढे तुला मी खुणवू तरी कशाला?

दिलदार मित्र 'सागर' साधासुधाच भोळा
दावून मोह त्याला फसवू अता कशाला?



- प्रकाश रामचंद्र क्षीरसागर / गोवा
मो.- ९०११०८२२९९

# माईलस्टोन



सराव होता का हा एक?.... नेहमीपेक्षा जास्त सायकलींग करण्याचा, की मोहीम होती?... स्वतः च्या मर्यादांना जोखण्याची, की निव्वळ वेडेपणा?..... मनात आलं म्हणून केलेला.... माहिती नाही... पण सरतेशेवटी आमचे शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विश्व कल्पनेपलिकडे श्रीमंत करून गेलेला हा एक अविस्मरणीय प्रवास होता..... आम्ही मारलेल्या एकेका पायडलने सामोरी आलेल्या चढउतारांना कवेत घेऊन मांडलेला आलेख होता... स्वतः तील क्षमतांशी डोळसपणे केलेला संवाद होता.... सहा जिल्ह्यातून भटकंती करीत गेलेल्या आम्हा सहा जणांचा ऐतिहासिक दस्तावेज होता... आम्ही तेव्हा जगलेल्या त्या एकेक क्षणांना विचारा हवं तर, ते सांगतील की हा एक झपाटलेला अनुभव होता... चार दिवसांत कापलेले चारशे चार किलोमीटर चे अंतर - खूप दिवसांपासून उराशी जोपासलेला एक ध्यास होता....शक्यअशक्यतेच्या धर्तीवर स्वतःचा नव्याने घेतलेला शोध होता..... आणि आनंदवनातून मिळालेला बोध होता.

प्रचंड उतारावरती आपण नुसतं असं ऐसपैस सायकलवर बसून रहावं... आणि तिनं बुंबाट पळावं, आपोआप, पायडल देखील न मारता... आणि बरसचं अंतर कापलं जावं... असं वाटतंय आज हे लिहिताना...आत्मविश्वासाचं गाठोडं फुगून मनावरचं दडपण गेल्यामुळे. आम्ही ठरवलं तेव्हा खात्री होती पण ती “क” च्या फेऱ्यात अडकलेली होती. कसं, कधी, कितपत, कोणकोण, काय काय, किती, केव्हा, कोणती असे बरेच “क” समोर फेर धरून नाचत होते.

कसं होईल? याआधी कधी आपण इतका लांबचा पल्ला सायकलवर सर केलेला नाही, कितपत जमेल? कोण कोण सहभागी होईल? काय काय सोबत घ्यावे लागेल? किती त्रास होईल? प्रत्येक ठरवलेल्या मुक्कामाच्या ठिकाणी आपण नेमके केव्हा पोहोचू? म्हणजे, ठरविल्याप्रमाणे की उशिरा? कोणती काळजी घ्यावी लागेल? याआधी वर्षभरापूर्वी केलेल्या फक्त एका दिवसाच्या सायकलींगचाच अनुभव आम्हाला, एकशे दहा किलोमीटरचा. आता सलग चार दिवस जमेल का? उत्सुकता, शंका, भिती, दडपण, खात्री असं सगळं सगळं चाललेलं आत खोलवर, मनाच्या ट्रॅकवर. पण आम्ही मात्र ठाम ठरवलेलंच, खऱ्याखुऱ्या ट्रॅकवरचा थरार अनुभवण्याचं. आम्ही म्हणजे चार जणच... महेश जिवने, प्रदीप पत्तेवार, मुकेश कुलकर्णी आणि मी. कारण बाकीचे दोघेजण म्हणजे आमचं मनोबल! सुनील ममदापूरे आणि गोविंद रंगवाळ..... पट्टीचे सायकलपटू. गेल्या सतरा अठरा वर्षांपासून हजार बाराशे किलोमीटरचा सायकल प्रवास सहज करणारे. या दोघांची सोबत, यापेक्षा मोठा दिलासा आणखीन काय

हवा? गेल्या तिनेक वर्षांपासून नियमितपणे करीत असलेल्या सायकलींग मुळे करु शकलेलो हे धाडस ( किमान आमच्याकरीता तरी ) इथून पुढे आम्हाला स्वस्थ बसू न देता सतत खुणावत राहणार, उद्युक्त करत राहणार हे मात्र नक्की.

ही असली नसती उठाठेव करून काय मिळणार आहे? जवळपास असाच सूर होता घरातील प्रत्येकाचा. कोणाचा उघड आणि कोणाचा छुपा, एवढाच काय तो फरक. आणि या पार्श्वभूमीवर चाललेली आमची जय्यत तयारी. प्रवासाचा मार्ग, टप्पे, मुक्काम, सोबत करणारी गाडी, आनंदवनाशी संपर्क, सायकली परत पाठवण्याची व्यवस्था वगैरे वगैरे. आम्ही आमच्याच धुंदीत.... आणि इंतजार की घडीया खत्म हो गई... १२ फेब्रुवारी २०२१. पहाटे तीनलाच आमच्यात फोनाफोनी होऊन प्रत्येकजण उठल्याची खात्री करून झालेली. एक जोशीली पहाट! कॅप्टन चौकात शहीद कॅप्टन कृष्णकांत कुलकर्णी यांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन करून, उपस्थित मान्यवर ( उदगीर नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. भरत राठोड साहेब, धन्वंतरी आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय पाटील आणि प्रबोधन साहित्य परिषदेचे अध्यक्ष श्री. धनंजय गुडसूरकर ) व आम्हाला आवर्जून शुभेच्छा द्यायला आलेल्या आमच्या सायकलींगवाल्या परिवाराच्या सदिच्छांसह आम्ही पहाटेच्या अंधारात पायडलवर टांग मारली आणि एका स्वप्नाचा प्रवास खऱ्या अर्थाने सुरु झाला. मैलाच्या दगडांना झपाझप मागे टाकत स्वतः " माईलस्टोन " झालेला एक प्रवास! तिघेजण तर आम्हाला निरोप द्यायला मुक्रमाबाद पर्यंत सायकल वर आलेले. ( विवेक होळसंबरे, नारायण पोले आणि कपील कलपे ).

तिव्र इच्छा असूनही काही अडचणींमुळे सहभागी होता येत नसल्याची खंत, हे तिघे आमच्यासोबतच्या तीस चाळीस किलोमीटरच्या प्रवासाने भरुन काढत होते. इथपर्यंत त्यांनी केलेली आमची पाठराखण आमचे इरादे आणखीन भक्कम करून गेली. १३६ किलोमीटरचे डोळ्यासमोर ठेवलेले पहिल्या दिवसाचे उद्दीष्ट पूर्ण करता करता पुन्हा एकदा अंधाराशी साथसंगत करावी लागली होती. एका दिवसात एवढे अंतर पहिल्यांदाच पार केलेले, त्याचा मनात चाललेला जल्लोष वेगळाच! या नव्या कोऱ्या अनुभवाला सामोरी जाताना अख्खा दिवस डोळ्यासमोरून तरळून जात होता. आमच्या प्रयत्नांना पाठबळ देण्याकरिता भल्या पहाटे जमलेला मित्रपरिवार, साडेतीन तासात पहिला टप्पा पार करून देगलूर गाठल्यावर, देगलूर महाविद्यालय व होंडा शोरुम मध्ये झालेले जंगी स्वागत, डॉ. सुरेंद्र आलूरकर सरांच्या घरी ताई व सरांनी केलेली मेहमाननवाजी आणि आस्थेवाईक विचारपूस, उन्हात होणारी दमछाक, सपोर्ट व्हेईकलमधे ठेवलेल्या पाण्याच्या कॅनचे पदोपदी ( पायडलो पायडली....हेच योग्य राहील नाही का? सायकलींग म्हणून ) जाणवणारे महत्व, प्रवासात लोकांकडून होणारी कुतूहल मिश्रीत चौकशी, प्रश्नांचा भडीमार आणि क्वचित चहापाण्यासाठी किंवा खाण्यासाठी मिळणारे निमंत्रण, एकमेकांची वाट पाहण्यात रस्त्याकडेला मारलेली

फतकल, गप्पा, रस्त्यालगतच्या सावल्यांचे नव्याने कळलेले महत्व, इयरफोन मधून साथसंगत करणारे किशोर, रफी, लता, आशा, हनिसिंग, जिथे तिथे सायकलींभोवती हमखास रेंगाळणारी लहान मुलं आणि त्यांचे विस्फारलेले डोळे, अधूनमधून मोठ्या गाड्या गेल्यावर उडणारा फुफाटा, आपआपल्या तंद्रीत मशगूल असलेली गावं - खेडी, एकंदरीत रोडावलेली झाडांची संख्या, उन्हाळ्याची जाणवणारी चाहूल, बिलोली नंतरच्या आमराईत दुपारी सोडलेल्या शिदोऱ्या आणि इवलूशी विश्रांती, नदीला कैद करत पुलावर झालेला फोटोसेशन, धर्माबादच्या आसपास लागलेला खराब रस्ता, मावळतीकडे चाललेला सूर्य, आणि भेटलेले पत्रकार, रात्री साडेआठ वाजता बासर ला पोहोचल्यानंतर पुन्हा एकदा अंगात संचारलेला उत्साह, स्वतः च थोपटलेली स्वतः ची पाठ, घरच्यांकडून फोनवर झालेले कौतुक..... आम्ही गाळलेल्या घामाच्या एकेक थेंबाच्या मोबदल्यात खूप काही देऊन गेलेला आणि आपल्याला झेपेल का? हे किंतू मनातून पूर्णपणे पुसून गेलेला दिवस.... जणू मा शारदेने भरभरून दिलेला आशिर्वाद!

खरं तर, सायकल म्हटलं की, माझ्या डोळ्यासमोर येते ती लहानपणी चौकातल्या तुराफभाई कडची एका रुपयात तासभर खेळलेली किरायाची छोटी सायकल आणि नंतर अकरावीला मिळालेली हक्काची सेकंडहँड हर्क्युलसची साधी सायकल. कोण अप्रूप होतं याचं आम्हाला तेव्हा.आज जरी हायब्रीड, गियरवाली,वजनाने हलकी ( पण किमतीने भारी ),अद्ययावत सायकल आणि मग ओघाने येणारा ड्रेस कोड वगैरे असले तरीही तेव्हाची बात काही औरच होती. तेव्हाच्या सिनेमात देखील सायकलची चलती होती. घोळक्या घोळक्याने सायकलवरून हिरो हिरोईन गाणी वगैरे म्हणायचे. त्या सायकलींसोबत उठून दिसायचा तो मागचा ७० एम एम ग्रीन कॅनव्हास.... निसर्गाच्या कुशीत बिनधोकपणे विसावलेली धरा... सगळं कसं स्वच्छ, शांत आणि जिवंत! ठराविक ड्रेस आणि हेल्मेट घालून रांगेत चाललेल्या आमच्या गियरवाल्या सायकलींकडे आणि आमच्याकडे कुतूहलाने पाहणारी मंडळी दिसली आणि ते शानदार दिवस आठवले. नाहीतरी सायकल आणि पर्यावरणाची सांगड हाच तर सुप्त हेतू होता आमचा. सरस्वती मातेच्या दर्शनाने दुसऱ्या दिवशीचा प्रवास सुरु झाला.... सलग दुसऱ्या दिवशीही सायकलींग... हे पहिल्यांदाच घडत होते. भविष्यातील अशा प्रकारच्या कैक मोहीमांची रुजूवात होता आजचा दिवस. कालच्या पेक्षा जवळपास अर्धा आणि विशेष चढ-उतार नसलेला, बऱ्यापैकी झाडी असलेला बाहत्तर किलोमीटरचा आजचा सरळ रस्त्याचा पल्ला लवकरच गाठला गेला. कुठे ताक, कुठे भुट्टा तर कुठे ज्युस घेत निर्मल कधी आलं ते कळलेच नाही. एकीकडे आज अर्धा टप्पा पूर्ण झाला म्हणून आनंद तर दुसरीकडे इथून पुढे लागणाऱ्या नॅशनल हायवे ची भूरळ. या स्वप्नरंजनात रात्र सरली आणि महामार्गाने आमचे स्वागत केले. निर्मल हून पुढे जायला दोन पर्याय होते. एक घाटातून गेलेला जुना रस्ता, तर दुसरा आम्ही निवडलेला महामार्ग. दिसायला एकदम गुळगुळीत डांबरी रस्ता, पण सायकली मात्र काही केल्या

म्हणाव्या तश्या पळेनात आणि वरुन त्यात घाट. महामार्ग असल्यामुळे बऱ्यापैकी काटछाट करून सरळ केलेला हा घाटातील रस्ता देखील अंगातलं पाणी काढत होता. तिसरा दिवस आमची परिक्षा बघण्याकरीताच उजाडला होता जणू. तीन चार तासांत घाट संपला कसाबसा, पण चढ-उतार मात्र दिवस सरेस्तोवर सहप्रवाश्यासारखे आमच्या सोबत होते. गाव म्हटलं की मोठ्ठाला उड्डाणपूल ठरलेलाच. आपले साधे रस्तेच बरे, ते मातीशी - झाडांशी असलेलं त्यांचं नातं घट्ट टिकवून ठेवतात. एक सळसळता उत्साह असतो त्यांच्यात, आणि अल्लडपणाही. दळणवळणाची सोय होत असेल महामार्गांमुळे आणि वाचतही असेल वेळ भरपूर, पण ते का कोणास ठाऊक, परके, भकास, गूढ वाटतात आणि सततच्या वर्दळीमुळे भेसूरही. एकशे सोळा किलोमीटर सायकलींग करत पांढरकवडा येथे पोहोचायला आजही रात्र झाली होती. आपण पाहिलेलं एखादं स्वप्न असं पूर्णत्वाच्या उंबरठ्यावर असताना.... शक्यअशक्यतेच्या पडताळणीत आपण खरे उतरलेलो असताना....मन कसं थाऱ्यावर असेल? इतका प्रवास करुनही मोरपिसासारखं हलकं हलकं वाटत होतं. रात्री जेवताना गप्पांचा फड आज दररोज पेक्षा जरा जास्तच रंगला होता. आम्ही सहाही जण तसे वेगवेगळ्या क्षेत्रातले पण सायकलींग मुळे एकमेकांत गुंतलेले.....हा प्रवास आमच्यातले हे बंध अधिकच खुलवत गेला, सोबत अनुभवलेल्या कैक क्षणांचा भागीदार बनवून गेला.


" जावूलालाव - करूलालाव " पासून निघालेले आम्ही, " जाऊलाल्या - करूलाल्या " ला वळसा घालून, अर्थबोध न होणाऱ्या तेलगू पुढे आपली भाषा म्यान करत, " जाऊन राहीलो - करून राहीलो " पर्यंत येऊन पोहोचलो होतो. रस्त्याप्रमाणेच भाषेनेही इथवर येईस्तोवर कैक वळणं घेतली होती. राहीलेले ऐंशी किलोमीटर आता आम्हाला खुणावत होते. चौथ्या दिवशी आमच्यातले आणि आनंदवनातले अंतर हळूहळू कमी होत असताना अर्ध्यातून महामार्गाची साथ संपली आणि पुन्हा माणसात आल्यासारखे वाटले. या चार दिवसांच्या प्रवासात पहिल्यांदाच, वाटेतील एका खेडेगावात, आमच्या सायकली पाहून, आमच्याभोवती एकाच वेळी चाळीस पन्नास शाळकरी मुलामुलींचा गराडा पडला. त्यांनी दिलेल्या डहाळ्याच्या बदल्यात काहीजणांनी आमच्या सायकलींची चक्कर मारली आणि संधीचं सोनं करीत मुकेश सरांनी पर्यावरणाचे महत्त्व सहज सोप्या भाषेत समजावून सांगत मुलांना घोषणा द्यायला लावल्या. अख्खा परिसर दणाणून गेला होता. आम्ही करीत असलेल्या सायकलींगचं आज खऱ्या अर्थाने चीज झालं होतं. कालौघात हरवलेलं भोवतालाशी असलेलं आपलं एक सुंदर, नाजूक नातं, आपल्याला सर्वांना मिळून जोपासायचं आहे हा संदेश मनामनात बिंबवणे ही काळाची गरज आहे. " झाडं लावा, जगवा, वाढवा. " या घोषणा आवेशाने देणाऱ्या त्या चिमुकल्यांच्या मनात हा अंकुर फुटावा अशी मनोमन प्रार्थना करत आणि हात हलवून ते देत असलेल्या निरोपाला प्रतिसाद देत आम्ही तिथून मार्गस्थ झालो. आमचं बोट धरून आम्हाला आनंदवनापर्यंत सुखरूप

घेऊन जाणारे मैलाचे दगड आता संपत आले होते. या मैलाच्या दगडांनीच आम्हाला पाठबळ दिलं होतं, आमच्यात एक नवा आत्मविश्वास जागवला होता. कोणत्याही प्रवासाचं हे असंच असतं, तो कधी ना कधी संपणारच असतो. पण आमच्याकरीता ही सुरुवात होती, स्वतः चा अवाका आणि त्याचा परिघ विस्तारण्याची, मुहूर्तमेढ होती एक..... मोठ्या विश्वासाने आम्ही रोवलेली.... आनंदवनात पाऊल ठेवताना मनात भावनांची कोण दाटी झालेली.एक भारावलेली दुपार होती ती,१९फेब्रुवारी२०२१ ची.. संकल्पपूर्तीची....जल्लोशाची....गहीवरलेपणाची आणि कृतकृत्यतेची.

आनंदवनात पाऊल ठेवल्यापासूनच त्याचं वेगळेपण नजरेत भरत होतं. का कोणास ठाऊक पण आपण फार थिटे आहोत हे ही आतल्या आत जाणवत होतं." ग्रामपंचायत कार्यालय आनंदवन"या कमानीतून आत गेल्यावर तिथे असलेलं एक वेगळंच विश्व आमचं स्वागत करत होतं. एक स्वच्छ, सुंदर आणि परिपूर्ण विश्व! संध्याकाळी ताजने काकांनी आमच्याशी मारलेल्या मनमुराद गप्पा म्हणजे आमचा सन्मान होता आणि त्यांनी उच्चारलेला एकेक शब्द म्हणजे आनंदवनाची बखर! धडधाकट विचारांच्या माणसांनी फुलवलेलं नंदनवन म्हणजे आनंदवन आणि आम्ही, जात- पात- धर्म आणि अहंमपणाचा बेगडी मुलामा काढून टाकलेल्या त्या खऱ्या माणसांच्या सहवासात होतो. आपल्या सारख्या सर्वसामान्य माणसांच्या कल्पनेपलीकडलं आहे हे सगळं. शारीरिक मर्यादांना कोसण्याऐवजी किंवा सहानुभूती मिळवण्याऐवजी स्वतःतील हुनर जोपासणारी ही स्वाभिमानी माणसं! विविध प्रकारची अप्रतिम कलाकुसर करणारे कलाकार तिथे होते, कुशल कारागीर होते, विविध क्षेत्रात पारांगत असलेले कामगार होते, ध्येयाने प्रेरित होऊन स्वतः चं उभं आयुष्य वेचलेले निष्ठावान कार्यकर्ते होते,"स्वरानंदन"या महाराष्ट्रभर गाजलेल्या इथल्या ऑर्केस्ट्रा चे गायक- वादक- निवेदक होते. शिवकाकांनी दाखवला आम्हाला सगळा परिसर. आनंदवनाच्या वतीने राजेश दादांनी आमची केलेली राहण्याची व्यवस्था, विचारपूस, आदरातिथ्य,स्वरानंदनच्या प्रतिथयश कलाकारांनी खास आमच्याकरीता पेश केलेली अदाकारी आणि ताजने काकांच्या हस्ते पुस्तकं भेट देऊन करण्यात आलेले आमचे सहृदय स्वागत.... हे आमच्याकरीता जीवन गौरव पुरस्कारापेक्षा कमी नव्हते. आनंदवनाच्या परिसरात व्यतीत केलेल्या या चोवीस तासांत जशी आम्ही जेवणं झाल्यावर स्वतः ची ताटं स्वतः धुतली, तशीच मनंही धुवून काढणार आहोत स्वतःची, इथल्यांच्यासारखी लख्ख आणि निकोप व्हावी म्हणून... सोमनाथ ला गेलेले असल्यामुळे विकासभाऊंची न झालेली भेट ही खंत नेहमीकरीता सोबत करणार होती. पण नंतर लक्षात आलं की, त्याकरिता पण नशीब लागतं. या अविस्मरणीय प्रवासाच्या मूळ आणि मूक साक्षीदारही असलेल्या आमच्या सायकली एव्हाना एस टी महामंडळाच्या पार्सल विभागात आम्ही नेऊन पोहोचवल्या होत्या. निरोपांची देवाणघेवाण होताना प्रभूकाकांची भेट झाली. एका मोठ्या स्वप्नाची पूर्तता

होऊन परतीच्या प्रवासाला सुरुवात झाली होती.पण........बाबा आणि ताईंच्या समाधी समोर विनम्रपणे नतमस्तक होताना, तिथेही हजर असलेली तिसरी पिढी मात्र मनाला चटका लावून गेली होती.

**- डॉ. संजय शेषराव कुलकर्णी / उदगीर**
**मो.- ९९६०६१२८०१**
(लेखक कान नाक घसा तज्ञ आहेत.)



# ज्ञानाचा दीवा



एक दिवा लावु ज्ञानाचा मनात
अंधकार नष्ट होईल जीवनात ।।धृ।।
ज्ञानाचा वसा घेऊया चला
तेवत ठेऊया या पणतीला
प्रगतीचा काळ समिप आला
सूर्याला गवसनी घालुया चला
सज्ञान होता पत वाढेल,
आपोआप जनात।।

घरोघरी लावु ज्ञानाचा दिवा
नष्ट करण्या अंधार तो तेवत ठेवा
बिज साक्षरतेच इथ लाऊन जावा
निरक्षरतेला या हटवु मानवा
ज्ञान सर्वश्रेष्ठ जगी,काय ठेवलय
धनात ?।।

ज्यांना कोनाचा मिळेना आधार
त्यांच्यासाठी जगण्याचा करुया
निर्धार
ज्ञानरुपी रांगोळी होऊ दे साकार
साक्षर करु भारता घेईल आकार
ज्ञानसंपन्न भारत बनुदे, गर्जुया
कानात।।

वंचितांच्या
चेहऱ्यावर आनंद
निराळा
साजरा करु
ज्ञानवंतांचा मेळा
हाच क्षण आहे आज दिवाळी सोहळा
ज्ञानाच ऊटणं लाऊ संस्काराचा
लळा
दिप लावु शिक्षणाचा, या
मंगलमय क्षणात ।।

वाचाल तर वाचाल हे ध्यानात ठेवा
ध्यानात ठेवा अन मनात ठेवा
शिकुन साक्षर व्हाव रे भावा
अडाणी राहुन करशिल कुणाचा
धावा?
साक्षर मिशन, ध्येय ठेऊया
ध्यानात।।

- श्री. हरिबा महादेव कोळी / दानोळी
मो.- 7588270093

# पणती



तनु मोठी झाली ती शहरांमध्ये एका मोठ्या कंपनीत छानसा जॉब करत होती. नुकतीच दिवाळी जवळ येणार होती. त्यामुळे ती खरेदीला गेली होती. एका दुकानांमध्ये पणती बघून तनु जुन्या आठवणीत रमून गेली. काळ लहानपणीचा होता. ती तेव्हा सातवीला होती. त्या गावात फक्त सातवी पर्यंतच शिक्षण होतं. काही दिवसांवर दिवाळी येऊन पोहचली होती. तेव्हा शिक्षिका वर्गातल्या विद्यार्थ्यांना दिवाळीच्या सुट्टीतला अभ्यास देत असत. "दिवाळीच्या पहिल्या दिवसापासून ते शेवटच्या दिवसापर्यंत जे जे तुमच्या घरात दिवाळीनिमित्त कराल त्याबद्दल तुम्हाला लिहून आणायचं आहे." असा अभ्यास होता आणि खडसावून सांगितलं कि, "हा सुट्टीचा अभ्यास, सर्वांनी पूर्ण करून आणायचा. फक्त दिवाळीत खात-पित आणि नवे कपडे घालून मिरवायचं नाही..."

गावातील एकुलत्या एक सरकारी शाळेतील कर्तव्यनिष्ठ शिक्षिका वर्गातील मोठ्या मुलांच्या समूहाला सांगत होत्या.

विद्यार्थ्यी लगेच दिवाळीच्या नावानेच आपापसात कुजबुज करून गलबला करू लागले. पण तनु मात्र अभ्यास कसा करायचा यावर शांत बसून विचार करत होती. काही वेळा नंतर शाळा सुटली विद्यार्थ्यांनी कल्ला करत घराच्या दिशेने धूम ठोकली. तनुला मात्र इतकं लांब अंतर पायी कापून घरी पोहचण्याची धडपड.

घरी जात असताना दिवाळी साठी सज्ज दुकाने तसेच खरेदीसाठी लोकांची झुंबड दिसत होती. रंगीबेरंगी रांगोळ्यांचे ढीग, बाजूलाच वेगवेगळ्या आकाराच्या नक्षी असलेल्या रंगवलेल्या पणत्या तनुच लक्ष वेधून घेत होत्या. मधेच कुठून तरी कपड्याच्या दुकानातून किंमतीवर घासाघीस ऐकू येत होती. इकडे मात्र तिने जाणीवपूर्वक नजर जाऊ दिली नाही.. वेगवेगळे आकाशकंदील वाऱ्यावर झुलत घरांची वाट पहात होते. तर विविध फराळाच्या पदार्थांची विक्रीही जोरदार सुरू होती.

"दिवाळीत इतकं सगळं करतात का? आपण तर कधीच काही करत नाही इतकं..!" तनु आईला विचारत होती. आई बिचारी सगळं माहीत असून ही तनुला कस बसं समजवायला बघत होती.

तनु दुपारी शाळेतून आल्यावर त्याच विचारान झोपी गेली.

"तनु , अगं ऐ तनु ! ऊठ. सूर्यनारायण कलतीला झालाय...साऱ्या गावात दिवे लागल्यात. ऊठ बाळा. असं तीन सांजेच्या यळी झोपू नये." आजी आपली तनुला उठवत होती.

"आजी, माझी झोप नाही पुरी झाली. थोड्या वेळाने उठते."तनु म्हणाली.

"अगं असं सणासुदीला सांजच्या यळी झोपून राहणं ग्वाड नव्हं"

"पण... आजी आपण काहीच तर करत नाही ना दिवाळी सणाला.. मग काय उपयोग....मला तर अभ्यास पण याच विषयावर दिलाय...मग ते पूर्ण कसा करणार मी."

"अभ्यास दिला होय. चल की मग काय होते. आपण दिवाळी साजरी करूयात. मग तू तुझा अभ्यास लिहून टाक."

"पण आई म्हणते आपल्याकडे दिवाळी साजरी करण्यासाठी पैसे नाहीत"

"अगं बाई, दिवाळी साजरी करण्यासाठी पैसे नाही तर उत्साह अन् आनंद लागतो. चल ही दिवाळी आपण जोरदार साजरी करू पण ते करण्यासाठी मला तू मदत करशील हा ! चल मग आपण तयारी करू." असं म्हणून आजी तनुला स्फूर्ती देत दिवाळीच्या सणासाठी तयारी करु लागली. तनुने बाहेरून जे जे ऐकलं ते ते ती आजीला कुतूहलाने सांगू लागली. "आजी रोज पणत्या लावतात ना ! मोठमोठ्या रंगीत रांगोळ्या काढतात ना ! आकाशकंदील लावतात जो दिवाळी संपल्यानंतरही महिनाभर ठेवतात ना ! फराळ बनवतात, एकमेकाला देतात, नवे कपडे, वस्तू खरेदी करतात ना !" छोटी तनु अचंबित होऊन आजीकडे बघत सारं काही सांगत होती.

जशी आई बाजार घेऊन आली तशी तनु आणि तिचे मोठे बहीण -भाऊ धावत जाऊन पिशवी धुंडाळू लागले. पण, दिवाळीच्या तयारीचं त्यात काहीही नव्हतं.. कांदे ,बटाटे ,टोमॅटो असलंच दैनंदिन सामान बघून तिघेही हिरमुसले. कारण त्यात दिवाळीची तयारी म्हणून फक्त उटणे आणले होते. आसपासच्या ओळखीच्या बाया आईला सांगताना तनु ऐकत होती...

"करंज्या झाल्या बनवून, लाडू झाले, आता बाकीचं बनवायचं, कढीपत्ता द्या ना चिवडा बनवणार आहे. तुमचं कुठवर आलं काय काय बनवलं ?"

आईला त्यांच्या बोलण्यातली खोच समजायची. "आमचं पण झालंय बनवून." अस सांगून आई मोकळी व्हायची...

"आई आपण तर काहीच नाही बनवलं मग तू तर सगळं केलं म्हणून सांगितलं असं का? कधी करायचं आपण?"

"पोरी तुझ्या बाबांना काम नाही. पैसे नाहीत कुठून आणणार सगळं आणि कुठून बनवणार? रोजचा दिवस कसा घालवायचा तेच समजत नाहीय... आपला त्रास आपल्यालाच माहिती!"

तनूला आज खरी गोष्ट समजली होती,पण तिच्या मोठ्या बहिणीला आधीपासूनच माहीत असल्यानं,तिने कधी हट्ट केला नव्हता.

आजीनं हाक मारली,"चला रं पोरांनो पणत्या बनवायला घेऊयात." आजी अन् पोरं चिखल मातीपासून पणत्या बनवण्यात गुंग झाली.. पण प्रत्येक पणती सुकल्यानंतर पेटण्याआधीच मोडून जायची. त्यातलं तेलही वाया जायचं. परत त्यावर आईचा ओरडा

व्हायचा. हे माहित होतं म्हणून...तीची मोठी बहिण आणि आजी पणती बनवल्यानंतर ती मोडणार नाही याची काळजी घेत शेवटचा हात फिरवत होती.

घर रंगवण्यासाठी आणलेला शेडू ,जुने फाटलेले जॅकेट मधील नायलॉन चे धागे, चाळण, पाणी असं सगळं घेऊन भराभर वेगवेगळ्या आकार प्रकारच्या पणत्या बनवून त्या सुकण्यासाठी ठेऊन दिल्या. मग घरातील विविध उपलब्ध असणारे रंग घेऊन रंगीन रांगोळ्या बनवल्या. अगदी उपेक्षित कोळसा, विटेलाही तिने वरवंट्याने बारीक करून इतर रंगांसोबत जागा दिली...

सुकलेल्या पणत्यांना त्यांच्याकडील पेंटिंगच्या रंगाने सजवले. घरातील जे काही सामान असेल त्यानुसार चौघांनी मिळून कंदील बनवला.

पोरांचं आणि आजीचं कौतुक बघण्यावाचून आई –बाबा काहीच करू शकत नव्हते.

दिवाळीचा पहिला दिवस अजून उजाडायचा होता. कडकडून थंडी पडली होती. दाट धुक्यात सगळं काही समावून घेतलं होतं. आदल्या दिवशीच आजीनं तनु च्या मदतीनं शेणानं जमीन सारवून मोठा सडा टाकून ठेवला होता. तिचे भावंडं सगळं सामान घेऊन दिवाळी साजरी करायला तयार होते.. आदल्या दिवशी ठरवलेली रांगोळीची डिझाईन घेऊन दोघी सुरु झाल्या. डासांचा त्रास रोखण्यासाठी मागे पालापाचोळा पेटवून धूर ही बनवला होता. बघता बघता धुकं सरून सूर्य प्रकाशाचं राज्य आलं. तोपर्यंत पोरीनी भली मोठी रांगोळी काढली होती. दिवसभर त्या रांगोळीचे रंग उन्हाने



इतर रंगासारखे फिके पडणार नाहीत ना म्हणून काळजी घेतली होती. मिळेल त्या फुलां- पानांपासून घर सजवलं होतं. घर अगदी रोजच्यापेक्षा खूप सुंदर दिसत होतं.

तनुची दिवाळी सुरु झाली होती. संध्याकाळ झाली तशी तनू पणती लावण्याची वाट बघत होती. आईने कणकेचा दिवा लावला. आपल्या कुटुंबासाठी प्रार्थना करून ती आत गेली. तशी तनु हळूच आपल्या बनवलेल्या पणत्या घेऊन आली. ती आणि तिच्या बहिणीने घाबरतच तेल घालून पेटवल्या आणि निरीक्षण करत बसल्या. तेल पूर्ण संपल पण पणती फुटली नाही. हे पाहून दोघींच्या आनंदाला पारवार उरला नाही. मग आईही त्यांना साथ देत विजलेल्या पणत्या एकाजागी आणून ठेवायची. इकडे वेडावाकडा कंदील ही रात्रीच्या अंधारात पणत्याची सोबत घेऊन झुलत होता. तनुची दिवाळी साजरी करण्याची इच्छा जणू सर्वांनी पूर्ण करण्याचं ठरवलं होतं. आजच्या दिवसाचा तिचा आनंद इतका मोठा होता की, फराळाच्या पदार्थांची उणीव तिला जाणवली देखील नाही.

दुसऱ्या दिवशीच्या रांगोळीची डिझाईन ठरवून आणि बाकी तयारी करून दोघी बहिणी आनंदाने झोपी गेल्या. दुसऱ्या दिवशीही अशी मोठी आकर्षक रांगोळी, संध्याकाळी इतक्या पणत्या ! हे रस्त्यावरून येणाजाणाऱ्या लोकांसाठी कुतूहलाचा विषय बनले. इतके की ते काही क्षण थांबून हे दृश्य डोळ्यात साठवून घेऊ लागले, पण इतक्या इतक्या कीलोचे इतके पदार्थ बनवले अस सांगणारे ही आता नजर चोरु लागले. “काय लॉटरी लागली वाटतं...!” इथपर्यंत बायका बोलून गेल्या. लोकांना काय माहिती तनुची दिवाळी कशी साजरी होतेय ते.

प्रत्येक दिवस तनुचा होत चालला होता. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी मात्र तनु आणि घरातील सर्व मंडळी हतबल होते.. नवे कपडे नव्हते कुणाकडेही आणि यात तीच काय तर कोणीही काहीही करु शकत नव्हते. जे जसं आहे त्यातच साधेपणाने पण श्रद्धेने पूजा केली. अगदी निवदासाठीही काही गोडधोड बनवणं शक्य नसल्याने रोजचे जेवणंच निवद बनवले होते.

पाडव्याला. घरच्या भाकड असलेल्या जनांवरांचं औक्षण केलं. शेणानं बनवलेल्या गवळणी आणि त्यांची मुले, जाते, भाकरी, भाजी, डोक्यावरील टोपली सगळं. त्यांना शेतातील कुर्डूची फुलं , आघाडा, मका, झेंडू यांनी घरातील उखळाभोवती पूजा करायची. चुन्यात हाताचे ठसे भिजवून जनावरांच्या खुराचे निशाण जमिनीवर उमटवायचे. मिळाला तर ऊस लावायचा नाहीतर ज्वारी. हे सगळं आजी खुप लाडाणं आणि कौतुकानं करायची. तनु इथे फक्त रांगोळी काढण्या पुरती असायची. शेणाच्याच गवळणी आणि त्यांचं जेवण वस्तू ही शेनाच्याच होत्या. फक्त त्यांच्या टोपलीत दही तेवढंच असायचं. त्यांनाही कधी नैवेद्य म्हणून गोडधोड मिळालं नाही.. पिठलं भातावरच त्या समाधान माणून संध्याकाळी घरच्या छपरावर जाऊन बसायच्या आणि मग वाजणाऱ्या फटाक्याकडे बघत राहायच्या. समाधान मानायच्या खाली घरातील

बोका कृष्ण बणून त्यांच्या टोपलीतील दही चाटून आपली दिवाळी साजरी करायचा. भाऊबीजेला भावाच औक्षण हसत मस्करित पार पडायचं. अगदी ओवाळणी म्हणून दार्शनिक किंवा वस्तू रुपातही काही मिळत नसलं तरी, दोघी बहिणी हट्ट न करता सगळं समजून घ्यायच्या. दिवाळी संपली, सगळ्या पणत्या ,रांगोळी गोळा करून घरात वरती कुठेतरी पुढच्या वर्षासाठी ठेवून दिल्या जाऊ लागल्या,

पण माझी बनवलेली एक पणती तुळशी जवळ आजीनं तेवत ठेवली होती. “आजी ही पणती इथे का ठेवलीस.” तनु ने विचारले.

“अगं ही पणती आपण अशीच तेवत ठेवूयात. या दिवाळीच्या आठवणीत ही पणती आपल्याला सदैव दिवाळीची आठवण करून देत राहील आणि ती पणती सदैव तेवत राहील यासाठी सगळेच काळजी घेत होते.

रात्रीच्या अंधारात आकाशकंदील आपलं वेडंवाकडं अंग वाऱ्याच्या हेलकाव्यासोबत सांभाळत पणतीला सोबत करत नव्या उद्याची वाट पाहत राहायचा. इतरांसारखी दिवाळी कधी साजरी करणं जमलं नसलं तरीही तनुची दिवाळी मात्र खऱ्या अर्थाने साजरी झाली होती. रोज मोठमोठ्या रंगीत रांगोळ्या, पणत्यांची आरास, वेडावाकडा असला तरीही स्वतः बनवलेला आकाशकंदील, पिठलं भाताच्या नैवेद्यावर समाधान मानून गेलेल्या शेणाच्या गवळणीचा गोतावळा आणि त्यांच्या टोपलीतील दही खाऊन समाधानाच पावणारा बोका ! ओवाळणी मिळाली नसली तरीही आशीर्वादाची वाढत जाणारी शिदोरी ! सकाळच्या थंडीत उटण्याने आंघोळ. असं सगळंच तर होतं. कारण हे सगळं तिच्या आवाक्यात होतं, तिने घडवून आणलं होतं.

पण नवे कपडे ? या एका प्रश्नचिन्हाबरोबर तनुची दिवाळी संपली होती.

सुट्टया संपल्या. वर्ग भरला. “सगळ्यांनी सुट्टीचा अभ्यास केलाय का? ज्यांनी केला नाही ते उभे राहा आणि ज्यांनी केलाय त्यांनी इकडे टेबलावर आणून ठेवा.” शिक्षिका स्थिर आणि कडक आवाजात बोलत होत्या. तनुने आपला अभ्यास जमा केला. ज्यांनी नाही केला त्यांची उलटतपासणी झाली. छडीची शिक्षाही झाली. वर्गात अभ्यास तपासणी करता करता शिक्षिका एक वही हातात घेऊन विचारू लागल्या. “ही कोणाची वही आहे?”

आपली वही बघून तनु घाबरली. कारण ती नवी वही नव्हती. सुटे ताव एकत्र करून त्यावर जुन्या वहीचा पुठ्ठा लाऊन काहीशी ओबडधबड वही बनवली होती तिने सुट्टीत. “माझी आहे.” तनु उभी राहात घाबरतच बोलली. मधेच असं नवी वही घेणं तिला परवडणारं नव्हतं. तनुला समोर बोलवत शिक्षिकेने तिची वही सर्वांसमोर उघडून पूर्ण वर्गाला दाखवायला सुरु केली.

बघा किती सुंदर पद्धतीने अभ्यास केला आहे. पूर्ण तर आहेच पण व्यवस्थित व सुटसुटीतही आहे. हस्ताक्षरही सुंदर काढले आहे. शिवाय जुन्या वस्तू वापरून वही बनवलेली आहे. तुम्हाला यातून शिकलं पाहिजे.” तनुला अशी अकल्पित शाबासकी

तिच्या दिवाळीच्या आनंदाला द्विगुणित करून गेली. कदाचित तिच्या दिवाळी साजरी करण्याच्या कल्पनेलाही ती शाबासकी होती. असंही तिला वाटलं.. याचं सगळं श्रेय तिने मनोमनी आजीला दिलं.

तनूला आनंदात बघून घरातल्या सर्वांनी हिचे भाव ओळखले होते.

“का ग काय झालं ? आज शाळेत तुझं कौतुक झालंय ना!” आजीनं विचारलं. “हो आजी तुला कसं कळलं.” म्हणतं तिनं आजीला पापा देत मिठी मारली. तनुच्या आनंदाला पारावार नव्हता, म्हणून जे गोडधोड दिवाळीत खायला जमलं नाही ते गोडधोड त्या दिवशी शिऱ्याच्या रुपात सगळ्यांना खायला मिळालं. शेवटी, काय तर आजीमुळे सर्वांची दिवाळी अगदी मजेत, उत्साहात आणि आनंदात पार पडली होती. आजीच्या छान छान गोष्टीमुळे. सारे जण सुखावून झोपी जात होते.

अगदीच पहाटे पहाटे एक हंबरडा ऐकून तनुला जाग आली होती. हा आवाज कसला म्हणून ती डोळे चोळत चोळत बाहेर आली. बघते तर काय आजीच्या भोवती सर्वजण रडत होते. ते आठवुन तिला काही कळेनाशी सुन्न झाली होती.

तितक्यात आईच्या फोनने ती भानावर आली. ती नोकरीला लागल्या नंतर पहिल्यांदाच घरी जाणार होती म्हणून सर्वांसाठी नवे कपडे घ्यायचे ठरवले होते, कारण या इतकी अमूल्य खरेदी दुसऱ्या कशाची असू शकेल असं तिला वाटलं.

कारण तेव्हा आजी होती पण नवे कपडे नव्हते अन् आता नवे कपडे आहेत तर आजी नाही. ही खंत मनी घेवुन ती गावाकडच्या प्रवासाला निघाली होती.

**- सौ. रुचिरा बेटकर / नांदेड**
**मो.- ९९७०७७४२११**



# साथ

स्वार्थापुरत्या नात्यांमध्ये
कधीच नसतो ओलावा,
खोटा तराजू त्या नात्याचा
कधी कुणी ना तोलावा.. !!

संसाराचे ओझे आले
उतार वयात खांद्यावर,
दुःख उगवले पुन्हा कोवळे
आयुष्याच्या फांद्यांवर..!!

जळमटलेल्या डोळ्यांमध्ये
सूर्य बुडाला धैर्याचा,
आयुष्याच्या दारामध्ये
काळ ठाकला वैऱ्याचा

दुभंगलेली आशा ठेवून
वाट पाहतो लेकाची,
साथ सोडली नाही आम्ही
कधीच एकमेकाची



- गो. शि. म्हसकर / नगरदेवळा
मो.- 9156077097

# ‘शहाण्या माणसांचा क्लास’



“अरे, पण गरज काय आहे याची?” हे वाक्य ज्यांना योग्यवेळी, योग्य ठिकाणी, योग्य गोष्टीविषयी आणि योग्य व्यक्तीशी बोलताना वापरता येतं ना, ती माणसं शहाणी असतात. जपून वागतात, जपून जगतात आणि जगताना इतरांनाही जपतात.

ऊठसूठ हॉटेलात जाऊन खाणार नाहीत, सतत बाहेरून पार्सल मागवणार नाहीत, सारखी खरेदीही करणार नाहीत. रेल्वे स्टेशन किंवा एसटी स्टॅन्डवर पहाटे साडेचार किंवा पाच वाजता एकटे उतरले तर अर्धा तास तिथंच थांबतील. भल्या पहाटे जाऊन घरच्यांच्या साखरझोपेचा विचका करणार नाहीत आणि दुप्पट-तिप्पट पैसेही खर्च करणार नाहीत. अर्धा तास थांबतील, बसेस सुरु झाल्या की शांतपणे घरी पोचतील. सकाळचा पहिला चहा घरीच घेतील, सात वाजता आलेला वर्तमानपत्राचा ताजा अंक वाचतील. अर्धा तास वाचवण्यासाठी जिवाचा आटापिटा करून तिप्पट पैसे खर्च करणार नाहीत. पण कुटुंब असेल, लहान बाळ असेल तर असं वागणार नाहीत. रिक्षा करतील, थोडीफार घासाघीस करतील, आणि घरी जातील. हे जगण्यातलं व्यावहारिक शहाणपण पिढ्यानपिढ्या रक्तात मुरलेला एक वर्ग आपल्या समाजात आहे. अनेकजण त्यांना मिडलक्लास म्हणतात, पण माझ्या लेखी ती खरी शहाणी माणसं असतात. त्यांना ‘मजेत जगावं कसं?’ हे समजायला पुस्तक वाचावं लागत नाही, ते मजेतच जगत असतात. किंबहुना, जगण्याचा आस्वाद घेण्याची कला त्यांना जन्मजात अवगत झालेली असते.

आपलं मूल अनवाणी शाळेत जाणार नाही याची काळजी त्यांना असते. ती काळजी वूडलँड, क्रॉक्स, ली कूपर, बाटा यांनी शांत करण्याचा उद्योग ते करत बसत नाहीत. लखानी किंवा पॅरागॉन ते आनंदानं निवडतात, आनंदानं वापरतात, गरजा पूर्ण करतात आणि मस्त राहतात.

स्वत:ची वाहनं ते स्वत: धुतात, पुसतात. सायकलला स्वत:च ऑईलिंग करतात. घरातल्या पंपानं सायकलच्या टायरमध्ये हवा भरतात. सुटी फुलं आणतील, देवाच्या पूजेचे हार स्वत: तयार करतील. बुटांना पॉलिश स्वत:च करतील. ते रोज जमणार नसेल तर बाहेरून आल्यावर बूट काढले की, मोज्यानंच ते बूट स्वच्छ पुसतील, आत ठेवतील आणि मग मोज्यांचा जोड धुवायला टाकतील. हे काटकसरीचं जगणं नसतं, हे योग्य जगणं असतं.

ज्या खोलीत कुणी नसेल तिथले लाईट्स आणि पंखे बंद ठेवतात. गरज नसताना घरभर दिवे आणि पंखे विनाकारण चालू ठेवण्याचा शौक त्यांना नसतो. रात्री खिडक्या

उघड्या ठेवून झोपतात, एसीची गरज पडत नाही. गरज नसताना 'बाय वन गेट वन फ्री' च्या शंभर जाहिराती पाहिल्या तरीही त्यांना काहीही फरक पडत नाही. पण गरज असेल तेव्हा रेमण्ड, सियाराम, अरविंद मिल्स, विमल असंच कापड घेतील. रेडिमेड घेण्यापेक्षा शिवून घेतील. मस्तपैकी चार-पाच वर्षं तरी सहज वापरतील.

घरी कुणी आलं की, पोह्याचा चिवडा, भडंग, खोबऱ्याची वडी किंवा शेंगादाण्याचा-रव्याचा-बेसनाचा लाडू मनापासून देतील आणि नंतर आलं घातलेला कपभर चहा.. (हे सगळे पदार्थ घरीच स्वहस्ते केलेले असतात आणि चहापत्ती होलसेल मार्केटमधून आणलेली असली तर आलं, गवतीचहा, चिमूटभर सुंठ घालून तिला फक्कड रंगत कशी आणायची, हे तंत्र बरोब्बर समजलेलं असतं.) आल्यागेल्याचा, पै-पाहुण्यांचा पाहुणचार मस्त करतात, रिटर्न गिफ्ट म्हणून उगाचच महागड्या गोष्टी देऊन इंप्रेशन मारायला जात नाहीत.

सणावाराला घरी गोड पदार्थ तर होणारच. घरच्या तुपातला शिरा, शेवयाची खीर, चक्का आणून घरी केलेलं श्रीखंड (अनेकदा चक्कासुद्धा घरीच करतात) हे पदार्थ पेटंट असतात. अचानकच गोड खाण्याची हुक्की आलीच तर केळ्याचं शिकरण दोन मिनिटांत तयार..! घरात कुणी नसेल आणि एकटाच मुलगा किंवा पुरुष जरी असेल तरी स्वत:च्या वेळेपुरती मुगाची खिचडी त्याला करून खाता येते. दुपारच्या उरलेल्या पोळ्यांची वरणफळं त्याला बरोबर जमतात. कालचा उरलेला भात फोडणी देऊन सकाळी खाता येतो. किंवा वेळप्रसंगी दहीपोहे करूनही उदरभरणाची सोय करता येते. त्यासाठी हॉटेलची पायरी चढण्याची गरजच पडत नाही. ह्या जगण्याला लो प्रोफाईल, मिडलक्लास किंवा चिक्कूपणा म्हणणारी माणसं बिनडोक असतात. कारण, हे परफेक्ट आत्मनिर्भर जगणं आहे.

यांच्या घरातले पुरुष दळणं आणतात, वाणसामान आणतात, भाजी आणतात, इस्त्रीचे कपडे लॉन्ड्रीत नेऊन देतात आणि घेऊनही येतात.रद्दीवाल्याकडे स्वत:च रद्दी घेऊन जातात. स्वत: पानं घेणं आणि जेवण झाल्यानंतर स्वत:चं ताट स्वत: घासणं, फरशी पुसणं यात त्यांना काहीही गैर वाटत नाही. पहिल्या पगारात घेतलेलं घड्याळ ते रिटायर होईपर्यंत छान वापरतात. पाच-सात वर्षं चष्म्याची फ्रेम बदलत्या नंबरनुसार काचा बदलून वापरतात. याच्यात त्यांना कसलाही कमीपणा वाटत नाही.

मुलाचा पहिला वाढदिवस, पाचवा वाढदिवस खाजगी हॉल किंवा पार्टी हॉल घेऊन साजरा-बिजरा करत नाहीत. असल्या कृत्रिम आनंदाची त्यांना गरज नसते. पण मुलांच्या शिक्षणाविषयी मात्र अजिबात तडजोड नसते. अगदी निगुतीनं मुलांना शिकवतात. महागड्या ब्रॅन्डेड गोष्टी चांगल्या असतातच असं नाही, यावर त्यांचा पूर्ण विश्वास असतो. त्यामुळं, चांगली शाळा ते बरोबर निवडतात आणि मुलांना शिक्षण देतात. मुलांना खाऊनही माजू देत नाहीत आणि टाकूनही माजू देत नाहीत. सापशिडीतल्या ९८ आकड्यावरच्या सापाला घाबरायचं नाही, हे आपल्या मुलांना

शिकवायला त्यांना कुठल्याही मोटिव्हेशनल ट्रेनरची गरज भासत नाही, ते स्वतःच खंबीर असतात. आवश्यक तेवढी यथाशक्ती बचत करून, साधी सरळ भरवशाची गुंतवणूक आणि साधा जीवनविमा एवढ्यावर त्यांना सुरक्षित वाटतं. गडगंज श्रीमंत होण्याचा हव्यास ते धरत नाहीत. अनैतिक मार्गानं काहीही कमावण्याचा विचारही करत नाहीत. “जोडोनियां धन उत्तम व्यवहारें, उदास विचारें वेच करीं” या तुकोबारायांनी सांगितलेल्या पक्क्या धारणेनं जगतात. म्हणून त्यांची वखवख होत नाही, त्यांना भस्म्या होत नाही. षड्रिपूंचा त्रास तर अजिबात नाही.. हेच तर खऱ्या अर्थानं निरामय आयुष्य आहे ना..!

घरात महागडं इंटिरिअर नसलं तरी, घरी कामाला येणाऱ्या बाईंच्या मुलांच्या वह्यापुस्तकांसाठी मात्र बरोबर पैसे दिले जातात, अगदी न चुकता. सकाळी दारी आलेल्या वासुदेवाला किंवा समर्थ संप्रदायातल्या माधुकरी मागणाऱ्यांना तांदळाचं माप मिळतंच. दरवर्षी दिवाळीला पोस्टमनला शंभराची नोट मिळते. सगळ्या रेषा कशा अगदी समांतर.. कशाचंही तंगडं कशातही अडकत नाही, कसला गुंता नाही, वैचारिक गोंधळ नाही. बेष्ट आयुष्य..! समंजस आयुष्य..! विनाशर्त विनातक्रार संपूर्ण स्वीकारलेलं आयुष्य..!

‘क्रेझ’ या गोष्टीशी यांचा लांबून-लांबून संबंध नसतो. म्हणून यांचे व्याप मर्यादित असतात. आयुष्याकडून फार अपेक्षा नसतात, हट्ट-दुराग्रह तर अजिबातच नाहीत. वर्षाकाठी दिवाळीसारख्या एखाद्-दुसऱ्या प्रसंगी कापड खरेदी वगैरे होते, जमल्यास गुरूपुष्यामृताच्या दिवशी एक ग्रॅम सोनं घरी येतं आणि देवघरात देवासमोर ठेवलं जातं. अट्टाहास कुठलाच नाही. ह्या जगण्याला ते ‘हा माझा मार्ग एकला’ असं म्हणू शकतात, पण ‘मैं जिंदगी का साथ निभाता चला गया’ हे म्हणणं त्यांना साधलेलं असतं. ह्या जगण्याला काय म्हणाल? मिडलक्लास? नाही. हा तर खरा वरचा क्लास.. विषमभुज त्रिकोणालासुद्धा समभुज करण्याची अफाट विलक्षण शक्ती ज्यांच्या दृष्टीकोनात ठासून भरली आहे असा क्लास...!

मला फार आनंद आहे की, मी याच क्लासमधला आहे.. मग कुणी त्याला मिडलक्लास म्हणो किंवा मध्यमवर्गीय.. पण हाच आहे खऱ्या शहाण्या माणसांचा क्लास...!

**- डॉ. राजेश गायकवाड / अ.नगर**
**मो.- 8848941635**

• **'व्यक्तिमत्व विकास'** हे नियतकालिक मुद्रक, मालक, संपादक आणि प्रकाशक मंगेश विठ्ठल कोळी यांनी कवितासागर प्रिंटींग सर्व्हिसेस, जयसिंगपूर येथे छापून 'व्यक्तिमत्व विकास' कार्यालय, सुदर्शन, प्लॉट १६, पद्मावती सोसायटी, बायपास रोड, नांदणी नाक्याजवळ, जयसिंगपूर - ४१६१०१, तालुका - शिरोळ, जिल्हा - कोल्हापूर, महाराष्ट्र, भारत येथून प्रसिद्ध केले.

• फोन - ०२३२२ - २२५५०० भ्रमणध्वनी - ०९०२८७१३८२०

• ईमेल - mangeshvkoli@gmail.com

• संपादक - श्री. मंगेश विठ्ठल कोळी.

• कार्यकारी संपादक - डॉ. सुनिल दादा पाटील

• वादविवाद जयसिंगपूर न्यायालयाच्या कक्षेत.

• या अंकामध्ये प्रकाशित झालेल्या मजकुराशी मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक सहमत असतीलच असे नाही.

• पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी मंगेश विठ्ठल कोळी यांच्यावर आहे.

• व्यक्तिमत्व विकास या नियतकालिका मधून प्रसिद्ध झालेल्या कथा, कविता, लेख व अन्य साहित्यांचे सर्व हक्क राखून ठेवलेले आहेत.

• **वार्षिक वर्गणी** - ४९९/-

• प्रकाशनाचा वार - प्रत्येक आठवड्याचा शनिवार

• वितरणाचा वार - प्रत्येक महिन्याचा शेवटचा शनिवार

# बीज बोऊ नव चैतन्याचे



प्रकृतिच्या सानिध्यात
मन होते उल्हासित
देऊन जातो कण न कण
नवचैतन्याची खाण

लावुनि एक रोपटे दारी
जगवुनी तया दूर प्रदूषण करु
आज गरज आहे हिरवळीची
कमी न होऊ देवु ऑक्सीजनची

पशु पक्षी ज्यांचा मित्र तू
मानव जीवनाचा रक्षक तू
वेद पुराणाची
ओळख तू
फळा फूलांचा करसी वर्षाव तू

वृक्ष वल्ली आम्हा सोयरे
करु आदर तयांचा
होवू सुजाण नागरिक
बोऊनी बीज नव पल्लवाचे

New Hope
FOR A BRIGHTER FUTURE

- प्रा. मनीषा नाडगौडा / बेळगाव कर्नाटक
मो.- 9241523418

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020



दररोजच्या जीवनात बदल अत्यंत गरजेचा आहे.ज्याप्रमाणे साचलेले पाणी पुढे न जाता एकाच ठिकाणी साचून राहते तेंव्हा त्याला वास येतो व ते वापरण्यायोग्य रहात नाही. त्याचप्रमाणे प्रत्येक गोष्टीत नवनवीन बदल येत राहतात. ते येणारे बदल सकारात्मकतेने स्विकारलेच पाहिजेत. त्याचप्रमाणे शिक्षण क्षेत्रातही बदल होत आलेले आहेत व हे बदल झालेच पाहिजेत. सध्याचा महत्त्वाचा बदल म्हणजे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 होय.1968,1986 नंतर 34 वर्षानंतर आता 2020 ला हा बदल केलेला आहे.शिक्षणपद्धतीत अमुलाग्र बदल केलेला आहे. तो सहजासहजी सर्वांच्या पचनी पडणे सुरवातीला अवघड आहे.सध्याच्या कोरोना महामारीच्या काळातील शिक्षणपद्धती पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने सुरु आहे. प्रत्यक्ष शाळा सुरु नसल्या तरी शिक्षण चालू राहू शकते,हे अधोरेखित झाले आहे. यामध्ये सरकारने विविध योजना, शैक्षणिक आभासी केंद्रे तयार केली आहेत.ज्याद्वारे शिक्षण दकश्राव्य माध्यमातून विद्यार्थ्यांच्यापर्यंत पोहचवले जात आहे.

सध्याचे येऊ घातलेले नवीन शैक्षणिक धोरण हे एक प्रकारचे आधुनिक बदललेल्या शैक्षणिक पद्धतीचा नमुना आहे.काय आहे हज धोरण?या धोरणाचे उद्देश पुढीलप्रमाणे- 2030 पर्यंत शालेय शिक्षण 100% सर्वांपर्यंत पोहचवण्याचा आहे. पूर्वप्राथमिक विद्यालयापासून माध्यमिक स्तरापर्यंतच्या शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व सार्वभौमिकीकरण करणे,वयवर्षे 3 ते 18 वयोगटातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे.डॉ. कृष्णास्वामी कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली हे धोरण आखले गेले.व शिक्षणक्षेत्रात महत्वपूर्ण बदल केले गेले.मोठख बदल केला गेला तो म्हणजे सर्वात प्रथम MHRD मिनीस्ट्री ऑफ ह्यूमन रिसोर्स डेव्हलपमेंट म्हणजेच मानव संसाधन विकास मंत्रालय हे नांव बदलून शिक्षा मंत्रालय (मिनीस्ट्रीऑफ एज्युकेशन)असे करण्यात आले.तसेच पूर्वीचा शिक्षणाचा 10 + 2 हा स्तर बदलून आता 5 + 3 + 3 + 4 असा करण्यात आला आहे. पहिला टप्पा वयवर्षे 3 पासून वयवर्षे 5 पर्यंत असणार आहे. आनंददायी शिक्षण या टप्प्यात दिले जाणार आहे. मुलांनी गाणी, गोष्टी गप्पा या माध्यमातून शिकायचे आहे. या टप्प्यावर कोणत्याही प्रकारची परीक्षा असणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना तणाव येणार नाही. ती सहजपणे शिकतील.यानंतरचा दुसरा टप्पा 3 मध्ये इयत्ता 3री,4थी,5वी असा असणार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या टप्प्यावर विद्यार्थ्यांना त्यांच्या त्यांच्या प्रादेशिक भाषेमध्येच शिकता येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना शिकताना कोणतीही अडचण येणार नाही पण इंग्रजी भाषेकडे दुर्लक्ष

होण्याची शक्यता आहे.या टप्प्यावर परीक्षेची सुरवात होणार म्हणजे परीक्षा घेतली जाणार आहे. म्हणजे हळूहळू विद्यार्थ्यांच्या मनातील परीक्षेची भीती कमी होईल. पुढील टप्पा 3 मध्ये 6वी, 7वी, 8वी असा आहे. या मधल्या स्तरावर विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच विविध कोर्सेस शिकवले जाणार जसे की,कंप्यूटर, छोटे छोटे कोर्सेस उदा.शिलाई,जेवण बनवणे,माळीकाम इ.कोर्सेस.हे कोर्सेस विद्यार्थ्यांना त्यांच्या त्यांच्या आवडीप्रमाणे निवडता व शिकता येतील.त्यामुळे शिकताना विद्यार्थ्यांना आंनद मिळेल.गणित, विज्ञान, कला या विषयांबरोबरच विद्यार्थ्यांना एक भारतीय भाषाही शिकता येणार आहे. यानंतरचा टप्पा 4 .यामध्ये इयत्ता 9वी, 10वी, 11वी, 12वी असा स्तर असणार आहे.ही सेकंडरी स्टेज आहे.या टप्प्यावर परीक्षा पद्धती ही सेमिस्टर पद्धतीने घेतली जाणार आहे. तसेच वेगवेगळे शिक्षणाचे प्रवाह नसणार तर कला,विज्ञान,वाणिज्य या तीनही शाखेतील आपल्याला आवडेल तो विषय विद्यार्थी घेऊ शकतात.त्याचबरोबर पूर्वीची पाठांतर पद्धती बंद करून वैचारिक पद्धती आणली जाणार आहे. विद्यार्थ्यांना कोणतीही परदेशी भाषा शिकता येणार आहे.

सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे बी.ए,बी.कॉम,बी.एस.सी. अशी असणारी डिग्री पद्धत बंद होणार व त्याऐवजी चार वर्षाचे चार शैक्षणिक वर्षाचे भाग पाडले जाणार. त्यामध्ये बारावीनंतर एक वर्ष शिक्षण पूर्ण झाले की,विद्यार्थ्यांना सर्टिफिकेट दिले जाणार. दुसऱ्या वर्षानंतर डिप्लोमा पदवी,तिसऱ्या वर्षानंतर डीग्री प्रमाणपत्र तर चौथ्या वर्षानंतर विद्यार्थ्यांना रिसर्च म्हणजेच संशोधन प्रमाणपत्र दिले जाणार. यामुळे फायदा असा होणार की, पूर्वी बी.ए.,बी.एस.सी.,बी.कॉम ची पदवी पूर्ण झाल्याशिवाय विद्यार्थ्यांना कुठे नोकरी करता येत नव्हती. शिवाय शिक्षण पूर्ण नसल्याने अर्धवट शिक्षणाचा काही उपयोग होत नव्हता. पण आता एक वर्ष शिक्षण झाले तरी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळणार आहे. व त्याआधारे तो नोकरी किंवा व्यवसाय करु शकतो.तसेच भविष्यात त्याला शिकायचे असेल तर तो पुन्हा प्रवेशित होऊन जिथून शिक्षण थांबले आहे तिथून पुढील शिक्षण घेऊ शकतो. त्यानंतर दोन वर्षांचे पदव्युत्तर शिक्षण घेऊ शकतो.त्याचप्रमाणे एम.फील.बंद करून पीएचडी. चे शिक्षण चार वर्षे करण्यात आले आहे.

सर्वांना समान शिक्षण मिळण्यासाठी शालेय फी सर्वत्र एकसमान असणार आहे. जेणेकरून सर्वांना एकाच छताखाली शिक्षण घेता येणार आहे. त्याचबरोबर प्रात्यक्षिक ज्ञानावर भर दिला जाणार आहे.कारण ऐकून व डोळ्याने पाहून घेतलेल्या शिक्षणापेक्षा प्रत्यक्ष कृती करुन घेतलेले शिक्षण,ज्ञान हे विद्यार्थ्यांना परीपूर्णव सक्षम बनवते.तसेच भविष्यात परदेशातील नामांकित 50 युनिव्हर्सिटी भारतात आपल्या शाखा चालू करु शकतात.त्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांना भारतातच राहून शिक्षण घेणे शक्य होणार आहे. विविध विभागासाठी वेगवेगळ्या शाखा चालू करण्यात येतील.शिक्षकांना सक्षम बनविण्यासाठी चार वर्षांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येईल ज्याचा उपयोग

विद्यार्थ्यांच्यात शिक्षणाप्रती रुची व अभ्यासाची आवड निर्माण करण्यासाठी नक्कीच होईल.मूल्यमापन पद्धतीत स्वयंमूल्यमापन व दुसऱ्या व्यक्तींच्याकडून मूल्यमापन केले जाणार असल्याने विद्यार्थ्यांच्या बरोबर शिक्षकांनासुद्धा नेहमी अपडेट रहावे लागणार आहे. नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून तंत्रस्नेही बणून संगणकीय युगातील विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची भूक भागवावी लागणार आहे. तरच शिक्षक या स्पर्धेत टिकून राहू शकतो.

यासाठी येणाऱ्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात स्वतःला सिद्ध करुन सक्षम बनण्यासाठी सर्वांनी सकारात्मकता अंगी बाणवली पाहिजे.

**- श्रीमती माणिक कल्लाप्पा नागावे / कुरुंदवाड**
**मो.- 9881862530**

**(- लेखिका, व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंक २०२० च्या अतिथी संपादक आहेत.)**



# हिरक रण



एकदाही नव्हती,
कोणतीही रण निती.
नकळतची गती,
साहित्याच्या रिती,
ठरतात यमकावरती.

एकांतातल्या मनात,
कोणत्याही दिशांच्या कोणात.
नकळत्या भावात,
सामर्थ्याच्या समर्पकात,
ठरणाऱ्या 'हिरक' शोधात.



एका विश्वाच्या
कोपऱ्यातून
नकळत समजाचा,
सारथी तुझ्या रथाचा,
ठरणार 'हिरक' प्रवासाचा.

एक ना एक,
कोणातला कोन.
नसलेल्या ध्यानात,
साधला सहाय्य कोन
ठरावे 'हिरक' यशस्वी रण.

- डी.एन.मोरे / नांदेड
मो.- ९९२३८४२०२६

# "चारीमेरा"



२१ व्या शतकातील मराठी साहित्यामध्ये बदलत्या सामाजिक जीवनाचे, स्थिती गतीचे प्रतिबिंब पडलेले पहावयास मिळते. गावगाडा आणि शेतशिवारातील घटना प्रसंगाचे, पात्रांचे सूक्ष्मातिसूक्ष्म पैलूवर केंद्रित होऊन कादंबरीकार काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून अभिव्यक्त होत असतो. काल्पनिकतेला वास्तवाचा आधार देत ही प्रतिसृष्टी जिवंत करीत असतो. २१ व्या शतकात गावखेड्यांनी आपली कुस बदललेली आ हे . शेतीचे आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण झालेले आहे. आपल्या कुटुंबाचा डोलारा सावरण्यासाठी शेतकरी आपले श्रम, वेळ आणि पैसा खर्च करीत आहे. तरीही वाढत्या महागाईने तो पुरता सैरभैर झाला असून, निराशेच्या गर्तेत गळ्याबरोबर बुडाला आहे. त्याने पाहिलेली सुखी जीवनाची स्वप्ने धूसर होत असून निराशेच्या आणि खिन्नमस्कतेच्या जाळीत तो पुरता अडकला आहे.

**बदलत्या ग्रामसंस्कृतीचा वेध -**

"चारीमेरा" ही डॉ सदानंद देशमुख यांची कादंबरी. ही बदलत्या ग्रामसंस्कृतीचा आणि कृषीसंस्कृतीचा वेध घेणारी आहे. ज्ञानेश्वरीतील 'ना तरी रणी शव सांडीजे...' या ओवीने कादंबरीची सुरुवात होते. यातून कादंबरीतील संघर्षाचे सूचनच कादांबरीकार करतो. कादंबरीतील नायकाला आयुष्यभर संघर्षच करावा लागतो. संसारातील कटकटींना सामोरे जावे लागते. चारीमेरामध्ये उदेभान आणि भावनाताई या मुख्य पात्रांच्या अनुषंगाने लेखकाने ग्रामीण वास्तवाचा वेध घेतलेला आहे. गाव, गावाच्या परीघातील माणसे, त्यांच्या वृत्ती, प्रवृत्ती, ग्रामसंस्कृतीतील रिती, पद्धती, दुराचार, अनाचार, व्याभिचार किंबहुना भ्रष्टाचार अशा सगळ्याच गोष्टींचा उभा - आडवा छेद यामध्ये ताकदीने घेतलेला दिसतो.

चारीमेरा म्हणजे शेतीचे बांध. शेतीच्या चार बंधिस्त बाजू. आपल्या शेतीच्या रक्षणासाठी प्रतिवर्षी शेतकऱ्याला बांधबंधिस्ती करावी लागते. शेतीच्या चारही बाजू अर्थात बांध मजबूत ठेवावे लागतात. अन्यथा शेतीचा खंगाळा होतो आणि शेतकरी कंगाल होतो. शेतकऱ्याला शेताच्या बांधबंधिस्तीबरोबर पीकपाण्याकडे, गुराढोरांकडे, गड्यामाणसांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे लागते. अन्यथा त्याची लुबाडणूक होते. त्याची अवनती होऊन त्याला लुबाडले जाते, घेरले जाते. त्याच्या शेतीकडे डोळा ठेवला जातो. ग्राम भागातील सावकारी वृत्ती, फुकटखाऊ वृत्ती, व भ्रष्टाचारी प्रवृत्तीचा पर्दाफाश लेखक या कादंबरीतून करतो.

**कादंबरीचे अंतरंग - कथानक -**

गावगाड्यात आणि शेतशिवारात उदेभान या नायकाने पाहिलेल्या, साहिलेल्या आणि अनुभवलेल्या जीवनप्रवासाचे चलचित्रणच कथानकाच्या रुपाने कादंबरीत प्रतिबिंबित होते. उदेभान आणि भावनाताई यांच्या चिकणी नावाच्या शेतीच्या पर्यावरणात या कादंबरीचे कथानक लेखकाने घेतलेले आहे. आपली शेती ओलीताखाली यावी असे प्रत्येक शेतकऱ्याला वाटत असते. पण आर्थिक ओढाताण, हरवलेली पत यामुळे उदेभानला बोअर मारताना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते. बोअर फसल्यामुळे विहीर काढण्याचा सल्ला लोक त्याला देतात. पण परिस्थितीने तो हतबल आहे. त्याची दयनीयता खूपच अस्वस्थ करणारी आहे.

ईमानेईतबारे काळ्या आईची सेवा करणाऱ्या शेतकऱ्यांना चोहोबाजूंनी घेरले जाते. त्याच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन लचके तोडले जातात. उदेभानच्या सालगड्याला फितुर करणे. त्यासाठी त्याला दुप्पट पगाराचे अमिष दाखविले जाते. पण रतिराम त्याला दाद देत नाही. उदेभान कर्जबाजारी आहे. भूविकास बँकेच्या वसुली अधिकाऱ्याचा त्याच्या मागे तगादा आहे. यात भर म्हणून शेतात राहिलेला उंट त्याला वेळोवेळी अडचणीत आणतो. राजस्थानच्या गाईगुरे राखणाऱ्या लोकांचा तो उंट. ते लोक जाताना तो आजारी पडला. पुढे तो चिकणीतच राहिला. पंचायतीने त्याचा ताबा उदेभानला दिला. पण बऱ्याचदा त्या उंटामुळे तो अडचणीत आला. आपली काहीच चूक नसताना तो अडचणीच्या घेऱ्यात अडकत गेला. उदेभानच्या शेतात राहणारा रतिरामबुवा त्याला मदत करतो . त्याच्या सोबत रहणाऱ्या रोशनबाई रतिरामाला पर्यायाने उदेभानच्या कुटुंबाला साथ देतात. शेतमालकाबरोबर कोंबड्या, शेळ्या पाळून आपल्या



कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात.

आज पारंपारिक शेतीची जागा यांत्रिकीकरणाने घेतली आहे. आधुनिकीकरणाच्या नावाखाली पारंपारिक औजारे अडगळीत गेली असून, ट्रॅक्टरने शेतीचा ताबा घेतला आहे. बादशहासारख्या जमीनदार बापाच्या सावलीत वाढलेला उदेभान या नव्या बदलाला सामोरा जातो. संकटाचा बाऊ न करता सामोरा तो सामोरा जातो. ट्रॅक्टर खरेदी करुन शेती करतो. पण धरणाच्या कामावरचे त्याचे पैसे त्याला मिळत नाहीत. ड्रायव्हर त्याला फसवतो. ट्रॅक्टरच्या व्याजाचे पैसेही तो भागवू शकत नाही. वसुली अधिकाऱ्यांना चुकविण्यासाठी त्याला लपून बसावे लागते. बँक अधिकाऱ्यांचे कोंबड्या, मटणाचे, दारूचे चोचले पुरवावे लागतात.

शेतकरी शेतात राबराब राबतो. पण त्याला त्याच्या कामाचे दाम मिळू शकत नाहीत. ऐन हंगामात दलालाकडून होणारी फसवणूक त्याला उद्ध्वस्त करते. याचे चित्रण वास्तवतेने यामध्ये लेखकाने मांडलेले आहे. सभ्यतेचा बुरखा पांघरणारे राजकारणी, स्त्रीयांच्या वाट्याला आलेली पराधिनता, अगतिकता, राज्यकर्त्यांचे दोन नंबरचे धंदे, अनैतिकता, फसवणूक, शेतक-याच्या जीवनात झालेले बदल असे अनेक प्रसंग ग्रामजीवनातील वास्तव चित्रित करतात. माणसाच्या वृत्ती प्रवृत्तीवर प्रकाश टाकतात. न्याय-अन्याय, निती-अनिती, योग्य-अयोग्य, बरे-वाईट याची पारख वाचकाला करायला लावतात.

ग्रामीण भागातील आणखी एका बाबीवर या कादंबरीत प्रकाशझोत टाकला गेलेला आहे. एक प्रकारे अभेद्य अशा जातिव्यवस्थेवर लेखकाने प्रहार केलेला आहे. मातीतला संकर शेतकऱ्यांनी मान्य केला पण जातीतील संकर होण्याला तीव्र विरोध केला. त्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या. शेतावर काम करणाऱ्या प्रविणाशी उदेभान तीव्र इच्छा असूनही लग्न करु शकत नाही. तर बादशारावच्या पराकोटीच्या जाती अहंकारामुळे प्रविणा आणि उदयभान यांची जीवघेणी शोकांतिका होते. "मातीतील क्रॉसिंग लोकांनी मान्य केले पण जातीतलेही मान्य केले पाहिजे." या उदेभानच्या विचारसरणीला बापाच्या हेकेखोरपणामुळे यश येत नाही. पण जेव्हा तो प्रगतीचा बाप होतो तेव्हा या विचाराला साथ देण्याची संधी तो घेतो. पुण्याला राहून आलेली व एम.पी.एस.सी परीक्षा पास झालेली त्याची मुलगी सपकाळ नावाच्या हलक्या जातीतील प्रियकराशी लग्न करण्याचा निर्णय त्याला बोलून दाखवते. तेव्हा तो या गोष्टीला विरोध करत नाही. इथे आंतरजातीय विवाहाला उदेभानने दिलेली मान्यता ही लेखकाची जातीभेदाविषयीची नैतिक भूमिका सूचित करुन जाते.

त्याचप्रमाणे आधी शेतकामाला तुच्छ समजणारी उदेभानची बायको भावनाताई असते. पण ती जेव्हा आपल्या नवऱ्याची पूर्व आयुष्यातील प्रविणा आणि उदेभानच्या शेतावरच्या प्रेमप्रकरणाशी निगडित डायरी वाचते. तेव्हा घरची लक्ष्मी आणि शेतातली लक्ष्मी एक झाल्याशिवाय शेतीला, पर्यायाने शेतकऱ्याला बरकत येणार नाही. तो सुखी

होणार नाही असा श्रमप्रतिष्ठेशी निगडित साक्षात्कार तिला होतो. आणि उत्तरार्धात ती शेतकाम करण्यासाठी बायकांसोबत चिकणी नावाच्या शेतात जाते. त्याचा उदेभानला मनस्वी आनंद होतो. या कादंबरीतील उदेभानची डायरी हा भाग चैतन्यकळेसी निगडित असून शेवटी भावनाताई सुद्धा या चैतन्यकळेशी जोडली जाते. एकूणच हा भाग कृषी संस्कृतीच्या भविष्यातील विकासासाठी प्रेरक आणि सकारात्मक ठरतो.

ट्रॅक्टर दुरुस्ती लांबविणारा मिस्त्री, बेरकी वृत्तीचा कलानाथ गोंजारी, उन्मत्त आणि मस्तवाल के.डी. साहेब, शेतकऱ्यांकडून कर्जाच्या वसुलीपायी पाट्या झोडणारे अधिकारी, अशी दुष्ट पात्रे या कादंबरीत आढळतात. तर रोशनबाई, तोंडाळबुद्धी, लोपाबाई अशा अगतिक आणि परिस्थितीशरण स्त्रिया, तर व्यवस्थेच्या चरकात सापडलेले उदेभानचे कुटुंब अशी सरळमार्गी पात्रेही आढळतात.

भावनाताई आणि उदेभानची दोन्ही मुले हुशार आहेत. मुलगी प्रगतीने तर खूप शैक्षणिक प्रगती केली. पुढे ती स्पर्धा परीक्षेला पुण्याला गेली व पक्की पुणेरी झाली. कितीही पडझड झाली तरी माणसाला ताठ मानेने उभे राहता आले पाहीजे. असा सल्लाही कादंबरीकार वाचकांना देतो. कादंबरीत पत्रकार किरण माने, शिक्षिका केतकी चव्हाण, केतकी बाबतचे उदेभानचे संशयी वागणे, लोपाबाईचे अनैतिक वागणे, लग्न ठरत नाही म्हणून बंड्याने केलेली आत्महत्या, अशा अनेक प्रसंगाची वीण या कादंबरीत मुख्य कथानकाच्या जोडीने आलेली आहे. शादेबाबाचे कादंबरीतील वर्णन ग्राम जीवनातील अंधश्रद्धा अधोरेखित करते. द्वारका आत्याचा उदेभान व भावनाताई वरील खडा पहारा, पिंट्या आणि सुन्या सारख्या पोरांवरील कुसंस्कार, छोट्या छोट्या कामासाठी त्यांचे पैसे मागणे, प्रविणा, आशा, वहिदा, मथुरा अशा एक ना अनेक पात्रांतून आणि त्या अनुषंगाने घडलेल्या प्रसंगातून चारीमेराचे कथानक आखीव, रेखीव व बांधेसूदपणे साकारण्यात आपले कौशल्य पणास लावले असून ते यशस्वी झालेले आहे.

अशा प्रकारे युद्धमान संघर्ष करणारा नायक उदेभानच्या रूपाने या कादंबरीत भेटतो. बाराव्या शतकातील साहित्य निर्मितीच्या कंदाशी ही कादंबरी सुरुवातीला जोडून घेते. तर लीळाचरित्राच्या लीळेचा आधार घेऊन संपते.

"चारीमेरा" ही २०१६ मध्ये लिहिलेली कादंबरी. गावशिवाराबरोबर कृषीसंस्कृतीतील समस्यांचा, अडचणींचा, अडथळ्यांचा वेध घेते. शेतकऱ्याच्या नशिबी आलेले गरीबीचे, लाचारीचे, दीनवाणीपणाचे दर्शन चारीमेरात आलेले आहे. के.डी साहेबांच्या माध्यमातून राजकारणाच्या उन्मत्तपणावर, आचारभ्रष्टतेबरोबर सत्ता आणि संपत्तीच्या वाढीसाठी कराव्या लागण्या-या लोचटपणावर लेखक यामध्ये प्रकाश टाकतो. रोशनबाईचे विवाहाशिवाय रतिरामबुवाबरोबर राहणे, लोपाबाईचा अनैतिक व्यवहार हा व्याभिचारीपणाची दखल घेतो. तर व्यापारी वर्गाकडून होणारी फसवणूक ही शेतकऱ्यांची होणारी लुबाडणूक दाखविते. अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रद्धा, अनाचार,

दुराचार अशा अनेक सामाजिक समस्यांचा आविष्कार चारीमेरा कादंबरीतून झालेला आहे. तसेच शेतीमध्ये आधुनिकीकरणामुळे, यांत्रिकीकरणामुळे झालेल्या बदलाबरोबर शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणावरही लेखक येथे दृष्टीक्षेप टाकतो.

**चारीमेराची वैशिष्ट्ये व वेगळेपणा -**

'उदेभान' या कादंबरीच्या नायकाने अनुभवलेल्या, पाहिलेल्या आणि सहन केलेल्या घटना प्रसंगांची मालिकाच एखाद्या चलचित्रपटासारखी या कादंबरीत पुढे सरकत राहते. ती वाचताना वाचक मन हरपून जातो. शेतकऱ्याची ससेहोलपट, गावकीतील वृत्ती - प्रवृत्ती, कुटुंब सदस्यांमधील कधी विश्वासाचे तर कधी अविश्वासाचे वातावरण, राज्यकर्त्यांची ऐषोरामी वृत्ती, उंची जीवन पद्धती, त्यांच्या अनुयायांचा अर्थात चेल्यांचा खोटारडेपणा, बँक आधिकाऱ्यांची मुजोरगिरी, व्यसनाधीनता, शेतशिवारातील अनाचाराचे, व्याभिचाराचे बिभत्स व ओंगळवाणे रूप, हातावर पोट असलेल्या शेतमजुरांची स्वतःच्या जीभेचे चोचले पुरवण्यासाठीची कोंबड्यांची चोरी, यंत्रदुरूस्ती करणाऱ्या कामगारांच्या स्वभावातील बेफिकीरी, शेतकऱ्यांच्या भूखंडावर लक्षप्रतिष्ठीतांचा असलेला डोळा, अशा अनेक घटना व प्रसंगातून चारीमेराचे कथानक दमदार असे साकारलेले आहे.

उदेभान आणि भावनाताई हे जोडपे या कादंबरीच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे. तर रतिरामबुवा, रोशनबाई या सहाय्यक व्यक्तीरेखा आहेत. तोंडाळबुद्धी, गालफाडे मास्तर, सुधाकर धस्कटे, पिंट्या आणि सुन्या, जयराम उमाळे, नवऱ्याने टाकलेली लोपाबाई, तिचा भाऊ बंडया, भावनाची मैत्रीण मथुरा, पत्रकार किरण, इंगळे ड्रायव्हर, कलानाथ गोंजारी, के.डी. साहेब, द्वारका आत्या या पात्रांची निर्मिती, त्यांची गुंतावळ, त्यांचा वेगळेपणा अबाधित ठेवून कथानकाला गती देण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येतात.

या कादंबरीत राजस्थानी लोकांनी आजारी आहे म्हणून सोडलेला उंट हे एक प्रतिक आहे. व्यवस्था माणसाला परिस्थितीशरण बनवते व माणसाला कजगडीच्या बाहुलीसारखे नाचविते. उंटामुळे झालेले शेतीचे नुकसान, म्हातारीचा झालेला मृत्यू, त्याचा उदेभानला झालेला नाहक त्रास, उंटाचे गाळात रुतणे, मृत्यू पावणे, दुर्गंधी सुटणे अशा घटनांची प्रतिके घेऊन लेखकाने नायकाची, एकूणच शेतकऱ्याची हतबलता वाचकांसमोर आणली आहे.

या कादंबरीतील उंट हा जातीयतेचे प्रतिक आहे. प्रत्येक जातीतही काही लोक आपण हलके - भारी आहोत असे समजतात. उंटाच्या रूपात बादशारावाचा जातीचा उच्च भाव चिखलात फसून नष्ट झाला आहे, असे उंटाच्या माध्यमातून लेखकाने दाखवले आहे.

अस्सल वैदर्भीय बोलीभाषेचा साज लेवून ही कादंबरी आलेली आहे. यामध्ये गावगाड्यातील घटना व प्रसंगाच्या बरोबरच कादंबरीकाराने प्रचलीत म्हणी आणि वाक्प्रचारांचा चपखल वापर केलेला आहे. मुख्य, सहाय्यक आणि अनुषंगिक पात्र व

प्रसंगाची योजना करून कादंबरीकाराने मुख्य विषयाला गतिमान केलेले आहे.

प्रयोगात्मकता हे या कादंबरीचे खास वैशिष्ट्य आहे. आपण जे पाहीले, साहिले, अनुभवले ते एक स्वप्नच होते. तो एक भास होता. हे झोपेतून जागा झालेल्या उदेभानला कळते. आणि खिन्न झालेला तो स्वतःशीच हसू लागतो. इथे कादंबरी संपते. चक्रधरकृत लीळेचा चपखल वापर करून ही प्रयोगात्मकता चारीमेरात साधली आहे. या कादंबरीच्या माध्यमातून लेखकाने आपले अनुभव विश्व आणि चिंतन मुक्तपणे उधळून दिलेले दिसून येते. त्यामुळे शेती संस्कृतीचा समग्र आणि कालोचित असा वेध घेणारी ही कादंबरी लेखकाच्या 'बारोमास ' कादंबरी प्रमाणेच केवळ एका प्रदेशाची कथा न होता ती भारतीय शेती संस्कृतीचा समग्र आणि सर्वसमावेशक वेध घेणारी प्रातिनिधिक कादंबरी ठरते. हे या कादंबरीचे महत्त्वाचे आणि मौलिक वैशिष्ट्य जाणवते.

कादंबरीतील म्हणी, वाक्प्रचार, प्राणी विश्वाच्या हालचाली, निसर्गवर्णने, नाट्यमय आणि प्रसंगनिष्ठ संवाद, वर्णनात्मकतेला लाभलेली सखोल चिंतनाची डुब आणि ती व्यक्त करणारी समर्पक भाषा यामुळे या कादंबरीची लक्षवेधी शैली ठळकपणे वाचकांच्या नजरेत येते.

अस्सल अनुभवांची गुंतावळ, निरगाठ आणि शेवटी उकल म्हणजेच कादंबरीचे सूत्र यात तंतोतंत पाळले गेले आहे. आकलनसुलभ भाषा, ओघवती शैली, कथानकाला गतिमान ठेवणारी निवेदने, नाट्यात्मक व वास्तव चित्रणे ही या कादंबरीची बलस्थाने आहेत. प्राधान्याने चार बांधाच्या आत फिरत राहणारे कथानक शीर्षकाची समर्पकता व यथार्थता सिद्ध करते. कृषीकेंद्रित, एकरेषीय अनुभवांची मांडणी करणारी ही आगळीवेगळी अलौकिक अशी प्रयोगात्मक कलाकृती आहे.

**- डॉ. श्रीकांत श्री. पाटील / घुणकी**
**मो.- ९८३४३४२१२४**
(राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक, राज्यशासन पुरस्कार प्राप्त लेखक)

# शब्दांच्या पलीकडे



शब्दांवाचूनी कळले सारे,
शब्दांच्याही पलीकडचे बोल...
नयनांमध्ये साठले होते,
अंतरातील भावनांचे मोल...!१!

मूक अबोल भावना,
सांगतात खूप काही...
शब्दांविना , शब्दांसह,
अंतरातून डोकावून पाही...!२!



रुसले जरी शब्द,
भावना मात्र रुसत नाही...
शब्दांच्याही पलीकडे जाऊन,
डोळ्यातून सतत बोलत राही...!३!

कधी कधी हवेत विरलेले शब्द,
सोसाट्याच्या वाऱ्याने उडून जातात...
भावनांच्या पुरा सोबत पुन्हा,
वेगाने पापण्यांच्या काठावर येतात...!४!

शब्दांच्याही पलीकडे जाऊन,
शब्द व भावनांची मैत्री व्हावी...
जीवनाच्या अखेरपर्यंत ती,
दोघांनीही खास निभवावी...!५!

- देवयानी शशिकांत म्हंकाळे / राहाता
मो.- 9922785873

# वेध मनाचे



कधी कधी असंही होतं काही लिहीण्यासाठी बसावं आणि अंती शब्दांचा कागद कोराच रहावा. मन आणि शब्द ह्यांचं मुर्त नातं निर्माण होत नाही पण तरीही विचारांचा, भावनांचा आणि मनाचा सुखद संवाद होवून जातो...

सगळच दुसर्यांना सांगण्यापेक्षा आपलं मनोगत आपणच ऐकण्याची मजाच वेगळी....

आठवणींचा मागोवा घेत निरागसतेची , जाणीवांची सुरवात शोधावी आणि त्या बिंदूपासूनचा आयुष्याचा प्रवास एखाद्या साक्षीदारासारखा अनुभवावा.शेवटी आपण काय आणि कसे जगलो हे एका बंद कुपीसारखं असतं.. जितक्या आठवणीत ठेवता येणाऱ्या चांगल्या क्षणांच्या आठवणी अधिक तितकी ही कुपी अधिक सुगंधीत...एक वेळ होती बालपणीची किती छोट्या छोट्या गोष्टींनी खूष व्हायचो आपण आणि आता जगातली सारी सुखं पायाशी लोळण घेताना देखील हे वेड मन मात्र त्या बालपणी च्या काळातच गुरपुटून राहणं पसंद करतंय.

पण पुन्हा विचार येतो आयुष्याच्या प्रत्येक वळणावर जगण्यासारखं असं काहीतरी नवीन वाट पहात आहे ह्या सुखद भावनेत मनाने विसावा घेणं हीच खरी अंतिम फलश्रुती. थोडंस मागे वळून चिंतन केलं की लक्षात येतं आजवरचा जगण्याचा प्रवास म्हणजे कधी सुखद झुळुक तर कधी हूरहूर लावणारं वादळ होतं. सुखासक्त मनाला चक्रव्यूहात अडकवणारी असंख्य मोहाची आंदोलनं कधी भावनीक तर कधी वैचारीक...पण ती वेळ सरली आणि त्या वेळेसोबत ते वादळ, ती झुळुकही ..पण मागे उरला तो पसारा रेंगाळणार्या आठवणींचा...

जसे पाण्यावर क्षणिक तरंग उठतात पण नंतर मात्र त्यांचा मागमूसही नसतो तसेच आलेले काही उत्कट पण आभासी क्षण....ते आले त्या त्या वेळी तेच सत्य म्हणून स्वीकारले खरे पण प्रत्यक्षात मात्र त्यांच "असणं" हेच फसवं होतं...

शेवटी एक गोष्ट मान्य करावीच लागते " We always search permanent things in this temporary world".

खरं तर ह्या जगाशी जोडणार्या श्वासांइतक शाश्वत तसं पाहता दुसरं काहीचं नाही. तेच साथीदार आणि तेच साक्षीदार...पण हे शाश्वत सत्य ते जेव्हा साथ सोडतात तेव्हाच कळतं...जीवनाचं हे आभासी स्वरूप जितकं वेदनादायी आहे तितकचं अनाकलनीय..

आयुष्य जगण्याचा खरा अट्टाहास ज्यासाठी असायला हवा तो आसक्तीतून मुक्तीचा प्रवास कधी सुरुच होत नाही आणि तो तसा करायला हवा होता ते कळेपर्यंत अंत सामोरी येतो. हीच खरी शोकांतिका आहे.

कधी कधी असही होतं आपल्याला वाटतं आयुष्यात व्यक्तीशः आपण खूप पुढे निघून आलो आहोत, भूतकाळावर मात करण्यात यशस्वी झालो आहोत..."वर्तमानाचा" हा अहंकार  की अज्ञान माहीत नाही. पण एक क्षण असा येतो की ह्या गैरसमजुतीतून आपण बाहेर पडतो आणि लक्षात येतं की हा जगण्याचा वेग फक्त बाहेरील विश्वापुरताच मर्यादीत राहीला, आपल्या मनोविश्वाने तर त्याचा स्वीकारच केला नाही. त्याने वर्तमान, भविष्य ह्या दोघांपासून स्वतःला वंचितच ठेवत स्वतःचं क्षितीज स्वतःच ठरवलयं.नक्की कुठलं वळण होत ते माहीत नसतं पण मनाची गती आयुष्याच्या "त्या" टप्प्यावरच थांबलेली असते. गंमत म्हणज "ती थांबली आहे" ह्याचा थांगपत्ता आपल्याला नसतोच...वेगाच्या वेडात अनेक विश्रांत टप्पे आपण चुकवतो पण मन.... ते मात्र त्यातीलच एका टप्प्यावर समाधानाच क्षितिजापलिकडे गवसल्याचं मानून शांत झालेलं असतं...खरं तर उमेद संपलेली नसते पण समाधानाची रेषा मनाने स्वतःच आखलेली असते आपल्याही नकळत...असं होतं कधी कधी.....

**- प्रिती उदगावे / जयसिंगपूर**
**मो.- 8669174141**



# नव्या युगाचे भारतीय



आम्ही आहोत नव्या युगाचे भारतीय युवा
समाज माध्यमांपासून होऊनी प्रेरित
भरभरून वाचतोय आम्ही महापुरुषांचे धडे
भरून घेतोय तत्त्वज्ञानाच्या शब्दसंचिताचे घडे

आम्ही आहोत नव्या युगाचे भारतीय युवा
धरीला आम्ही तंत्रज्ञानाचा सुसाट तारू
लक्ष्य आमचे शाश्वत परम विकासाचा तरू
म्हणुनी अखिल मानवतेची कास धरू

आम्ही आहोत नव्या युगाचे भारतीय युवा
इंस्टाग्राम रील्सवरती लीलया नाचतो
विज्ञान गणिताचे खंड सहजतेने वाचतो
भारत भू साठी आधुनिकतेचे मोती वेचतो

आम्ही आहोत नव्या युगाचे भारतीय युवा
आम्ही अभिनव अशा स्टार्टअप चे उद्योजक
आम्ही जागतिक कंपनीचे व्यवस्थापक
आम्ही विचारप्रवर्तक कवी-लेखक

आम्ही आहोत नव्या युगाचे भारतीय युवा
आम्ही बनतो माणसं जोडण्याचा दुवा
आम्ही करू पारंपारिक लग्न नाहीतर लिव्ह-इन
आम्ही सांधतो रेशमी नात्यांची वीण

- अमोलजी पाटील / पुणे
मो.- 9730576056

# ऊसकोंडी


ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या मांडणारी कादंबरी



सर्व सामान्य माणसाच्या सुख, दुःख ला वाचा फोडणारे नामवंत लेखक डॉ. श्रीकांत पाटील यांची ' ऊसकोंडी ' ही नवी कादंबरी वाचणात आली आणि आनंद झाला. यापुर्वी त्यांनी लिहिलेली 'लॉकडाऊन ' ही कादंबरी खूप चर्चेत राहिली. या कादंबरीला अनेक पुरस्कार मिळाले. देश विदेशातील सात भाषेमध्ये त्याचा अनुवाद झाला. यामुळे वाचकाला डॉ. श्रीकांत पाटील यांच्या पुढच्या कादंबरीची उत्सुक्ता लागली होती. नव्या कादंबरीसाठी त्यांनी निवडलेला विषयही दमदार आहे. यामधून त्यांनी शेतकऱ्याचे जनजीवन मांडले आहे.

ऊस हे पश्चिम महाराष्ट्रातील प्रमुख पिक आहे. राज्याच्या, एकंदरीत देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देणारे हे पिक आहे. साखर, इथेनॉईल,अलकोहोल बगॅस अशी इतर उत्पादनेही घेतली जातात. पण या ऊस उत्पादक शेतकऱ्याची दशा काय आहे हे 'ऊसकोंडी ' मधून व्यक्त करण्यात आली आहे.

सध्या शेती परवडत नाही असे चित्र उभा केले जात आहे.आस्मानी संकटाबरोबर सुलतानी संकटाचा हवाला दिला जातो आहे. भौतिक सुखसुविधांची भुरळ पाडून शेतकऱ्याला भ्रमिष्ट केलं जात आहे. त्यामुळे शेतकरीही आपल्या चांगल्या पिकाऊ जमिनीत गुंठेवारी प्लॉट तयार करून विकतो आहे. रस्ते, पूल, रेल्वे मार्ग, कारखाने यासाठी अधिग्रहन केल्या जाणाऱ्या जमिनीचा मोबदला घेण्यापलिकडे शेतकऱ्या जवळ पर्याय उरला नाही. कारण आजतागायत सुरु असलेले धरणग्रस्तांचे लढे, त्यांची दुरावस्था शेतकऱ्यांनी पाहिली आहे.




गेल्या अनेक वर्षापासून देशातला शेतकरी हवालदिल झाला आहे. अतिवृष्टी, महापूर, रोगराई, महागाई, शेतमालाला बाजारात नसलेला भाव यामुळे प्रश्न निर्माण झाले आहेत. हे प्रश्न

सोडवण्यासाठी बऱ्याच अंशी सरकारही अपयशी ठरते आहे. अशा परिस्थितीमध्ये शेतकऱ्यामध्ये संयम आणि आत्मविश्वास निर्माण व्हावा असे लेखन डॉ. श्रीकांत पाटील यांने केले आहे.

'ऊसकोंडी 'चा कादंबरीच्या माध्यमातून एक आदर्श शेतकरी जगासमोर ठेवला गेला आहे. कितीही संकटे आली शेतकऱ्याने विचलीत होऊ नये. शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष केंद्रीत व्हावे यासाठी अनेक शेतकरी आत्महत्या करत आहेत. पण हा काही पर्याय नाही. सरकारे येतात. जातात. आयुष्य हसत खेळत नव्या उमेदीने जगण्याचा संदेश ऊसकोंडीमधून दिला गेला आहे.

खरंतर लेखक, कवी जे लिहितो ते त्याचे अनुभव असतात.ऊस उत्पादनाच्या बाबतीत आलेले स्वतःचे अनुभव डॉ. पाटील यांनी ' मनूदा ' नावाचा नायक उभा करून व्यक्त केले आहेत हे स्पष्ट दिसते आहे.

बांधाला बांध असणारा भाऊ सुद्धा कसा वैऱ्या सारखा वागतो.आणि मैत्रीचे नाते असणारे लोक संकटात कसे धावून येतात याचे चांगले उदाहरण लेखकाने मांडले आहे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या जवळ जवळ सारख्याच आहेत. समदुःखी एक होतात म्हटल्याप्रमाणे शेतकऱ्यांची झालेली संघटना आणि त्या बळावर झालेली आंदोलने यामुळे देशाच्या राजकारणात बदल झाला. नवे नेते तयार झाले तरीही समस्या सुटल्या नाहीत. शेतकरी आजही लढतो आहे. मुंगीसारखा कष्ट करतो आहे. हे त्याचे जीने डॉ. श्रीकांत पाटील यांनी आपल्या कादंबरीतून व्यक्त केले आहे.

आपल्या जमिनीला काळी आई म्हणणारा शेतकरी ऊसाची लागण करतो तेव्हा शुभमुहूर्तावर रानात पूजा बांधतो. ऊसाच्या शेंडयाचा वाघ रानात उभा करतो आणि सुख, समृद्धी लाभावी म्हणून स्वतः आरोळी ठोकत परमेश्वराला आवाहान करतो.

ऊसाच्या शेंडयापासून बनवलेला वाघ मुखपृष्ठावर दिसतो हे पुस्तकाचे वैशिष्टय आहे. वाचनाची आवड असणाऱ्या प्रत्येकाने ऊसकोंडी ही कादंबरी एकदा तरी जरूर वाचावी.पुस्तकासाठी वापरलेला दर्जेदार कागद, उत्कृष्ट छपाई, मजबूत बायडींग यामुळे ही पुस्तकाला दर्जा प्राप्त झाला आहे. खरोखरच लेखक व प्रकाशक अभिनंदनाला पात्र आहेत. त्यांना भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

**- मनोहर भोसले / सैनिक टाकळी**
**मो.- 9767044509**

# *माझं कोकण*



दऱ्याखोऱ्यातून माझ्या कोकणाची वाट
मला आस लावते माझ्या कोकणी भाषेची

फणसासारखे मधुर अपुल्या माणसाचे मन
दूर जाता कोकणासाठी भरलेले डोळे पाणावती

कोकणात माझ्या विस्तीर्ण सागर
मौज वाटे पहाण्यास मासोळ्या चे सूर

लालबुंद या मातीत तांदूळ वरीचे पिके
कोकणचा हापूस आंबा अवघे जग जिंके

करवंद,जांभूळ,काजू अपुला कोकणी मेवा
निसर्गाने तर दिलाय जणू अनमोल ठेवा



- शुभम मंगेश येरुणकर / चिंचवड पुणे
मो.- 9890680093

# जीवनातील छंदांचे महत्त्व



असं म्हटलं जातं की , From Womb to Tomb Human Being is a Student. याचा शब्दशः अर्थ असा की गर्भाशयात असल्यापासून कबरेत जाईपर्यंत मनुष्यप्राणी हा विद्यार्थी म्हणून जगत असतो. तो आयुष्यभर विद्यार्थी म्हणून जगत असला तरीही त्याला खरे जीवन शिक्षण मिळते ते शाळेत असताना. शालेय शिक्षण हे त्याच्या जीवनाला कलाटणी देणारी ठरते. शाळेत शिकत असताना शाळेतील विविध विषयां बरोबरच विद्यार्थी शालेय तसेच सहशालेय उपक्रमात सहभागी होत असतो. विद्यार्थ्यांचे शालेय जीवनातील ताणतणाव कमी करण्यासाठी त्यांना त्यांचे छंद किंवा त्यांची आवड फार महत्वपूर्ण आहेत. छंद विद्यार्थ्यांना विकसित होण्यासाठी सर्वोत्तम पर्याय आहेत, तसेच ज्याना काहीतरी नाविन्यपूर्ण उपक्रम करून चाकोरी बाहेरील जीवन जगावयाचे असेल त्यांसाठी शालेय जीवनात विविध छंद जोपासणे फार महत्त्वाचे ठरते. छंद विद्यार्थ्यांच्या जीवनात आनंद आणि उत्साह निर्माण करतात बऱ्याच वेळेस छंद हे विद्यार्थ्यांच्या अभ्यासाशी निगडीत असतात तर काही वेळा छंद हे शालेय अभ्यासक्रमा व्यतिरिक्त ज्ञान देणारे ठरतात. छंद हा जीवनाचा अर्थ समजण्यासाठी अतिशय प्रभावी साधन आहे, किंबहुना जे छंदाची जोपासना करतात त्यांना जीवनाचा अर्थ अधिक कळतो, तसेच ते जीवनाबद्दल अतिशय सकारात्मक असतात. छंदांचा अनुभव घेण्याचा प्रवास स्वतःला फार प्रेरणादायी असतो, तसेच तो इतरांनाही प्रेरणादायी ठरू शकतो.

छंदांचा सर्वात मोठा फायदा म्हणजे स्वतःला तणावमुक्त ठेवणे असे मला वाटते. या तांत्रिक युगात विद्यार्थी अतिशय एकलकोंडा तसेच आत्मकेंद्रित होत चाललेला आहे. तंत्रज्ञानाच्या जंजाळात तो असा काही अटकून बसलेला आहे की त्याला तिथून बाहेर काढणे अतिशय अवघड होत चाललेले आहे. बऱ्याच वेळेस मुलांना इंटरनेटची आभासी दुनिया हेच खरे जीवन आहे असे वाटू लागते आणि त्यापासून दूर जाणे अवघड होऊन बसते. याचा सर्वात मोठा फटका म्हणजे विद्यार्थ्यांची आकलन शक्ती, चमत्कृतीपूर्ण विचार करण्याची शक्ती क्षीण होत जाते. मुळात म्हणजे विद्यार्थ्याला आपण जसे जग दाखवू तसेच त्याला ते वाटत असते. पूर्वी समाजाचे प्रतिबिंब चित्रपटात उमटत असायचे आता चित्रपटांचे प्रतिबिंब समाजात उमटताना दिसते. विद्यार्थी चुकीच्या व्यक्तिमत्त्वांना Imitate करताना दिसतात. कोणतीही शिक्षण किती महत्त्वाचे किंवा किती मोठे किंवा कोणत्या कॉलेजात घेतले त्यापेक्षा ती किती उपयुक्त आहे समाजाच्या विविध प्रश्नांची उकल करण्यासाठी त्या शिक्षणाची कितपत उपयुक्तता आहे हे महत्त्वाचे असते.

प्रत्येक शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी भरपूर प्रयत्न केले

जातात, किंबहुना प्रत्येक शिक्षकाला आपल्या विद्यार्थ्यांनी अभ्यासा व्यतिरिक्त कोणत्यातरी एखाद्या विषयात अतिशय निष्णात असावे असे वाटते. त्यातील छुपे कलागुण बाहेर काढण्यासाठी शिक्षक वर्ग नेहमी प्रयत्नशील असतो, परंतु बऱ्याच वेळेस असे होते की नृत्य, चित्रकला, गायन किंवा एखादा खेळ याव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या इतर कलागुणांना वाव मिळत नाही. छंद वर्गाचा एखादा स्वतंत्र वर्ग घेणे वेळेअभावी शाळेत घेता येत नाही. बऱ्याच विद्यार्थ्यांना नृत्य, चित्रकला, गायन, वादन या व्यतिरिक्तही दुसऱ्या विषयात रुची असू शकते. तसेच आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना करियर करावं की छंद जोपासावे असा प्रश्न सुद्धा पडू शकतो, बऱ्याच अंशी आपल्याकडे शिक्षण हे नोकरी मिळविण्याचे साधन आहे, असा समज असतो त्यामुळे डॉक्टर, इंजिनिअर, वकील, सीए होऊन मोठ्या लठ्ठ पगाराची नोकरी किंवा व्यवसायांमध्ये उतरून रग्गड पैसा कमावला म्हणजे तो यशस्वी झाला हे यशाचे एक मानक होऊन बसले आहे. काहीजण तर शिक्षण झाल्या झाल्या सर्व प्रथम सरकारी नोकरी मिळवणे हेच त्यांचे जीवनाचे अंतिम उद्दिष्ट आहे की काय असे वाटते. यात फार कमी विद्यार्थी असे असतात की जे आपला छंद जोपासून भविष्यात या छंदातून कमाई चालू करू शकतात. बऱ्याच पालकांना छंदापायी आपला मुलगा वाया जाईल की काय अशी भिती वाटत असल्यामुळे छंदाकडे नेहमी ते दुर्लक्ष करावयास सांगतात किंबहुना त्याच्या छंदात ते जास्त इंटरेस्ट दाखवत नाहीत.

छंद हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक असला पाहिजे भलेही त्या छंदातून आपल्या जीवनात अर्थार्जन नाही झाले तरी चालेल कारण छंदांमुळे विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानवृद्धी ,तणावमुक्ती, सर्जनशीलता, आकलन क्षमता, बोधन क्षमता, सामाजिक ज्ञान, भावनिक आरोग्य, संवेदनशीलता, शारीरिक आरोग्य ,वेळ व्यवस्थापन ,निसर्ग ज्ञान, आव्हान पेलण्याचा क्षमता, निकोप स्पर्धा, मानसिक विरंगुळा, मनशांती ,आणि शिस्त गुणांची जोपासना होते. आणि या गोष्टींचे मूल्य कधीच करता येत नाही. मराठी विश्वकोश प्रथमावृत्ती नुसार छंद हे चार प्रकारात विभागता येतात एक वस्तू जमविण्याचा व प्राणी पाळण्याचा छंद, वस्तू स्वतःच तयार करण्याचा छंद ,कला कौशल्याची कामे करण्याचा छंद व विविध खेळ आणि व्यायाम. छंदांची जोपासना करणारा व्यक्ती जीवनात सहसा निराश होत नाही तसेच त्याला न्यूनगंडाची भावना कधीच शिवत नाही. आणि आत्महत्येसारखा टोकाचा विचार करण्यापासून तो नेहमी दूर राहतो. मुळात छंदिष्ट माणूस हा स्वतः जीवनात आनंद शोधत असतो आणि आपल्याबरोबर सर्वांना आनंदी करण्याचा प्रयत्न करत असतो. मोठमोठे वैज्ञानिक उद्योगविश्वातील उद्योगपती चित्रपट तारे-तारका खेळाडू, डॉक्टर, इंजिनियर्स, वकील, पत्रकार हे कोणता न कोणता छंद जोपासत असतात त्यामागील कारण म्हणजे कामाचा तणाव दूर करणे हाच होय कारण त्यांना त्यांच्या या क्षेत्रात त्यांच्या कार्यातून अफाट पैसा हा मिळतच असतो परंतु जीवनातील आनंद वाढविण्यासाठी तसेच मनावरील

ताण कमी करण्यासाठी छंद उपयोगी येतात.

बरेच विद्यार्थी शालेय जीवनापासून छंदांची जोपासना करतात परंतु बऱ्याच वेळेस कौटुंबिक परिस्थिती किंवा सामाजिक परिस्थिती त्यांच्या छंदाच्या विरोधात जाते आणि मग त्यांना मन मारून करिअरची वाट निवडताना त्यांना फाटा द्यावा लागतो परंतु बऱ्याच वेळेस अशा विद्यार्थ्यांची निवडलेले शिक्षण पूर्ण करताना त्यांच्या मनाची घुसमट होते किंवा कधीकधी आपण घेत असलेले शिक्षण व्यर्थ आहे की काय अशीच भावना त्यांच्या मनात रुजत जाते. राजकुमार हिराणी यांचा थ्री इडीयट्स हा चित्रपट आपण बघितलेला असेल त्यातील एक पात्र कायम माझ्या स्मरणात राहते. ते म्हणजे फरहान. फरहान हा अतिशय जिद्दी आणि आज्ञाधारक असा मुलगा असतो, पण वडिलांची इच्छा असते की त्याने इंजिनियर व्हावे आणि लहानपणापासून त्याला इंजिनिअर होण्याचे स्वप्न दाखविले जाते परंतु फरहान याचे स्वप्न वेगळे असते, मुळात त्याला इंजीनियरिंग या विषयात रुची नसते. तर त्याची रुची वाइल्ड लाईफ फोटोग्राफी यामध्ये असते परंतु भारतासारख्या खंडप्राय देशात वाईल्डलाईफ फोटोग्राफी बद्दल मुळात कुणाला माहितीच नसते किंवा त्यामध्ये करियर करु शकतो किंवा नाही याची कल्पना त्याच्या घरच्यांना नसते. अभियंता होऊन यंत्रा बरोबर खेळण्यापेक्षा, जंगलात जाऊन जंगलातील पशुपक्ष्यांची फोटो काढणे यातच आपले करिअर असावे अशी त्याची प्रामाणिक इच्छा असते. आणि हीच इच्छा त्याला व्यक्त न करता आल्यामुळे त्याचा मित्र रेंचो हा पुढे होऊन त्याला याकामी मदत करतो आणि शेवटी फरहान त्याच्या इच्छेनुसार निवडलेल्या करिअरमध्ये सफल होतो. परंतु ही झाली चित्रपटातील गोष्ट. पण खऱ्या आयुष्यात सुद्धा आपले व्यवसाय, आपली नोकरी, आपली उद्योगधंदे सांभाळून कित्येक लोक छंदांच्या मार्फत मान्यता पावले आहेत त्याची उदाहरणे पाहू.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे तसेच मनसे अध्यक्ष राज ठाकरे या द्वंद्वांचे उदाहरण खास करून येथे देता येईल हे दोघेही प्रगल्भ राजकारणी असले तरी त्यांची पहिली ओळख ही अतिशय उत्कृष्ट असे व्यंगचित्रकार अशीच आहे. महाराजा रणजीत सिंग यांनी क्रिकेट क्षेत्रात महान कार्य केले, स्वतःची टीम बनवून इंग्रजांच्या विरुद्ध खेळले. क्रिकेट हा त्यांचा छंद होता आणि आजही भारतातील देशांतर्गत क्रिकेट स्पर्धा ही त्यांच्या नावे म्हणजे ‘ रणजी क्रिकेट स्पर्धा’ या नावाने खेळवली जाते.आज राजश्री शाहू छत्रपती महाराज -कुस्ती, तसेच राजा रविवर्मा -चित्रकला, डॉक्टर सलीम अली, मारुती चितमपल्ली- पक्षी निरीक्षण, यांच्या छंदांचे वर्णन करता येईल.अगदीच आताच्या काळाचे उदाहरण घ्यायचे ठरल्यास अहमदनगर जिल्ह्यातील अकोले येथील बीजमाता राहीबाई पोपेरे यांचे घेता येईल, रहीबाई यांनी वीस वर्षापासून त्यांच्या भागात सापडणार्या गावरान वाणांचे बियाणे गोळा करण्याचा छंद जोपासला आणि बघता बघता कळसुबाई संवर्धन समितीच्या अध्यक्ष बनल्या. भारत सरकारने त्यांना 2019 मध्ये पद्मश्री पुरस्कार देऊन गौरवित केले.. याबरोबरच त्यांना राष्ट्रपतींच्या

हस्ते नारी शक्ती सन्मान पुरस्कार मिळाला. आणि बी. बी. सी. ने 100 शक्तिशाली महिलांमध्ये त्यांचा समावेश केला. जगातील सर्वांत श्रीमंत व्यक्ती एलोन मस्क याचा लहानपणी वाचन हा छंद होता आणि वाचनातूनच मी घडलो असे त्यांनी वेळोवेळी सांगितले आहे. आज तो स्पेस एक्स या कंपनीचा मालक आहे. भारत रत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतले भारतासारख्या सर्वात मोठी लोकशाही असलेल्या देशाचे संविधान त्यांनी लिहिले .बाबासाहेबांनी आपल्या जीवनात वाचन हा प्रमुख छंद जोपासला होता . आणि त्यांनी पुस्तकांसाठी स्वतंत्र घर बांधले होते.

वरील उदाहरणे हे त्या त्या क्षेत्रातील प्रातिनिधिक उदाहरणे असली तरी वरील सर्व महामानवांना त्यांच्या छंदांचा त्यांच्या कार्यात उपयोग झाल्याचे दिसून येते, तसेच छंद हे केवळ वेळ घालवण्याचे साधन नसून त्यातून मिळणारी अंत:प्रेरणा फार महत्त्वाची असते हेच सिद्ध झाले. विद्यार्थीदशेत असताना छंद जोपासल्यास भविष्यात आपली समाजात चांगली ओळख निर्माण होते. बदलत्या काळात छंदांचे स्वरूप जरी बदलले असले तरी छंदांची आपल्या जीवनात महत्त्व कमी झालेले नाही. विद्यार्थ्यांनी शिकता शिकता आपल्या आपल्या आर्थिक, सामाजिक, भौगोलिक, शारीरिक परिस्थितीनुसार आपल्या छंदांची निवड करावी. आपल्या पाल्यामध्ये असलेल्या छंदाची माहिती पालकांना असल्यास पालकांनी त्यांना त्या बाबतीत मदत करावी किंवा आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शन घ्यावे, विद्यार्थ्यांना सहज सुलभ प्रकारे करता येणारे छंद जसे की देशी विदेशी नाणी गोळा करणे, नोटा गोळा करणे, बी-बियाणे गोळा करणे ,पोस्टाची तिकिटे गोळा करणे, गायन करणे, वादन करणे,चित्रकला, पक्षी निरीक्षण, वाचन, लेखन, ब्लॉगिंग, बागकाम, ओरिगामी, योगा, नृत्य, गिर्यारोहन, कुकिंग, हस्तकला, मूर्तिकाम ,खेळ इत्यादी .खऱ्या अर्थाने जीवन समृद्ध करण्यासाठी छंद हे जीवनात हवेच आणि त्यांची जोपासना विद्यार्थीदशेत झाल्यास जीवन जगण्यात सकारात्मकता येते . परीक्षेत यशस्वी होण्यासाठी गुणांची आवश्यकता असते तर जीवनात यशस्वी होण्यासाठी छंदाची आवश्यक असते म्हणूनच जॉर्ज बर्नाड शॉ म्हणतात Happy is the man who can make a living by his hobby.

**- श्रीम. वेरोनिका श्रीनिवास अवसरमल / अ.नगर**
**मो.- 9421646899**

# पुन्हा वाट पाहत बसतो



माहेरच्या मुऱ्हाळ्याची
जश्शी वाट पाहावी
तश्शी मिरगाच्या पाण्याची
वाट पाहात अस्ते माय

माती शिवारभर फुलून आलेल्या
बाभळीच्या पिवळ्याजर्द फुलासंग
पिवळेपण घेते
नवी नवरी व्हतें

खुलून जातें चैत्राच्या भर ऊन्हात
काळ्या ढेकळ्याचे काजळ लेवून
गाते पाखरांच्या गाण्यासंग गाणं
कधी दुष्काळाच कधी सुगीच

चंद्रभागेच्या अमृताचा दांड
आणि
कास्तकरी दु:खाची गाथा पचवून

वाहणाऱ्या इंद्रायणीच्या पाण्याची
पुण्याई
कुठं आमच्या बिघाभर शेताशिवाराला

म्हणूनच तर....

ह्या कृष्णसावळ्या मेघांना
कोरडवाहू पणाचे निरोप सांगत
फिरतो आम्हीं

आणि पुन्हां वाट पाहात बसतो
बांदावर
नव्या नक्षत्राची
नव्या पावसाची

- गोपाल ऋषीदास इंगळे / सोयगाव
मो.- ७३५०७११९८६

# गंप्या पोस्टमन



गंप्या!हा वडगावबंधारा या गावचा पोस्टमन, गावाला वडगाव बंधारा हे नाव पडण्यामागे एक इतिहास आहे.म्हणजे गावात पुरातनकाळापासून एक भले मोठे वडाचे झाडं होते आणि त्या झाडाला लागुनच एक पाण्याने तुडुंब भरलेला बंधारा होता त्या बंधाऱ्यातील पाणी साऱ्या गावाला मिळायचे म्हणून त्या पाच हजार वस्तीच्या गावाचे नावं वडगावं बंधारा असे प्रचलित झाले. आणि अशा एतिहासिक गावात गंप्या हा एकुलताएक पोस्टमन होता.खरतर गंप्याच नाव गणपत असे होते पण या गावकऱ्यांनी गणपतचा पार् गंप्या करून टाकला म्हणून गणपत ऐवजी गंप्या पोस्टमन या नावाने गावकरी होकारत असे.

गंप्यांचे वडिल वडगाव बंधाऱ्याचे पोस्टमन होते.पण वारंवार तब्येत खराब होत असल्यामुळे वडिलांच्या जागेवर गंप्याला नौकरी मिळाली आणि काही दिवसानीच गंप्याचे वडिल स्वर्गवासी झालेतं त्या नंतर दोन वर्षनी गंप्याच्या आईनेही या जगाचा निरोप घेतला त्यामुळे गंप्या पोरका झाला.आईवडील गेल्यामुळे एकुलताएक असलेल्या गंप्याला त्याची काळजी घेणारे कोणीच राहीले नाही म्हणून तो साऱ्या गावकऱ्यांना आपलचं समजायचा,गावकरीही गंप्याला आपल्याच कुटुंबातला एक सदस्य समजून त्याच्यावर प्रेम करायचे.आणि गंप्याल्याही कधी एकटेपणाची जाणीव झाली नाही.सारे गावकरी त्याची काळजी घ्यायचे सुख दुःखाला अडीअडचणीला मदत करायचे,सणसणावळीला गावातल्या कोण्या एका घरी गंप्याला हमखास जेवणाचे निमंत्रण असयचे तेव्हा असे लाडाकोडाच्या वातावरणात गंप्याला कधीच एकटेपणासारखे वाटतं नव्हते.तो सर्वंना आपलचं गणगोत समजायचा म्हणून गंप्याही त्यांच्यात मिळून मिसळून रहात असल्यामुळे गंप्याला कसलीच फिकीर नव्हती.

गंप्या तसा पदवीधर पण अगदी साधाभोळा सरळ एकमार्गी,कुणाच्या अध्यात नाही की मध्यात नाही सांगितल्या बरोबर सर्वांच्यां मदतीला हजरं कोणी काहीही काम सांगितले की नकार नसायचां होकार देवून गंप्या काम फत्ते केल्याशिवाय गावात परतायचा नाहीचं.म्हणून साऱ्या गावकऱ्यांचा गंप्यावर लई जीव होता. वडगावबंधाऱ्याच्या जवळपासची गावातील माणसही गंप्याची चांगलीच परिचित होती. सर्वांना तो ओळखायचा त्या गावातील प्रत्येक घराघरातील खडानखडा माहिती गंप्याची तोंडपाठ होती.कुणाला मुलं किती, मुली किती,किती जावाई, कुणाची मुलगी कुठे दिली,कुणाची सुनं कोणत्या गावाची,कुणाची मुलगी लग्नाची आहे, कुणाचा मुलगा कुठे नौकरी करतो,कोणा जवळ शेतीबाडी,जमीन जंमला,घरदार प्रॉपर्टी किती. एव्हढचं नाहितर कुणाचा टाका कुणाशी भिडला आहे, कुणाची भानगड कुणाशी आहे

आणखीन जरा खाजगीत सांगायच झालच तरं कुणाच्या घरात काय चाल्लय,कोण बायकोच्या तब्यात आहे,बायकांच्या काय गप्पा चालतात

बापरै...बाप अशा कितीतरी बारीकसारीक गप्पागोष्टीकडे गंप्याची कानपूर लाईन जोडलेली होती.म्हणून सारे उनाड पोरं पंचायतीच्या चावडीवर रात्री गोळा व्हायचे आणि गंप्या कडून साऱ्या गप्पा एकण्यास उत्सुक असायचे.गंप्याही मस्तपैकी तिखटमीठ लावून चविने सांगायचा. सारे पोरं कसे कान टवकारुन बिड्यांचे झुरके ओढून, पाना गुटख्याच्या पिचकाऱ्या मारुन तासंतास ग्रामपंचायतीच्या ओट्यावर गप्पांचा फडं रंगायचा.

गंप्याचं समाजकार्यही खूप मोठं होतं टपाल वाटण्याबरोबर लग्न जुळवण्यातही गंप्या माहिर होता बरीच लग्न त्याने जुळवली होती एखाद्या घरात लग्नकरण्यासारखी मुलगी दिसली म्हणजे न लाजता,न घाबरता तो मुलीच्या बापाला तिच्या लग्नाबद्दल विचारुन टाकायच्या,आमक्या गावात आमक्याचा पोरगा लग्नाचा आहे एकटा पोरगा, बागायत शेती,इस्टेट भरपूर, कशालाच काही कमी नाही,घरात नौकरचाकर पोरीला कसलाच त्रास नसणार तुम्ही सांगाल तर मुलीच्या वडिलांकडे निरोप पाठवतो. मुलीच्या वडिलांचा होकार मिळतात गंप्याचे पाय मुलाच्या घराकडे वळायचे.आमक्या आमक्या गावाला आमक्याची पोरगी आहे. दिसायला सुदंर देखणी एकुलती एक घराला घरपण देणारी नावं ठेवायला कुठेचं जागा नाही तुम्ही म्हणतं असाल तर योग घडवून आणतो.मुलाच्या वडिलांचा होकार मिळाला की गंप्याचा मोर्चा मुलीच्या घरी. दोघांची पसंती झाल्यावर धुमधडाक्यात लग्नाचा बँड वाजायचा.लग्नाचा योग गंप्याने घडवून आणल्यामुळे लग्नात गंप्याचा थाट तर विचारायलाचं नको गंप्या तर दोघीकडचा पाहुणा! काय त्याचा संन्मान काय त्याचा सत्कार,काय त्याचा रुबाब विचारायलाच नको एकदम ओक्केमधेच

मुला मुलीच्या मंडळी कडून गंप्याचं खूपं कौतुक व्हायचं मग काय त्याला हारतुरे, जेवायच्या वेळी पंगतीत बसायला पाट ताटाभोवती रांगळी विशेष पाहूणा म्हणून दोघी मंडळी कडून एकशेएक्कावन्न रुपये आणि नारळ.त्या दिवशी गंप्याला सर्वांनकडून मानपान सन्मानचं मिळायचा.

सरकारी नौकरी चांगला पगार,पाच एकर जमीन त्यातून मिळणारे उत्पन्न शिवाय स्वतःचे घर गंप्याला कसलीच काही कमी नव्हती सर्वाकाही चांगल असताना मात्र त्याचं लग्न काही जमत नव्हते अनेकांची लग्न त्याने  जुळवलीत पण त्याच्या लग्नासाठी कोणीच पुढाकार घेईना गंप्या दिसायलाही छानं होता तरीही त्याचा लग्नयोग कोणाच्या घरच्या खुंटीला बांधला होता काही कळेना.खरतर त्याच कोणी बघणारे असते तर कधीच लग्न झाले असते पण लग्न गाठी या वरुनच बांधुन येतात तेव्हा असेल आपलीही होणारी बायको कुठेतरी! योग आला की स्वतःहून येईल ती असं म्हणून तो काही वाईट वाटून घेत नसे.सायकलीची घंटी वाजली म्हणजे गंप्याच्या अवतीभवती सार गावं

जमायचं मग प्रत्येकाला ज्याचे त्याचे टपाल देवून सायकलीची घंटी वाजवत पुढच्या गावाला रवाना व्हायचं.रोजच्या दैनंदिन सरकारी कामाला गंप्या मात्र प्रमाणिक होतां.एकदा अचानक गावच्या सरपंचांनी गंप्याल्या बोलवने पाठवले अर्थात गावात कोणतेही राजकीय, सामाजिक,धार्मिक कार्यक्रम असले की त्याचे नियोजन हमखास गंप्याकडेच असायचे वडगावबंधाऱ्याचे सरपंच आबासाहेब देशमुख याच्यामुळे गावात सर्वाकाही सुखसुविधा झाल्यात जिल्यातील ‘वडगावबंधारा’हे गावं एकनंबराला होते शिवाय गंप्या आबासाहेबांचा भरोशाचा माणूस म्हटल्यावर आबांच गंप्यावर विषेश प्रेम आणि गंप्याही आंबाचा शब्द खाली पडू देत नव्हता.म्हणून कोणतेही कार्यक्रम असुदे गंप्याशिवाय त्याचे नियोजन शक्य नसायचे. कार्यक्रमाचे नियोजनात अथवा पाहूण्यांच्या व्यवस्थेत गंप्याचे अतिशय काळजीपूर्वक लक्ष असायचे. .

सायकलवर टांग टाकली आणि इकडे तिकडे न बघतां सरळमार्गीने गंप्या टपाल वाटायला निघाला असता अचानक पाठीमागून गोडं मंजुळा आवाज एकू आला आवाजाच्या दिशेने गंप्याने कान वळवलीत आणि गंप्या आं वासून एकसारखे बघतंच राहिला,आभाळ कोसल्या सारखे झाले, त्याला विश्वास बसतं नव्हता आपण काय बघतोय,खरचं बघतोय की स्वप्न बघतोय असचं झाले समोर साक्षात सुंदर देखणी लावण्यवती मुलगी गावात पहिल्यांदाच आलेली बघीतल्यावर गंप्याला काहीच काही सुचेना ‘सरपंच कुठे असतात हो? तिच्या या गोडं आवाजाने गंप्या भानावर येताच.’आपण काही म्हणालात का’?

‘मी म्हटले सरपंच कुठे राहतात!

‘तुम्ही म्हणाल तरं मी दाखवतो त्यांच घरं!

नाही म्हणजे कसं आहे की सरपंच साहेबांच्या मर्जीतला मी खास माणूस,’गणपत’ माझं नावं पण गावकरी गंप्या म्हणून बोलवतातं

आपल नावं?

नाही म्हणजे.....!

‘सविता’....

‘सविता!...व्वा छान नाव आहे’...तर त्याच काय आहे ‘सविता मॅडम’ आमच्या गावात आपण पहिल्यांदाच आलात, आपल्यासारखे नक्षत्र आमच्या गावातं अवतरले म्हटल्यावर कोणाची द्रुष्ट लागायला नको म्हणून मिचं तुम्हाला सरपंच साहेबांच घर दाखवतो’,आता सविता मॅडम आणखी पुढे काही बोलण्याच्या आत पुन्हां गंप्या...’बरं कसं येण केलतं आमच्या गावात!’

‘या गावात नव्याने सुरु झालेल्या शाळेत सरपंच साहेबांच्या शिफारशीनी मी शिक्षिका म्हणून या गावात आले.तेव्हा प्रथम साहेबांची भेट घेतली की पुढच्या कामाला मार्ग मोकळा यासाठीच त्यांच्या घरी जायचे म्हणते मी’,

‘व्वा का नाही!म्हणजे चारही वर्गाला तुम्हीच शिकवणार तर!

हो...!

आणि सरपंचाच घर येईपर्यंत त्या सविता मॅडमांना गंप्याने आपल्या आयुष्याचा संपूर्ण लेखाजोखा सांगुन टाकला,बाई काहीच न बोलता गंप्याची बडबड ऐकता ऐकता सरपंच साहेबांच्या घरी पोहचला साहेबांची भेट झाल्यावर साहेबांनी गंप्यावर हुकूम सोडला.'हे बघं गंप्या या आपल्या गावच्या शिक्षिका आहेत यांना कुठलीच अडचण यायला नको,काय लागते काय नाही ते सार तू बघायचं, वरच्या गावातली खोली रिकामी आहे ती त्यांना दाखवं त्या खोलीची साफसफाई करं काय सारसामान लागतो ते आणून दे त्यानंतर शाळा दाखवं आणि काही महत्वाची कागदपत्रे पोहचवायची व आणायची असली तर ती जबादारी तुझी समजलका'

'समजलना आबासाहेब सगळ करतो की मी तुमची काम करतो म्हटल्यावर त्यांची का नाही करणार.आता बाईंची जबाबदारी माझ्यावरचं काय...!'

असं म्हणून गंप्याने त्या सविता मॅडमांना सरपंचांनी सांगीतलेल्या खोलीवर नेले खोलीची साफसफाई केली.त्या नको नको म्हणत असतांनाही गंप्याने सर्व कामे केलीतं स्वतःच्या घरचा पलंग,पंखा,गादी पाण्याची बादली रोज वापरण्यासाठी काही भांडीकुंडी आणून दिलीत आणि त्या दिवसापासुन गंप्याचीनी् मॅडमांची रोजच्या भेटीगाठी व नजरानजरीचा सिलसिला सुरु झाला.

गावात मॅडम आल्यापासून गंप्याचं ग्रामपंचायतीच्या चावडीवर,मित्रांसोबत गप्पा झोडायला येण्याचे बंद झाले शिवाय पहिल्यापेक्षा पाचपटीने त्याची राहणीमान सुधारली अंगावर चांगले कपडे दिसायला लागल्यामुळे मित्र सवंगडी गावकरी अचंबित झाले.वागण्यात बोलण्यातही खूपच बदल झाला.ऑफिस कामाशिवाय ईतर रिकामी कामेही गंप्याने बंद केलीत.रोजच्या येण्याजाण्याने अवघ्या सहा महिन्यातच गंप्याची व सविता मॅडमांशी चांगलीच ओळख झाली.मॅडमांनी सांगितलेली शाळेची कामे गंप्या बिनचूक करायचा त्यामुळे गंप्याशिवाय मॅडमांचे कामे अडून जायची व गंप्याची सवय झाल्यामुळे सविता मॅडमांनाही काही करमायचे नाही.वर्षभरात दोघही हळूहळू एकमेकांना खूपच चांगले ओळखायला लागलेत. गंप्याही मॅडमांच्या सहवासाचा आनंद,आणि गुलाबी स्वपनात रंगून जायचा.जणू तो तिच्या प्रेमात गुरफटला पण सांगुशकत नव्हता प्रेम काय असते हे गंप्याला हळूहळू कळायला लागले कोणीतरी आपल्याला भेटल्याची जाणीव गंप्याला होवू लागली पण मनातल्या भावना कशा व्यक्त कराव्यात हे गंप्याला काही कळेना. गंप्याने अनेकांच्या चिठ्ठ्या ईकडच्या तिकडे केल्यात पण स्वतःने मात्र कुणासाठी चिठ्ठी लिहली नव्हती परंतू मॅडम आल्यापासून गंप्या पुरता त्यांच्या प्रेमात बुडाला होता म्हणून आपल्या मनातल्या भावना चिठ्ठीत लिहून महत्वाचे पाकीट आल्याचे सांगुन गंप्याने त्यांच्या हातात स्वतःच प्रेमपत्र दिले. पत्र वाचताना सविता मॅडमांचा बदलेला चेहरा पाहून गंप्याची चांगलीच टरकायला लागली मॅडमांचा चेहरा लालेलाल तर गंप्याचा चेहरा काळा पिवळा झाला,गंप्या

घाबरायला लागला पत्र वाचून मॅडम ताडकन उठल्या पुढेकाही बोलण्याच्या आत गंप्याने त्यांचे पाय धरून क्षमा मागितली.

'मॅडम मला क्षमा करा मी चुकलो मी अस करायला नको होतं मी यापुढे असे कधीच करणार नाही आपण जी शिक्षा द्याल ती मला मान्य आहे एकदा क्षमा करा पण कोणाला सांगु नका'

गंप्याला जेकाही सांगायचं होत ते एका दमात सांगुन टाकले तसे सरपंचांनीही गंप्याची सर्व कहाणी सविता मॅडमांना सांगीतल्याने त्यांच्याही मनात उठलेला भावनांचा कल्लोळ मोकळा करायला संधी मिळाली. मग काय सविता मॅडमने गंप्याचे दोघी हात हातात घेवून त्याच्या जवळ आपल्या भावना व्यक्त केल्यात क्षणभर त्याला विश्वास बसत नव्हता जे एकतोय ते खरच की स्वप्न त्याला काही कळेना

पण ते खरचं होतं.ज्या दिवशी सरपंचांनी तुमच्याबद्दल सांगितले त्याच दिवशी तुम्ही माझ्या मनात घर केले पण कसं सांगावे काही कळेना,माझेही आई बाबा देवा घरी गेलेत,त्या नंतर मामांनी माझा सांभाळ केला त्यांच्याच प्रयत्नाने मला नौकरी मिळाली आता मामाही राहीले नाहीत मामी तिच्या मुलाकडे मुंबईला रहायला गेली तेव्हा तुमच्यासारख्या गुणी मुलाचा आधार जर मला जन्मभर मिळणार असेल तर लग्नाच्या बेडीत अडकायला माझी काहीच हरकत नाही फक्त तुमचा होकार हवायं'

सविता मॅडमांचा होकार असल्यावर गंप्या नकार कसला देतोय.मग काय गंप्याच्या लग्नाची वार्ता होतोहात साऱ्या गावात पसरली.

वडगावबंधाऱ्यासकट आजूबाजूच्या सर्व गावकऱ्यांनी तसचे अधिकाऱ्यांनी गंप्याच्या लग्नाला हजेरी लावली सरपंचच्या मदतीने गंप्याच लग्न धुमधडाक्यात झाले. कन्यादान सरपंचांनीच केले.गंप्याच लग्न म्हणजे आपलं घरचचं लग्न आहे म्हणून गंप्याच्या जिवाभावाच्या मिंत्रानीसुध्दा गंप्याच्या लग्नात जबाबदारीने राबलेत.गंप्याचं लग्न सर्व गावकऱ्यांसाठी आदर्श विवाह ठरला यावेळी गंप्याला त्याच्या आईवडीलांची आठवण झाली ते असते तर त्यांना किती आनंद झाला असता.गंप्याच्या प्रामाणिकपणाची दखल घेत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गंप्याची पोस्टमास्तर म्हणून बढती केले.

बायकोच्या पायगुणांमुळे पोस्टमनचे पोस्टमास्तर म्हणून गंप्याचे प्रमोशन झाले हे गंप्याला मिळालेली खूप मोठी लग्नभेटं होती.एकदाचं गंप्यांच लग्न झालनी् गावकऱ्यांच्या जीवात जीव आला. मग काय आता गंप्या आणि त्याची बायको दोघेही रोज मोटारसायकलीने ऑफिसला भुर्रकनी जाऊ लागले.

**- संजय धनगव्हाळ / धुळे**
**मो.- ९४२२८९२६१८**

# संसार

काव्यप्रकार : अभंग

संसार संसार । आनंदाचा मेळ ।
साधा योग्य वेळ । जीवनात ॥१ ॥

ठेवावा आदर । एकमेका प्रती ।
मिळे सदगती । संसारात ॥२ ॥

दोन्ही कुटुंबाची ।जपावी संस्कृती |
सांभाळूनी नाती । प्रेमभावे ॥३ ॥

मुलगा मुलगी । प्रेमाचे अंकुर ।
पूर्ण घर दार । जीवा वाटे ॥४ ॥

संसाराचा मंत्र । विश्वास सर्वत्र ।
जगण्याचे तंत्र । बहुमोल ॥५ ॥

सुख आणि दुःख । संकटाचे वारे ।
एकजूट सारे । कुटुंबात ॥६ ॥

जीवन प्रवास । एकमेका हात ।
मनो मिलनात । मनमित ॥७ ॥



– सौ. अमिता अरविंद घाटोळ / अकोला

# प्रलय



"ताई हे बाळाचं नाव असं काय आहे ?"

"आता तुला माहिती आहेच की?"

प्रश्न तसा साधा होता. जान्हवी ने तो सहज विचारला होता.

" सांगेन तुला ..सवडीने सगळं सांगते पटापट काम आवर, साधना व बाळ झोपले तसं.. मलाही आवरायचा आहे हो जान्हवी"

असे म्हणत शामला कामाला लागली. पण बाळाचे नाव हे का ठेवले..हा साधनाचाच हट्ट? तिला तो प्रसंग आठवला आणि तिने देवाचे आभार मानले...मनापासून..बाळंतपणासाठी साधना माहेरी महाड ला आली होती.तेच महाड जे रायगडच्या सावलीत विसावले आहे.इतिहासाची साक्ष देत उभे आहे तेच महाड.

जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात पाऊस जास्तच पडत होता पण तो काही केल्या थांबायचं नाव घेत नव्हता..ढग फुटी झाल्यासारखा तो पडत होता त्यात हे गाव सखल भागात असल्याने चहुबाजूनी डोंगर त्यामुळे अवतीभवतीचे सगळं पाणी गावांमध्ये यायचं.. तीन नद्यांच्या पाण्याचा वेढा गावाला पडायचा.महाडकरांना या उथवाची सवय झालेली होती. नेमेची येतो मग पावसाळा या उक्तीप्रमाणे नेहमीची येतो हा 'उथव' हे महाडकरांच्या अंगवळणी पडलं होतं हे नाकारून चालणार नाही.. तशी श्यामलानीही तीस वर्ष महाडमध्ये घालवलीत ना.. तसं पाहिलं तर 2005 चा महापूर तिने पाहिलेला होता.. घरात पाणी येणे.. पाणी हळूहळू कमी होत असताना घर धुणं हे सगळं अनुभवलं होतं,पुराचे पाण्यात हिंडणारी, पुराचे पाणी पाहण्यासाठी जमलेली गर्दी एक वेगळाच अनुभव ती अनुभवली होती.पुराच्या पाण्यात फिरणाऱ्या बोटी, बोटीच्या साहाय्याने वाचवली जाणारी माणसं हेही अनुभवलं होतं.कधी कधी मगर कौलावर जाऊन बसायची तर कधी पुराच्या पाण्यासोबत महाडमध्ये मगरी शिरायच्या हे ही नवीन नव्हतं.. पण का कुणास ठाऊक? हा पाऊस ना असा भयानक वाटत होता. काळंकुट्ट गच्च भरलेलं आभाळ.. माणसांच्या मनातील मळभ काही केल्या दूर करत नव्हतं, सतत जोरात बरसणारा पाऊस थांबायचं नावच घेत नव्हता अशा वातावरणामध्ये शामला एकटक त्या धो धो पडणाऱ्या पावसाकडे पाहत होती.. कारणही तसंच होतं?ती लेकिला म्हणाली, "आत्ता जर या पावसाने महाडमध्ये पूर आणला तर सगळं अवघड होईल नाहीतर तू बाळंतपणाला आली आहेस आणि अशी दिवसात ...आहेस"

"अग आई त्यात काय एवढं? थांबेल तो पाऊस?"

असा मायलेकीचा संवाद चालला होता आणि आज अचानक पाणी आलं,पाणी

चढत होतं....दुपारपर्यंत पाणी अगदी एक ठराविक लेव्हलला आलं आणि पुन्हा उतरलं तशा मायलेकींना बर वाटलं .पण त्यातच साधनाच्या पोटात बारीक कळा येत होत्या तशी शामला घाबरली.. लेकीला दवाखान्यात घेऊन गेली.. डॉक्टर म्हणाले,

"जातील अजून चार दिवस अगदी सहज"

तेव्हा कुठे तिला जरा हायसं वाटलं..

तरीही तिने डॉक्टरला विचारले.

"हिला ठेवायची का इथे..पाऊस ही खूप पडतोय..पुन्हा पाणी आले तर....."

"अगं...मी आहे ना......तू नको काळजी करुस..."

डॉक्टर तिची मैत्रिणच होती त्यामूळे दोघी घरी आल्या. पावसाची रिपरिप थांबलेली नव्हतीच.. संध्याकाळी दिवस कलला आणि पाण्याचा वेग वाढला.. जसा पाण्याचा वेग वाढत होता तसे घाबरुन भीतीने साधनाच्या पोटात जोरात दुखू लागले.

" साधना खरचं पोटात खूप दुखतयं का? की पुराच्या भीतीने तुझं पोट दुखतंय.....?"पाणी चढतेय त्याची तुला भीती वाटतेय का?"

" नाही गं आई, मला पोटात दुखतयं"

"असं मग आता डॉक्टर कडे जायचं का? डॉक्टर तर म्हणाले होते अजून पाच सहा दिवस जातील, चेक केले तेव्हा...जरा आडवी पडतेस का? बाहेरच का गोंधळ होतोय ते.... थांब मी बघून येते जरा टेरेसवर जाऊन ती टेरेस वर गेली आणि पाहते ते काय.. पाण्याची पातळी वाढतच होती... तशी धावतच खाली आली.

"हे गं काय आई जरा सावकाश! किती दम लागलाय तुला?"

"दम मला नको दम आता पावसानी घेतला पाहिजे, दम त्या पाण्याला लागला पाहिजे"

" म्हणजे काय?"

"पाणी वाढतंय"

" तरी बरं आहे, तुम्ही रुम पहिल्या माळ्यावर घेतली म्हणून बर आहे हो, बरं झालं बघ आई...."

असा मायलेकींचा संवाद चालला होता आणि एकदम पाण्याची पातळी वाढतच होती..आणि साधनाच्या कळा वाढतच होत्या.

" दवाखान्यात जायचं का? तुझ्या पोटात जास्त दुखतयं का ?"

"काही जास्त नाही पण थोडं थोडं. मला कसतरी होतंय ग!"

" आपण जायचं का दवाखान्यात मी फोन करते डॉक्टरना. अगं आज दुपारी डॉक्टर चेक केले तेव्हा म्हणालेत ना चार दिवस जातील आपण जरा वाट बघू"

"काही सांगता येत नाही आणि हे बघ नंतर पाणी वाढलं तर आपल्याला बाहेर पडता येणार नाही बाळा!"

" नको "

"अगं श्रीधरला सांगते मी रिक्षा बघायला आणि आपण जाऊ दवाखान्यात. "

"मी काय म्हणते ते ऐक, अगं नको आणि दादाला कशाला सांगतेस ..थांब जरा,

ठिक आहे मी तुला गरम गरम जेवायला देते अस म्हणत तिने सहज पार्किंग मध्ये डोकावून पाहिलं आणि तिची भीतीने गाळण उडाली पण तसे चेहऱ्यावर न दाखवता तिने लेकीला खाऊ घातलं, थोडे गरम पाणी प्यायला दिले तिच्या चेहऱ्यावर एक काळजीचा थर जमला होता.. आत्ताच लेकीच्या कळा वाढल्या तर काय करायचं? हा प्रश्न तिला सतावत होता आणि झालंही तसंच..

" आई ग ,आई कसंतरीच होतयं, आता खूप दुखतंय पोटात.."

" अगं थोडं धीराने घे, मी डॉक्टरांना फोन करते"

म्हणत तिने डॉक्टरांना फोन लावला..

" घाबरु नका आम्ही संपर्कात आहोत.पण सकाळी चेक केलं तेव्हा असं काही जाणवलं नाही.. मग असं अचानक..बहुतेक पुराच्या पाण्याचे टेंशन घेतलय तिने,"

" माहिती नाही डॉक्टर पण तिला कळा येत आहेत.. काय करायचं आता ?आमच्या पार्किंगला पाणी आहे. खूप दुखतेय, खूप त्रास होतोय तिला, मॅडम ह्या डिलिव्हरीच्या कळा आहेत आता तिला हॉस्पिटलमध्ये एडमिट करु कसं करणार? पार्किंगमध्ये चार फूट पाणी आहे, अशा अवघड परिस्थितीत अवघडलेल्या लेकीला कसं आणायचं? "

" खरंच कसोटीचा काळ आहे, संयम ठेवून धीराने वागायला पाहिजे आता."

"मग मी काय करु सांगा ना.. पाणीही वेगाने वाढते आहे, या क्षणी आता काय करावं काही सुचतच नाही.. तिला दवाखान्यात ऐडमिट करावे इतका त्रास होतोय मॅडम पण आता काही तरी करायलाच पाहिजे पर्याय नाही....कळा देवून दमेल ती,"

"थोडं थांब मला विचार करु दे.. अगदी पटकन निर्णय घ्यायचे आहेत

बरं घरी अजून कोण आहेत..आजी असेलच ना..आजीला तिच्याजवळ बसायला सांग, आता या परिस्थितीत तिला हलवता येणार नाही.. एक काम करते एका नर्सला घेऊन तिकडे येते."

" हो ,पण तुम्ही इकडे येणार कसं साडेचार फूट पाणी आहे आणि वेगाने वाढत आहे बघते मी काय करायचं ते,"

बाजूची बिल्डिंग जरा जास्तच उंचावर आहे हे डॉक्टर मॅडमला माहिती होते..

चवदार तळे हा थोडा उंच भाग..इथे पाणी उशीरा येते..हाच एक प्लस पॉईंट होता. डॉक्टर मॅडम बाजूच्या बिल्डींग मध्ये पोहोचल्या होत्या आपल्या दोन सहकाऱ्यांना घेऊन. दोन्ही बिल्डिंगमध्ये जवळजवळ पंधरा फूट अंतर होतं व पार्किंग ला आता साडेचारफूट पेक्षा जास्त पाणी होतं. डॉक्टर मॅडम समोरच्या बिल्डिंगच्या पहिल्या मजल्यावर बाल्कनीत आल्या .तेथील लोकाना कल्पना दिली की इथून बाजूच्या बिल्डिंग मध्ये जायचे आहे..प्रसंगाचे गांभीर्य समजावून संगितले .. खाली तर भरपूर

पाणी होतं ..पाणी वेगाने वाढत होतं आणि आत्ता पाण्याचा जोरही वाढला होता आणि वेगही वाढला होता. बिल्डिंगच्या खांबाभोवती पाणी गोल गोल गोल फिरत होतं लाटा उसळत होत्या..पाण्याचा वेग प्रचंड वाढलेला जाणवत होता.ते पाहून हृदयाच्या ठोक्यांचा वेग वाढत होता. ह्या बिल्डिंग मधून त्या बिल्डिंग मध्ये आता जायचे होते. तिकडे साधनाचा जीव हैराण होत होता...खरं तर हा अतिशय आनंदाचा क्षण होता पण त्यावर एक दडपण होते. एक गोष्ट चांगली होती ती म्हणजे आजी घरात होती आणि ती साधना जवळ बसून होती. तिला धीर देत चार गोष्टी सांगत होती. दोन्ही बिल्डींग मधले लोक मदतीला धावून आले .त्या बिल्डिंग मध्ये डॉक्टर येणार कसे यासाठी प्रत्येक प्रत्येकजण स्वतःची आयडियाची कल्पना सांगत होता.. शेवटी फळी टाकायची आणि त्यावरुन यायचे असे ठरले .खाली पुराचे पाणी होते चुकून जरी पाय घसरला तर खाली पडण्याची शक्यता... जलसमाधीच मिळणार होती कारण 5 फूटापेक्षा जास्त पाणी होते प्रसंग बाका होता पावसाने धोका दिला होता.. आतापर्यंत दोन्ही बिल्डिंग मध्ये ही बातमी समजली होती त्यामुळे प्रत्येक जण कार्य तत्परतेने पुढे आला व स्वतःला जमेल तशी मदत करायला तयार झाला. भली मोठी जाडी फळी दोन्ही बिल्डिंगच्या तिस-या मजल्यावरील बाल्कनीतून ग्रीलला घट्ट बांधण्यात आली.. वाणी काकांनी ही शक्कल लढवली होती त्याच फळीवर बसून हळूहळू पुढे सरकायचे असे ठरले . डॉक्टरांच्या कमरेला दोरी बांधली दोन्ही बाजूंनी फळी घट्ट पकडण्यात आली....

"सावकाश जा हो पोरी आम्ही आहोत अशा सुचना मिळाल्या...

ही खरी सत्त्वपरीक्षा आहे सगळ्यांसाठी पण खास करून माझ्यासाठी" असं म्हणत डॉक्टर मैडम ग्रिलला धरून हळूच फळीवर हाताचा आधार घेत बसल्या...

दोन्ही बिल्डींग मधल्या लोकांनी दोन्ही बाजूने फळी गच्च पकडली आणि डॉक्टर मॅडम हळूच पुढे सरकू लागल्या एका नवीन जीवाला या जगात आणण्यासाठी त्यांना त्यांच्या जीवाची बाजी लावावी लागत होती..कोणत्याही क्षणी काहीही घडू शकत होते. प्रत्येकाच्या मनात भीतीने गोळा उठला होता.. फळीवर बसून हळूहळू सरकत डॉक्टर मॅडम पुढे येत होत्या. एकाग्रचित्ताने समोरच्या बाल्कनी कडे लक्ष ठेवून अतिशय शांतपणे एकाग्रचित्ताने डॉक्टर मॅडम पुढे सरकत होत्या ....चुकून जरी पाय इकडे तिकडे गेला असता, सरकला असता तर नक्कीच जलसमाधी....प्रत्येक जण श्वास रोखून पाहत होता...अंधारमध्ये मोबाइलचे लाईट तेवढे चमकत होते आणी पावसाचे थेंब..बाकीचे सारे श्वास रोखून होते.. पण देवाच्या कृपेने डॉक्टरमैडम या बाल्कनीपाशी आल्या अजिबात संयम ढळू न देता सावकाश वर चढल्या....विजयी मुद्रेने...ही तर सुरवात होती..खरी सत्वपरीक्षा आता होती...सोबतची नर्स काही आली नाही....तिला घाबरुनच चक्कर आली होती.... पण डॉक्टरांची भेट मात्र फळीवर हळु हळु सरकवत इकडे आणलेली

"कोठे आहे माझा पेशंट म्हणत डॉक्टरांनी घरात प्रवेश केला त्यांना पाहून सर्वांना आनंद झाला.

" शामला आता आहे त्या परिस्थितीमध्ये आपण ही डिलेव्हरी करतोय त्यामुळे प्रत्येकाने सहकार्य करा, काय ग बच्चू! कशी आहेस? काळजी करू नको आलेय मी आता." असं म्हणत डॉक्टरानी आपली बॅग उघडली. त्यातील सामान काढले सलाईन लावण्याची व्यवस्था केली शामलाला गरम पाणी आणायला सांगितले .आजींना काही सूचना दिल्या आणि साधनाला धीर देत कळा दे असं सांगितलं.

"डॉक्टर तुम्हाला काही चहा कॉफी देऊ का?"

" सध्या नको पहिला हे महत्वाचं काम करु दे, त्यानी साधनाला चेक केले आणि त्यांच्या लक्षात आलं की ही लवकरच बाळंत होणार आहे .सलाईन इंजेक्शन जी काय द्यायची त्यांनी दिली तशा साधनाला पटापट कळा यायला लागल्या. तिच्या वेदनानी, ओरडण्याने घर भरून गेलं. वरुण ढगांचा गडगडाट ऐकू येत होता, विजा चमकत होत्या, धो धो पाऊस कोसळत होता. पाण्याची पातळी वेगाने वाढत होती अगदी पहिल्या मजल्याच्या पायरीपाशी पाणी आलं होतं.

श्रीधरने मित्रांच्या सहाय्याने सामानाची आवराआवर केली तसा खाली काही विशेष पसारा नव्हता आणि न बोलवलेल्या पाहुण्यासारखं ,लाजत लाजत पाणी घरात घरात आलं.... हळूहळू घराचा ताबा पाण्याने घेतला तरी बरं साधना बाळंतपणासाठी आली म्हणून लोखंडी कॉट घेतली होती म्हणून तिला थोडा उंचावर ठेवता आलं होतं. साधना बाळंतपणाच्या कळा देत होती आणि पाणी घरात धुमाकूळ घालत होतं .श्यामला हवालदिल झाली.. अशा परिस्थितीत काय करावं तिला सुचत नव्हतं पण आजीने सर्वांना धीर दिला.

"आजी म्हणाल्या एकावर एक संकटे येत आहेत, देव परीक्षा घेतोय हीच वेळ आहे आपण शांतपणे सामोरं जायचं रात्रीचे दोन वाजून गेले होते हळू हळूहळू पाणी वर चढत होते अशा परिस्थितीत साधनाला हलवता येत नव्हतं ती वेदनेने विव्हळत होती आणि पाणी धुमाकूळ घालत होते घरात एका फुटावर येवून पाणी जरा शांत झाल्यासारखं वाटलं.साधनाला भराभर कळा येऊ लागल्या. डॉक्टर पुराच्या पाण्यात उभ्या होत्या आणि साधनाला धीर देत होत्या .प्रसंग किती भयंकर होता आता जर पाणी वाढायचं थांबलं नाही तर काय करायचा याचा विचारही न करता... डॉक्टर साधनाला म्हणाल्या,

" बाळा भराभर कळा दे,आता इथून तुला हलवता येणार नाही आणि पाणी थांबल नाही तर पंचायत होईल.. प्लीज इतक कोऑपरेट कर.

तशा साधनांला बराबर काय येऊ लागल्या तीही हवालदिल झाली होती पण सुदैवाने पाणी थोडं शांत वाटलं आणि अशा गूढ शांत भयानक वातावरणात साधनाने शेवटची कळ दिली आणि एकाच छानशा गोंडस बाळाने जन्म घेतला.. जवळच्या

टेबलावर डॉक्टरनी सगळा पसारा मांडला होता. किती आनंदाचा क्षण होता,आनंद साजरा करण्याचा क्षण होता पण वेळ फार भयंकर होती.. बाळाचे रडणे एक शुभ संकेत देत होते.. पाणी हळूहळू ओसरू लागले डॉक्टरानी हळूच नाळ कापलीव टेबलवर टबामध्ये बाळाला धुवून काढले कापडात गुंडाळले आणि शामलाकडे दिले तोपर्यंत ..वरच्या काकू खाली आल्या.. शामलाच्या घरात पाणी जातं हे पाहताच तिने बाळासाठी एक खोली रिकामी करून दिली माणुसकी म्हणजे काय असते त्याचे दर्शन घडत होते कारण काकू कर्मठ होत्या ..पण आत्ताची परिस्थिती त्याहीपेक्षा कर्मठ होती बाळाला पाण्यात कसं ठेवणार.. शामला बाळाला काकूकडे झोपवून आली .तोपर्यंत डॉक्टरांनी साधनाची आवराआवर केली आता पाणी ओसरले होतं घरात चिखल होता..

श्रीधर ने भराभर बाथरूम साफ करून घेतली साधनाचे सगळे आवरले आणि श्रीधरदादानी अक्षरशा तिला उचलून काकूंच्या खोलीत नेले...ती ग्लानीतच होती.... काकूनी तिच्यासाठी गरमागरम चहा केला....बिस्किट दिले...सगळे आवरून डॉक्टर वर काकूंकडे गेल्या आराम खुर्चीवर बसल्या......आणि साधनाला म्हणाल्या........

"कोठे आहे तो तुझा *प्रलय*..... .झोपला का?

तेव्हाच साधनाने ठरवले होते याचे नाव प्रलय ठेवायचे.....

"जान्हवी कळंल का? बाळाचे नाव प्रलय का ठेवले ते....शेवटी नावात काय आहे.....तर या नावात.....हे भयानक वास्तव आहे.

**- डॉ. शीतल शिवराज मालूसरे / महाड**
**मो.- 9850963181**

# आम्ही फक्त ऐकणारे



कुठे शोधू तुकोबाला
कुठे आहे त्याचं गाव ,
त्याचा प्रत्येक अभंग
घेते काळजाचा घाव ।

प्रत्येकानं सांगितलं
तुका वैकुंठाला गेला ,
तोच कसा एकटारे
इथे पुण्यवान झाला ।

शेणा मातीच्या घरात
होती विठोबाची मूर्ती ,
रोज रचले अभंग
गेली वेकुंठात कीर्ती ।

टाळ कुटूनिया त्यानं
केला देहूत जागर ,
विठ्ठलाच्या मूर्तीलाही
त्यानं फोडला पाझर ।

त्याच्या नावाचं संकट
चिंता रोजच मठात ,
म्हणून आलं विमान
त्या देहूच्या डोंगरात ।

त्यांनी त्यांच्यासाठी केलं
अन् लिहून ठेवलं ,
त्याचं वैकुंठाला जाणं
त्यांनी घरोघरी केलं ।

आम्ही फक्त ऐकणारे
कधी प्रश्न नाही केला ,
त्याच्या आधी नि नंतर
कोण वैकुंठाला गेला ।

**- गणेश भाकरे / सावनेर**
**मो.- ९९२३८२९७१७**

# ओझं अपेक्षांचे



खरं म्हटलं तर माणुस फक्त एक हमाल आहे ...
तो आयुष्यभर अपेक्षांचे एक अदृश्य ओझं वहात रहातो आणि ते ओझं सोबत घेऊनच जगाचा निरोप घेतो...
( एक खोडकर मित्र )

जुलै २०२२.....
वैष्णोदेवी दर्शनासाठी जाण्याचा योग आला..
जम्मू पर्यंत रेल्वे आणि पुढे इनोव्हा करून कटराला पोहचलो..
कटरा ते वैष्णोदेवी जाण्यासाठी हेलिकॉप्टरचे बुकींग केलं होतं पण खराब वातावरणामुळे हेलिकॉप्टरचे उड्डाण रद्द झाले..
खास दर्शनासाठी आलो होतो तेंव्हा कसं ही करून जाणं भाग होतंच..
मग उरले ३ पर्याय -
पहिला घोड्यावरून जाणे..
दुसरा डोलीतून जाणे ...
आणि तिसरा - शेवटचा पर्याय म्हणजे पायी चालत जाणे..
काही वर्षांपूर्वी मी अमरनाथला गेलो होतो तेंव्हा घोड्यावरून प्रवास केला होता, त्या प्रवासाचा अनुभव चांगला नव्हता...
एकतर आपल्याला घोड्यावर बसण्याची सवय नसते अन् दुसरं आपण ज्या घोड्यावर बसलेले असतो तो घोडा दरीच्या काठाकाठाने चालतो, तुम्ही त्याला दुसऱ्या बाजूला वळविण्याचा किती ही प्रयत्न करा - ते जनावर ऐकत नाही, पुन्हा पुन्हा दरीच्या बाजूनेच चालतं... खाली पाहिले की आपल्या पोटात भीतीचा गोळा उठतो.. सांगता ही येत नाही अन् सहन ही होत नाही अशी परिस्थिती...
डोलीचं ही असंच आहे, बसायला आराम खुर्ची सारखं आहे असं वाटतं पण अंग ताठून जाते....
तिसरा पर्याय म्हणा किंवा नाईलाज म्हणा - तो होता पायी चालत जाणे....
१४-१६ किलोमीटरचा चढ पायी चालत जाणे आपल्याला जमेल का मनात ही शंका होती पण पाहिले की लहान लहान मुले, वयस्कर माणसे ही ' जय मातादी - जय मातादी ' असा जयघोष करत जातात मग ठरवलं let us try !! - प्रयत्न करू या !!
निघालो...
प्रवासाच्या सुरुवातीला रस्त्यात वेगवेगळ्या प्रकारची दुकाने आहेत, स्टॉल आहेत, हॉटेलस् आहेत...

एक पोरगेलासा तरुण पुढे आला आणि लाकडी छडी दाखवत म्हणाला – " ये छडी ले लो बाबुजी, सिर्फ २० रुपये..रास्ते में काम आयेगी...दर्शन कर के लौटते वक्त इसे जमा करोगे तो १० रुपये वापस .."

वैष्णोदेवी मंदिराला जाताना मोठा डोंगर चढावा लागतो...वळणं वळणं आहेत त्यामुळे आधारासाठी अशा प्रकारच्या छड्या (किंवा काठ्या) बहुतेक वृद्ध तसेच काही काही तरुण देखील वापरतात...

मी ही एक छडी विकत घेतली.. विकत घेताना एक सहजसुलभ मध्यमवर्गीय विचार मनात आला – " चला, दर्शनाला जाताना ही छडी टेकू म्हणून कामाला येईल... परतीला येताना दुकानदाराला छडी परत करु आणि १० रुपये परत घेऊ.."

माझ्या बाजूलाच एक वयस्क गृहस्थ उभे होते, ते मनकवडे असावेत, माझ्या मनात आलेला छडी परत करुन १० रुपये परत घेण्याचा विचार त्यांनी ताडला असावा..ते म्हणाले – " छडी वापस मत करना बाबू ...इसे माता के चरणों में रखना, फिर घर ले जाना और घर के मंदिर में सजाना ... बहोत शुभ ... बहोत लाभदायी होता है ..तुम्हारे बिगडे काम बन जायेंगे .."

मी त्या गृहस्थाकडे निरखून पाहिले , एकदम फाटका माणूस.. मी पहातो आहे हे बघून त्याने लगेच हात पुढे केला अन् " कुछ चाय पानी के लिये दे दो बाबू.. " म्हणत हसला..

आपण ही कधी कधी भाबडे होऊन जातो ...

मनात विचार आला – " देव कधी कुठल्या स्वरुपात भेटेल सांगता येत नाही .."

मी ५ रुपयांचे नाणे त्याच्या हातात ठेवले..

" माता राणी आपका भला करें.. हर काम में बर्कत आये " – अशी दुआ देत तो मार्गस्थ झाला...

मला तर त्या बाबांचं भेटणं बोलणं शुभशकुन वाटला...

एकदा छडी कडे पाहिले अन् ती टेकवित टेकवित निघालो...

विचार चक्र सुरु झाले....

खरंच ही छडी आपल्या आयुष्यात काही चांगला बदल करु शकेल ?...

का नाही !!

तर्जनीत पुष्कराज घातलेले कैक माणसं हा खडा पावला असं आवर्जून सांगत असतात की ....

कुठे तरी वाचलं होतं की ' मिस्टर इंडिया ' मध्ये परिधान केलेला कोट माझा लक्की कोट आहे..तो मी घरात सांभाळून ठेवला आहे असं अनिल कपूर म्हणत असतो आणि बघितलं तर मि. इंडिया नंतर अनिल कपूरचं करिअर खरोखरच मार्गी लागलं होतं...

धर्मेंद्र कडे जगातील लेटेस्ट कार असताना ही ते ६० च्या दशकातली फियाट कार आपली लकी कार आहे असं म्हणत तिच्या सोबत फोटो शेअर करतात , त्यांनी

आपल्या गॅरेज मध्ये सुस्थितीत ठेवली आहे....

बाराखडीची अक्षरं खरं तर निर्जिव पण एकता कपूर आपल्यासाठी ‘ क ‘ ची बाराखडी लक्की आहे असं म्हणते, तिचा सिनेमा , सिरियलचे टायटल हे ‘ क ‘ अक्षरानेच सुरु होते...

इतकंच काय आमचे शेजारी बंगाली दासबाबू ही करंगळी मध्ये मोत्यांची अंगठी घालतात , कधी कधी सांगत असतात – ‘ जब से इस को पहनना शुरु किया तब से बहोत सारे प्राब्लेम से कम हो गये है ..”

परिस्थितीने दमलेला सामान्य माणूस हळवा होतो... भाबडेपणाने निर्जिव वस्तूंकडून ही काही पॉझिटीव्ह होईल अशी अपेक्षा करु लागतो आणि शुभ शुभ विचार ( wishful thinking ) करत असतो...

मी विचार केला – आपण तरी कुठे असामान्य आहोत !!...

कोण तो बाबा ... मी छडी घ्यायला आणि तो भेटायला एकच गांठ पडणं हा योगायोग म्हणावं की आणखी काही ... ते काही असो ह्या छडीमुळे आयुष्यात नक्कीच काही तरी सकारात्मक ( Positive) होणार आहे, तेंव्हा हिला एकदा वैष्णोदेवीच्या पायांवर घालून देव्हाऱ्यात ठेवायचंच असा मनोमन निर्धार केला...

चालू लागलो...

वैष्णोदेवीचा डोंगर निसर्ग रम्य आहे पण आता माझं तिकडे लक्ष नव्हतं...

सगळं लक्ष – छडीवर ... स्वप्नरंजनात ...

चहा घ्यायला थांबलो तर छडी दोन्ही पायात सुरक्षित ठेवून चहा प्यालो..

बाथरुमला जातांना ही ती हरवणार नाही हीच काळजी जास्त घेतली..

ह्या नादात रस्त्यात एकदा ही सेल्फी घेतली नाही की फोटो काढला नाही – एरव्ही मी १०-१२ तरी फोटो काढत असतोच...

मंदिराच्या अलिकडे सिक्युरिटी चेक आहे ...

सिक्युरिटी चेकच्या वेळी छडी घेऊन गेलो तसा गार्ड खेकसला – “ क्या सोने की छडी हैं जो यहाँ तक ले आये हो ? .. थोडी देर बाजू मे नहीं रख सकते ??.. “

आता ह्याला कसं सांगणार की – “ बाबा रे , ये मेरी तकदीर बदलनेवाली हैं !!...”

वैष्णोदेवीच्या मंदिरात प्रवेश करताना प्रत्येकाला आपल्या जवळ असलेले सर्व सामान , मोबाईल, पर्स सगळं सगळं बाहेर लॉकर्स मध्ये ठेवून मगच जाता येते...

मी सगळं सामान ठेवून दिलं पण छडी ?? ...

छडी बरोबर घेतली कारण छडी देवीच्या चरणांवर ठेवायची होती ना ..

रांगेत लागलो – रांगेत उभे असलेले यात्रेकरु म्हणायला लागले – तुम छडी नहीं ले जा सकते .. त्यांच्याकडे दुर्लक्ष करत पुढे सरकलो ...

रांगेच्या बाहेर उभा असलेला गार्ड ओरडला – छडी फेक दो , अंदर अलाऊड नहीं है ... पण हो नाही – हो नाही करत , नजर चुकवून छडीला शेवटपर्यंत अंतर दिलं नाही

....

एकदाचं दर्शन झाले...

छडी माता राणीच्या पायांवर ठेवली, तेंव्हा तिथं उभा असलेल्या गार्डने छडी हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला पण मी तो हाणून पाडला अन् गर्दीत सटकलो..

चला , एवढ्या दिव्यातून छडी घेऊन सही सलामत बाहेर पडलो तेंव्हा आपल्या सोबत काही तरी नक्कीच चांगलं घडणार आहे ही खात्री वाटू लागली...

परतीचा प्रवास श्रीनगर - मुंबई असा विमानाने होता..

आता मात्र छडी मला नेहमी हातात हवी होती...

विमानतळावर पोहोचलो, बोर्डिंग पास घेतला..लगेज् टाकून दिलं...

हातात छडी घेऊन सिक्युरिटी चेकला गेलो..

विचारांच्या तंद्रीत मला लक्षात आले नाही की बोर्डिंग पास घेतानाच छडी लगेज् सोबत टाकून द्यायला पाहिजे होती... पण वेळ निघून गेली होती... लगेज काऊंटर खूप दूर होतं, परत जाणं अवघड होतं आणि वेळ ही नव्हता...

विमानात छडी नेता येणार नव्हती...

चेक इनला गेल्या गेल्या गार्डने छडी काढून बाजूला फेकून दिली..

हातात असलेले डॉलर खिशात ठेवतानाच वाऱ्याने दूर उडून जावेत अशी परिस्थिती...

हळहळलो...

गप्प बसण्याशिवाय माझ्याकडे अन्य कांहीच पर्याय नव्हता ...

* * * * *

१५ ऑगस्ट २०२२ ...

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव ...

देशाच्या पंतप्रधानांनी ह्या निमित्ताने ' हर घर तिरंगा ' लावा अन् हा महोत्सव साजरा करा असं जनतेला आवाहन केलं...

आमच्या हाउसिंग सोसायटीने घरोघरी तिरंगा वाटला...

बायको म्हणाली - " जा... बाल्कनीत तिरंगा लावून या ..."

ध्वज लावण्यासाठी मी काठी शोधू लागलो ...

तेंव्हा -

मला श्रीनगरला विमानतळावर राहून गेलेली ती छडी आठवली, जी पुढे माझ्यासाठी lucky mascot ( शुभप्रद - शुभंकर वस्तू ) ठरणार होती..

पुढे पाडवा येईल ...

गुढी उभारताना ही छडी आठवेल ....

जेंव्हा जेंव्हा छडी हा शब्द कानावर पडेल तेंव्हा तेंव्हा ती हमखास आठवत राहील ....

थंडीमुळे काही चांगलं घडेल ही भाबडी अपेक्षा होती..


बाकी काही जरी झालं नाही तरी किमानपक्षी घरावर झेंडा लावायला, गुढी उभारायच्या कामाला तरी नक्कीच आली असती...

खरंच ...

माणूस हमाल आहे...

अपेक्षांचं ओझं तो सदैव वहात असतो...

**- शरणप्पा नागठाणे / औरंगाबाद**
**मो.- ७०२८९६३२५५**



# फास



कधी पावसाने गेले
कधी अवर्षण झाले
शेती करता करता
नाही उभारता आले

कर्ज झालं डोईवर
शेतकरी घेतो फास
रोज त्याला चिंता कसा
घालू लेकरांना घास

कष्ट करण्यात शेत
पावसान गेल सार
खता बियांणाचे पैसे
दारी उभा सावकार

शेत उजाड भकास
कस सोडू घरदार
अश्रु पुसाया आमचे
कधी यावे सरकार

कोण देईल आधार
शेत गेलया पुरात
सुखी संसाराचे स्वप्न
गेलं वाहून पाण्यात



- दत्ता वालेकर / घाटनांदूर
मो.- ९४२१४४०९२२

# आजचा दिवस तिचा



पक्षांच्या किलबिलाटाने तिला जाग आली. स्नानादी कार्यक्रम उरकले तशी खूर्चीवर विराजमान होऊन अंगणात आली. सकल विश्वावर अधिराज्य गाजवण्या निघालेल्या सूर्यनारायणाला तिने नमस्कार केला, मनोभावे त्याची प्रार्थना केली. देवघरातून घंटा किणकिणल्याचा आवाज आला आणि तिने वेगाने चाके आतल्या खोलीकडे वळवली. तिला यायला उशीर झाला म्हणून बाबांनी डोळ्यानेच रागे भरले आणि आरती सुरु केली.

किमान पाच एक आरत्या म्हणणे हा तिचा नित्यक्रम होता आणि बाबांनाही तो आवडत होते. आजही 'विषय विकार मिटाओ' किंवा 'तन मन धन है तेरा' या तिच्या विशेष आवडीच्या ओळी तिने अगदी तन्मयतेने म्हटल्या. 'म्हणोनी रामेश्वरें, चरणी मस्तक ठेविले' या ओळी आल्या की खरेच चरणी मस्तक ठेवल्यासारखे केले. हे सगळे ती आवडीने करायची.

बाबांनी हातावर चिमूटभर साखर ठेवली तसे तिने खूर्चीतुनच बाबांना नमस्कार केला. "ताईसाहेब तुमचे दुध तयार आहे", माधव काकांनी आतून आवाज दिला. ऐकून न ऐकल्यासारखे करत तिने स्वारी अभ्यासाच्या खोलीकडे वळवली. काचेच्या कपाटात मांडलेली एकेक प्रमाणपत्रे, पदके काढली व पुसून जागेवर ठेवली, हाही एक नित्यक्रमच. बरे नुसती पुसून ठेवायची नाहीत तर प्रत्येक प्रमाणपत्र किंवा पदक हातात घेतले की पुसून होईतो ते मिळविताना केलेली मेहनत आठवायची, पुन्हा एकदा परमेश्वराचे आभार मानायचे आणि मग पुढच्याकडे वळायचे.

तेवढ्यात खिडकीतून आत वर्तमानपत्र आले. ती यावेळेला अभ्यासाच्या खोलीत असणार आणि तिला आधी वर्तमानपत्र वाचायचे असणार हे त्या वर्तमानपत्र टाकणाऱ्या मुलाला माहिती होते. त्याच्या पाठमोऱ्या आकृतीला "शाळेत जातोयस ना रे? अभ्यास करतोयस ना रे?", असे प्रश्न तिने विचारले. तिचे प्रश्न त्याला ऐकू गेले कि नाही किंवा त्याची उत्तरे तिला ऐकू गेली की नाही, हे त्या दोघांनाच ठाऊक. वर्तमानपत्र आल्याची चाहूल लागली तसे बाबा चहाचा कप घेऊन अभ्यासाच्या खोलीत आले. मुख्य वर्तमानपत्र कोण वाचणार आणि पुरवणी कोण वाचणार यावर प्रेमाचे भांडण ठरलेले. अर्थात भांडणात विजय तिचाच झाला आणि माधव काकांनी, "ताईसाहेब वर्तमानपत्र वाचता वाचता दूध पिऊन टाका बघू", हा भांडण समाप्तीचा शंख वाजवला.

आई गेली तशी माधव काकांनी घराची सुत्रे हातात घेतली. तिला आईची माया आणि बाबांना वडिलधारी आधार माधव काकांनीच दिला. या घरात त्यांचा हुकूम इतका चालतो की मालक कोण आणि नोकर कोण असा प्रश्न पडावा. पण याच

कारणाने परिसरातले सर्वजण माधव काकांचा आदर व कौतुक करायचे.

बाहेरच्या खोलीतल्या गोंगाटाने तिला शिकवणीची मुले आल्याची जाणीव करून दिली आणि अभ्यासाच्या खोलीतील खूर्चीची चाके दिवाणखान्याकडे वळाली. भिंतीवर टांगलेल्या भल्यामोठ्या फळ्यावर तारीख कोण टाकणार आणि सुविचार कोण लिहिणार यावरून मुलांची भांडणे सुरु होती. फळा साफ कोण करणार हा प्रश्न कधी नसायचाच, कारण माधव काकांनी तो केव्हाच साफ करून ठेवलेला असायचा. “जो आधी खाली जाऊन बसेल त्याला श्रीखंडाची गोळी”, असे म्हणताच सगळे खाली जाऊन बसले. मग तिनेच शक्य तेवढी खूर्चीची चाके पुढे नेत व हात उंचावत आधी तारीख आणि मग सुविचार लिहिला. खरे तर तिचे हस्ताक्षर खूप छान होते पण खूर्चीत बसून फळ्यावर लिहायचे म्हटले अक्षरात जरा गडबड होणारच. “हा अपघात झाला नसता, तर मी वर्गशिक्षिकाच झाले असते”, ती मनातच बोलली आणि मुलांना शिकविण्यात गुंतून गेली.

दुपारच्या जेवणानंतर एक शिकवणी तिच्यासाठी होती. पूर्वी तिच्या कॉलेजचा सांस्कृतिक विभाग सांभाळणाऱ्या आणि सध्या निवृत्त असलेल्या प्राध्यापिका तिला गाणे शिकवायला आल्या होत्या. तिने आधी शालेय जीवनात व नंतर महाविद्यालयीन जीवनात विविध गाण्यांच्या स्पर्धांमध्ये भाग घेतला होता आणि विजयही मिळविला होता. पण एका अपघाताने तिला खूर्चीत खिळवून ठेवले. आता तिच्यासाठी काही ना काही करायची जबाबदारी प्रत्येकाने उचलली तेव्हा प्राध्यापिका पटकन म्हणाल्या मी रोज दुपारी गाणे शिकवायला येत जाईन. त्यांच्या रुपाने तिला आई तर तिच्या रुपाने त्यांना मुलगी भेटली. बाईंकडून गाणे शिकता शिकता पुढचे दोन तीन तास कसे गेले हे तिला कळालेच नाही किंबहुना तिला तिच्या शारीरिक व्याधीचा विसरच पडला.

परसातली उतरत्या उन्हांनी तिला खूणावले. दिवसभर उन्हाने पोळलेल्या झाडांवर तिने थंडगार पाण्याचा आणि तिच्या प्रेमाच्या स्पर्शाचा वर्षाव केला. काही थंड तुषार मुद्दामच स्वतःवर उडवले. तिचा चहा माधव काका परसातच घेऊन आले. संध्याकाळ झाली तशी मागच्या दारानेच जवळच्या बागेत जायला बाहेर पडली. वाटेत भेटलेल्या ज्येष्ठांची विचारपूस व समवयस्कांची चेष्टामस्करी यात बागेचा जवळचा रस्ता अधिकच लांब होत गेला. एरवी सर्वांच्या येण्याजाण्यासाठी छोटा असलेला दरवाजा तिच्या खूर्चीच्या चाकांसाठी मोठा झाला. संध्याकाळ झाली की रखवालदार तिच्या येण्याची वाटच पाहायचे. तिला सहज आत जाता यावे फिरता यावे म्हणून शक्य ती मदत करायचे.

बागेतल्या कारंज्याजवळ जाऊन ती थांबली. एका कोपऱ्यात असलेल्या त्या कारंज्याजवळ थांबले की बागेत सभोवार नजर टाकता यायची. आजूबाजूला लहान मुलांचा गलका चालू होता. एका बाकड्यापाशी निवृत्त मित्रांचा अड्डा जमला होता. एका बाकड्यापाशी काही सासूबाई आपापल्या सुनांच्या तक्रारी सांगत होत्या. एका

गर्भवती स्त्रीला तिचा नवरा बागेत फिरायला घेऊन आला होता. एका झाडाखाली बसलेल्या प्रेमीयुगुलाला पाहून मात्र तिचे मन खट्टू झाले. तिच्या डोळ्यांत अश्रूधारा येणार तेवढ्यात कोणीतरी पाठीमागून येऊन तिचे डोळे घट्ट बंद केले. बाबा थेट कचेरीतून बागेत आले होते. त्यांचा स्पर्श तिने लगेच ओळखला. आता फक्त तोच स्पर्श तर तिला आश्वासक वाटत होता.

बाबांसोबत ती घराकडे आली. थोडा दम लागला होता तिला म्हणून अंगणातच थांबली. बाहेर तिच्या आवडीचा छान गार वारा सुटला होता. आजचा दिवसही अगदी तिच्या बकेट लिस्ट सारखा छान गेला होता आणि म्हणूनच तिच्या खूर्चीची चाके अंगणातून घराकडे वळत नव्हती. आकाशीच्या चंद्राकडे एकटक पाहात घराच्या दरवाजाला पाठमोरी होऊन बसली होती. पण माधव काका थोडीच ऐकणार होता. मघाशी चहा परसात आणून दिला म्हणून आता जेवण अंगणात आणून देईन असे तुला वाटत असेल तर तसे काहीही होणार नाही असे म्हणत जेवणाचे ताट घेऊन माधव काका तिच्या पाठीमागे उभा राहिला. ती नाईलाजाने मागे वळाली आणि माधव काकाच्या हातात जेवणाचे ताट बघून एकदम खूश झाली. बाबाही जेवणाचे ताट घेऊन अंगणातच आले.

जेवण झाल्यावरही बाबांशी काही काळ गप्पा चालूच राहिल्या. मग मात्र शहाण्या बाळासारखी तिच्या खोलीकडे वळाली. "माझे माहित नाही पण खूर्चीला आरामाची गरज आहे", हसत म्हणाली. पांघरूण घालून दिवा बंद करून बाबा त्यांच्या खोलीकडे गेले. ते नक्की गेले आहेत, याची खात्री झाली तसा तिने छोटा दिवा लावला आणि दैनंदिनी लिहायला घेतली. शीर्षक होते - आजचा दिवस माझा.

**- होरापंडित मयुरेश देशपांडे / जुनी सांगवी**
**मो.- ८९७६३१२०६९**

# पणती



एक पणती अंगणी
आणते आनंद पर्वणी
तिच्या तेजोमय किरणांनी
सौख्य येई जीवनी

एक पणती अंगणी
संदेश हा दिवाळीचा
गरीबांच्या झोपडीतही
उजेड देई प्रकाशाचा

एक पणती अंगणी
गूज आकाशकंदिलाशी
प्रगतीचा चढता आलेख
जाऊन भिडू दे आकाशी

एक पणती स्नेहाची
जागवी चैतन्य मनामनांत
माणुसकीचा गहिवर त्यासी
दीन दुबळ्यांना मदतीचा हात

एक पणती अंगणी
रंगीत रांगोळीची तिज साथ
सप्तरंगांची तुमच्या जीवनी
आनंदाची होवो बरसात



**- डॉ. शैलजा करोडे / नवी मुंबई**
**मो.- 9764808391**

# आपले व्यक्तिमत्व



खरं म्हणजे ..एक माणूस, एक व्यक्ती ..जो पर्यंत स्वतःच स्वतःत बदल करून घेण्यास उत्सुक अथवा तयार असणार नाही, तो पर्यंत सर्वांचे सर्व प्रयत्न फोल ठरतात, आणि कितीही समजावून सांगा, बोला, नातिजा-

"पालथ्या घड्यावर पाणी ", हा असतो.

मुळातच "माणूस , व्यक्ती हा प्राणी अगम्य ,अतर्क्य असतो, अंतरीच्या नाना कळा, वागण्याच्या तऱ्हा " हे लक्षात घेऊनच आपल्या मित्रांची आपण निवड करीत असतो.

कारण एक गोष्ट तर नक्कीच की-

आपले दर्शनीरुप म्हणजे व्यक्तिमत्व नव्हे, ही आपली बाह्यरुप ओळख आहे.

बाह्यरंग- गोरा, काळा, सावळा " यावरून रंगरुप दिसते, दर्शनी व्यक्तिमत्व आकर्षक की आनाकर्षक ", हे ठरते, पण हेच केवळ निकष नाहीत.

माणूस आणि त्याचे व्यक्तिमत्व ", त्याचा स्वभाव "हे दोन्ही माझ्या मते तरी वेगवेगळे असतात, आणि ते तसे आहेत.

आपल्या सार्वजनिक जीवनात वावरतांना "दिसणारी माणसे", ही "अंतरंगात कशी असतील ?"

याचे अंदाज करून पहा, बहुतेक वेळा ते चुकले आहेत"

असा अनुभव सर्वांच्याच पदरात पडलेला असतो.

यातूनच काही अनुभवसिद्ध उक्ती सामाजिक-जीवनात

उदाहरण म्हणून दिल्या जातात..

जसे-

दर्शनी रुप आणि माणूस- कारे भुलसी वरलिया रंगा ",

संधीसाधू माणूस- लबाड लांडगा, चतुर कोल्हा,

कपटी माणूस- ओठात एक -पोटात दुसरेच ",

असे गुण आपल्या स्वभावात बिलकुल नसावे, तरच

व्यक्तिमत्व विकसित होण्यास मदत होईल.

माणूस आणि त्याच्या स्वभावात असलेली माणुसकी" या दोन्ही गुणांचे सुरेख मिश्रण "असणे याला "उत्तम व्यक्तिमत्व " म्हटले जाते.

कार्यतत्पर, सेवाभावी वृत्ती, सर्वांना सोबत घेऊन चालण्याचा स्वभाव, माणसे जोडण्याची सवय,

शांत, संयमी स्वभाव, मोजके नि योग्य बोलण्याची सवय, अभ्यासू वृत्ती, सर्वांप्रति

आदरभाव”,
असे व्यक्तिमत्व” जनमानासात स्वीकारले जाते.
सर्वांच्या समोर समोर करून “कामाचा देखावा करणारे
“चमकू -माणसे” कधीच मनात भरत नसतात “, आणि
पब्लिक सब जानती है “ की कामाचा माणूस कोण आहे “.
जो कार्य करतो, त्याची निरपेक्ष वृत्ती ,पाहूनच अशा व्यक्तींना ,सामाजिक जीवनात “सच्चा कार्यकर्ता “ अशी ओळख, अशी इमेज “ स्वीकारली जाते.
यासाठी अशा व्यक्तींना “स्वतःची टिमकी वाजवावी लागत नसते”.
माझ्या स्वानुभवातून उमजलेल्या या गोष्टी बघा बरं ट्राय करून
मन शांत प्रसन्न असते तेव्हा -आपले वागणे बोलणे छान असते,
इतर वेळी विनाकारण चीड-चीड करणे, त्रागा करणे, पाणउतारा करून अपमानित करणे “
तुम्ही अशा वागण्याने सगळ्यांना मन:स्ताप देता-
हे का कशासाठी ?
बदलता येईल हे सारे, त्यासाठी
“आपली जीभ काबूत ठेवून -कमी बोलणे योग्य - ,
मोजके बोलणे ,खोचक टोमणे न मारणे “,
असे वागणे जमले तर,तुमचे कुणाशी खटके उडणार नाहीत .
चला तर मग..बघा ट्राय करून ,आनंद होईल सगळ्यांना
समाजमन आरसा “असते यात आपण स्वतःला ला पाहावे,
आपले व्यक्तिमत्व नेमके कसे आहे ?
उत्तर नक्की मिळते.

**- अरुण वि.देशपांडे / पुणे**
**मो.- 9850177342**

# आली दिवाळी

आली दिवाळी हर्षाची
करु लक्ष्मीचे पूजन,
दिप तेजस्वी सुखाचा
मनी आनंदी गुंजन.

फराळाचा स्वाद भारी
दारी झेंडूचे तोरण,
समृद्धीचा होई नाद
जणू सुखाचे भरण.

नवा शालू भरजारी
शोभे नथ नाकी छान,
गुळपोळी ताटामध्ये
दिवाळीला तिला मान.

शोभे रांगोळी अंगणी
दिसे नाविन्याचा रंग,
सुख आनंदी सणात
मन राही इथे दंग.

दारी आकाशकंदील
देई तेजस्वी प्रकाश,
लख्ख पणती दिव्याने
तेजोमय हे आकाश.

बाल गोपाल बनवी
दारी किल्ला नवा छान,
आजी आजोबांच्या मुखी
राही दिवाळीचे गान .

शुभ आशीर्वाद घेता
वरदान मिळे नवे,
असे सण संस्काराचे
सदा मिळायला हवे.



- प्रा.भावना गांधिले / अ.नगर

# मला अभिमान, मी ललना



**" यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:"**

सुभाषितकारांचे वचन सार्थच आहे. जिथे स्त्रीची पूजा केली जाते.तिच्या मतांचा मान राखला जातो.तिचा आदर केला जातो, तिथे देवतांचा वास असतो.

" जळला मेला बायकांचा जन्म!! रांधा वाढा अन् उष्टी काढा, हेच आमचे जीवन!!" असं खरंच पूर्वीच्या बायकांना म्हणावे लागे कारण त्यांना उंबरठ्याबाहेर जाता येत नसे.

" तुमची अक्कल चुलीपुरतीच" असे म्हणून त्यांना हिणवले जाई. निर्णयामधे त्यांचे मत कुणीच विचारत नसे. स्त्रीची अवस्था तेव्हा खरंच खूप कठीण होती.

ज्योतिबा अन् सावित्रीबाईंनी स्वत: कष्ट, हालअपेष्टा सोसून मुलींना शिक्षणाचे दार खुले केल्याने, स्त्रिया, मुली शिकू लागल्या. त्यांचा मेंदू पुरुषाइतकाच कार्यक्षम आहे हे सिद्ध झाले.पुढेनुसते शिक्षण घेऊन त्या थांबल्या नाहीत तर, पुरुषांच्या बरोबरीने अर्थार्जनही करु लागल्या.अर्थार्जनामुळे तिचा आत्मविश्वास वाढला. तिला घरातल्या तसेच कार्यालयातल्या निर्णयप्रक्रियेत

प्रत्यक्ष सहभाग मिळू लागला.

तिने पुरुषांच्या बरोबरीने पदोन्नतीही मिळवली.आता कोणतेही क्षेत्र असे नाही की जिथे स्त्रीने आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला नाही.हा मार्ग खरंतर खूप खडतर होता, पण स्त्रीने लढून, झगडून तो यशस्वीरित्या पार केला.

खरंतर स्त्री पुरुष एकाच ईश्वराने निर्मिलेले!!कोणी श्रेष्ठ नाही की कोणी कनिष्ठ नाही.सर्वसामान्यपणे मुली सासरी जातात, म्हणून मुलींना अर्थोही कन्या, परकीय एव असे म्हटले जाते.मुलगा त्याच घरात राहून आईवडीलांना सांभाळतो, त्यांची काळजी घेतो म्हणून त्याला म्हातारपणची काठी म्हटले जाते.पण काळामानानुसार सर्व संज्ञा बदलल्या आहेत.मुलगा शिक्षणासाठी परदेशी गेल्यावर, मुलगीच आपल्या घरी म्हाता-या आईवडीलांना घेऊन जाते.त्यांच्या कांचनसंध्या उमलवते.ती सासरचीही जबाबदारी निभवतच असते. तिच्या आंगी दुर्गेची शक्ती असते.

सर्व क्षेत्रात बरोबरीने काम करुन, तिने आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे.

तिला वामांगी का म्हटले जाते, तेच समजत नाही. कोणत्याही संकटाशी सामना करण्याचे तिच्या अंगी फार मोठे मानसिक बळ आहे. एखाद्या पुरुषाची अचानक दुर्दैवाने नोकरी गेली तर, तो हतबल होतो.अशावेळी बायको प्रसंगावधान राखून " माझ्या नोकरीत आपले व मुलांचे भागेल, तुम्ही काळजी करु नका.बघू काहीतरी मार्ग काढू."

तिच्या शब्दांनी त्याला धीर येतो.प्रसंग ओळखून नोकरी नसली तर, तर ती केटरिंगचा व्यवसाय सुरु करते.अगदी शाळेत मुले पोचवण्याचे काम करते.पदवीधर असूनही प्यूनची नोकरी स्विकारते, पण आपले कुटुंब ती उघडे पडू देत नाही.

कुणी आजारी असेल तर, तिच्यातले वात्सल्य, माया, प्रेम उफाळून येते. हॉस्पिटलच्या चकरा, डबे पोचवणे ती आनंदाने करते.धीर देण्यासाठी तिला खंबीर मनाची देणगी परमेश्वराने निसर्गतःच दिलेली आहे.कोणाकडे मृत्यू झाल्यास, बाईच पुढे होऊन घरच्यांचे जास्त चांगले सांत्वन करु शकते. त्यांची जेवण चहापाण्याची व्यवस्था करते.

सृजनाचे अत्यंत मोठे आणि महत्वाचे वरदान परमेश्वराने तिला बहाल केलेले आहे. “तुमच्या आयुष्यातला सर्वांत आनंदाचा क्षण कोणता?” असे तुम्ही कोणत्याही आईला विचारा.

“ माझ्या बाळाला जन्मानंतर जवळ घेतले, तोच क्षण परमभाग्याचा!!”असेच उत्तर मिळेल.अपत्यासाठी ती तन, मन, धन अर्पून कष्ट करते.

म्हणूनच “कुपुत्रो जायेत् क्वचिद्पि, कुमाता न भवेत् कदापि.” असे सुभाषितकारांनी म्हटले आहे.

स्त्रीच्या नाजूक, सुकोमल हातांना कामाबरोबरच कलांचेही वरदान लाभले आहे. सौ. चारुशीलाताई गोसावी, डॉ. निलीमाताई राडकर ह्यांनी व्हायोलिनच्या चार तारांबरोबर, संसाराच्या ताराही जुळवून घेऊन, वादनात प्रोफेशनल कलाकार म्हणून मोठे नाव कमावले आहे, ही खरोखरीच कौतुकास्पद बाब आहे.सौ. चारुशीलाताईंनी तर नोकरी सांभाळून, एकत्र राहून आखिल भारतीय स्पर्धांमधे 20 वेळा सुवर्णपदक मिळवले आहे.त्यांचे कौतुक करण्यास शब्द अपुरे आहेत.ह्या दोघींच्याही कर्तृत्वास आणि त्यांच्या आदरणीय गुरुंना माझे लाख लाख प्रणाम!!

बायकांना त्यांच्या मासिक धर्मामुळे, बाळंतपणातील त्रासामुळे बाईचा जन्म नको वाटतो. त्यांना ह्यामुळे शारिरीक मानसिक त्रास होतो हे जरी खरे असले तरी, काही त्रास पुरुषांच्यामागेही आहेत.त्याचा ते गवगवा करत नाहीत, म्हणून कळत नाही.

आपल्या देशात पुत्र पाठीशी ढाल छातीशी घेऊन लढणारी वीरांगना झाशीची राणी भारताची सुपुत्री आहे. राघोबादादांना युद्धाची ललकारी देताना “ मी तुमच्याबरोबर लढताना हरले तर, जग काहीच म्हणणार नाही, पण तुम्ही माझ्याबरोबर लढताना हरलात तर जग तुमचीच नाचक्की करेल “ असे स्पष्ट शब्दांत बजावणा-या राणी अहिल्यादेवी होळकर स्वाभिमानी भारतीय नारी आहेत. स्वातंत्र्यवीर सुभाषचंद्र बोस यांच्या महिलासेनेत धाडसाने सामील होणा-या वीरांगना भारतीयच!!

हे झाले मागील काळातले.आताच्या नवयुगात महिलांना आर्मी, नेव्ही, एअरफोर्समधे प्रवेशाची संधी दिल्यावर, खूप रणरागिणी सीमारक्षणाचे अवघड आव्हान लीलया पार पाडत आहेत.अलीकडेच एका महिलेच्या पतीचा सीमारक्षणाचे पवित्र कर्तव्य

पार पडत असताना, दुर्दैवी मृत्यू झाला तर, आपल्या आईवडीलांचे व सासूसास-यांचे अश्रू पुसून, तिने आर्मीमधे प्रवेश घेतला आणि सीमारक्षणाच्या कामावर रुजूही झाली. इतके खंबीर मन तिच्याजवळ आहे, ही खरोखरीच कौतुकास्पद बाब आहे. तिला सर्वांच्या हार्दिक शुभेच्छा!!

तर अशी ही मुलखावेगळ्या पराक्रमी, स्त्रियांची गाथा वाचल्यावर ऊर अभिमानाने भरुन येतो.आपल्याला शक्य आहे तेवढे तरी करण्याची जबरदस्त प्रेरणा ह्या ललनांकडून मिळते.जीवनाचा अर्थ फक्त उपभोग नाही तर, आपले जीवन कोणासाठी तरी सार्थकी लागावे ह्यासाठी करावा ही समज विचारांती येते.स्त्री ही अबला नाही तर, सबला आहे

हे जाणून घेतले पाहिजे.बाई म्हणून मागे न रहाता, सदैव पुढे पुढेच चालत राहिले पाहिजे भरीव कार्य साधून, “ मला अभिमान आहे, मी ललना आहे “ असे ठासून सांगितले पाहिजे.

**- सौ. मनीषा चिंतामणी आवेकर / पुणे**
**मो.- 9763706200**



# || विटाळ ||



मासातल्या त्या दिसाचे
का हो करता विटाळ
त्याने जातात दिवस
निराश आणि रटाळ

होतात किती वेदना
दुखते हो सारे पोट
फुलेल अंकुर प्रेमाचा
धरेल आपले बोट

गर्भाशयात फुलते
ते बीज मातृत्वाचे
त्या मासिक पाळीने
नारीच्या कर्तृत्वाचे

कपड्याच्या डागापेक्षा
देतात मनाला डाग
नारीच्या आदरासह
फुलवा संसाराची बाग

जर आली नसती पाळी
चालला असता संसार?
माणसांच्याही नात्यांचा
भरला नसता बाजार...



- संदीप पाटोळे / नंदुरबार
मो.- 9421890770

# त्या वळणावर..



त्या वळणावर सगळेच चांगले आहे. वळण येईपर्यंत वाट पाहायला हवी. धुकं आणि दुःखं हे क्षणीकच असतं. वाट पाहिली की जातं.

दवबिंदू येतात, ठराविक काळाने जातात, फुलें उमलतात सुगंध देतात आणि निर्माल्य होऊन आपली भूमिका झाली की संपून जातात. माणसांना आपली भूमिका संपली असं वाटतच नाही. भूमिका संपली की अस्तित्व संपतं. आपले अस्तित्व कायम राहावं ही माणसांची इच्छा असते.मन आहे म्हणून मनोव्यापार आहे.

कितीजणांना चांदण्यात फिरतांना हात हातात मिळतो. कितीजणांना मलमली तारुण्य पांघरायला मिळतं. किती जण पहाटे मोकळ्या केसात गुंतण्याचा अनुभव घेतात. चाफा बोलत नाही हे किती जणांनी अनुभवले आहे. त्यासाठी मन शांत हवं. किती जण मनाची स्पंदनं अनुभवली आतलां आवाज कितीजण ऐकतात.मनात कुणी डोकावतंच नाही, सगळेजण जनात डोकावतात.

नेहमीच तुलनेचे आलेख कामाला येत नाहीत, कधी कधी ते प्रेरणा देतात, कधी कधी ते संपवतात.

कधीकधी वाटतं उध्वस्त झालों, सगळं संपलं, आता काहीच होणार नाही, पण एक दिवस असा येतो, सारा चेहरामोहरा बदलून जातो. होत्याचं नव्हतं होतं.आपल्यालाच कळत नाही, आपण त्याला चमत्कार म्हणतो, पण त्या दिवसाची वाट पाहणं ज्यांना जमलं तेच खरं जीवन जगलें. वाईट दिवस येतच राहतात , चांगल्याची वाट पाहावीच लागतें.

जीवन सुंदर ही असतं, थोडं थांबायचं असतं. प्रतीक्षेत उद्याची पहाट असते. प्रतीक्षा करायला फार संयम लागतों.

आवाक्यातले यश प्रत्येकालाच मिळतें, पण आवाक्याबाहेरचे यश प्रत्येकाला हवें असतं.दुसऱ्यांचे यश मिळवल्याशिवाय माणसे स्वस्थ बसत नाहीत. फोटो फ्रेम मध्ये बंदिस्त करता येतो, माणसांना नाही बंदिस्त करता येत. आठवणींना बंदिस्त करता येतं, वास्तवाचा कोलाज समोर असतांना व हातात विचारांचा ब्रश असतांना, मनात रंगाची उधळण असतांना, कुणाला चित्र हवंहवंसं काढावं वाटणार नाही.

एखाद्या सुंदर पहाटे सगळेच बदललेंल असावं, चाकोरी सोडून आकाशात विहार केल्याप्रमाणे मनसोक्त जगांव. ऐवढंच आकाश आणि एवढंच सुख असतं, असं नव्हे. आकाश मोकळं होणार आणि निरभ्र होणार तोपर्यंत वाट पाहायलाच हवी.

झाले मोकळे आकाश ही अवस्था सुखद असते, मनाचेही तसेच आहे, मन हे जेव्हा

मोकळं होतं तेंव्हा मनाचा अनुभव हा प्रत्येकाचा अवर्णनीय असतो. आवाक्याबाहेरचे यश आपल्या पदरात कधीकधी पडतं, पण तें आपल्या क्षमतेची पावती असते. आपल्या क्षमता आपल्यालाच माहीत नसतात, आपलीच माणसें आपल्याला माहित नसतात. माणसात जसे सुप्त गुण असतात तसे क्षमतेत सुद्धा सुप्त गुण असतात. त्यासाठी स्वतःहून उमलायलां शिकायला पाहिजे.आत्महत्या करणाऱ्यांनीसुद्धा आत्महत्या कां करु नये याचे ऑनलाईन क्लासेस घेतलेले आहेत, पण ऑफलाईन मध्ये त्यांनी परिस्थितीपुढे नांगीच टाकलेली असते. संघर्ष माणसांना जिवंत ठेवतो. स्वप्नातही विचार केला नव्हतां, असं जेंव्हा माणसं म्हणतात, तेंव्हा त्यांची स्वप्नंही कोती असतात.

प्रत्येक दिवस वेगळां, प्रत्येक रंग वेगळा, प्रत्येक क्षण वेगळां हे समजून घेतलं पाहिजे. प्रत्येक श्वास वेगळा. पहिल्या व अखेरचा श्वासाची नोंद होते.मधल्या श्वासावर आपण हुकूमत गाजवायची असते.

क्षणांना हव्या त्या रंगात बुडवतां आलं पाहिजे.

क्षणांनी आपल्याला बुडवू नये. क्षण एकच पुरेसा असतो प्रेमासाठी, जगण्यासाठी.

एक दिवस मानाचा असतो एक दिवस अपमानाचा असतो हे ही समजून घेतलं पाहिजे. पराक्रमासाठी पराभवाचा इतिहास ही कधी कधी संदर्भासाठी आवश्यक असतों. अपयशाला गाडून त्याच्या पायावर, यशाचा ध्वज उभा करण्यातच खरं कर्तृत्व असतं.

यश सहज नाही हे समजून घेतले पाहिजे. तत्वज्ञान कधी कधी कंटाळवाणं वाटलं तरी तेच माणसाला घडवतं.

माणसे एकमेकांपासून, मोजून अंतर राखतात.कुणांत किती मिसळायचं, कुणात किती रत व्हायचं, याबाबत ज्याची त्याची गणितं ठरलेली असतात. मनाची तार जुळल्या शिवाय पुढचां प्रवास सुरुच होतं नाही. केवळ शरीर जवळ आल्यानें मनाची आंदोलने, स्पंदने एकमेकांना कळतात असं नाही. मनाचा डोह फार खोल अथांग असतो.

माणसें मनाचा विचारच करत नाहीत. शरीर दिसतं, शरीर ऑफलाईन असतं. मन ऑनलाईन कार्यरत असतं. मनाचा प्रवास स्वप्नातही भरारी घेतो. शरीराला मर्यादा आहेत. वैचारिक मतभेद संवादाला फिरकूही देत नाहीत. पूर्वग्रहाची साथ सोडायला माणसे तयारच नाहीत.निसर्गाकडे पहा निसर्ग कुठे अंतर मोजून-मापून तुमच्याशी वागतो, तो तुम्हाला कवेत घ्यायला तयार असतो. तुम्हाला समजून घ्यायला तयार असतो. तुम्हाला अभिव्यक्त होण्यासाठी प्रवृत्त करतो, अनेक साहित्य निर्माण करण्यात निसर्गाचाच वाटा आहे. निसर्गाकडे पाहून, एखादा सूर्योदय, एखादा सूर्यास्त, एखादा इंद्रधनुष्य, तो जगण्यासाठी प्रवृत्त करतो. मन तुमचं त्याठिकाणी रमतं, शांत होतं. शांत होणं आणि रमणं यासाठीच्या जागा खूप कमी होत चाललेल्या आहेत. मन

भरकटण्याची अनेक ठिकाणें उपलब्ध आहेत.

जगण्याला प्रवृत्त करणाऱ्या गोष्टी कमी होत चाललेल्या आहेत. जगण्यापासून परावृत्त करण्याची ठिकाणं वाढत आहेत.

मनाचा हळुवार कोपरा माणसांनी सेफ डिपॉझिट मध्ये टाकून दिला आहे. मनाला थोपटणं, समजावणं, होतंच नाही. दागिने घालून मिरवावे तसं माणसे दुःख घेवुन मिरवत आहेत. दुःख दागिन्यां प्रमाणे लॉकरमध्ये ठेवायला हवं. दागिन्यांनी शरीर सजतं, मनाची श्रीमंती दागिन्या शिवाय असते. मन मोठं केलं की वळणा पर्यंतचा प्रवास सुसह्य होतो.

मनाच्या पलीकडे आनंदाचे झाड आहे, सौख्याचा धबधबा आहे.

एकच अट आहे, त्या वळणा पर्यंत जाता यायला हवं.

**- डॉ. अनिल कुलकर्णी**
**मो.- 9403805153**

# नव्या सूर्योदयाची आस



प्रवास किती झालाय, किती
राहिलाय माहीत नाही!
पाखरांच्या आरवांपूर्वी डोळे
किलबिलतात
कामांना हात देत दिवस सुरू होतो
सगळ्यांचं सगळं जिथल्या तिथं
करता यावं म्हणून लगबग घरातल्या
घरात.

आवडी-निवडी.....हवं-नको
सांभाळता सांभाळता
होतं थोडं थकायला.
आरसा पुन्हापुन्हा पुसते
तरी
रंग उडालेलाच असतो चेहऱ्यावरचा...

सगळ्यातून वाचलाच वेळ
तर उघडते मनाचं कवाड
विचारते स्वतःच स्वतःला
की
बाई ग तुला काय हवंय?
अलिबाबाच्या स्मार्ट गुहेत शिरून
शोधते सुखाचे चार-दोन क्षण...

खरेतर दिवसेंदिवस महिनोन् महिने
साठलेल्या शरीर मनाच्या ताणातून
व्हायचं असतं
मुक्त
विसावायचं
असतं समंजस
हातात
पण ते नेहमीसारखं
राहूनच जातं...

आवरून घरकाम
विस्कटलेल्या थकलेल्या गात्रांना
करते धरणीच्या स्वाधीन
तेव्हा काही निश्वास शेजारी
आणि दुरून येणारा बासरीचा मंद
स्वर
मनात रेंगाळतो
कुशीत घेतो
दुखऱ्या नसांना हळुवार हळुवार
स्पर्शतो
आपुलकीच्या आत्मीय स्वरातून वेढून
राहतो
जागवतो स्वसंवेदन...

उद्यासाठी संघर्षसिद्ध होताना
मी मिळवत राहते उब
खोलवर जपलेल्या स्मृतीतून
नव्या सूर्योदयाची वाट बघत...

**- श्यामसुंदर मिरजकर / मायणी**
**मो.- ९४२१२१२३६२**

# जगूया सुंदर जीवन



दिले देवाजीने सुंदर, मनुष्याला हे जीवन
राहू खुशीत मस्तीत, मिळवूया संजीवन

आपणाला मोफत मिळालेल्या वस्तूंचे जसे काहीच मोल वाटत नाही. तसे जीवनही देवाकडून मोफत मिळाले असे वाटते. नाही म्हणायला आंधळे, पांगळे, लंगडे, मुके पाहिले की आपण व्यथित होतो. तरीही आपण आपल्या अवयवांच्या बाबतीत बेफिकीर असतो. 'होगा तभी देखा जायेगा' अशी वृत्ती ठेवून आपण जीवनाची वाटचाल करत असतो. आपणाला देवाने दोन हात, दोन पाय, दोन कान, दोन डोळे, एक नाक दिले आहे. अंतरंद्रियामध्ये भक्कम हृदय, फुफ्फुसे आणि यकृत! यामुळे आपले जीवन आनंदात जात असते. या अवयवांपैकी एक जरी अवयवाचे काम बिघडले तरी आपल्या शरीरात बदल होतात. पर्यायी औषधे खावी लागतात. जेवण, खाण्याची, भ्रमणाची, झोपेची पथ्ये पाळावी लागतात. काही वेळा अपघाताने एखाद्या जरी अवयवाला इजा झाली आणि तो अवयव काढावा लागला तरी आपले जीवन संपूर्ण बदलून जाते. म्हणून आपल्या शरीरावयवांना जपणे, आरोग्याला जपणे आपली जबाबदारी असते. वेळ निघून गेल्यावर रडून काही फायदा होत नाही.

नको भरकटू जीवनास, लागून पळत्याच्या पाठी
येईल अकाली मरण वा, तारूण्यात हाती काठी

सकाळी झोपेतून उठल्यापासून आपल्या चेहऱ्यावर प्रसन्नता दिसली तर आपलाच नव्हे तर घरातील इतरांचाही दिवस चांगला जातो. आपल्यामुळे सर्वांचे जीवन चांगले जाणार असेल तर का चांगले आणि हसतमुख राहू नये ? उगाच चिडचिड, भांडण करत बसले तर निरनिराळ्या आजारांना आयतेच निमंत्रण मिळते. शिवाय घरातील वातावरणही बिघडते. पैशाच्या मागे लागून स्वास्थ्य बिघडत असेल तर त्या पैशाचा उपयोग काय? त्यापेक्षा जे मिळतंय त्यात सुखी समाधानी राहिले तर सर्वांना सुख लाभेल. अशावेळी बेरोजगारांच्या रांगा पाहिल्यात तर आपल्याला नोकरी आहे, दोन वेळचे पोट भरते आहे असा विचार करा. म्हणजे आपण सुखी असल्याचा आनंद होईल. नेहमी रडत कुढत जगण्यापेक्षा जीवनाचा खरा आनंद लुटला तर पैशांपेक्षा जास्त सुख मिळेल. आंधळे, पांगळे पाहून देवाने आपणाला सर्व अवयवांचे दान बहाल केल्याबद्दल त्या जगनियंत्याचे आभार माना.

जीवन हे क्षणभंगूर आहे, कशाला सत्तेचा हव्यास
जगू सुंदर निरोगी आयूष्य, नसावा कसलाही तो त्रास

शरीर निरोगी सुदृढ कसे राहील याची काळजी घ्या. हल्ली तंबाखू, गुटखा, बिडी,

सिगारेट, दारू अशा व्यसनांनी शरीराची चाळण करून घेतली जाते .म्हणजे " दैव देते आणि कर्म नेते" अशी परिस्थिती येते. म्हणून निर्व्यसनी राहाल तर सदृढ जीवनाचा आनंद लुटा. व्यसनाधीन मनुष्य स्वतःबरोबरच सोन्यासारख्या संसाराची ही माती करतात. व्यसनापायी घरदार, भांडीकुंडी विकून कंगाल होतो. निष्पाप मुले आणि पत्नीला मारहाण करतो. अशामुळे त्यांच्या मनावर विपरित परिणाम होत असतो. ही मुले चांगले, सुदृढ जीवन जगू शकत नाहीत. ना शिक्षण घेऊ शकत. ती आयुष्यापासून दूर भरकटतात किंवा घर सोडून जातात. नाहीतर भित्री तरी होतात .दारुडा मनुष्य बाहेरचा राग मुलांच्यावर काढतो. पत्नीला बंधनात ठेवतो. पत्नी कमवती असेल तर तिला मारून तिच्याजवळचे पैसे हिसकावून घेतो. त्या घरात लक्ष्मी कशी टिकणार? मुलांवर संस्कार कसे होणार? देशातील बरीच मुले आई-वडिलांच्या दुर्गुणामुळे, व्यसनामुळे, कलहामुळे वाया गेली आहेत. त्यांचा काय अपराध! आपण कोणाच्या पोटी जन्माला यायचे हे कोणी ठरवू शकत नाही. त्यामुळे आपल्या कर्म दारिद्री आणि व्यसनी वडिलांच्या सहवासात मुलांच्या आयुष्याची माती होते. त्यांना कोणाचा आधार नसल्याने ती वाया जातात.

कळून घेऊया मित्रांनो, नीज जीवनाचे हे मोल
नको गुरफटू व्यसनात, होई उगा ते मातीमोल

'सकाळी लवकर निजे, लवकर उठे तया ज्ञान, संपत्ती, आरोग्य लाभे' अशी म्हण पुराणकाळापासून आजी म्हणत असे. त्यामुळे निरोगी आयुष्य मिळते हे तरी त्रिकालाबाधित सत्य आहे. सकाळी लवकर उठून केलेला व्यायाम आपणाला दिवसभर तजेला पुरवतो, तसे आपण कसे जगतो ,काय आणि किती,कसे खातो पितो त्यावरच आपला जीवनानंद अवलंबून असतो. आपण चाकोरीबाहेरचे जीवन जगण्याचा प्रयत्न केला तर जीवनात दु:खच मिळेल. सुखी माणसाचा सदरा अंगात घालून जीवन जगलो तर परमानंद मिळेल.

घेऊ आनंद जीवनाचा, आहे जीवन अनमोल
नकोच सोडू वाऱ्यावर, जगणे ठरू नये फोल

**- सौ. भारती दिलीप सावंत / नवी मुंबई**
**मो.- 9653445835**

# विकृती



संस्कृतीला विसरून
जगत आहेत सारे
विदेशी संस्कृतीचे
देशात वाहती वारे

धार्मिक कार्यक्रमात
दारू पिऊन जल्लोष
देवा धर्माचा बाजार
मांडून उडाले होश

जगाला कुठे कळली
महान अशी संस्कृती
समाजाने स्वीकारली
जाणून फक्त विकृती

राजकारणी लोकांनी
मांडला हा डाव आहे
तरुणाईच्या जोशाला
बेकारीचा घाव राहे

विवेकानंदांचे विचार
जगाला कळले काही
करण्या संस्कृती रक्षा
तारुण्य झटले नाही

विकृतशी मनोवृत्ती
तरुणांनी स्वीकारली
चांगले सोडून बाकी
विकृतीच आकारली

पतन होण्या संस्कृती
कोण हो जबाबदार
भविष्य ज्याच्या हाती तो
तरुण रुबाबदार

**- प्रा. वर्षा विलास कावरे / मूर्तिजापूर**
**मो.- 9021673178**

# एक दुर्लक्षित राजहंस



जेव्हा एखादी साहित्य कलाकृती अजरामर होते तेव्हा त्या कलेला भाषा आणि सीमेच्या मर्यादा शिल्लक राहत नाही. मराठी भाषेमध्ये असा एक साहित्यिक जन्माला आला आणि त्यांनी अशी काही अजरामर साहित्य निर्मिती केली आहे की त्यांच्या साहित्याचा गौरव अगदी रशियामध्ये देखील झाला आहे. पण काय मराठी माणसाला या साहित्यिका बद्दल आणि त्यांच्या कार्याबद्दल संपूर्ण माहिती आहे? १ ऑगस्ट १९२० रोजी भारतीय स्वातंत्र्याच्या क्रांतिकारी चळवळीचे नेते आणि साहित्यिक लोकमान्य टिळक यांनी अखेरचा श्वास घेतला. आणि याच दिवशी महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यात जागतिक कीर्तीचे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठेंचा जन्म झाला. अण्णाभाऊ साठे म्हणजे समाज सुधारक आणि जागतिक कीर्ती मिळवलेला मराठी साहित्य क्षेत्रातील एक अनमोल हिरा.

घरची गरीबी आणि वंचित घटकात झालेला जन्म यामुळे अण्णाभाऊ साठे यांना लहानपणा पासूनच संघर्षाला सामोरे जावे लागले. त्यांच्या वाटेला आलेले शालेय शिक्षण म्हणाल तर फक्त दीड दिवस. त्या काळच्या समाज व्यवस्थेमुळे त्यांना सरस्वतीचा त्याग करावा लागला, तरीही आयुष्यभर सरस्वतीचा वरदहस्त त्यांच्यावर राहिला. लहानपणा पासूनच जगण्या-मरण्याचा संघर्ष अनुभवल्याने वंचित घटकांसाठी वैचारिक भूमिका मांडण्याची प्रगल्भता त्यांच्या मध्ये हळूहळू निर्माण होत गेली. याच संघर्षाने त्यांना कम्युनिस्ट विचारधारेकडे देखील आकर्षित केले. रोजगार शोधण्याच्या निमित्ताने त्यांनी मुंबईची वाट धरली. सांगली जिल्ह्यातील वाटेगाव ते मुंबई असा पाईच प्रवास करण्याचा संघर्ष इथे पण त्यांना करावा लागला. मुंबईमध्ये हाताला मिळेल ते काम स्वीकारत खऱ्या अर्थाने त्यांच्या सामाजिक जीवनाला सुरुवात झाली.

अमर शेख आणि स. दा. गवणकर म्हणजे १९५० च्या दशकातील प्रसिद्ध लोकशाहीर. त्यांच्या सहवास आणि प्रेरणेने १९४४ साली लाल बावटा या लोकनाट्य कला पथकाची स्थापना अण्णाभाऊ साठे यांनी केली. इथूनच अण्णाभाऊ लोकशाहीर म्हणून ओळखल्या जाऊ लागले. या लोकनाट्य पथकाद्वारेच त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन आणि समाज सुधारनांचे धडे गिरवायला सुरुवात केली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील त्यांच्या शाहिरीचे योगदान हा महाराष्ट्र कसा काय विसरू शकेल? “माझी मैना गावाकडे राहिली, माझ्या जीवाची होतीया कायली” या प्रसिद्ध लोक गीताद्वारे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला त्यांनी मोठा हातभार लावला. या गीतामध्ये मैना शब्द त्यांनी

महाराष्ट्राला उद्देशून वापरला आहे.

अण्णाभाऊ साठे तांत्रिक दृष्ट्या निरक्षर असले तरीही आयुष्यभर वाट्याला आलेल्या संघर्षाने, आणि वंचित घटकांच्या बघितलेल्या जीवन-मरणाच्या समस्यांनी त्यांच्या मधल्या साहित्यिकाला जन्म दिला. ११ कथासंग्रह, ३५ कादंबऱ्या, अनेक लावणी, लोकनाट्य, पोवाडे असा साहित्याचा मोठा ठेवा ते सर्वांसाठी सोडून गेले. फकिरा, वारणेचा वाघ, वैजयंता या त्यांच्या कादंबऱ्या विशेष गाजल्या. त्यांच्या फकिरा या कादंबरीला १९६१ साली महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला. या कादंबरीचा इतर भाषांमध्ये देखील अनुवाद झालेला आहे. फकीरा कादंबरी वंचित घटकातील एका तरुणाच्या सामाजिक संघर्षावर आधारित आहे. वैजयंता या कादंबरी द्वारे त्यांनी तमाशा मध्ये काम करणाऱ्या कलावंतीन स्त्रियांच्या शोषणाचा प्रश्न समाजापुढे दाहक पणे मांडला. त्यांच्या कादंबरी आणि कथा संग्रहांवर आधारित ७ चित्रपट देखील बनले.

छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्राचे आराध्य दैवत. आणि अण्णाभाऊ साठे म्हणजे पोवाड्याच्या माध्यमातून शिवाजी महाराजांचे जीवन चरित्र रशियापर्यंत पोहोचवणारे व्यक्तिमत्व. त्यांच्या साहित्य क्षेत्रातील या योगदानासाठी रशिया सरकारने १९६१ साली मॉस्को येथे त्यांचा विशेष गौरव केला. एव्हढेच नव्हे तर २०२० साली लोकशाहीर अण्णाभाऊंच्या शंभराव्या जयंती निमित्त मॉस्को मध्ये त्यांच्या तैल चित्राचे अनावरण देखील केले. एका मराठी साहित्यिकाचे देशाच्या सीमेपलीकडेही वाचक वर्ग आणि चाहते आहेत ही मराठी माणसासाठी नक्कीच अभिमानाची गोष्ट आहे. हा सर्व आदर आणि आंतरराष्ट्रीय वाचक वर्ग लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी त्या काळात मिळवला जेव्हा मोबाईल, सोशल मीडिया, डिजिटल क्रांतीचा अविष्कार देखील झालेला नव्हता. त्यातही तांत्रिक दृष्ट्या निरक्षर असूनही फक्त वैचारिक प्रगल्भतेच्या जोरावर त्यांनी मराठी साहित्याचा अनमोल खजिना निर्माण केला.

लोकशाहीर आणभाऊ साठे यांनी अखेरचा श्वास १८ जुलै १९६९ रोजी घेतला. आज अण्णाभाऊ यांना हे जग सोडून ५३ वर्ष झाली आहेत. आजच्या तरुण नवोदित साहित्यिकांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे नाव नक्कीच ऐकले असेल. मात्र आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली अशा त्यांच्या अजरामर साहित्याबद्दल नवोदित साहित्यिकांना माहिती आहे का हा खरा प्रश्न आहे. कारण आजही त्यांच्या साहित्या बद्दल माहिती असलेल्या अनेक व्यक्तींकडून पीएचडी केली जाते. शब्दांमध्ये सामर्थ्य असते म्हणतात ते यामुळेच. व्यक्ती मरतो पण विचार मरत नाही म्हणतात ते पण यामुळेच..

**- राहुल बोर्डे / पुणे**
**मो.- 9822966525**

# स्त्री भ्रूणहत्या



आई मला जन्म
लाभला तुझ्यामुळे
जग माझे चिमुकले//१//

सगळे विचारले माझ्या
जन्माआधी मुलगा की मुलगी
तुझ्या शिवाय कोणीही
झाल नाही आनंदी //२//

प्रत्येकाने केला
माझ्या जन्माचा नकार
मुलगी आहे म्हणून
केला प्रत्येकाने तिरस्कार//३//

माझ्या आधी दोन तीन मुली
गर्भातच मारल्या गेले
मुलगी आहे म्हणून ऐवढे
कुठले पाप मी केले//४//

होईन मी गोपाळ
गावांची आनंदी
थांबवेन गर्भातच
स्त्रीभ्रूणहत्या होण्याधी//५//

किती झाले तरी तुझे
माझ्या वरती प्रेम
सारखेच राहिले
तुझ्या पोटी जन्म
घेऊन मी ही धन्य झाले....//६//

- श्रुती शिवाजी चौधरी / उस्मानाबाद
मो.- 9011794469

# श्रद्धा और सबुरी



दिल्लीतल्या हिवाळ्याचे दिवस. हवीहवीशी वाटणारी थंडी. अशा दिवसातल्या रविवारची मजा काही औरच ! आठवडाभर भरपूर काम करून थकलेल्या सलीलने आजचा त्याचा रविवार मस्तपैकी आरामात घालवायचा अस ठरवलं होत. रोजच्यासारखं लवकर उठायचं नव्हत. म्हणून नऊ वाजत आले तरी तो उबदार रजई अंगाभोवती लपेटून घेवून सदाबहार किशोरकुमार ऐकत पडून राहिला होता. इतक्यात किशोरच्या 'ओ मेरी दिल की चैन'ला थांबवणारी त्याच्या मोबाईलवरची कॉलरट्यून वाजली. त्याने अनिच्छेनेच मोबाईलवर नजर टाकली. truecaller मुळे पडद्यावर जे नाव झळकत होते, ते पाहून लगबगीने चार्जर बाजूला करून सलीलने फोन कानाला लावला.

पलीकडून त्याचा बालपणीचा जानी दोस्त जतीन बोलत होता. अतिशय आश्चर्याने आणि आनंदाने सलील त्याच्याशी बोलू लागला. दहा वर्ष तरी झाली असतील दोघांची भेट होवून. इकडून तिकडून ख्यालीखुशाली कळायची पण प्रत्यक्ष भेट, बोलणं अस झालं नव्हत. किती बोलू आणि काय बोलू अशा दोघांच्या गप्पा सुरु झाल्या. जतीन काही कामानिमित्ताने दिल्लीला आला होता. एका जुन्या मित्राकडून सलीलचा नंबर त्याला मिळाला होता. दोघांनी बोलत बोलत त्या दिवशी भेटण्याचे ठरवले. फोन ठेवत असताना जतीन बोलला,'ठीक आहे तर मग. ठरल्याप्रमाणे आज सीपीला भेटूया बारा वाजता' 'हां मेरी जान' म्हणत सलीलने फोन ठेवला. त्याचा रविवारचा आळस कुठल्याकुठे पळून गेला आणि दिल्लीतील राजीव चौक या मेट्रो स्टेशनजवळील कॅनोट प्लेस या ठिकाणी म्हणजेच सीपीला आपल्या खास मित्राला भेटायला जाण्यासाठी तो तयारी करु लागला.

दक्षिण दिल्लीतील कटवारिया भागात सलीलचे घर होते. तिथून जवळचे मेट्रो स्टेशन म्हणजे हौजखास. तो तयारी करून स्टेशनला आला. येलो लाईनची मेट्रो त्याने घेतली. रविवार असल्यामुळे प्रवाशांची फारशी गर्दी नव्हती. वातानुकुलीत ट्रेनमधल्या स्टीलच्या चकाकणाऱ्या बाकावर सलील बसला. खिडकीच्या विस्तीर्ण काचेतून बाहेरची धावती दिल्ली तो नेहमीच्या  नजरेने पाहू लागला. बाहेरची दृश्य नजरेला सवयीची होती. अशावेळी डोळे दृश्य बघत असतात पण मन मात्र आपल्या नकळत काही वेगळच पाहत असतं आणि आठवणीच्या विचारात ते घोटाळत असतं. त्या दिवशी सलीलच अगदी तसच झालं. अचानक आलेल्या जतीनच्या फोनमुळे भूतकाळातल्या आठवणीचे विचारचक्र मेट्रोच्या गतीच्या तालात त्याच्या डोक्यात घुमू लागले.

मुंबईतल्या मुलुंडमधल्या चौधरी चाळीचे दिवस सलीलला आठवले. सलीलचे कुटुंब चाळीत राहत असे आणि जतीनचे कुटुंब चाळीला लागून असलेल्या इमारतीत राहत होते. पंधरा वीस मिनिटाच्या चालत जाण्याजोग्या अंतरावर असणाऱ्या सेंट क्झेवियर या इंग्लिश माध्यमातल्या शाळेत दोघेही जात होते. शाळेत एका वर्गातील असल्यामुळे ओळख झालेली आणि रोज शाळेत जाण्याचा रस्ता दोघांचाही एक त्यामुळे त्यांची आपसूक मैत्री झालेली.

दोघांची वेगवेगळी अशी असलेली ; मराठी आणि गुजराती जीवनशैली कधीच या मैत्रीच्या आड आली नाही. उलट एकमेकांच्या घरी जावून हक्काने काही खायला मागणं दोघानाही आवडायचं. तेंव्हाचा काळ १९७५/८०चा. त्यावेळी चाळीत झाडे खूप असायची. कधी पेरुच्या झाडावर चढून पेरु काढायचे, तर कधी चिंचा पाडायच्या. असे बालपणीचे उद्योग त्या दोघांचे चालू असायचे. शाळेच्या वाटेवर जातायेता त्यांच्या अनेक करामती चालू असायच्या. जतीन गोरापान, तब्येतीने नाजूक असा तर सलील सावळा, सुदृढ आणि गुटगुटीत असा होता. शाळेच्या रस्त्यावरील प्रत्येक दुकानदार सलीलला ओळखत असायचा. कारण काय तर चाळीत कुणाचे काही सामान पोचवायचे असेल तर सलील घरी जाता जाता ते सामान सहज घेवून जायचा. एखाद्या काकूचा दळणाचा डबा नेवून दे, एखाद्या काकींची भाजी आणून दे तर एखाद्या काकाला दाढीला ब्लेड हवं असेल तरी सलीलला दुकानातून ते घेवून येण्यासाठी हाक मारली जायची. बालपणी निरागस मनाने सलील सर्वांची कामे करायचा आणि हळूहळू लोकांना अशी मदत करणं त्याला आवडू लागलं होत. चाळीतील लोकांचे वाणसामान पोचवणे हे शाळेला जाण्याइतकच सलीलसाठी रोजचं आणि सवयीच झालं होत. लोकांना मदत करण्याच्या सलीलच्या या सवयीवर जतीन त्याला नेहमी चिडवायचा.

विचारायचा 'तुम क्यो सबका हमाली करता है'?

सलील हसून उडवून लावायचा. म्हणायचा,' अरे त्या सबनीस काकू म्हाताऱ्या आहेत. त्यांचे गुडघे दुखतात आणि त्या देशपांडे काकाचं नुकतच ऑपरेशन झालय. मंदारला पोलिओ झालाय तुला तर माहित आहे. म्हणून सामान नेवून देतो त्यांना. तू छोड ना ये सब '!

जतीन आणि सलील मोठे होत होते. दोघेही नववीला गेले होते. लहानपणीचे निरागस दिवस संपले होते. दोघे पौन्गडाअवस्थेत असल्याने जगाबद्दल एक प्रकारच कुतुहल दोघांच्या मनात निर्माण झाल होत. सलील राह्यायचा त्या चौधरी चाळीच्या गेटवर साईबाबाच एक मोठ मंदिर होत. तिथल्या संगमरवरी फरशी घातलेल्या कट्ट्यावर अनेकदा दोघांच्या गप्पा रंगत. गप्पांचे विषय शाळा, शाळेतले शिक्षक, मुली यावरुन ते सिनेमातील आवडता हिरो असे चालत. शाळा बुडवून कुठे भटकायचं असेल तर तो प्लान कसा बिनचूक कुणाला न कळता अमलात आणायचा हेही या

कट्ट्यावर बसून दोघांचे ठरत असे. अशावेळी साईबाबांची पांढरीशुभ्र मूर्ती आपले बोलणे ऐकून गालातल्या गालात हसतेय असही त्या दोघांना वाटत असे. मग त्यांना साष्टांग दंडवत घालून दोघेही चक्क त्यांना देखील आपल्या प्लानमध्ये सामील करून घेत. हळूहळू दोघे मंदिराच्या मंडळाच्या उत्सवात भाग घेवू लागले. दहावीची परीक्षा झाल्यावर मंडळातर्फे शिर्डीला पायी वारी निघाली होती. कोलेजला जाणारी अनेक मुले त्यात होती. घरी हट्ट करून सलील आणि जतीन दोघेही त्या वारीला गेले. पहिल्यांदा इतके अंतर पायी चालत जाण्याचा अनुभव काही वेगळाच होता. या वारीत त्यांची लहानपणापासूनची मैत्री अजूनच पक्की झाली.

दहावीचा निकाल लागला. दोघेही फर्स्टक्लासमध्ये पास झाले. कॉलेजला कुठे जायचं यावर दोघांची बोलणी सुरु झाली. जतीन म्हणाला मला माझ्या मामाने सांगितलंय म्हणून मी माहिमला जाणार इलेक्ट्रॉनिक डिप्लोमा करायला. सलील म्हणाला मी पण तुझ्यासोबत येणार. आपला मित्र जिथे जाणार तिथे आपण जायचं इतकाच साधा सरळ सलीलचा विचार. १९८५च्या सुमारास करियर गायडन्स असलं काही फारसं नसायचचं किंवा त्या विषयावरची मार्गदर्शन केंद्रे सुद्धा आजच्यासारखी उपलब्ध नव्हती. मुलांनी आपला कल ओळखावा. त्यासाठी पालकांनी त्यांना मदत करावी आणि मग नीट विचार करून, आवडीने जाणीवपूर्वक शिक्षणक्षेत्र निवडावं असं काही तेंव्हा नव्हतं. दहावी झालं की आर्ट्स, कॉमर्स, सायन्स यापैकी एखादी शाखा निवडायची आणि कॉलेज करायचं. यापेक्षा मुद्दाम वेगळं काही शिकणं असतं याचं ज्ञान सर्वसाधारण पालकांना आणि त्याचमुळे त्यांच्या मुलांनाही नसायचं.

दहावीनंतर जतीन आणि सलील माहिमला इलेक्ट्रोनिकमध्ये डिप्लोमा करायला गेले. शाळेच्या रस्त्याची जागा आता मुलुंड ते माहीम ट्रेन प्रवासाने घेतली होती. दोघेही तीन वर्षाचा डिप्लोमा इन ऑडीओ व्हिडिओ उत्तम मार्कांनी पास झाले. शिकत असल्यापासूनच जतीन दहिसरला त्याच्या मामाच्या इलेक्ट्रॉनिक दुकानात जावून बसत असे. त्याच्या सोबत अध्येमध्ये सलील जात असे. दोघानाही दुकानात कामाचा अनुभव मिळत होता. डिप्लोमा झाल्यावर सलीलला अकाई tv कंपनीत नोकरी मिळाली. इथूनपुढे सलील आणि जतीन यांच्या  कामाच्या वाटा वेगळ्या झाल्या होत्या मात्र बालपणीच्या मैत्रीचा हमरस्ता मजबूत होता.

चारपाच वर्षे गेली. मामाचे दुकान सांभाळत जतीन दहीसरलाच सेटल झाला. नात्यातल्या तिथल्याच मुलीशी त्याच लग्न झाल. मुलुंडचे घर विकून त्याने दहिसरला मोठा फ्ल्याट घेतला आणि कुटुंबासोबत जतीन दहिसरला राहू लागला. एव्हाना सलीलचेही लग्न झाले होते. त्याने लग्न झाल्यावर कर्ज काढून ठाण्याला मोठे घर घेतले. बहिणीचे लग्न लावून दिले होते. आई वडील मुलुंड सोडायला तयार नव्हते. चाळीतले घर लहान म्हणून सलील  बायको मुलासोबत ठाण्याला राह्यला गेला.

लग्न झाल्यावर सुरुवातीला काही काळ भेटत राहणारे जतीन आणि सलील दोघे

मित्र हळूहळू आपापल्या सांसारिक जबाबदऱ्यामध्ये गुंतत गेले आणि मग त्यांच्या गाठीभेटी कमी होवू लागल्या. त्या काळात मोबाईल आले नव्हते. तेंव्हा पेजर असायचे. त्यावरुन बोलणे शक्य नसायचे पण संदेश पाठवता येत असे. पूर्वी पोष्टातून तार पाठवली जात असे तशी पेजर म्हणजे एकप्रकारे इलेक्ट्रोनिक तार पाठवायचे मशीन!

१९९८-९९ मध्ये जागतिक मंदी आली आणि त्याचा फटका इतर अनेक क्षेत्रासोबत इलेक्ट्रोनिक दुनियेवर पण पडला. रिसेशन! या एका शब्दाने अनेक तरुणांच्या नोकर्या हिरावून घेतल्या. सलील त्यातलाच एक होता. कुटुंबाची जबाबदारी आणि भारतीय समाजव्यवस्था यामुळे विनानोकरीचा काळ मोठा कठीण वाटू लागला. सलीलचा आत्मविश्वास डळमळीत होत होता. कोणत्याही कार्यक्रमासाठी नातेवाइकांकडे जाणे तो टाळू लागला. पुरुषाने पैसे कमवलेच पाहिजेत असे मानसिकता असल्याने, जर कुठलाही पुरुष घरी बिनकामाचा बसून राहिला तर त्याला समाजातील आपल्या जवळच्या लोकांच्या टीकेला तोंड द्यावे लागते. सलीलचेही तसेच झाले. त्याला मानसिक त्रास होत होता पण सुदैवाने सलीलची बायको नोकरी करत होती आणि ती समजूतदार होती त्यामुळे घर चालत होते. थोड्याफार बचतीमुळे काही दिवस निभावून निघणार होते पण लग्नानंतर लोन काढून स्वतःचे घर घेतले होते त्याचे हफ्ते, मुलांचे शिक्षण यासाठी मुंबईत दोघांनी कमवणे गरजेचे होते. या सगळ्याचे सलीलला टेन्शन येत होते. थोडे दिवस नोकरीशिवाय गेले. पण काहीतरी हातपाय हलवणे गरजेचे होते. खूप ठिकाणी शोधून त्याला एक कमी पगाराची नोकरी मिळाली. साईबाबावर श्रद्धा ठेवून सलील सबुरीने या आलेल्या कठीण दिवसांना तोंड देवू लागला.

संकटाच्या वेळी आपलं कुटुंब आपल्याला साथ देणारं असलं की ओढवलेल्या परिस्थितीतून नक्की मार्ग काढता येतात. सलील शाळेत जात होता तेंव्हापासून त्याची आई उत्पन्नाचे साधन म्हणून मुलुंडच्या चौधरी चाळीमध्ये घरगुती शिकवण्या घेत असे. त्यांच्या या घरगुती शिकवणी वर्गाचे रुपांतर मुलुंडमध्येच एक छोटी जागा भाड्याने घेवून बऱ्यापैकी नावाजलेल्या ज्ञानदा क्लासेसमध्ये झाले होते. नोकरी गेलेल्या काळात सलील तिथे जावू लागला. पाचवी ते दहावीच्या मुलांना शिकवू लागला. शिकवता शिकवता त्याच्या अस लक्षात आलं की त्याला शिकवणं आवडत आहे. मुलांना देखील हा नवीन शिकवायला आलेला दादा आवडू लागला होता. सलीलच्या आईने हे हेरले आणि त्याला B.Ed. करण्यास सुचवले. त्यासाठी आधी B.A. होणे आवश्यक होते. पण सलीलला वयाची तिशी उलटल्यावर आणि एका मुलाचा बाप झाल्यावर कॉलेजमध्ये जावून शिकणे रुचेना. यावर मार्ग म्हणून सलीलच्या बायकोने सांगितले की तू मुक्त विद्यापीठातून B.A. हो. घरच्या पाठीम्ब्यामुळे सलील केवळ BA झाला नाही तर त्याने विशेष शिक्षणात म्हणजे स्पेशल एजुकेटर म्हणून B.Ed. आणि M.Ed. in hearing impaired म्हणजे कर्णबधीर मुलांसाठी शिक्षक म्हणून शिक्षण घेतले. त्यावर आधारित त्याला मुंबईच्या कॉलेजमध्ये गेस्ट लेक्चरर

म्हणून काम मिळाले. पण ही खात्रीची नोकरी नव्हती. सर्वसाधारण कोणत्याही मराठी कुटुंबात वाढलेली मुल ही चांगल्या आणि स्थिर नोकरीला प्रथम प्राधान्य देतात. सलील देखील त्याला अपवाद नव्हता. तो पुढील शिक्षणाची म्हणजे PH.D. ची तयारी करु लागला. त्याच्या सुदैवाने दिल्लीतील एका संस्थेत M.Ed. in hearing impaired ची जागा निघाली होती. ती जाहिरात सलीलच्या पाहण्यात आली आणि भरपूर तयारी करुन त्याने लेखी परीक्षा आणि मुलाखत दिली. या सगळ्यामध्ये त्याचे उत्तम शिकवण्याचे कौशल्य कामाला आले आणि वयाच्या 36 व्या वर्षी चक्क त्याला केंद्रसरकारची नोकरी मिळाली. फक्त पोस्ट दिल्लीला असल्याने घरापासून दूर जावे लागणार होते. कुटुंबापासून दूर राहणे अवघड वाटत होते. परंतु निर्णय तर घ्यावा लागणार होता. आपण आधी जावून दिल्लीला सेटल होवू आणि त्यानंतर बायको मुलाला तिकडे बोलवून घेवू. तोपर्यंत मुलगा थोडा मोठा झालेला असेल. असा विचार करुन सलीलने दिल्लीला जायचे ठरवले.

'अगला स्टेशन राजीव चौक. दरवाजा दाई ओर खुलेगा.' मेट्रोमधल्या या उद्घोषणेमुळे सलील आपल्या भूतकाळाच्या विचारातून बाहेर आला आणि उतरण्यासाठी दरवाज्याजवळ येवून उभा राहिला. राजीव चौक मेट्रो स्टेशन मधून बाहेर पडल्यावर उजव्या हाताला चालत गेल की तिथेच दिल्लीतील एक प्रसिद्ध ठिकाण कॅनॉट प्लेस आहे. तिथे सरकारी कार्यालये मोठ्या प्रमाणावर आहेत. ठरल्याप्रमाणे एका हॉटेलच्या दारात जतीन उभा असलेला सलीलला दिसला. आनंदाने दोघांनी एकमेकांना मिठी मारली. त्यावेळी सलीलला जतीनच्या खिशात काहीतरी टोचल्यासारखे जाणवले. जतीनला याबद्दल लगेच काही विचारायला नको म्हणून त्याने तो विषय टाळला. दोघे हॉटेलमध्ये जावून बसले. एकमेकांची चौकशी करुन झाली. सलीलने जतीनला विचारलं की तू इकडे कसा काय? आणि माझा नंबर कुठून मिळाला?

यावर जतीनने त्याच्याबद्दल सांगायला सुरुवात केली. तो म्हणाला,' मी माझ्या मामाचं दुकान चांगल सांभाळत होतो पण मामा वारल्यावर त्याच्या मुलाचं आणि माझं काही पटेना. त्यामुळे मी दुकान संभाळण सोडून दिल आणि consultancy सुरु केली. मामाबरोबर राहून इलेक्ट्रोनिक क्षेत्रात भरपूर अनुभव मिळाला होता त्या जोरावर LED आणि इतर गोष्टीसाठी टेंडर काढून त्याचं supply करण्याचं contract मी मामाच्या उद्योगपती मित्रांसाठी करु लागलो. त्याकरिता मला भारतभर सगळीकडे फिरायला लागत. या धंद्यात कमालीची स्पर्धा आणि चढाओढ असते. एकदा उत्तर प्रदेशमध्ये contract मला मिळू नये म्हणून माझ्यावर जीवघेणा हल्ला देखील झाला होता. तेंव्हापासून हे जवळ बाळगायला लागत'. अस म्हणत जतीनने शर्ट वर करुन पिस्तुलाचा दांडा सलीलला दाखवला.

तो आवाक् होवून जतीनकडे पाहतचं राहिला. त्याला काय बोलायचे ते सुचेना. जतीन पुढे म्हणाला,'एकदा मुलुंडला नातेवाईकाकडे गेलो होतो तेंव्हा चौधरी चाळीतल्या

तुमच्या घरी गेले होतो. काकाकाकू काही भेटले नाहीत. घराला कुलूप होत म्हणून मंदारकडे तुझी चौकशी केली. मंदारचा साईबाबा मंदिरसमोर दुधाचा stall आहे. त्यानेच तुझा नंबर दिला आणि म्हणाला सलीलमुळे मला अपंगासाठी stall असतात त्याची माहिती समजली. तुझ खूप कौतुक करत होता. तू कशी मदत केलीस तेही तो सांगत होता. सलील तू लहानपणी जसा होतास तसाच आहेस अजून'. अस म्हणत जतीन त्याला टाळी मारत मोठमोठ्याने हसू लागला.

कितीतरी वर्षांनी दोघे मित्र पूर्वीसारखे बोलत होते, हातावार हात मारत हासत होते. दोघे हॉटेलमधून बाहेर पडले. दोघांच्या गप्पा काही संपेनात. फुटपाथवर एका कोपर्यात उभे राहून दोघे बोलू लागले. बोलता बोलता जतीनने सलीलला विचारले,' अरे मी तुला विचारायचं विसरलो बघ. तू इथे कुठे नोकरी करतोस सांग बर ;?

सलीलने मग तो दिल्लीत कसा आला ती सारी कहाणी जतीनला सांगितली. त्यावेळी जतीन म्हणाला,' तुझी नोकरी गेली त्यानंतर तू इतका स्ट्रगल करत होतास तर मला का नाही भेटलास तेंव्हा ? मी तुला नक्की नोकरी लावून दिली असती'. त्यावर सलील हसून म्हणाला,' अरे हो ! पण तुही तुझ्या आयुष्यात सेटल झाला होतास. तुला त्रास देण मला काही बरे वाटले नाही. पडेल ते कष्ट केले. छोट्या छोट्या नोकऱ्या केल्या. पुन्हा नव्याने शिक्षण घेतले. घरच्यांनी पण मला आधार दिला. त्यामुळे मला आवडणाऱ्या शिक्षणक्षेत्रात उशिरा का होईना आलो. यावरून मला इतके समजले की आपल्याला आपल्या आवडीनिवडी वेळेवर समजल्या तर आपण आपल्या आवडीच्या क्षेत्रात करियर करू शकतो. तुला आठवत ना चौधरी चाळीतले ते दिवस, साईबाबा मंदिर? मी माझ्या आयुष्यात साईबाबावर श्रद्धा ठेवली आणि सबुरीने येईल त्या प्रसंगाला तोंड दिले. त्याचच हे फळ अस म्हणत सलीलने आपल्या पाकिटातून स्वतःचे व्हिजिटिंग कार्ड काढून आपल्या मित्राच्या हातात दिले.

सलीलच्या त्या व्हिजिटिंग कार्डवरील त्याच्या नावापाठीमागची डॉक्टर अशी अक्षरे आणि त्याची केंद्रसरकारी कार्यालयातील मोठ्या अधिकाऱ्याची पोस्ट जतीनने बारकाईने वाचली. जतीन आश्चर्याने सलीलचे ते कार्ड पाहत असतानाच दुपारच्या उन्हाची तिरीप नेमकी त्या कार्डवर पडून त्यावरील सोनेरी रंगातील भारतीय एम्ब्लेम चमकू लागला होता. ते नुसते देशाचे चिन्ह नव्हते तर सबुरीने स्वतःवर विश्वास आणि चांगल्या कामावर श्रद्धा ठेवली तर पडत्या काळात सुद्धा स्वतःला सावरता येते आणि आवडत्या क्षेत्रात काम करता येते असे सांगणाऱ्या युवा पिढीच्या भारत देशाचे ते सोनेरी प्रतिक होते.

**- सुनिता तांबे / डोंबिवली**
**मो.- ९९३०९०८००८**

# तिची उत्तुंग भरारी

तिची उत्तुंग भरारी
साऱ्या विश्वाला व्यापते
रोज रोज जीवनात
नवे विक्रम स्थापते

नाही बंधनात आता
राहिलेली बद्ध नारी
केली तिने पादाक्रांत
आपसूक क्षेत्रे सारी

तिची पूर्वीची ओळख
फक्त शोभेची बाहुली
आता धावते सर्वत्र
घेते काळाच्या चाहूली

देते नवेच आयाम
मिळालेल्या आयुष्याला
आणि घडवते पुन्हा
हवे तसे भविष्याला

नदी आणि नारी दोघी
प्रवाहित राहतात
इतरांची सुखदुःखे
आनंदाने वाहतात

- एकनाथ गायकवाड / त्रिंबक
मो.- 9421182337



# मराठी माणसाची भाषिक जबाबदारी



**म = महाराष्ट्र**
**रा = राज्याची**
**ठी = ठिणगी**

महाराष्ट्र राज्याची ही ठिणगी म्हणजेच अभिमान, परंपरा, संस्कृती, आदर्श, माणुसकी, बंधुता, प्रेम, आदर, अस्तित्व, माया, सौंदर्य, आपुलकी, इतिहास, एकमेव ओळख, इत्यादी. या सर्व गोष्टी जेव्हा एकत्र येतात तेव्हा "मराठी" भाषेचा उदय होतो.

मराठी म्हणजे महाराष्ट्र राज्याची एकमेव पारंपारिक आणि सांस्कृतिक भाषा. या भाषेला अतिमहत्त्वाचा दर्जा महाराष्ट्र राज्यात दिला जातो आणि अभिमानाने आणि गर्वाने तो पाळला देखील जातो. पुरातन काळापासून ते आजवरच्या इतिहासात अनेक शूर, योद्धे, मावळे, संत, महात्मे, नेते, आदर्श व्यक्तिमत्व या महाराष्ट्रात घडले आणि त्यांची भाषा देखील मराठी हीच होती. म्हणूनच महाराष्ट्र राज्याची नाळ इथल्या मराठी भाषेशी जोडली गेलेली आहे. मराठी भाषेवर आधारित सर्व प्रकारचे साहित्य मराठी कवी आणि लेखकांनी आपल्या मराठी साहित्य क्षेत्राला दिलेले आहे. त्यांच्या या अमूल्य योगदानामुळेच मराठी साहित्याचे अस्तित्व अजूनही अबाधित आहे. कोणत्याही प्रकारचे गालबोट न लागता आपली ही मराठी भाषा जगातील सर्व प्रकारच्या स्पर्धेमध्ये प्रतिनिधित्व करून आपले सर्वोच्च स्थान नेहमीच राखून ठेवत असते.

आपली मायबोली मराठी भाषा ही फक्त गाव, खेडे, शहर, तालुका, जिल्हा, राज्य, किंवा देश यापुर्तीच मर्यादित न ठेवता संपूर्ण जगभरात तिचा प्रसार केला पाहिजे आणि नावलौकिक घडवले पाहिजे. आपल्या मराठी भाषेचे कौतुक आणि तिची एकमेव ओळख जगभरात वाढवण्यासाठी आपल्या सर्व मराठी भाषिकांची एकजूट असली पाहिजे. मराठी कर्म, मराठी धर्म आणि मराठीच आपले खरे आयुष्य ही भावना आपल्या मनी असली पाहिजे. तसेच मराठी भाषेचा आदर आपल्या सर्वांच्या प्रती असलाच पाहिजे. "मराठा तितुका मेळावा महाराष्ट्र धर्म वाढवावा" हे वाक्य आपल्या महाराष्ट्रातील थोर संतांचे आहे. प्रत्येक मराठी बांधवांनी या वाक्याचा विचार करून त्याचे प्रात्यक्षिक रूपांतर आपल्या स्वतःच्या आयुष्यात करावे तरच आपल्या या मराठी भाषेला देशातच नाही तर "जगातील एकमेव भाषा" म्हणून नक्कीच सर्व जगात संबोधिले जाईल. प्रत्येक मराठी माणसाला आपल्या मायबोली मराठी भाषेचा खरंच अभिमान असतो आणि मनस्वी प्रेम देखील असते. जसे गुजराती लोकांना गुजराती,

कन्नड लोकांना कन्नाडी, पंजाबी लोकांना पंजाबी, मुसलमान लोकांना उर्दू भाषेबद्दल प्रेम असते. मराठी भाषेचा प्रत्येकाला अभिमान असला तरीही मराठी माणसाला त्याची भाषिक जबाबदारी देखील असते. आपल्या भाषेला कोणी तुच्छ मानले न जावे किंवा आपल्या भाषेबद्दल जर एखादा व्यक्ती गैर पद्धतीने वागणूक देत असेल तर त्या सर्व गोष्टींना आळा बसवण्यासाठी आपले धाडसाचे पाऊल सर्वप्रथम पडलेचं पाहिजे.

सध्याचा काळ हा बदलत चाललेला नवीन काळ आहे. आपण सर्वजण एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करत असताना, विज्ञानवादी दृष्टिकोन मनात ठेवून आधुनिक संस्कृती जोपासत असतो. सध्याच्या नवीन पिढीमध्ये सारे नवनवीन बदल घडून येत आहेत. पूर्वीच्या गोष्टी ह्या सध्याच्या पिढीतील लोकांमध्ये फार क्वचित जाणवत आहेत. सध्याचे मराठी नागरिक आपल्या पाल्यांना मराठी शाळेत प्रवेश न घेता इंग्रजी माध्यमातूनच शिकवण्याचा जास्त पुढाकार घेतात. याचे मुख्य कारण म्हणजे प्रत्येक पालकांना आपला पाल्य हा सुशिक्षित, हुशार आणि आदर्श विद्यार्थी व्हावा असे वाटत असते. तसेच त्याने उच्च शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहून चांगली नोकरी किंवा व्यवसाय करावा असे वाटत असते आणि या सर्व गोष्टींसाठी इंग्रजी भाषेवर मोठ्या प्रमाणावर प्रभुत्व असावे लागते. काही पालकांची अशी इच्छा असते की ज्या गोष्टी आपल्याला मिळाल्या नाही आहेत त्या गोष्टी आपल्या पाल्याला जरुर मिळाव्या आणि त्याने मोठे व्हावे. यातील काही गोष्टी जरी थोड्या प्रमाणावर योग्य असल्या तरीही मराठी शाळांवर त्याचा फार गंभीर परिणाम झालेला आहे. सध्य परिस्थिती पाहता बहुतेक शहरांमध्ये मराठी शाळा ओस पडू लागलेल्या आहेत तसेच बहुतांश ठिकाणी मराठी शाळेचं अस्तित्व संपुष्टात आलेले आहे. एखादया विद्यार्थ्याने जर त्याचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून पूर्ण केले असेल आणि त्याला त्याची मातृभाषा असणारी मराठी भाषा ही जर त्याला पूर्णतः येत नसेल तर ती फार मोठी शोकांतिकाच असेल. यामुळे मराठी भाषेचे अस्तित्व टिकवण्यासाठी फार भयानक परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यासाठी ठोस पाऊले आत्तापासूनच आपल्याला उचलायला हवीत.

आपल्या भारत देशातील दक्षिण भारतीय सर्व राज्यांमध्ये त्यांच्या त्यांच्या भाषेप्रमाणेच त्यांच्या प्रांतात भाषा बोलली जाते आणि ते देखील सर्वचं जनांसाठी बंधनकारक असते. उदाहरणार्थ कन्नड, तामिळ, तेलगू, मल्याळम, कानडी, मद्रासी. त्या ठिकानातील नागरिकांना फक्त त्यांची मातृभाषा आणि फार थोड्या प्रमाणावर इंग्रजी येत असते. त्या सर्व राज्यांमध्ये सर्व प्रकारचे व्यवहार, कार्ये आणि सर्वच गोष्टी या त्या प्रांताच्या स्थानिक भाषेनुसारचं केल्या जातात. त्या ठिकाणच्या लोकांना आपली राष्ट्रभाषा हिंदी ही देखील येत नसते. म्हणजेच दक्षिण भारतातील सर्व राज्यातील स्थानिक नागरिकांना आपल्या राष्ट्रभाषा हिंदीपेक्षा जास्त प्रेम हे त्यांच्या स्थानिक भाषेवरचं असते. त्या सर्व नागरिकांना त्यांच्या स्थानिक भाषेबद्दल आदर, अभिमान आणि गर्व असतो. आपल्या मराठी भाषेला देखील असाच प्रतिसाद मिळाला, तर

आपल्या मराठीचे अस्तित्व आणि एकमेव ओळख जगाला नक्कीच कळेल.

आपल्या मराठी भाषेचे अस्तित्व आपल्या राज्यात तसेच देशात निरंतर टिकवून ठेवायचे असेल, तर आपल्यातील प्रत्येक मराठी बांधवाला मराठी भाषेबद्दल प्रतिज्ञा केली पाहिजे.

**मराठी भाषेबद्दलची प्रतिज्ञा**

- माझा जन्म हा मराठीतच झाला आणि अंतही मराठीतच असणार.
- मराठी भाषिकांसोबतचं इतर अन्य भाषिकांशी संभाषण साधताना मी मराठी भाषेचाचं जास्त उपयोग करणार.
- मी इतर अन्य भाषिकांना मराठी भाषेबद्दल माहिती देऊन मराठी भाषेचे महत्व त्यांना पटवून देणार.
- माझ्या दैनंदिन व्यवहारात आणि जीवनात सर्व ठिकाणी मराठी भाषेचाचं मी उपयोग करणार.
- मराठी भाषेबद्दल आदर, गर्व आणि अभिमान हा माझ्या जीवनात निरंतर असणार.
- मराठी भाषेबद्दल काही गैर होत असेल तर त्यावर नक्कीच ठोस पाऊल मी उचलेन.
- मराठी भाषेबद्दलची जनजागृती मी लेख, कविता, निबंध, पत्रलेखन, किंवा इतर माध्यमांद्वारे करणार.
- वर्तमानपत्र, कादंबरी, काव्यसंग्रह, कथासंग्रह, पुस्तके, मासिके, विशेषांक, हे वाचण्यासाठी मी मराठी भाषेला प्रथम प्राधान्य देणार.
- मराठी भाषेला एक अभिजात दर्जा मिळावा म्हणून माझे योगदान हेचं माझे कर्तव्य असणार.
- मराठी ही भाषा नाही तर ती आमची आई आहे. तिच्या संवर्धनासाठी आम्ही सर्व मराठी भाषिक सदैव कटिबद्ध असणार.

माय मराठी..!! प्रणाम मराठी..!!
मुजरा मराठी..!! जय मराठी..!!

मराठी भाषेबद्दल जेवढे बोलायचे तेवढे कमीच होईल. याचे मुख्य कारण म्हणजे या सांस्कृतिक, ऐतिहासिक, पारंपारिक आणि जगातील एकमेव भाषेचा दर्जा हा सर्वांपेक्षा भिन्न आहे. शेवटी या आदर्शवादी भाषेबद्दल थोडक्यात आणि आशयघन भावना व्यक्त करण्यासाठी पुढील चारोळी या जगातील विविध देशातील सर्व मराठी बांधवांना समर्पित.

ऐतिहासिक मायबोली मराठी
हीच आपली खरी संस्कृती,
एकमेव थोर अभिमानाची
मराठमोळी सुरेख आकृती.!

- भूषण सहदेव तांबे / मुंबई
मो.- ९०२९२५८०३८

# म

# मराठी

# हट्ट

चित्र बोलके सार सांगे भेळकागदाचे
चपखल भविष्य वर्तमान तुकड्याचे

भुक मुलांच्या पोटची भेळेचा बालहट्ट
पलिकडे पंचतारांकितात पोटे तट्ट

नको उघड बोलू बाळा माज तो सत्तेचा
विरोधाने होईल गुन्हा तो राष्ट्रद्रोहाचा

विकासाची मनकी बात ऐकेनात मठ्ठ
गरिबांचे आजवर भुकेशी नाते घट्ट

नागरिका स्वातंत्र्याचा भोग का म्हणायचा
कर्म दरिद्री लाचार देश का सांगायचा

भ्रष्टाचाराने कोण करतो मलिदा गट्ट
पोलीस झाले मित्रे पळपुटे गुंड घट्ट

जरी प्रतिज्ञा एकतेची का विधान वेळा
दुटप्पी जनता मुखवटेधारींचा मेळा

दूष्ट क्रूरता पाहूनही कां निगरघट्ट
होरपळली निरागसता निर्दयी लठ्ठ

– बाबू फिलीप डिसोजा / पुणे
मो.– ९८९०५६७४७८

# सुखी जीवनासाठी कानमंत्र



एका पाहणीनुसार भारतामध्ये साठ वर्षांवरील जनसंख्या आठ कोटी आहे. याचा अर्थ आज घडीला भारतातील सात टक्के लोक 'ज्येष्ठ नागरिक' या व्याख्येत येतात. आणि दरवर्षी वेगवेगळ्या आस्थापनांमधून साधारणपणे सात लाख लोक निवृत्त होत आहेत. म्हणजे ज्येष्ठ नागरिकांची संख्या दिवसेदिवस वाढत जाणार हे निश्चित. यावरुन कुणाचा असा समज होऊ शकतो की, या ज्येष्ठ नागरिकांपुढे जगण्यासाठीच्या खूप समस्या असणार आहेत. काही प्रमाणात ते खरे असेलही. पण निवृत्तीनंतरचे जीवन सुखी, आनंदी आणि चैतन्यमय कसे करायचे ते आपल्या हातात आहे.

निवृत्त जीवन आनंदाने जगण्यासाठी प्रामुख्याने तीन गोष्टींची आवश्यकता आहे.

१. आर्थिक स्थैर्य

२. आरोग्य

३. प्रेमाची माणसं (आप्तेष्ट, मित्र इत्यादि )

त्यापैकी आर्थिक स्थैर्य हवे असण्यासाठी निवृत्तीनंतर नियमित मासिक उत्पन्नाची हमी पाहिजे. दरमहा मिळणाऱ्या निवृत्ती वेतनाव्यतिरिक्त बँकेमधील ठेवीवर मिळणारे मासिक व्याज हासुद्धा एक चांगला पर्याय असू शकतो. आपण कष्टाने कमावलेल्या पुंजीचा आपल्याला निवृत्तीनंतर चांगला उपयोग व्हावा म्हणून जास्तीत जास्त परतावा मिळेल अशा ठिकाणी पैसा गुंतवावा.

मात्र त्या गुंतवणुकीत कमीत कमी जोखीम असावी. कारण जसजसे वय वाढत जाते, तसतशी जोखीम घेण्याची मानसिकता कमी होत जाते. त्याचप्रमाणे अचानक उद्भवणाऱ्या आजारपणासारख्या गोष्टींसाठी थोडे पैसे बाजूला काढून ठेवावेत म्हणजे ऐनवेळी त्यासाठी धावपळ करावी लागणार नाही.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपले आरोग्य. ते चांगले राहण्यासाठी आपणास झेपेल तसा नियमित व्यायाम करणे, खाण्यापिण्याच्या बाबतीत योग्य ती काळजी घेणे आणि स्वत:ला कशात तरी गुंतवून ठेवणे आवश्यक आहे. जसे की, नोकरीच्या व्यस्त वेळापत्रकामध्ये आपले काही छंद जोपासायचे राहून गेले असतील तर आता ते आपण करू शकतो. कारण अशा गोष्टींमुळे आपला मेंदू तरतरीत राहतो. त्याचप्रमाणे स्वत:चा आणि जोडीदाराचा आरोग्यविमा आपण नोकरीमध्ये असतांनाच काढून ठेवणे हेसुद्धा आवश्यक आहे.

सुखी निवृत्त जीवनासाठी तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रेमाची माणसे. यामध्ये ज्याप्रमाणे आपले कुटुंबीय आहेत, त्याचप्रमाणे नातेवाईक आणि मित्रही आहेत. या

सर्वांना आपल्याविषयी प्रेम आणि काळजी वाटत असतेच. पण ते प्रेम वृद्धिंगत कसे होईल हे पाहणे आपल्याच हातात आहे. यासाठी आधी काही पथ्ये आपण पाळणे आवश्यक आहे. एक म्हणजे घरामध्ये कुणालाही अनाहूत सल्ला देण्याचे टाळावे. मुलांना त्यांचा संसार त्यांच्या मनाप्रमाणे करू द्यावा. त्यात अनावश्यक ढवळाढवळ नको.

घरातील मुले, सुना, नोकरीस असतील तर नातवंडांची काळजी घेणे हे आपणास जमू शकते. त्याचप्रमाणे विजेचे किंवा टेलिफोनचे बील भरणे इत्यादी छोटी छोटी कामे आपण करू शकतो. त्यामुळे कुटुंबियांना आपली मदतच होते. दुसरे म्हणजे नोकरीमध्ये व्यस्त असतांना आपण जास्तीत जास्त वेळ नोकरीच्या ठिकाणी घालवलेला असतो. कुटुंबियांना देण्यासाठी तेव्हा वेळच नसतो.

आता निवृत्तीनंतर मात्र आपण जास्तीत जास्त वेळ कुटुंबियांसाठी द्यायला हवा. कुटुंबियांसोबत पर्यटनाला जाणे, सर्वांनी एकत्र बसून नाटक, सिनेमा पाहणे हे आपण करू शकतो. आपल्या जोडीदाराच्याही काही इच्छा, आकांक्षा आपल्या नोकरीच्या व्यग्रतेमुळे पूर्ण करायच्या राहून गेल्या असतील तर आता त्या पूर्ण करण्यासाठी ही चांगली संधी आहे. कारण प्रेम दिल्याने प्रेम वाढत असते ही गोष्ट सदैव ध्यानी असू द्यावी.

त्याचप्रमाणे सामाजिक कार्यासाठीसुद्धा थोडा वेळ आपल्या दिनक्रमातून काढला पाहिजे. कारण ज्या समाजात आपण राहतो, त्या समाजाचेही आपण देणे लागत असतो. तसेच नवनवीन मित्र मिळविणे, एखाद्या सामाजिक संस्थेशी स्वत:ला जोडून घेणे, सदैव उत्साही राहण्याचा प्रयत्न करणे या गोष्टी नक्कीच आपले निवृत्त जीवन सुखी बनवितील यात शंका नाही.

**- उद्धव भयवाळ / औरंगाबाद**
**मो.- ८८८८९२५४८८**

# शिक्षा



तुझ्यासाठी काही करू शकलो नाही
म्हणजे मी प्रेमच करत नाही
हा तुझा युक्तिवाद
कदाचित असेलही बरोबर..

आणि माझी कुवतही नसेल
तुझ्याशी कसलं नातं ठेवण्याची..
पण अगदी मनापासून
तुझा चांगला विचार करत आलोय;

तरी मी नौटंकी वाटतोय ना तुला !



कळलेय आता मला
मी तुला समजावू शकत नाही
माझ्या प्रेमाची परिभाषा..
आणि
तुझ्या प्रेमाच्या अपेक्षांनाही
नाही खरा उतरू शकत मी..

होय चुक केलीय मी तुला जीव लावण्याची !
म्हणूनच;
आता तुझ्यापासून दूर राहण्याची
शिक्षा देणार आहे मी स्वतःला..

- डॉ. बाळू ना. दुगडूमवार / कुंटूर
मो.- ९७६७१८९३९२

# पत्त्यांची शाळा संस्कारांचा मळा



"चला रे लवकर! ठेवा काय करता ते. सकाळीच सांगितलं होतं ना की बरोबर एक वाजता गंमत सांगणार. ये गं तू, आणि दादाला घेऊन ये." आईचा आवाज ऐकून सगळे आले हॉलमध्ये.

"काय गं?"

"चला आपण आज पत्ते खेळायचे आहेत. मस्त. आम्ही लहान असताना चारपाच तास खेळतं होतो रोज. मला तर खूप आवडतात. एकेक सांगतेच तुम्हाला. नक्की आवडेल सगळ्यांना. बाबांना पण येतात बरं कां सगळे डाव. जा रे आजी काय करते बघं."

"आई ना. नुसती पडून असते. तिला झोप नाही लागतं. आपण आपापल्या खोलीत असतो. तेंव्हा बघितलं का आजी थोड्याथोड्या वेळाने चक्कर मारुन जाते परत आणि पडते. जा येईल आई खाली. आजोबा झोपले असतील तर राहू दे. आले तर आले. झोपू दे त्यांना नाहीतर." इति बाबा. आजीच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवतं असतात. बरोबर आहे म्हणा.

"हो बाबा, मला पण असंच वाटतं. परवा आजीने मला पेन्सिलवरची लोकरीची फुलं कशी करायची शिकवलं. किती नाजूक आहेत ती. मी करणार आहे. आजीला खूप काही येतं ना?"

"हो, आजीच्या वेळच्या बायका असले बारीक नक्षीकाम, भरतकाम विणकाम खूप सुंदर करायच्या. शिवाय घरातलं पण अगदी व्यवस्थित असायचं. तुम्हाला नसेल आठवतं ते. आता आजी थकली तरी पत्ते खेळायला येईल बघ. एकदम पट्टीची पत्ते खेळते. ती बघ, आलीच. आणि आजोबा पण आले. झोपले नाही वाटतं. त्यांना पण आवडत पत्ते खेळायला... आता आपण सहाजण झालो. मज्जा करु यात."

मुलांनो आणि पालकांनो, तुमच्या घरात असे सगळेमिळून पत्ते खेळतात का? की जो तो आपापला मोबाईल घेऊन फक्त तिथेच खेळत बसतात. माहित आहे ना खूप वेळ मोबाईल बघणं, डोळ्याला त्रासदायक तर आहेच. आणि त्या व्हिडीओगेम्स ने तर कान जातील असे वाटते, डोळे तर कसे होतात ते खेळताना, हाताची छोटी चिमुकली बोटे ती दुखत असतील ना? सगळ्यात महत्वाचे खेळाडूच्या मेंदूचे काय होते माहित आहे का? एकदम आउट, खूप वाईट परिणाम होतो त्याच्यावर. तसेच मनाचे अवघड होते, विचारशक्ती तर कुजू लागते. मग, तरी कशाला खेळायचे ते? मस्त पत्ते खेळा, ते

देतात धम्माल मज्जा, पोटभर हशा, चिडवाचिडवी, डोक्याला बुद्धीला चालना. माहित आहे का आपले आईबाबा आजीआजोबा का खेळतं असतं पत्ते ते...नाही, आहो, पत्ते म्हणजे संस्कारांची शाळा! वाजवा टाळ्या! चला, काढा पत्त्यांचे कॅटस आणि वाचवा आपल्याच चिमुकल्यांना आणि स्वत:ला देखील त्या ई खेळण्याच्या नादातून. ती खरचं ईsssss शीsssss आहेत. नकोच ती...

हे चित्र बदलले पाहिजे असे सगळ्या मोठ्यांना महिन्यातून कधीतरी वाटते. पण, लक्षात कोण घेते. चाललं ते चालू दे. मी देखील तेच तर करीत असतो सारखा. जे होईल ते होईल. असे म्हणतं मुलांच्या शाळेतून प्रगतीपुस्तक आले की समजते, मुलाचे अभ्यासातून लक्ष उडालेले दिसते. मार्कांची घसरगुंडी, गप्प बसणे, आपल्याच तंद्रीत असणे, व्हिडीओ बघायचा नाही म्हंटले तर चिडचिड करणे, रडणे, ओरडणे, सगळेच चुकीचे वाढलेले असते. लक्षात आले तर मग त्याकडे लक्ष देऊन कृती करावी. दुदैव आपल्या समाजाचे पुढची पिढी अशी बिघडत चालली आहे ते उघड्या डोळ्यांनी बघतो आपण सगळेच्या सगळे.

खरं सांगू, आधीच्या पिढ्या म्हणजे आत्ता जे सर्व वयवर्षे पन्नासच्या पुढे असतील त्यांच्या बद्दल सांगते. ते असं की, या पिढ्यांनी खूप पत्ते खेळले आहेत. त्यांना मोकळा वेळ तसा कमी मिळायचा. घरातली कामेच खूप शिवाय अभ्यास पाठांतर, शेतावरची कामे, नाहीतर अवांतर वाचनाचे पुस्तक सतत हातात. तर, ते पत्ते खेळले, तुमचे आईबाबा खेळले बऱ्यापैकी. "आज आपण पत्ते खेळू यात. चला, लवकर बसा खाली. खालीच बसु या का. मला आवडतं. पाय पसरून बसायला मिळतं. सहा जण बसले आपापले जागा घेऊन."

मला आवडतं खूप पत्ते कुटायला
पिसून सरसर भरभर वाटायला
मस्तपैकी सर्कन कात्री लावायला
मार कट म्हणता टिचकी मारायला ..... १.

पत्ते खेळायला अनेकांना आवडतात. त्यात विविधता खूप आहे. पत्ते पिसणे महत्वाचे असते. ते नाही नीट पिसले तर आधीच्या डावात झालेले हात जसेच्या तसे पुढे या डावात येतात. म्हणून पत्त्यांना कात्री लावायची असते. म्हणजे कात्री घेऊन कापायचे नाही. तर पत्त्यांचा गठ्ठा दोन भागात करायचा, दोन्ही हातात एकेक घ्यायचे आणि एकात एक गुंतवून गठ्ठा सरळ करायचा. डाव्या हातातल्या गठ्यातले थोडे त्यावर उजव्या हातातले पत्ते, असे डावेउजवे करीत पत्ते एकत्र करणे. त्यानंतर येते ती टिचकी. सगळे पत्ते एकत्र शेजारच्या भिडूच्या समोर धरून त्याने पत्त्यांच्या गठ्यावर दोन बोटांनी टिचकी मारायची नाही तर हवे तेव्हडे काढून बाजूला ठेवायचे. तेंव्हा आधी वाटणाऱ्याच्या हाततले वाटायचे नंतर कातलेले.

समोरासमोर बसलेले असतात भिडू

वख्खई बोलता पटकन वळला लाडू
हुकुम लपवा आधी नका फोडू
संपला डाव आता नका ओरडू ..... २.

काही पत्ते डाव खेळताना दोन वा तीन जणांचा एक ग्रुप असे करून एक पार्टी विरुद्ध दुसरी पार्टी. असे खेळले जाते. भिडू समोरासमोर असतात, शेजारी नाही. लॅडीज खेळात असे समोरासमोर एका बाजूचे गडी बसतात.आता या खेळातली वख्खई ही खेळताना समजून येईल. कधी हुकुम लपवावा लगतो. कुठलाही खेळ म्हंटल कि गलका आरडाओरडा भांडण हे येतेच की.

भिकार सावकार भिडू फक्त दोन
डाव लावायला एकटा देखील पुरे
पाच तीन दोनसाठी हवेत गडी तीन
झब्बुला असतील ते खेळतात सारे ..... ३.

भिकार की सावकार? सावकाराकडे खूप पत्ते गोळा होतात आणि भिकाऱ्याकडे खूपच कमी. असा साधा अर्थ. इथे देखील हा खेळ एकटा माणूस देखील खेळतो. हो, पण अगदी प्रामाणिक पणे खेळायचे. आपण हरलो तर सांगायचे. पाचतीनदोन डावात पत्त्यांच्या खेळातील बारकावे समजायला सुरवात होते. हात म्हणजे काय? ओढले, हात दिले, लॉटरी कशी लागते. हे खेळताना सांगता येते. झब्बू म्हणजे मज्जाच मज्जा. किती प्रकारचे झब्बू असतात. प्रत्येकाची तऱ्हाच न्यारी. खेळताना जिंकाल नाहीतर गाढव व्हाल. बापरे, एकदम गाढव काय करते इथे या पात्यात...हा! हा! हा!.. मी नाही गाढव. होशील तेंव्हा समजेल.

गाढव व्हायला भिणार नाही मी
त्याच्या सारखं ओरडते का कोणी?
झालेला अपमान गिळायला शिकलो
गंमतच गंमत पोट धरून हसलो ..... ४.

गाढव झाल्यावर काय वाटतं. रडायचे नाही. पत्त्यातले तर गाढव हे! खरं थोडंच आहे? जे डावात हरतात त्यांना काही खेळात गाढव म्हणतात. इतकेच. मज्जा असते गाढव होण्यात.ऐकलात ना त्याचा आवाज. किती छान आहे ना! ह्याsss ह्याsss ह्याssssss! खरं सांगू हे असे गाढव होणे म्हणजे आलेल्या परिस्थितीचा सामना करताना कोणी काही म्हंटले तरी न घाबरता आपण आपले कार्य करतं राहणे असते. इतकी मज्जा येते की सगळे शेवटी पोट धरून हसायला लागतात. कसे गाढवासारखे. नाही रे बाबा, खुशीने मुलं हसतात तसे.

नाटे ठोंब म्हणजे माझ्याकडे नाही
जोडी लपवलेली चालणार नाही
कोणाकडे राणी होती आठवत नाही

स्मरणशक्तीची कसोटी होई. ..... ५.

नाटे ठोंब! होळीची बोंब आठवली ना तुम्हाला. ती नाही इथे येतं. तर माझ्याकडे नाही, नॉट ॲट होम! माझ्या हातात तू मागितलेला पत्ता नाही, हे सांगायची पद्धत. पण अशी तंतरते ना एकेकाचे. कोणी काय मागितले, कोणी कोणाला काय दिले, नंतर तोच पत्ता कुठे गेला, हे लक्षात ठेवणे महाकठीण असते. मघाशी कुठली तरी राणी याच्या कडे आली. म्हणजे गोंधळ.. नक्की राणी की गुलाम होता. स्मरणशक्ती जाते पाणी प्यायला. तिला शाबूत ठेवायचे तर खेळायचे नाटे ठोंब!!

चारी सत्त्या पडल्या खाली
त्यामागे इतरांची पळापळ झाली
मार्कांची बेरेज पटापट केली
बदामसात मध्ये मज्जाच आली ..... ६.

बदामसात खेळ बहुतेक सगळे खेळतात. अगदी सोपा, लहान मुलांना आवडणारा. बदाम सत्तीने सुरु होणारा हा खेळ आहे. चारी सत्त्या एकामागून एकेक जमेल तशा म्हणजे खेळाडूची उतरी म्हणून येतात रिंगणात. तिला लपवून पास दिला तर प्रत्येकाचे एकेक पान बक्षीस मिळते. पहिला सुटला की डाव संपला. मग तोंडी बेरीज करायची आणि शेवटी गाढव! तोंडी बेरीज म्हणजे आकडेमोड बहाद्दर होणे. होणार ना हुषार!! खेळा.

मॅरेज मध्ये जो राजा तीच राणी
लफड्यात इथे अडकतं नाही कोणी
तीनशेसात मध्ये तोंडी बेरीज हुकमी
खाजवून डोके करा उतारी नामी ..... ७.

खरंच डोकं खाजवावं लागतं इथे, म्हणा असेल तर, की नुसतेच काहीतरी गोलगोल मानेला ओझं. असं कसं असेल, देवाने सगळ्यांना थोडी तरी बुद्धी दिलेली आहे. पण, ती वाढवायला असे खेळ खूप मदत करतात. पुढचा मागचा विचार करून चाल करायची असते, शिवाय गणितातली आकडेमोड इथे देखील असते. लफडं इथे चालतं नाही. जो राजा तीच राणी फक्त त्याच्याबरोबर येणार. इथे लफडं नाही की ते अगदी नवीन ... काय बरं ... हं, लव्ह इन म्हणतात ना ते. ते तर नसणारचं इथे खेळात. अगदी खात्रीने सांगतो, चलं लावतोस बेट? 'नको रे बाबा... तू म्हणतोस तेच खरं. खेळू यात आपण.'

उचल चल पत्ते...च्यालेंज माझा
गुलाम म्हणून तू लावलास राजा
चुकीच्या लोकांना लगेच पकडा
आयुष्यभराचा गिरवला धडा ..... ८.

अरे इथे पकडापकडी. चूक केली की जशी बोलणी खावी लागतात तसेच इथे

चुकीचे पान लावले, आणि पुढच्या भिडूने तुम्हाला पडकले तर तुमच्या हातात मावणार नाहीत इतके पत्ते गोळा होणार. खूप ओझं वाटते त्याचे. नको ना ओझं. मग खरं लावा, पण मगं खेळातली मज्जा कशी येणार. तर, कधी खोटं कधी खरं असे करीत

अष्ट एक्का त्रिभुज राजा
सप्त राणी चतुर गुड्डु छकी दश्शी
दुरी नवी आणि पणजी
जादूमंत्र पाठ फसाल तुम्ही ..... ९.

ही तर आहे पत्त्यातली जादू. आता नाही सांगणार. पत्ते खेळून झाल्यावर सांगीन सगळी जादू.

कधी खेळलो मेमरी, कधी बांधला बंगला,
तर कधी मेंढीकोट खूपच रंगला
कधी रमी मध्ये सिक्वेन्स रिअल
अति महत्वाचा जोकरचा रोल ..... १०.

किती खेळ आहेत. वेगवेगळे. मेमरी म्हणजे स्मरणशक्ती. एकदम भारी खेळ आहे. शिवाय मेंढीकोट, पत्त्यांचा बंगला, तर कधी रमी आणि सिक्वेन्स. इथे जोकर खूप उपयोगी येतो. दोघांत देखील खेळता येतो खेळ.

आपली जागा ओळखून वागेल तो खरा
आपापला आब प्रत्येकाने ठेवलेला बरा
गुलामचोराची जरी असली थोडी भीती
त्याने तर दिली जादू, युक्ती, अन गती ..... ११.

चोर म्हंटल की भीती वाटते ना? आला चोर बघा बघा! इथे पत्त्यात एक खेळ आहे. गुलामचोर. पत्ते खेळताना छोटे छोटे खेळ खूप आहेत. सातआठ हा ही एकखेळ दोघात रंगतो. जेव्हढे खेळाल तितके प्रकार शिकाल.

दोन काळी दोन लाल राजा राणी मोठे
एक्क्याची सत्ता मोठी अजबच वाटे
असली तर असू दे मी दुर्री बिचारी
हुकुमाची असेल तर कमालच करी ..... १२.

एक्का सगळ्यात भारी असतो. शिवाय राजाराणी च्या जोडीला काही ठिकाणी खूप महत्व असते. दुर्री सगळ्यात हलकं पान, पण तीच जर हुकमाची असेल दुर्री तर तिचेही महत्व भारी असते. हुकुम म्हणजे सगळ्यात एकची निवड करायची. इस्पिक, बदाम, किलवर, चौकट या चार रंगापैकी एक हुकुम बोलायचं असतो. आणि त्याने हात अधिक करायला मदत होते.

झालं का खेळून पत्ते करा गोळा
सगळ्यांची लाडकी पत्त्यांची शाळा

त्यातूनच शिकलो चांगल वागायला
संस्कार ते काय पत्त्यांशी बोला ..... १३.
.............. तेरा कडवी चार ओळी
तेर चोक बावन्न बरोबर जुळली..........

बघितले ना! किती रंगतदार पत्त्यांचे खेळ आहेत ते. सगळेच एकापेक्षा एक भारी. एक खेळ झाला की लगेच दुसरा विषय घेऊन पत्ते वाटायचे. ब्रिज म्हणून पण एक पत्त्यांचा खेळ आहे. तो किंचित अवघड आहे. बाकीच्यांचा सराव झाला की मग ब्रिज खेळायला सुरु करु यात. पत्त्यात रंग चार आणि प्रत्येक रंगाची पाने तेरा. तेर चोक बावन्न जुळली, म्हणजे पत्ते असतात एकूण बावन्न. मोजून बघा आणि मग नीट कॅटमध्ये घालून ठेवा. पुढच्या वेळी सगळे हवेत ना खेळायला. हरवायचे नाही, म्हणून ठेवताना मोजून ठेवायचे. आवडेल कि नाही पत्त्यांचे डाव. किती तरी विविधता आहे त्या खेळांमध्ये. मनोरंजन आहे, बुद्धीला चालना आहे, हसणे चिडवणे रडणे ते कधीकधी होते. एकुणात पत्त्यांची ही शाळा आहे. या शाळेत संस्कार आपोआप रुजवले जातात. म्हणून तर म्हणतात पत्त्यांची शाळा संस्कारांचा मळा!!

**- वंदना धर्माधिकारी / पुणे**
**मो.- 9890623915**



# तू जगून बघ



आपल्या आत डोकावून बघ
जीवनाच्या सागरात वाकून बघ
काळजावर दगड ठेवून बघ
माणसा रे माणसा, तू जगून बघ

धरती, आकाश, पाऊस, पाणी
फुलांत फुलणारी तरल विराणी
उजाड माळाची उनाड गाणी
सुरात वेड्या गाऊन बघ
माणसा रे माणसा, तू जगून बघ



मनात ओला गहिवर घेऊन
नभात दाटल्या मेघांतून
पंख लेवून विहरत जात
मोकळं रान माजवून बघ
माणसा रे माणसा, तू जगून बघ

मळक्या वाटा सोडून दे
नव्या जगाला वाहून घे
उरल्या सुरल्या जीवनासाठी
हिंमत बाळगून लढून जग
माणसा रे माणसा, तू जगून बघ

- रमेश नागेश सावंत / मुंबई
मो.- 9821262767

# ती काळरात्र ....
# आणि नवी पहाट

६. ०० जसे घड्याळात वाजले तशी मी लगेच निघाले, ऑफिसमधून . झपाझप पाउले टाकत मी बस स्टॉप वर पोहोचले. बस ५ मिनिटात दरवेळी येते पण आज २० मिनिटे अधिक होऊन गेली पण बसचा काही पत्ता नाही.

ढग गडगडून रिमझिम पाऊस सुरु झाला. मी बस स्टॉपच्या आताल्या भागास, सीट्स वर जाऊन बसले. तिथे १४-१५ वर्षाची शालेय मुलगी बसली होती. सावळा रंग, दोन वेण्या आणि पाठीवर भलीमोठी बॅग, थकलेली दिसत होती .

मी मोबाईल वर मेल चेक अरण्यात बिझी झाले. तितक्यात एक घोषणा झाली , "पाऊसामुळे काही गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत." आणि त्या गाड्यांच्या लिस्टमध्ये मी प्रवास करणारी गाडीदेखील होती.

आता ज्यादा पैसे देऊन प्रवास करण्याशिवाय काही गत्यंतर नाही, अशी नाकार्थी मान डोलावत मी उठले आणि बाहेर कुठे रिक्षा मिळते का म्हणून पाहू लागले.

तितक्यात मागून एक आवाज आला. "दीदी, मला घरी फोन करायचा आहे." ती मघासचीच मुलगी माझ्याकडे केविलवाण्या नजरेनं पाहत होती.

मी तिला फोन दिला. तीच बोलणं झाल्यावर तिने परत केला. "काय गं , कुठे जायचे आहे तुला?"

"सुभाषनगर " असं एका झटक्यात तिने उत्तर दिलं.

"अरे वाह ते तर माझ्या घरापासून फक्त ५ मिनिटांच्या अंतरावर आहे. चल मग शेअर रिक्षा ने प्रवास करायचा का? म्हणजे घरी लवकर पण पोहोचू "

तिने थोडा विचार करून होकार्थी मान हलवली.

"नाव काय तुझं?

"रिचा " असं हळू स्वरात तिने उत्तर दिलं.

कोणत्या शाळेत शिकते?" असे काही प्रश्न विचारून आम्ही रिक्षाची वाट पाहत होतो.

घड्याळात पहिले तर ७ वाजायला आले होते. रिक्षाची वाट बघत आम्ही दोघी स्टॅन्ड वर उभ्या होतो. पण आमच्या घरानजीक स्टॉप वर सोडणारी एकही रिक्षा आम्हाला मिळत नव्हती.

शेवटी एक रिक्षा आमच्या समोर येऊन थांबली. एक व्यक्ती मागच्या सीट वर बसला होता. आम्ही दोघींनी एकमेकांकडे कटाक्षा टाकून होकार्थी नजरेनं रिक्षात बसलो.

रिक्षा चालत होती आणि मी उद्याच्या कामाचा विचार करत होते.

आमचा स्टॉप यायला अजून २० मिनिटे होती, मी सहजचं नजर रिचाकडे वळवली. ती अस्वस्थ दिसत होती. जायला आज उशी होतोय म्हणून असेल अस्वस्थ, असा विचार मी करतच होते कि माझी नजर अचानक रिक्षा चालकावर गेली, तो रिचाला आरशामधून पाहत होता. अगदी विचित्र नजरेने.

माझ्या तळपायाची आग मस्तकात गेली. “काय बघताय तुम्ही? रिक्षा चालवा नीट” अशी मी वरच्या आवाजात बोलले. तसे सगळे माझ्याकडे पाहू लागले.

“ओ मॅडम आता तुम्ही मला नका शिकवू रिक्षा कशी चालवायची ते. “ त्याने उद्धट स्वरात उत्तर दिले.

“मग मागे काय आहे पाहायला?” मी पण पलटवार केला. “थांबवा गाडी इथेच.”

तरीदेखील तो रिक्षाचालक रिक्षा अगदी वेगात चालवत होता. आणि रिक्षातील तो वैक्ती यात सामील असावा म्हणून काही उद्गार काढत नव्हता.

आम्ही दोघीही आता घाबरून गेलो होतो. आणि रिक्षा एका निर्मनुष्य पुलावरून चालली होती. मनात आलं मारावी का उडी? जीव तरी वाचेल. कारण आम्ही दोघीही किती वाईट संकटात सापडलोय हे कळाल्यावर आम्ही जोर जोरात किंचाळायला सुरुवात केली. तसे बाजूच्या माणसाने रिचाच्या तोंडावर हात ठेऊन तिचं किंचाळणे थांबवण्याचा प्रयत्न करत होता.

मी झटकन रिक्षाचालकांची कोलार घट्ट मागे आवळू लागले तसा त्याचा रिक्षावरुन तोल सुटू लागला. समोरच्या झाडाला आदळू नये म्हणून कसे बसे कर्कश आवाजाचे ब्रेक त्याने लावले. याच गोष्टीचा फायदा उचलून आम्ही धावत सुटलो. धापा टाकत, मागे न बघत आम्ही फक्त धावत होतो. रिचा तिची ५ किलोची बॅग घेऊन सुसाट पळत होती.

पुढे जळणाऱ्या प्रकाशाखाली असलेल्या एका दुकानापाशी आम्ही थांबलो. इकडे तिकडे बघून रस्त्याचा आढावा घेतला. आणि इथून आता घर फक्त १० मिनिटावर अशी खात्री करून आम्ही चालत निघालो. तिथला रस्ता हा व्यस्त होता. दुकानदारांची, भाजीवाल्यांची घरी जायची घाई चालली होती. तसेच काही गाड्या वेगाने आमच्या बाजूने जात होत्या.

आज एका विचित्र संकटातून आपली सुटका झाली याचे मी देवापुढे आभार मानले. आम्ही झपाझप पाऊले टाकत घर जवळ करत होतो, पण कोणीच कोणाशी बोलत नव्हतं. आजच्या भयानक घटनेने आमच्या दोघींच्या मनावर एक खूण केली होती.

थोड्याच अंतरावर असणाऱ्या रिचाच्या घरी मी तिला सोडले आणि माझ्या घरी जायला निघाले. पण माझ्या मनात विचारांचं थैमान चालेलं.

तस बघायला गेलं तर यात आमची काही चुकी नव्हती. तरी देखील आम्ही भित्रा सशासारखी उडी मारून धूम का ठोकली ? आज एका लहान मुलगी जी उद्याची एक

निर्धास्त नारी झाली असती तिच्या पुढे मी काय हा आदर्श मांडला ?

मी घरी पोहोचले, काहीही न खाता तशीच बिछान्यावर झोपून विचार करू लागले, पण आज घडलेल्या त्या घटनेमुळे मला झोपच लागली नाही. विचार केला, घरी घडलेला प्रकार सांगावा पण एकुलती एक मुलगी म्हणून आई बाबा काळजी करतील. पोलीस स्टेशनमध्ये कंप्लेंट देऊन तरी काय?

असे बरेच दिवस घडलेल्या घटनेचा विचार मनात घोळत होता. अनेक दिवस, रात्री प्रवास करायचा योग्य आलाच नाही, त्यामुळे रिचाची भेट ही झाली नाही. कशी असेल ती? परत काही विचित्र तर घडलं नसेल ना? तिने घरी सांगितलं असेल का? असे अनेक प्रश्नांनी मला त्या दिवशी जकडून टाकलं मग मनात विचार केला, रिचाच्या घरचा पत्ता तर मला माहीत आहे मग आज भेटून येऊ तिला.

तिच्या घराच्या दिशेने मी तिला काय म्हणून विचारावं या प्रश्नांनी जड पाऊले उचलत होती.

तिच्या घरी पोहोचल्यावर तिच्या आईने पाणी दिले.

“रिचा कुठेय आहे?” असा झटकन प्रश्न विचारला.

“अजून आली नाही. “ तिच्या आईने उत्तर दिले.

“अजूनही आली नाही?” असं विचारून मी डोळे विस्फारले. घड्याळातला वेळ पहिला तर ७ वाजून गेले होते.

“आहो पण तिची शाळा ६ च्या दरम्यान सुटते ना?

“अगं हो, पण तिने कराटे क्लास जॉईन केलाय. हल्ली ती ७. ३० ला घरी येते. “

माझे मन एकाच वेळी आनंदित आणि भावुक झाले. एवढीशी पोरगी पण स्वतःला आत्मनिर्भर करण्यासाठी स्वतःहून पाऊले उचलतीये आणि इथे मी दिवस रात्र फक्त विचारांच्या विळख्यात अडकले होते.

त्या दिवसांतर एक आत्मविश्वास मनात भरला.

मी देखील सेल्फ डिफेन्स टेक्निक शिकून आता ५-१० वर्गातील मुलींना मोफत शिकवणी देते. ह्यामुळे मला समाजासाठी , मुलींसाठी काही कार्य केल्याचे समाधान मिळते आणि मुली शिकून प्रबळ बनतात हे माझं ध्येय साध्य होते.

**- प्रणाली पाटील**

# मी होतो पाऊस जेव्हा



मी होतो पाऊस जेव्हा
तुला हवाहवासा वाटतो
बेधुंद होऊनी मी मग
तुला चिंबचिंब भिजवतो ।। ध्रृ ।।

शहारते तुझी काया
रोमारोमात अंगार फुलतो
असे भिजणे अन् शहारणे
याचा मला हेवा वाटतो ।।१।।

मीही मग रंगुनी जातो
तुझ्या नसानसांत भिनतो
तुही जातेस मग विरघळुनी
माझा रंग मी तुला देतो।।२।।

मिलनांतला हा स्वर्गानंद
युगे युगे मी लुटत राहतो
येथील उन्हाळे अन् पावसाळे
अमर प्रीतिस या मी कवटाळतो।।३।।



- बाळासाहेब तोरस्कर / ठाणे
मो.- ८८७९९२११२१

# आपण सविस्तर बोलू या !



अनघा खूप काळजीत होती, तिला आपलं मन मोकळं करण्याची खूप इच्छा होती, पण प्रश्न असा होता कि कोणाशी आपण बोलायचे? कोणाकडे आपली बाजू हक्काने मांडायची? अशा एक ना अनेक विचारांच्या गर्तेत अनघा अडकली होती, तिला सुचत नव्हते काय करावे ते.

अनघा हि आजच्या युगातील मुलगी होती, तिचे स्वप्न, तिच्या आकांक्षा, तिची ध्येय अगदी आजच्या युगातील मुलीला साजेसे असेच होते, ती एका बड्या कॉर्पोरेट कंपनीत ती चांगल्या पदावर काम करत होती, आपलं शहर सोडून ती मुंबईमध्ये रहात होती, तिने तिचे शिक्षण स्वतःच्या हिंमतीवर पूर्ण केलं होतं, तिच्या आई वडिलांना तिचा सार्थ अभिमान होता. शिक्षण पूर्ण झाल्यावर तिला कॅम्पस इंटरव्ह्यूव्ह मधून तिला चांगला जॉब मिळाला होता, तिचंविश्वच बदलून गेलं होतं, एवढ्या मोठ्या कंपनीत, आणि तेही चांगल्या हुद्द्यावर तिला जॉब मिळाला होता, पहिल्याच प्रयत्नात ती यशस्वी झाली होती. पण प्रश्न असा होता कि, तिला तिचं शहर सोडून मुंबईला राहायला जावं लागणार होतं, वडिलांनी तिला परवानगी दिली होती, पण प्रश्न आईचा होता, मग आईने देखील तिला परवानगी दिली. मग सुरु झाला तिचा, जीवनाशी असलेला लढा, कामात ती योग्यच होती, मुळात ती कष्टाळू होती, तिला तिचं ध्येय गाठायचं होतं. एका मिटिंग च्या दरम्यान तिची ओळख मेघ शी झाली.

मेघ हा तिच्याच कंपनीत मार्केटिंग डिपार्टमेंट मध्ये होता, तर अनघा फायनान्स डिपार्टमेंट मध्ये होती, मेघ आणि अनघा हे असेच धययवेडे होते. मेघ हा मुंबईचाच होता, अनघाच्या राहणायचा प्रश्न त्याने बऱ्याच अंशी सोडविला होता, त्याच्याच नातलगांच्या फ्लॅट मध्ये त्याने तिची राहण्याची सोया केली होती. हळूहळू मेघ आणि अनघा ह्यांच्या भेटी वाढत गेल्या, पहिले मैत्री झाली, आणि ते दोघे कधी एकमेकांच्या प्रेमात पडले हे त्यांना देखील कळले नाही. त्यांच्या भेटी, सुट्टीच्या दिवशी फिरायला जाणं, एकत्र सिनेमे पाहणं, कंपनीच्या मिटींग्स मध्ये सहभागी होणं, ह्या सगळ्या गोष्टी घडत होत्या, आणि एक अनामिक नातं त्या दोघांमध्ये बहरत होतं, त्यांना ह्या नात्याची जाणीव होऊ लागली होती, आणि ते दोघे कधी एकमेकांच्या जवळ आले ते कळले नाही.

त्यांच्या नात्याची खमंग चर्चा आता ऑफिस मध्ये होतं होती, प्रत्येक जण आपल्या सोयीनुसार त्यांच्या नात्याला एक वेगळंच नाव देऊ पाहत होते, एक वेगळा आयाम देऊ पाहत होते, काहींचा तिरपा कटाक्ष देखील त्यांना सहन करावा लागत होता. "

मेघ मला भीती वाटते”, अनघा मेघ ला बोलली, जेव्हा ते असेच फिरायला गेले होते, “भीती? कशाची भीती?” मेघने तिला विचारले. “ आपल्या नात्याची उलट सुलट चर्चा आपल्या ऑफिस मध्ये चालू आहे, प्रत्येक जण खमंग फोडणी देऊन आस्वाद घेत आहे, मला कसंतरी होतंय मेघ.” एवढं बोलून ती मेघ जवळ गेली, त्याचा हात हातात घेऊन, ती हुंदका देऊ लागली.” अरे तू वेडी आहेस का? का रडतेस? ओके, ह्या चर्चेला आपणच पूर्णविराम देऊया.” मेघ अनघाला सावरत म्हणाला, मेघ च्या बोलण्याने काही काळ का होईना अनघाचं मन शांत झालं.

मेघ ने एका पार्टीचं आयोजन केलं होतं, निमित्त होतं, त्याला मिळालेल्या प्रोमोशनचं सेलिब्रेशन करणं, अनघा पण त्यावेळी उपस्थित होती, एका बड्या हॉटेल मध्ये एक जंगी पार्टी मेघ ने आयोजित केली होती, सगळे ऑफिसमधले त्याचे कलिग्ज होते, त्याचे बॉस देखील होते. बॉस गेल्या नंतर त्याने अनघाला हात धरून स्टेजवर बोलावले, आणि सगळ्यांच्या समोर जाहीर केले कि ती आणि अनघा लवकरच विवाह बंधनात अडकणार आहे. अनघाला आपल्या कानांवर विश्वासच बसेना, आणि सगळीकडून टाळ्यांचा कडकडाट झाला, सगळ्यांनी त्यांचे अभिनंदन केले, आणि पार्टीत एक वेगळाच जल्लोष सुरु झाला. सगळे जण संगीताच्या तालावर ठेका धरून नाचू लागले.

मेघ आणि अनघा देखील नाचू लागले. “झाले ना सगळे गप्प, हि पार्टी हेच अनाऊन्स करण्यासाठी होती, तुझ्या माझ्या नात्याचा दृष्टिकोन ह्यांच्या नजरेत बदलणे हा उद्देश होता, आता कोणीच खमंग फोडणी करणार नाही, कारण सगळ्यांचे मन तृप्तीने भरले आहेत, ते बघ”. मेघ अनघाला म्हणाला. अनघाने पार्टीत एक नजर फिरवली, सगळे आपापल्या विश्वात मश्गुल होते.... आणि त्यांच्या नात्याच्या चर्चेवर कायमचा पडदा पडला होता.

काही महिन्यांचा काळ लोटला, आता परिस्थिती बदलली होती, अनघा ती कंपनी सोडून दुसरीकडे जॉब करत होती,मेघ मात्र त्याच कंपनीत होता, आता तो सीईओ झाला होता, सगळी सूत्र त्याच्या हातात आली होती, मग असं काय झालं होतं, अनघा का जॉब सोडून गेली होती? अनघा आणि मेघ मध्ये एक दुरावा आलेला होता, त्यांच्या नात्याची वीण सैल झाली होती, ह्या सगळ्या प्रकारात चूक कोणाची होती, सगळ्यांना आपलं नातं समजावं म्हणून मेघ ने किती खटाटोप केला होता, मग अचानक सगळं कसं विरळ होतं गेलं.......

श्रीमती .सविता कुलकर्णी, ह्यांची ओळख अनघाशी झाली, सौ. सविता कुलकर्णी, ह्या सोशल वर्क करत होत्या, त्यांचे समाजाप्रती विचार ऐकून अनघा एकदम भारावून गेली होती, आणि त्यामुळेच तिला त्यांना भेटण्याची तीव्र इच्छा होती, आणि एका कार्यक्रमादरम्यान त्या दोघी भेटल्या, आणि त्यांची गाढ मैत्री झाली, पण हि मैत्री काही अटीशर्तींवर झाली, अनघा ने सौ. कुलकर्णी ह्यांना कॉम्प्युटर शिकवायचा आणि सौ. कुलकर्णी ह्यांच्या सामाजिक उपक्रमात अनघाने काही अंशी का होईना सहभाग

घ्यायचा.

दिवस जात होते, त्यांची मैत्री खूप घट्ट झाली होती, अनघा, मेघ ला विसरू शकत नव्हती, पण ती त्याच्यापासून दूर गेली होती, इकडे मेघ देखील आपल्या विश्वात रममाण होता, यशाची शिखरं तो मार्गक्रमण करत होता, जीवनाच्या एका वेगळ्या अनुभवांना दोघे सामोरे जात होते, पण ते दोघे एकमेकांना विसरू शकत नव्हते...............

" तुम्ही एकदा एकमेकांशी बोला" श्रीमती. कुलकर्णी अनघाला म्हणाल्या, त्यांच्या ह्या वक्त्यव्यावर काय बोलावं तिला सुचत नव्हतं. अनघा गोंधळून म्हणाली," तुम्ही काय म्हणतात मला समजत नाही". " तू त्याला अजून पूर्णपणे विसरू शकलेली नाही, अगं पहिलं प्रेम असच असतं वयाच्या फरकासारखं, ठरवलं तरी विसरता येत नाही." सौ. कुलकर्णी अनघाला म्हणाल्या. अनघा मात्र एकदम गप्प होती

श्रीमती. कुलकर्णी ह्या मेघ च्या आई होत्या, त्यांना मेघ आणि अनघाबद्दल ठाऊक होते, अर्थात त्याची कल्पना मेघने आगोदरच दिली होती, जेव्हा अनघाची सौ, कुलकर्णींशी भेट झाली तेव्हाच त्यांनी अनघाला ओळखले होते, आणि म्हणूनच त्यांनी अनघाशी मैत्री वाढवली, आपली होणारी सून कशी आहे हे त्यांना जाणून घ्यायचे होते, आणि अनघा त्यांना पसंत होती, त्यांनी आपली भावी सून म्हणून अनघाला स्वीकारले होते. पण अनघा आणि मेघ मध्ये इतका दुरावा येण्याचे कारण त्यांना सापडत नव्हते, कारण मेघ तो विषय टाळून इतर विषयांवर आपल्या आईशी बोलत होता, सौ. कुलकर्णी ह्यांनी मेघ ला खूप लाडात वाढविले होते, त्याच्या वडिलांच्या पश्चात त्यांनी त्याला लहानाचे मोठे केले होते, नोकरी करून, आपलं घर त्यांनी संभाळल होत, एकूणच काय तर मेघ हा त्याच्या आईचा सर्वकाही होता, आणि आपल्या एकुलत्या एक मुलाच्या मनात कोणती सल आहे, अनघाबद्दल त्याच्या मनात काय भावना आहे हे त्यांना जाणून घ्यायचे होते, पण सगळे प्रयत्न निष्फळ होते. म्हणून त्यांनी आपला मोर्चा अनघाकडे वळविला होता. " श्रीमती. कुलकर्णींना आपल्याबद्दल इतकी कशी माहिती आहे? मेघ बद्दल त्यांना काय माहीत आहे? आपल्या बद्दल आणि मेघ बद्दल?.........." अनघाचा आपल्या मनाशीच संवाद चालला होता, ती जेव्हा सौ. कुलकर्णी ह्यांना भेटून आली तेव्हापासून ह्या विचारांनी तिच्या मनात खळबळ माजवली होती, आपणच मेघ पर्यंत जाण्याचे दोर कापून टाकले, आपल्या आयुष्यात आता मेघ दूरवर कुठेच नाही, पण तरीही............ इतक्यात अनघाच्या आईचा फोन आला, आणि तिला खुशीहली विचारत होती, अनघा फक्त हो म्हणत होती, पण तिच्या डोक्यातून सौ. कुलकर्णी आणि मेघ काही केल्या दूर होत नव्हते. " आई मी एकदम ठीक आहे, तू दिलेले लाडू, चकली सगळे मिळाले आहे, तू काळजी घे, स्वतःची आणि बाबांची देखील, मी फोन ठेवते." एवढे बोलून अनघाने आपला फोन बंद केला. आणि तिने घाईघाईने श्रीमती. कुलकर्णी ह्यांना फोन केला. अनघाचा फोन पाहून त्यांना आश्चर्य वाटले नाही, कारण त्यांना तेच अपेक्षित होते. "तुझ्या सगळ्या प्रश्नांची

उत्तर मी तुला देणार आहे, पण माझ्याही काही प्रश्नांना तुला उत्तरं द्यावी लागणार आहे, चल उद्या नेहमीच्याच कॉफीशॉप मध्ये संध्याकाळी ठीक सात वाजता, तुझे ऑफिस सुटल्यावर थेट ये, मी वाट पहाते, आपण सविस्तर बोलूया........." श्रीमती. कुलकर्णी ह्यांनी अनघा काही म्हणायच्या आत सगळं सांगून मोकळ्या झाल्या, आणि पुन्हा अनघा अनुत्तरित राहिली.

अनघा फक्त विचार करत होती, तिने स्वतःला पुन्हा भूतकाळात घेऊन गेली, मेघ च्या आठवणींनी पुन्हा तिचे मन गहिवरून आले, आता मेघ ने तिला पूर्णपणे व्यापून टाकले होते, त्याच्या आठवणींनी तिला एकदम व्याकुळ झाले होते. मग का आपण मेघ ला सोडले? आपण मेघ शिवाय राहू शकत नाही, आणि मेघ पण..... कदाचित...........

जसजसे दोघे यशाचे शिखरं मार्गक्रमण करत होते, त्यांच्या एकमेकांप्रती अपेक्षा हि वाढत होत्या, मेघ आज त्या कंपनीत एक यशस्वी सीईओ म्हणून कार्यरत होता, त्याच्या इतर कंपनीशी भेटीगाठी वाढत होत्या, आणि इतर स्त्रियांशी संबन्ध देखील, एका कंपनीची मार्केटिंग डिपार्टमेंटची हेड, मालिनी हि तर मेघ च्या अतिशय जवळ आली होती, मालिनी जणू पूर्णपणे त्याचा ताबा घेतला होता, आणि मेघ पण तिला जरा जास्तच जवळ करत होता, व्यावसायिक पातळीवर हे सगळं ठीक होतं, पण त्यांचे संबंध त्याही पलीकडे जाऊ पहात होते, मेघचा त्याला विरोध नव्हता, ह्यावरून मेघ आणि अनघा मध्ये वाद देखील झाला होता, अहंकाराची वेगळी नशा त्यावेळी मेघच्या मनावर होती, आणि मालिनीची धुंद करणारी अदा देखील, अनघाने आपण जॉब सोडत आहे, असे त्याला सांगितले पण तरीही त्याला त्याचे काहीच वाटले नाही, त्यांच्यातले इतके चांगले संबंध संपुष्ठात येत होते, त्या दोघांनी आयुष्यभर एकत्र राहण्याची वचनं एकमेकांना दिली होती, पण मेघ चे मालिनीशी असणारे संबंध आणि त्याची हि वर्तणूक मेघ आणि अनघाच्या नात्याला एका वेगळ्या वळणावर आणून ठेवले.

अनघाने ती कंपनी सोडली, आणि एक न संपणारा दुरावा त्या दोघांमध्ये आला, अनघाने दुसरीकडे जॉब करायला सुरवात केली, मालिनीचा प्लॅन हा वेगळा होता, तिच्या मनात होतं कि, मेघ ला आपल्या जाळ्यात ओढून त्याच्याकडून त्याच्या कंपनीची सगळी माहिती काढून घ्यायची, पण इथे उलटेच झाले, मेघ जरी मालिनीच्या जाळ्यात अडकलेला होता, पण तो हुशार होता, त्याने असा काही गेम खेळाला कि उलट मालिनीच तिची कंपनी सोडून, मेघ च्या कंपनीत मार्केटिंग हेड म्हणून जॉईन झाली, आणि पुन्हा एकदा सूत्र बदलली, एक नवा यशाचा टप्पा मेघ आणि त्याच्या कंपनीने गाठला, आणि तो कंपनीचा बेस्ट एम्प्लॉयी म्हणून पुन्हा एकदा निवडला गेला, त्याच्या सोबत मालिनी देखील ह्या अवॉर्ड साठी निवडली गेली होती, कंपनीने त्यांना बक्षीस म्हणून फॉरेन ट्रिप देऊ केली, तीही थेट मलेशियात.

मेघ च्या आठवणींनी अनघा ची झोप पुरती मोडली होती, तिच्या डोक्यातील विचार

चक्र काही केल्या थांबेना, सौ. कुलकर्णी आणि मेघ ह्यांच्या संबंधातील ताळमेळ तिला बसविता येईना.... सरतेशेवटी विचार करतच तिला कधी झोप लागली तिला देखील कळले नाही.......... सकाळी ती आवरून ऑफिस ला गेली खरी, पण तीच मन रमेना, सतत ती घड्याळाकडे पाहात होती, आणि ऑफिस सुटायची वाट पाहत होती, शेवटी ती इतकी वैतागली कि, तिने सरळ ऑफिस मध्ये हाफ डे टाकला आणि सरळ घरी आली...........

संध्याकाळी ती सात वाजता ठरल्याप्रमाणे कॉफी शॉप मध्ये पोहचली, सौ. कुलकर्णी तिचीच वाट बघत होत्या. “मी तुझीच वाट पहात होते ये बैस.” सौ. कुलकर्णी ह्यांनी तिला बसण्याची खून केली, आणि अनघा बसली, सौ. कुलकर्णी ह्यांनी अगोदरच कॉफीची ऑर्डर दिली होती, पण अनघाच्या मनातील घालमेल काही केल्या संपत नव्हती. तिची घालमेल आता दूर झाली पाहिजे असं सहजच श्रीमती . कुलकर्णींना वाटले.

“तुझ्या मनात चाललेली हि घालमेल आधी थांबावं, तुझ्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं मी तुला देणार आहे, “. श्रीमती. कुलकणी म्हणाल्या. त्यांच्या बोलण्याने तिला जरासा धीर आला. तोपर्यंत कॉफी आली होती. “ तू ज्याच्यावर इतकं जीवापाड प्रेम केलं, काय नाव बरं त्याचं... हा...... मेघ.” श्रीमती. कुलकर्णी म्हणाल्या. मेघच नाव ऐकताच, अनघाच्या संपूर्ण शरीराला घाम फुटला, श्रीमती. कुलकर्णी ह्यांनी तिला पाण्याचा घोट घ्यायला सांगितला. तिने पाणी पिले. “ जरा शांत हो, तुला प्रश्न पडला असेल कि मी मेघचे नाव कसे सांगितले?” श्रीमती. कुलकर्णी ह्यांनी सांगलीतले. “ मीच मेघची आई आहे” हे ऐकताच अनघाच्या पायाखालची जमीन सरकली. “मला तुझ्याबद्दल आणि मेघ बद्दल सगळं माहित होतं अगदी आधीपासून, मेघने मला आगोदरच तुझ्याबद्दल सांगिलते होते, मलाही तुला भेटण्याची उत्सुकता होतीच.” श्रीमती. कुलकर्णी अनघाला म्हणाल्या.

अनघा एकदम रडू लागली, श्रीमती. कुलकर्णी तिला धीर देत राहिल्या..................

“मला तुमच्यात भांडण का झालं हे हि माहित आहे, ह्यात सगळी चुकी मेघची आहे, त्याने तुला समजावून घ्यायला हवं होतं, जेव्हा एखादी स्त्री एखाद्यावर जीवापाड प्रेम करते, तेव्हा ती आपलं सर्वस्व त्याला अर्पण करत असते, त्याच्या पुरुषीअहंकारापुढे, त्याने तुझा स्वाभिमान जपला नाही, ह्याच वाईट वाटत, मी त्याला बोलले, त्याला समजावून सांगलीतले, मला खूप वाईट वाटले, माझ्या वेड्या मेघला तूच संभाळू शकते, अनघा” एवढं बोलून, त्यांनी अनघाचा हात हातात घेतला. अनघाला खूप मोकळं झाल्यासारखं वाटलं

“तुला ठाऊक आहे अनघा, तुमच्यातल्या दुराव्याच कारण काय आहे ते? तुमच्यातला संपलेला संवाद, तुम्ही एकमेकांपासून दूर गेला खरं, पण त्यांनतर तुम्ही

एकत्र येऊन एकमेकांशी बोलला का? नाती अशीच सहज तुटत नसतात, त्याला जपणं हीच तर नात्यांच्या तारेवरची खरी कसरत आहे, मेघ चुकला, अगदी १०० % चुकला, पण तू देखील त्याच्याशी एकदा बोलायला हवं होतं, तुम्ही आजकालची मुलं ना, एका झटक्यात सगळं सौडून देतात, तुम्ही एकमेकांशी व्यवस्थित बोला, एकमेकांना वेळ द्या, तुझ्या मनात असेलच कि ती मालिनी कुठे गेली.......... मालिनी शिफ्ट झाली कायमची अमेरिकेत, तिने देखील लग्न केलं, तीच मेघवर प्रेम नव्हतच मुळी......... जाऊ दे, जे झालं ते झालं, आता तुम्ही सविस्तर बोला." एवढं बोलून श्रीमती. कुलकर्णी आपल्या जागेवरून उठल्या, आणि त्या मेघला घेऊन आल्या, मेघला बघितल्यावर, अनघाचे सगळे पूर्वग्रह गळून पडले, आणि तिच्या डोळ्यांत अश्रू दाटून आले, तिच्या मनातील मेघ बद्दलचे सगळे गैरसमज आता दूर झाले होते.

श्रीमती. कुलकणी ह्यांनी मेघला तिच्या समोर बसविले, आणि आता एकमेकांशी अगदी मनमोकळं, स्पष्ट बोलायला सांगितले. "तुम्हा दोघांची भेट घडवून आणणं हे माझ्या हातात होतं, आता ह्या भेटीचं सोन कस करायचं हे तुमचं तुम्ही ठरवा, तुमच्यातला दुरावा निर्माण झाला आहे, तो एकमेकांशी मनमोकळेपणाने बोलून दूर करा, गैरसमज दूर करा, संवाद झाला तर तो नक्कची चांगल्या मार्गाने सुरवात करायला लागतो, सगळं बोला, आणि एकमेकांबद्दलचा गैरसमज दूर करा, आणि पुन्हा एकत्र या... अगदी कायमचे......... त्यासाठी एकमेकांशी सविस्तर बोला....." एवढं बोलून श्रीमती. कुलकर्णी तेथून जाऊ लागल्या, त्यांना एक आत्मविश्वास होता, कि आता मेघ आणि अनाघामधले सगळे कच्चे दुवे गळून, त्यांचं नातं पुन्हा नव्याने बहरून जाईल, जातांना त्यांनी मागे वळून बघितले, आणि अनघाला हात वर करून शुभेच्छा दिल्या, अनघाच्या चेहऱ्यावर देखील आनंदच हास्य फुललेलं होतं, तिच्या चेहऱ्यावर गैरसमजाचे कोणतेच भाव नव्हते...

हि नांदी होती का मेघ आणि अनघाच्या नवीन नात्याच्या सुरवातीची....

**- संदीप काजळे / नाशिक**
**मो.- 8830257267**

# धाव , राजा धाव



धाव, राजा धाव रे सत्वरी
बाप्पा भिती दाटली उरी || ध्रु.||

घपले लफडे अगणित केले
खून, खंडणी बलात्कार झाले अन्
आडवी तिडवी माया सावडून बनलोय रे कारभारी. || ध्रु. ||

घडी लावून आमदार झालो
हात धरुनी खासदार झालो अन्
पैसा पेरुन मंत्री बनून
गोदाम भरली रे गोजीरी || ध्रु. ||


सीबीआय सीआयडीच्या भारी तुझ्या तलवारी
म्हणून चळकाप सुटलाय भारी तरी

कमळ धरितो करी बाप्पा
लावू नको मागे इडीची रे कुत्री.

धाव, राजा धाव रे सत्वरी
बाप्पा भिती दाटली उरी.

- आनंद कदम / नांदेड
मो.- ९८८१७८७६८४

# महत्त्व संस्काराचे



विश्वातील प्रत्येक जीव हा संस्काराचाच एक पुंज असतो. मग ते संस्कार कोणत्याही प्रकारचे असोत.

आज येथे आपणास केवळ मानवाच्या संस्कारासंबंधीचाच उहापोह अभिप्रेत असल्याने त्याचाच प्रामुख्याने मागोवा घेणे प्रशस्त ठरेल.

एखादी विशिष्ट गुणसंपन्न व्यक्ती जेव्हा आपण नजरेसमोर ठेवतो व त्याच्या विद्यमान गुणदोषांची छाननी करतो तेव्हा हे मान्य करावे लागते की त्याच्या मन वचन कायेवरचे आढळणारे संस्कार ही काही केवळ एकाच जन्माची किंवा वातावरणाची देणगी नाही, किंवा परिपाक नाही. त्यामागे बराच मोठा इतिहास, परिस्थिती, वातावरण ही जबाबदार आहे.

या सर्व परिस्थितींचा मागोवा आपणास घ्यावयाचा आहे. कारण त्याशिवाय त्या संस्काराचा कार्यकारण संबंध सिद्ध होणार नाही. संस्काराचे माध्यम मन-वचन-काय हे असले तरी शेवटी ते आत्म्यावरच पडत असतात परिणामतः त्याची अभिव्यक्ती किंवा त्याचे प्रतिबिंब मात्र पुन्हा मन-वचन-कायेच्या माध्यमातून प्रगट होतात.

सामान्य किंवा वैशिष्ट्यपूर्ण मानवाच्या अंतरंगातील विविध पैलूंचे सूक्ष्म विश्लेषण केल्यास असे आढळते की विद्यमान संस्कार ही काही त्यांची याच जन्माची व्यक्तीशः त्यांचीच मिळकत नाही. त्याला अनेक कारणे जबाबदार आहेत.

गेल्या अनेक जन्माचे संस्कार.
मातापित्याचे संस्कार (अनुवंशिकता)
वातावरणाचे संस्कार
सुयोग्य संस्कार

**गेल्या अनेक जन्माचे संस्कार –**

आत्म्याचे अस्तित्व अनादि अनंत आहे, व ते स्वयंभू आहे. स्वयं प्रेरित व स्वयं नियंत्रित आहे हे नितान्त सत्य विश्वसत्य (युनिव्हर्सल टूथ) आहे.

मानव किंवा प्रगत पशुमध्ये जे स्वभाव विशेषांचे बौछिक प्रमाण आढळते त्याला त्याच्या पूर्वीच्या काही जन्माच्या किंवा बहुभाग जन्मातील संस्कार जबाबदार असल्याचे आढळून येते.

प्रथम मानवासंबंधीच्या अशा घटना पाहू-

अगदीच बाल्यावस्थेत सामान्यतः न आढळणारा गुणोत्कर्ष काही फारसे पूर्व शिक्षण न घेताही काही व्यक्तींमध्ये प्रकर्षाने आढळतो. त्याला दृश्य किंवा प्रगट अशा

कोणत्याही सामुग्रीची पार्श्वभूमी लाभलेली नसते. मग हे बौद्धिक, शारीरिक किंवा कल्याणात्मक प्रौढपण त्याच्या ठिकाणी आले कोठून व कसे?

याचे एकच उत्तर असू शकते व ते म्हणजे गेल्या काही जन्मात किंवा मागल्या जन्मात त्याने गुणांसाठी केलेले संस्कार आणि घेतलेले परिश्रम. अशी वैशिष्ट्ये आपणा सभोवतालच्या अनेक व्यक्तींमध्ये आढळत असल्याचे प्रत्ययास येते. इतिहासात डोकावल्यास अशा काही वेगवेगळ्या क्षेत्रात गाजलेल्या व्यक्ती दृष्टीसमोर येतात.

उदाहरणार्थ : संत ज्ञानेश्वरांनी अगदी कोवळ्या वयात ज्ञानेश्वरीची रचना केली. ती इतकी प्रौढ व प्रतिभासंपन्न ठरली की थोरामोठ्यांनी ती जमली नसती ही प्रज्ञा त्यांना गेल्या जन्मीच्याच तत्वभ्यासाने लाभली असावी. यापेक्षा दुसरा खुलासा कोणता?

अल्बर्ट आईनस्टाईनने वयाच्या १८व्या वर्षीच युक्लिड, न्यूटन वगैरेंच्या सिद्धांतात कौशल्य संपादन करून साऱ्या विज्ञान जगताला प्रभावित करणाऱ्या सापेक्षवादाचा सिद्धांत २६व्या वर्षी बहाल केला.

रवींद्रनाथ टागोरांनी १६व्या वर्षी पदावली हे काव्य लिहून साऱ्या बंगालमधील बुद्धिवंतांना आश्चर्यमूढ केले.

महान विश्वविजेता सिकंदर केवळ वयाच्या १७व्या जग जिंकायला निघाला व त्यात यशस्वी झाला.

व्हायोलीन वादक यहुदी मेन्युहीन वयाच्या ७व्या वर्षी श्रेष्ठ वादक ठरला. वयाच्या तिसऱ्या वर्षीच त्याने आपले कौशल्य प्रगट केले होते.

***

मानवाप्रमाणेच पशुवर देखील हे संस्कार आपली संगती व सातत्य कसे राखून ठेवतात याचीही उदाहरणे मधूनमधून वर्तमान पत्रात वाचायला मिळतात. त्यावरून पूर्व जन्मीचा बोध होतो. पूर्व संस्कारासह दिसून येतात.

उदाहरणार्थ : गोहाटी येथील सरकारी अधिकाऱ्याजवळ एक कुत्रा होता तो पौर्णिमा, अमावस्या व एकादशीला पूर्ण उपवास करीत असे.

बस्तर येथील भैरवनाथाच्या मंदिरात पूजेच्या वेळी एक कुत्रा नियमितपणे हजर असे. प्रतिमेसमोर प्रतिदिन एक तास डोळे मिटून ध्यान करी, सात प्रदक्षिणा घाली नंतरच अन्नाला स्पर्श करी.

देहराडूनच्या तपोवन आश्रमातील एक कुत्रा एकादशी व्रत करी त्याने सबंध आयुष्यात मांसाला तोंड लावले नाही.

तामिळनाडूतील रामनाथपूरच्या पश्चिमेस एक (डोंगर) टेकडी आहे. तिचे नाव चंदूरगिरी तेथे शंकराचे देवालय आहे, त्याठिकाणी एकच दात असलेला हत्ती नियमितपणे येऊन मानवाप्रमाणे मस्तक जमिनीवर टेकवून नमस्कार करी सोंडेच्या हालचालीने आरती करी. कोणाला कधी त्याने उपद्रव दिला नाही. मे १९७१मध्ये हा हत्ती मरण पावला. आजही तेथे त्याचे स्मारक आढळते.

या अलीकडच्या उदाहरणांवरून असा निष्कर्ष निघतो की हे प्राणी पूर्वजन्मी मानवप्राणी होते. व त्यांच्या आराध्य दैवताचे पूजा-आरतीचे संस्कार त्यांच्यावर अद्यापही कायम होते.

पुराणात अशी असंख्य उदाहरणे आहेत. प्रत्येक प्राणाच्या मूळ स्वभाव असणे म्हणतात व तो केव्हातरी व कुठेही बदलत नाही अशी ठाम समजूत असते. हा मूळ स्वभाव गेल्या एक किंवा अनेक जन्मातील संस्काराचाच पण असा काही दृढ समूह असतो की त्याचे प्राबल्य कमी करणे कठीण असते. तथापि ते अशक्य असते असे मात्र समजू नये, त्यावर मत करणारा पुरुषार्थ व आत्मबल प्रत्येक मनुष्याजवळ असतो व तो त्यातून मार्ग काढतोच.

**मातापित्याचे संस्कार -**

'गवयाचे पोर तालासुरात रडताना आढळतो.'

ही म्हण खूपच प्रचलित आहे. जसे मासळीच्या पिलांना पोहणे शिकवावे लागत नाही असे ही बोलले जाते. मानव असो की प्राणी असो या सगळ्यामध्ये योनि परत्वे काही अनुवंशिकता अपरिहार्यपणे उतरतेच, मुल जन्मतःच मातेच्या स्तनपानासाठी धडपडते हा पूर्वसंस्काराचाच परिपाक आहे. अशा पुष्कळ गोष्टी न शिकवता, न सांगताच वैशिष्ट्यानुरुप येतात. काही प्रगत व बुद्धिमान प्राणी नव्या संस्कारांनी विभूषित होऊन मानव सदृश वैशिष्ट्ये प्रगट करतात, तेथे पुरुषार्थ कधी कधी अनुवंशिकतेवर मात करतानाही आढळतो.

चीम्पांजी, हत्ती, अस्वल इ. प्राणी यात येतात. पण असे असले तरी त्यांचेवर करावयाच्या संस्काराला विशिष्ट मर्यादा पडते.

एकूण काय तर मातापित्याच्या संस्काराची घनता पशु योनीमध्ये मानवाच्या तुलनेत अधिक असते.

मानवाचे तसे नाही असे जरी म्हणता यायचे नाही तरी मातापित्याचे सुसंस्कार ग्रहण करून त्यांचे कुसंस्कार दूर करण्या इतपत विवेकशीलता त्याला लाभू शकते आणि म्हणूनच सहस्त्र प्रयत्नाने अनुवंशीकते सोबत आलेले सद्गुण राबवून किंवा संवर्धित करून कुसंस्काराचा एवं दुर्गुणांचा त्याग करण्याच्या पुरुषार्थाला पुष्कळच वाव प्राप्त होतो.

पिढ्यानपिढ्याच्या वैद्याचा मुलगा साक्षात उपजत धन्वंतरी, गवयाचा मुलगा बालगंधर्व, पहिलवानाचा मुलगा रुस्तमेआलम, तत्वेत्याचा मुलगा ज्ञानदेव आढळतो तो त्या मातापित्यांच्या संस्कारामुळे.

आपली संतती कोणत्या एका सद्गुणाचा, कलेचा, विद्येचा वारसा घेऊन जन्मावी हे सर्वथा नसेल तर बऱ्याचअंशी मातापित्याच्या संस्कारावर व ते मातापिता मुलांच्यावर शत प्रयत्नाने करू इच्छिणाऱ्या विशिष्ट संस्कारावर अवलंबून असते हे आधुनिक

मानसशास्त्र देखील खुल्या दिलाने मान्य करतात. ज्या मातापित्यांना या गोष्टींची जाणीव नाही त्यांची संतती काहीतरी, कशीतरी निर्माण होते. चारचौघासारखे सामान्य जीवन जगते व यथाकाल जन्म संपवते.

आपल्या पोटी जन्माला आलेला मुलगा गेल्या जन्मीचे कसले संस्कार घेऊन आला आहे याची तमा न बाळगता आपल्या स्वाधीन जे आहे ते सर्व करीतच राहिले पाहिजे. अत्यंत निरलसपणे व सातत्याने ही जाणीव ज्या मातापित्यांना नाही त्यांनी कृपया मातापिता होण्याचे पातक करु नये. मातापिता हे सुशिक्षित, सुसंकृत, विवेकी, सुजाण असतील तर ते जन्मास येऊ घातलेल्या मुलामुलीवर मातेच्या पोटात प्रवेशताना त्यावर सुयोग्य सुसंस्कार करीत राहतील. आपला मुलगा उत्तम डॉक्टर व्हावा, वकील व्हावा, अनुशासक व्हावा की धर्मात्मा व्हावा हे त्यांनी ठरविले पाहिजे व त्या दृष्टीने मातेने त्या त्या विषयाचे वाचन-मनन-अध्ययन, अध्यापन करीत राहिले तर जन्मणारे बालक त्या संस्काराने प्रेरित होऊन योग्यवेळी त्या त्या विषयात लोकोत्तर व्यक्ती म्हणून उदयास येईलच. मग त्याला पूर्वजन्म संस्काराचे बळ कमी अधिक का असेना या चालू संस्काराचे बळ अधिक असेल तर ते पूर्वजन्म संस्कारावर देखील काही अंशाने मत करु शकेल. ही जाण ज्या मातापित्यांना नाही त्याच्या पोटी जन्मलेली संतती पूर्वसंचिताप्रमाणे जे काही विधिलिखित घेऊन येईल तसे सामान्य जीवन जगेल, ते जीवन आहार, निद्रा-भय-मैथुन असे पशुप्रमाणेही असू शकेल, तसे झालेच तर हा श्रेष्ठ कुलातील जन्म, निर्व्यंग शरीर प्राप्त झालेला चांगला धर्म, सुभिक्ष, निर्दोष बौद्धिक दर्जा सर्व काही व्यर्थ जाईल. तसे न व्हावे असे वाटत असेल तर प्रत्येक मातापित्यावर आपल्या बालकांना सुसंस्कृत करण्याची जबाबदारी येते. ती जन्मानंतर ते मुल प्रौढ होई पर्यंत जर नीट पार पडली नाही तर ते मातापिता त्या मुलाचे शत्रू ठरतात.

**सुयोग्य वातावरण :**

दुर्दैववश बरेचशे मातापिता बालपणी अर्धशिक्षित व अनुकुलता न लाभल्यास अशिक्षित-असंस्कृत असे राहिलेले असतात हे जरी खरे असले तरी त्यांना त्यांची मुले त्यांच्या सारखीच मागासलेली न रहावीत असे तीव्रतेने वाटत असते त्यासाठी ते वाटेल ती गैरसोय, आर्थिक कुचंबना सोसूनही मुलांना चांगल्या ठिकाणी ठेवण्यासाठी जीवापाड परिश्रम करीत असतात. दुर्दैववश आमचे झाले ते आमच्या मुलांचे होऊ नये याची जाणीव त्यांना त्रस्त करीत असते परिणामत: चांगले वातावरण-सुसंस्कार कोठे उपलब्ध होतील याचा शोध सुरु होतो.

आजकाल ज्या सरकारी किंवा निमसरकारी शिक्षण संस्था अपरिमित संख्येत चालू आहेत, त्यातून बाहेर पडणारे पदवीधर पाहिले तर सुसंस्कार संपन्नतेच्या अपेक्षेने, दारुण निराशाच पदरी पडते. व्यसनाधीनता, धार्मिक व नैतिक मुल्यांची पायमल्ली, निर्लज्जपणा, भोगलोलूपता, उथळपणा यांचेच थैमान विद्यार्थी जगतात अधिक

आढळते. त्यातल्यात्यात राज्यकर्त्यांची स्वार्थलोलुपता, सत्तालालसा, भ्रष्टाचार यांचीही छाया त्यांच्यावर कळत न कळत पडतच असते अशा वेळी सुसंस्कारासाठी निराळे ठिकाण निवडणे प्राप्त होते.

संस्कार संपन्नतेसाठी गुरूगृही निवास अरण्याश्रम निवास हे भारतीयांसाठी तरी नवीन नाही. ती आपली सहस्त्रावधी वर्षापासूनची परंपराच आहे. अशा एखाद्या गुरुकुलातच सुसंस्कार होऊ शकतात. हे लक्षात घेऊन अशी गुरुकुले स्थापन करण्याचा प्रयत्न सुरु झाला.

संस्कार दोन्ही प्रकारचे असू शकतात. सुसंस्कार व कुसंस्कार दुर्जनांच्या किंवा ज्यांना उच्च नीतिमूल्यांचा कधी स्पर्शच झाला नाही अशांच्या सहवासात राग द्वेषाचीच पेरणी होते या उलट सज्जन संत लोक यांच्या सहवासात होणारे ते सुसंस्कार येथे विवेकपूर्णता समजावून दिली जाते.

**- डॉ. प्रवीणकुमार वैद्य / जयसिंगपूर**
**मो.- 9766581353**

**(- लेखक, व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंक २०१७ च्या अतिथी संपादक आहेत.)**



# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव



गौरव हा भारताच्या अभिमानाचा,
सोहळा स्वातंत्र्याचा अमृत
महोत्सवाचा.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव,
पार झाली पंच्याहत्तरी
अभिमानाने आज तिरंगा
उंच फडकला घरोघरी

आपुल्या देशाचा
अभिमान व सन्मान
तिरंगा आपुली
आन बाण अन शान

स्वातंत्रवीरांना करूया
शत-शत प्रमाण
त्यांच्या निस्वार्थ त्यागानेच भारत
बनला महान

मिळाले स्वतंत्र छान
तयांनी दिली आपली जान
गावूनी वंदे मातरम गान
करू वीरांना प्रणाम

राहू सारे एक
दिलाने
मोडून
जातीपाती
हृदयातूनी नित्य जपावी
भारतमाता अंतरी

भारत मातेची शुद्ध प्रतिमा
मनावरी कोरून ठेवू
तिरंगा आपुला अभिमानाने
घरोघरी उंच फडकवू

भारत देश सर्वांची शान
जगी भारत देश महान



**- अंजली राजकुमार पाटील / विटा**
**मो.- 9527897213**

# हे असं आहे



काल गांवात गेलो , साऱ्यांनी रामराम केला ,
पाठ वळली,कुजबूजीत धिक्कार केला |

पहाट झाली, पाखरांनी सुस्वर गायला
एक गिधाड आले,त्याने खुला संहार केला |

हसरी फुलं गंध उधळत होते दारी शिवारी
रक्षकांनीच दिवसा केला बलात्कार जबरी |

बघा देऊळी जरी उभा आहे देव निरंकारी
खेळ ईष्काचे समोर त्याच्या खेळतोय पुजारी |

काल साऱ्यांनीच केले होते व्रत एकादशीचे
आज पायदळी घेता आहेत तुळशी मंजिरी |

असे जगत आहेत सारे करून उधारी
बुवा म्हणे ,तुम्ही कुटा टाळ आम्ही खातो शिदोरी |

- काशिनाथ भारंबे / भुसावळ
मो.- 9272303212

# लोकसंख्या



पाऊस नाही पाणी नाही
खायला पुरेसे अन्न नाही
आत्महत्या चालू आहेत
.... लोकसंख्या वाढतेच आहे

दारूत भेसळ सुरु आहे
तरीही लोक पित आहेत
मरत आहेत रडत आहेत
.... लोकसंख्या वाढतेच आहे

मुलगा मुलगी समान आहे
घोष कानी येतो आहे
तरी मुलगाच हवा आहे
.... लोकसंख्या वाढतेच आहे

नियोजनासाठी मंत्री आहे
नियोजन लक्ष गाठले आहे
साधने सगळी वाटली आहेत
.... लोकसंख्या वाढतेच आहे

नियोजन धर्माविरुद्ध आहे
एकपत्नी कायदा तुमचा आहे
आमच्यात सगळी मुभा आहे
.... लोकसंख्या वाढतेच आहे

- मोहन वैद्य / डोंबिवली
मो.- 98922 26671

# खंत



मिळतील इथेही भ्रष्ट, काही नतद्रष्ट,
वागतील खाष्ट, परि तू शांतऽऽ

म्हणतील स्वतःला श्रेष्ठ, तरीही दुष्ट,
सांगतो गोष्ट, रहा निश्चिंतऽऽ

देतील कधी ना साद, घालतील वाद,
सोड तू नाद, अशा व्यक्तींचाऽऽ

करतील कुणा फिर्याद, कुठे प्रतिवाद,
नको संवाद, अशा नात्यांचाऽऽ

सोडून सदाची लाज, केवढी खाज,
कशाला माज, एवढा धरतीऽऽ

शृंगार करुनी साज, वरुनी बाज,
फुका आवाज, केवढा करतीऽऽ

वागतो असा की संत, दिखावू पंत,
नसे गुणवंत, केवढा तोराऽऽ

ना असे मनाची खंत, कशाची भ्रांत,
जगे खूशवंत, पिटे धिंडोराऽऽ

दाटला मनी अंधार, भुईला भार, बुद्धी
बाजार, कशाला करशीऽऽ

ठोकून विद्येचे दार, विवेकी मार, सुज्ञ
विचार, जीवनी सरशीऽऽ
जीवनी सरशीऽऽ
जीवनी सरशीऽऽ

**- विजय जोशी / डोंबिवली (पूर्व)**
**मो.- ९८९२७५२२४२**

# प्रयत्न

दोष का देती मग दैवावरती
प्रयत्न हाच मार्ग खरा जगती ।।धृ।।

मुंग्या अन्न वाढवी वारुळात
मधु साठवी मक्षिका घटात
तयांच्या कार्याची तळमळ किती ॥१॥


उतरून येती खग अंगणी
गुंजारव करी भृंग सुमनी
जीवनी लक्ष्य प्रेम महती किती ॥२॥

मौक्तिक कसे निर्मे शिंपल्यात
वृक्ष कैसा लपे एका बीजात
करणी निसर्गे फलद्रूप होती ||३||

नाही देई हरी पलंगावरी
का मानवा शिकस्त ना करी
चल ऊठ होईल कर्मसंस्कृती ।।४।।


**– प्रा. संपतराव माणिकराव गर्जे / पुणे**

# - दिवाळी अंक २०२२ -



व्यक्तिमत्व विकास
दिवाळी अंक २०२१


व्यक्तिमत्व विकास


व्यक्तिमत्व विकास
दिवाळी
अंक
2019


व्यक्तिमत्व विकास


व्यक्तिमत्व
विकास
दिवाळी अंक


व्यक्तिमत्व
विकास
दीपावली
विशेषांक